
पुरोगामी जनगर्जना

लोकनेते भाई वैद्य विशेषांक

मे–जून २०१८, पुणे, वर्ष: ४, अंक: ६
पृष्ठ संख्या: १२८, ₹ २००



लोकनेते भाई वैद्य: अल्प परिचय

भालचंद्र सदाशिव वैद्य

✻२२ जून १९२८ - २ एप्रिल २०१८✻

✻शिक्षण- बी.ए. बी.टी. (१९५२) एम.ए. समाजशास्त्र एम.ए. राज्यशास्त्र (१९७२)✻

✻१९४३ साली राष्ट्र सेवा दलात सामील झाल्यापासून 'लोकशाही समाजवादी'
विचारधारा स्वीकारली आणि अखेरपर्यंत ती निष्ठा जपली.✻

चळवळींमध्ये सहभाग आणि तुरुंगवास

✻१९४२ साली शालेय जीवनात चलेजाव चळवळीमध्ये सहभाग.✻

✻१९५५ मध्ये गोवा स्वातंत्र्य चळवळीमध्ये दुसऱ्या तुकडीत सहभाग आणि जबर मारहाण.✻

✻१९५७ साली संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग व तुरुंगवास.✻

✻१९६१ साली कच्छ सत्याग्रहामध्ये भुज ते खावडा पद यात्रा व सहभाग.✻

✻१९७४ ते १९७७ या दरम्यान आणीबाणीमध्ये मिसाबंदी म्हणून १९ महिने तुरुंगवास.✻

✻१९८३ मध्ये जनता पार्टी अध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी ते दिल्ली पार पडलेल्या
भारत यात्रा मध्ये ४००० किलोमीटर पदयात्रा पार पाडली.✻

✻सुमारे २५ वेळा सत्याग्रह व तुरुंगवास.✻

✻शेवटचा सत्याग्रह व अटक डिसेंबर २०१६ वयाच्या ८८ व्या वर्षी शिक्षण हक्कांसाठी.✻

आयुष्यभर लेखन

✻एका समाजवाद्याचे चिंतन, मंडल आयोग व अन्य मागासवर्ग, समाजवाद,
संपूर्ण शिक्षण: फी विना समान व गुणवत्तापूर्ण: का व कसे, आर्थिक आक्रमणाचे अरिष्ट (भाषांतरित)
परिवर्तनाचे साथी व सारथी, शब्दांमागचे शब्द आदी. प्रसिद्ध.✻

✻मंडलआयोग व राखीव जागा.✻

✻संघाचा असली चेहरा.✻

✻शिक्षण सर्वांना मोफत, समान आणि गुणवत्तापूर्ण.✻

अनुवाद

✻समाजवाद काल, आज आणि उद्या, जागतिकीकरणाचे आर्थिक आरिष्ट्य
समाजवाद, जागतिकीकरण, शिक्षण, जातिनिर्मुलन आदी विषयांवरील २५० पेक्षा जास्त लेख.✻

३५ प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त. त्यातील प्रमुख–

✻राजर्षी शाहू जीवन गौरव✻

✻पुणे विद्यापीठ जीवन गौरव✻

✻महर्षी पुरस्कार✻

✻पुण्यभूषण✻

जाहीर आवाहन

पुरोगामी जनगर्जना मासिकासाठी निधी उभारणी

आरोग्य सेना या संघटनेतर्फे पुरोगामी जनगर्जना मासिक गेली तीन वर्षे पुण्यातून प्रकाशित होत असून हे मासिकाचे चौथे वर्ष आहे.

सामाजिक हेतूने चालविल्या जाणाऱ्या या मासिकाची वार्षिक वर्गणी उत्पादन खर्चाच्या तुलनेत अल्प आहे. परंतु अशा कार्यात व्यावहारिक मर्यादांमुळे अडथळे येऊन ते मध्येच बंद पडण्याची शक्यता असते.

आरोग्य सेनेचे कार्यकर्ते हे मासिक चालू राहावे यासाठी प्रयत्नशील असतात. मात्र हे मासिक सामाजिक जबाबदारी मानणाऱ्या व्यक्तींच्या, मोठ्या संख्येने, सहकार्याने पुढेही चालू राहावे यासाठी निधी संकलन करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आरोग्य सेना ही प्रामुख्याने गेली २३ वर्षे आपल्या देशावर कोसळणाऱ्या विविध नैसर्गिक आणि मानव निर्मित आपत्तींमध्ये फार मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय मदत कार्य करत आहे. त्याचबरोबर ही संघटना सर्वसामान्य जनतेला आपत्कालीन वैद्यकीय मदत कार्याचे प्रशिक्षणही देण्याचे काम करते. हे सर्व काम मोफत केले जाते. आरोग्य सेनेच्या देशातील ८ राज्यांमध्ये शाखा असून १४ हजार प्रशिक्षित सैनिक आहेत.

या व्यतिरिक्त 'आरोग्य सेना' 'आरोग्य' या शब्दाची व्यापक व्याख्या करून सार्वजनिक, सामाजिक आरोग्याच्या अनेक प्रश्नांवरही कार्य करीत आहे. अशाच सामाजिक भावनेने पुरोगामी जनगर्जना मासिकाप्रमाणेच स्मिता पाटील आंतरराष्ट्रीय चित्रपट व माहितीपट महोत्सवाचेही आयोजन संघटना गेले सहा वर्षे करीत आहे. या महोत्सवासाठी किमान ८० देशांमधून अत्यंत दर्जेदार लघू व माहितीपट येतात.

आरोग्य सेना, कोणत्याही सरकारी वा परकीय संस्थांकडून देणग्या स्वीकारत नाही. मात्र व्यक्तिगत हितचिंतक आणि भारतातील समविचारी संस्थांकडून देणग्या स्वीकारल्या जातात.

आपण आरोग्य सेनेला देणगी देऊन या सामाजिक कार्याला हातभार लावावा; जेणेकरून हे मासिक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत दर्जा राखून पोचवता येईल, ही आपल्याला विनंती.

आरोग्य सेनेला देणगी देण्यासाठी पुढील खात्यावर ऑनलाईन व्यवहार करून त्याचा तपशील आपण इमेलवर कळवू शकता किंवा कार्यालयात प्रत्यक्ष 'आरोग्य सेना' या नावे धनादेश देऊ शकता. आरोग्य सेना ही संघटना एस.एम.जोशी मेमोरियल मेडिकल असोसिएशन या विश्वस्त संस्थेअंतर्गत चालविली जात असल्याने या देणग्या ८० जी अंतर्गत ५०% आयकर मुक्त आहेत.

बँक तपशील
खाते नाव: आरोग्य सेना
बँक नाव: बँक बँक ऑफ बडोदा
शाखा: सुभाषनगर, पुणे
खाते क्रमांक: 07910100006583
खाते प्रकार : सेविंग्ज
IFSC कोड: BARB0SUBHAS

आपले नाव, संपर्क व ट्रान्स्फर केल्याची पावती येथे पाठवावी-
इमेल: puja.monthly@gmail.com
arogyasena@yahoo.co.in
धनादेश द्यायचा झाल्यास
आरोग्य सेना या नावे लिहावा.

कार्यालयात प्रत्यक्ष भेट द्यायची असल्यास-
पत्ता: आरोग्य सेना राष्ट्रीय मुख्यालय, सणस प्लाझा, बाजीराव रस्ता, पुणे ४११००२
दूरध्वनी ०२०२४४३०२८, ९०११०५९०६० (स. १० ते ५.३०) रविवारी बंद

देणगी ८० जी अंतर्गत ५०% आयकर मुक्त आहे.

पुरोगामी जनगर्जना

मे-जून २०१८, पुणे, वर्ष: ४, अंक: ६, पृष्ठ संख्या: १२८, ₹ २००

संपादक : डॉ. अभिजित वैद्य

कार्यालयाचा पत्ता- 'पुरोगामी जनगर्जना', आरोग्य सेना राष्ट्रीय मुख्यालय, १० सणस प्लाझा, बाजीराव रोड, पुणे-४११००२
संपर्क: ०२०-२४४७३०२८ email : puja.monthly@gmail.com

पुरोगामी जनगर्जना मे-जून २०१८


समन्वय:
इम्प्रिंट, मिडिया ॲन्ड पब्लिशिंग, पुणे

मुखपृष्ठ, अक्षर मांडणी:
बिगफूट डिझाईन

मुद्रण:
दिशा पब्लिकेशन

'पुरोगामी जनगर्जना':
वार्षिक वर्गणी ₹ ३३०. पोस्टेजसह.
एकूण एका वर्षात दिवाळी विशेषांकासह ११ अंक.
(दिवाळी विशेषांक हा दोन महिन्यांचा एकत्र जोड अंक असेल.)
वार्षिक वर्गणी तसेच जाहिराती संबंधी चौकशी व व्यवहारासाठी
संपर्क- रमाकांत सोनवणी :
मोबाईल- ९५०३७५३०४५

भाईंच्या स्मृतीचित्रांचे दालन... ६१-६८



अनुक्रमणिका

आदरांजली
(लेखांचा क्रम लेखकांच्या नावांच्या इंग्रजी अद्य अक्षरांनुसार)

पुरोगामी जनगर्जना

मे-जून २०१८, पुणे, वर्ष: ४, अंक: ६, पृष्ठ संख्या: १२८, ₹ २००

संपादक : डॉ. अभिजित वैद्य

कार्यालयाचा पत्ता- 'पुरोगामी जनगर्जना', आरोग्य सेना राष्ट्रीय मुख्यालय, १० सणस प्लाझा, बाजीराव रोड, पुणे-४११००२
संपर्क: ०२०-२४४७३०२८ email : puja.monthly@gmail.com

पुरोगामी जनगर्जना
मे-जून २०१८

'पुरोगामी जनगर्जना':
वार्षिक वर्गणी ₹ **३३०. पोस्टेजसह.**
एकूण एका वर्षात दिवाळी विशेषांकासह ११ अंक.
(दिवाळी विशेषांक हा दोन
महिन्यांचा एकत्र जोड अंक असेल.)
वार्षिक वर्गणी तसेच जाहिराती
संबंधी चौकशी व व्यवहारासाठी
संपर्क- रमाकांत सोनवणी :
मोबाईल- ९५०३७५३०४५

अनुक्रमणिका

❊ निवेदन आणि सूचना ❊

२ एप्रिल २०१८ रोजी आदरणीय **भाई वैद्य** यांचे निधन झाले. त्यांना आदरांजली म्हणून पुरोगामी जनगर्जना मासिकाने भाईंवर विशेषांक प्रसिद्ध करण्याचे ठरविले. भाई आमचे वाचक आणि मार्गदर्शक होते. पुरोगामी जनगर्जनेच्या माध्यमातून आम्ही नेहमीच समतेचा- पुरोगामी विचार पुढे घेऊन जात असतो. आपल्या समोर हा विशेषांक घेऊन येताना भाईंचे विचार आपल्या सर्वांना पुढे घेऊन जायचे आहेत याचेही स्मरण आणि जबाबदारी वाटते आहे. त्यांच्यावरील लेखांचा हा विशेषांक आपणास आवडेल व आपल्याला मार्गदर्शक ठरेल अशी आशा करतो.

याबरोबरच एक सूचना अशी की, हा विशेषांक हा मे आणि जून महिन्याचा जोड अंक म्हणून निर्मिला असल्याने **जून महिन्याचा स्वतंत्र अंक प्रसिद्ध होणार नाही याची सर्व वर्गणीदारांनी नोंद घ्यावी.**

संपादक

❊ पी.आर.बी. कायद्यानुसार: 'पुरोगामी जनगर्जना' हे मासिक मालक 'एस. एम. जोशी मेमोरियल मेडिकल असोशिएशन' या विश्वस्त संस्थेंतर्गत काम करणाऱ्या 'आरोग्य सेना' या संघटनेसाठी मुद्रक व प्रकाशक डॉ अभिजित वैद्य यांनी दिशा पब्लिकेशन: राष्ट्र सेवा दल बिल्डिंग, साने गुरुजी स्मारक, दांडेकर पुलाजवळ, पुणे - ४११ ०३० येथे छापून, १० सणस प्लाझा, बाजीराव रोड, पुणे-४११००२ येथून प्रसिद्ध केले.

❊ **संपादक: अभिजित वैद्य**

❊ 'पुरोगामी जनगर्जना' मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

भाई आपके सपनोंको मंजिल तक पहुचायेंगे - डॉ. अभिजित वैद्य

विशेष संपादकीय

भाई गेले. भाई जाऊच शकत नाहीत असे वाटायला लागले असताना अचानक गेले. सर्वांच्या दृष्टीने एक अविश्वसनीय गोष्ट घडली होती. एकोणनव्वदाव्या वर्षी इतके प्रसन्न, सतेज,सदाबहार,रसरशीत, तरतरीत, तरल, तल्लख आणि तीक्ष्ण असणारे भाई न कोमेजता आणि न पिकता एखाद्या पक्षासारखे भुरकन उडून गेले. आईही तशीच गेली. त्यावेळी, 'नलिनी तेरा वर्षे कर्करोगाचा सामना करून त्या दुर्धर आजाराला छळण्याची संधी न देता एखाद्या पक्षासारखी घराच्या बागेतील झोपाळ्यावर झोके घेत कशी भुरकन उडून गेली, तसे मरण मला यावे' असे ते सांत्वनाला येणाऱ्यांना सांगत. 'गाडी जागेवर उभी करायची नाही तर पंक्चर होईपर्यंत पळवायची असे मी ठरवले आहे' हे त्यांच्या भाषणातील वर्षापूर्वीचे वाक्य त्यांनी खरे केले.

मी तर 'भाई वैद्य की अमर कहानी' अशी एक अपूर्व कहाणी लिहिण्याचा विचार करीत होतो. कारण तसे पाहायला गेले तर भाई यातून वाचणार नाहीत अशा अनेक घटना भाईंच्या आयुष्यात घडल्या. भाई पंधराव्या वर्षी स्वातंत्र्य लढ्याचे विद्यार्थी नेते झाले. शिवाजी मराठा शाळेपाशी व्यासपीठावर येऊन वंदे मातरम म्हणणाऱ्या दोघांना पोलिसांनी गोळ्या घातल्या. तिसरे भाई व्यासपीठाकडे निघाले असता असे काहीतरी घडणार असल्याची कुणकुण लागल्याने भाईंच्या वडिलांनी पाठविलेल्या दोघांनी धावत येऊन भाईंना अक्षरशः पकडून घरी आणले आणि भाई वाचले. पण पुढे गोवा मुक्ती संग्रामाच्या दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व करणाऱ्या भाईंना पोर्तुगीज पोलिसांनी अमानुष मारहाण केली. डोके फुटले, हात मोडला. शुद्ध हरपत असतानाही भाईंनी तिरंगा सोडला नाही. शुद्धीवर येताच पुन्हा वंदे मातरम घोषणा द्यायला सुरुवात केली आणि जवळ उभ्या असणाऱ्या पोलिसाने पुन्हा दंडुका डोक्यात घातला. शुद्ध आली ती डोक्याला टाके घातले जात असताना. हाताचे फ्रॅक्चर प्लॅस्टरविनाच ठेवले गेले. तिथून रवानगी तुरुंगात. हात तसाच जुळला आणि आयुष्यभर वाकडाच राहिला.

त्यानंतर भाईंना मंत्री झाल्यावर गाडीचा मोठा अपघात झाला आणि भाई गुडघ्याच्या मारावर बचावले. भाई साधारण पासष्ट वयाचे असताना स्कूटरवरून जात, पायापाशी ठेवलेली पत्रके सांभाळताना पुण्यातील नीलायम थिएटर जवळील ओढ्यात रात्रीच्या अंधारात पुलावरून पंधरा फूट खाली पडले. मनगट तुटले, कॉलर बोन तुटले, पेलव्हीस फ्रॅक्चर झाले. तशा अवस्थेत तुटलेले मनगट दुसऱ्या हाताने धरून भाई मातीचा ढिगारा चढून वर आले. एका रिक्षावाल्याने ओळखले आणि जवळच असणाऱ्या भाईंचे परमस्नेही मुंदडा शेट यांच्याकडे नेले. त्यांनी थेट सिद्धार्थ हॉस्पिटल गाठले. तिथून मला रात्री ९ ला फोन आला. संक्रांतीचा तो दिवस होता. पुढील दोनेक महिने एका हाताला प्लॅस्टर, दुसरा हात गळ्यात, अनेक छोट्या शस्त्रक्रिया अशा अवस्थेत काढून भाई पुन्हा अखंड उभे राहिले आणि सोशलीस्ट फ्रंट आणि नंतर समाजवादी जनपरिषदेच्या उभारणीसाठी देशभर हिंडायला सज्ज झाले. सत्तरीत भाईंना संधिवाताने गाठले. त्यानंतर आजतागायत भाई मेथोट्रेक्झेट आणि तत्सम औषधांच्या मदतीने पळत राहिले. पण गाडीच्या अपघातात इजा झालेल्या आणि संधिवातग्रस्त गुडघ्यांनी वयाच्या सत्तरीत मान टाकायला सुरुवात केली. त्याही अवस्थेत एका हातात फोल्डींगच्या कमोडची बॅग आणि दुसऱ्या हातात कपड्यांची बॅग घेऊन भाई रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाने आणि एसटीने महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल, आसाम, केरळ पालथा घालीत समाजवादी जनपरिषद उभी करीत हिंडत होते. भाईंच्या पंचाहत्तरीत, ते राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यावर मी त्यांचे गुडघे बदलण्याची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. डॉ. राजन कोठारी यांनी अत्यंत यशस्वी शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर महिन्याभरातच भाईंनी राष्ट्र सेवादलाच्या हीरक महोत्सवासाठी महाराष्ट्र पिंजून काढायला सुरुवात केली. भाई राजन कोठारींना म्हणत डॉक्टर माझी एक तक्रार आहे मी तुम्हाला चालण्याचे गुडघे बसवायला सांगितले तर तुम्ही पळण्याचे गुडघे बसवलेत. राष्ट्र सेवा दलाचा निधी जमविण्यासाठी भाई दुसऱ्यांदा महाराष्ट्र पिंजत होते. पहिल्यांदा त्यांनी तो सुवर्ण

महोत्सवासाठी पिंजला होता. दोन्ही वेळा मिळून भाईंनी सेवा दलासाठी दीड एक कोटी जमवले. सेवा दलाला राजकीय भान आणि जागतिकीकरणाच्या विरुद्ध लढण्याची वैचारिक शिदोरी देऊन दोन वर्षांत अध्यक्ष पदावरून दूर होऊन भाईंनी स्वत:ला अखिल भारतीय अध्यापक सभेच्या कामात झोकून दिले. भाई ऐंशीला टेकले होते. पण थक्क करून टाकणाऱ्या ऊर्जेने झंझावातासारखे हिंडत होते. यातून केजी टू पीजी मोफत, गुणवत्तापूर्ण, सर्वांना समान शिक्षणाचे अभूतपूर्व असे आंदोलन उभे राहिले.

कित्येक वर्षे संधिवातासाठी चालू असणाऱ्या मेथोट्रेक्झेट या औषधाने भाईंना चालते ठेवले खरे पण याचबरोबर प्रतिकारशक्ती कमी करणाऱ्या या औषधाने आपले रंग दाखवायला सुरुवात केली.

शिक्षण हक्क यात्रेत भाईंना न्यूमोनियाने गाठले. नांदेडवरून डॉ. काब्दे यांचा मला फोन आला तेव्हा मी आरोग्य सेनेचे वैद्यकीय पथक घेऊन ओरिसाच्या खेड्यांमध्ये पूरग्रस्तांवर उपचार करण्यासाठी पोहोचत होतो. परिस्थिती लक्षात घेऊन मी रात्रभर हायर अँटीबॉयॉटीक्स देऊन सकाळी भाईंना गाडीने पुण्याला पाठवायला सांगितले. संध्याकाळपर्यंत भाई कसेबसे पुण्याला पोहोचले आणि पुढील काही दिवस अतिदक्षता विभागात त्यांना व्हेंटीलेटरवर ठेवावे लागले. तोपर्यंत मोहीम आटोपून मी पुण्याला पोहोचलो. ऐंशी वर्षांचे भाई व्हेंटीलेटर पचवून पुन्हा पळायला लागले. वाढत्या वयानुसार तरुण होत राहिले. वार्धक्याच्या खुणांची त्यांना स्पर्श करण्याची हिंमत नव्हती. स्मरणशक्तीचा वरदहस्त होताच. तरुण वयात वाचलेल्या पुस्तकांचे संदर्भ त्यांना आजही आठवत. मी त्यांना चालता बोलता ज्ञानकोश आणि गुगल सर्च म्हणे. वाचन आणि लिखाण अखंड चालूच होते. घरच्या हजारो पुस्तकांच्या ग्रंथ संग्रहात दर आठवड्याला नव्या पुस्तकांची भर पडत होती. वाचण्याची गरज असणारे पुस्तक भाई खरेदी करीत असत. अनेक पुस्तके भेटही येत. संधिवातामुळे आणि कंपामुळे लिहिणे मात्र शक्य नसल्याने गेली दहा वर्षे मी एक डीटीपी ऑपरेटर घरी ठेवला होता एवढेच. त्याच्या शेजारी बसून भाई लेख, पत्रे डीकटेट करीत.

कोल्हापूरच्या प्रवासात एकदा आई बरोबर असताना टायर गुळगुळीत झालेली गाडी ब्रेक दाबताच भर हायवेच्या मधोमध ३६० अंशात गरकन फिरून रस्त्याच्या कडेला उभी राहिली. दोघेही न खरचटता बचावले. आयुष्यभर आम्हांला कुठे ट्रीपसना जाणे आर्थिक कारणासाठी शक्य नसे. पुढे माझी आर्थिक परिस्थिती सुधारल्यावर आम्ही आई-भाईंसहित गोवा, करदे, भंडारदरा, महाबळेश्वर अशा छोट्या ट्रीपस केल्या. आईच्या तब्येतीमुळे लांबची ट्रीप शक्य नसे. पुढे आई गेल्यावर भाई आणि गीतांजलीच्या पप्पांना घेऊन आम्ही सिंगापूर, स्पेन अशा ट्रिप्स केल्या. बार्सिलोनाला मी भाईंना पाब्लो पिकासोच्या म्युझियमला आवर्जून घेऊन गेलो. पिकासोच्या गुर्निका या जगप्रसिद्ध चित्राच्या समोर उभे राहून त्याबद्दल भाईंकडून ऐकणे हा अद्‌भुत अनुभव होता.

पंच्याऐंशी वयाच्या सुमारास भाईंना उच्च रक्तदाब सुरू झाला. दोन एक वेळा हृदय स्पंदन दोषासाठी (अॅट्रीयल फिब्रिलेशन) अतिदक्षता विभागाची वारी करावी लागली. या सर्व गोष्टींची आम्ही बाहेर फारशी वाच्यता करीत नसू. सततचा प्रवास, हवेतले बदल, जिथे जाईल तिथले पाणी पिण्याची आणि खाणे खाण्याचा आग्रह यामुळे मधून मधून डायरिया तर कधी फुफ्फुसाचा संसर्ग होत होताच. प्रत्येक वेळी भाईंच्या सखोल तपासण्या केल्या जात आणि त्या चांगल्या येत. बरे वाटताच प्रवास आणि कार्यक्रम चालू राहत. भाई सर्वांना कार्यक्रमासाठी हवे असत. शहांशिव्या वर्षी भाईंना कोल्हापूरचा 'राजर्षी शाहू जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यावेळी कोल्हापुरी फेट्यात भाईंनी केलेले तासाभराचे भाषण अविस्मरणीय असे होते. एक रुढार्थाने वयोवृद्ध नेता देशापुढे असणाऱ्या आव्हानांची जाणीव करून देत होता आणि त्या आव्हानांना भिडण्याची एखाद्या योद्ध्याप्रमाणे प्रेरणाही देत होता. सभागृह तुडुंब भरले होते. सभागृहाबाहेर सी.सी.टी.व्ही.वर शेकडो लोक उभ्याउभ्याच कानात प्राण आणून भाईंचे भाषण ऐकत होते. याच काळात धनंजय भावलेकर या तरुण चित्रपट दिग्दर्शकाने भाईंवर अप्रतिम अशी डॉक्युमेंटरी केली. तिचा खर्च पुणे मनपा सफाई कामगार युनियनने केला. त्यासाठी भाईंनी अनेक शॉट्स न थकता दिले. या डॉक्युमेंटरीचे पहिले स्क्रीनिंग पुण्यातील मंगला चित्रपटगृहात ओसंडून वाहणाऱ्या गर्दीत झाले. सत्त्याऐंशीव्या वर्षी सेवा दलाने अमृत महोत्सव निधीची जबाबदारी भाईंवर टाकली आणि भाईंनी तिसऱ्यांदा महाराष्ट्र पिंजून काढून पुन्हा पाऊण कोटी रुपये उभे केले.

सेवा दलासाठी पैसे गोळा करण्याचे फार मोठे श्रेय भाईंकडे जात असले तरी राष्ट्र सेवा दल या नावावर झालेल्या सामूहिक प्रयत्नाचे हे यश होते असे भाई मानत. दोन वर्षांपूर्वी भाईंना त्रिदल तर्फे 'पुण्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला शरद यादव, शरद पवार, डॉ. माशेलकर आदी उपस्थित होते. भाईंना मिळालेला हा पस्तिसावा वगैरे पुरस्कार असावा. त्यानंतर भाईंना घेऊन मी अमेरिकेची वारी केली. नातवाची फिल्म इंस्टीट्युट बघण्याची त्यांना मनोमन इच्छा होती. लॉस एंजेलिसला सोहिलचे जगातील प्रथम क्रमांकावर असणारे 'युएससी फिल्म स्कूल' भाईंनी पायी हिंडून पाहिले. तीन दिवस आम्ही तीन पिढ्या मनसोक्त हिंडलो. आम्ही व्हेनिस बीचवर हिंडत असताना सोहिलचा ऑस्कर पुरस्कारप्राप्त प्राध्यापक भेटला. त्याने प्रथम भाईंकडे बोट दाखवीत विचारले की, हु इज धीस हँडसम मॅन? सोहिलने सांगितले ही इज माय ग्रँडपा. तो उत्स्फूर्तपणे म्हणाला, सो नाऊ आय कम टू नो फ्रॉम व्हेयर युवर हँडसमनेस कम्स! आणि त्याने जेव्हा आम्हांला सांगितले की सोहिल हा त्याचा अत्यंत प्रतिभावंत विद्यार्थी आहे; तेव्हा भाई म्हणाले, मी भरून पावलो. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक क्रांती कानडे आणि त्याच्या पत्नीने आम्हांला एका स्पॅनिश रेस्तोरामध्ये जेवायला नेले तेव्हा क्रांतीने तिथल्या मॅनेजरला सांगितले की, ही इज बर्नी सँडर्स ऑफ इंडिया. लोकशाही समाजवादाचा झेंडा खांद्यावर घेऊन अमेरिकेत हिलरी क्लिंटन यांच्यापुढे आव्हान उभे करणारा हा नेता. तेथून आम्ही बॉस्टनला माझ्या आतेभावाकडे गेलो. बॉस्टनहून आम्ही आत्या-काकांसहित गाडीने न्यूयॉर्क, नायगरा, आणि कॅनडातील टोरांटो गाठले. निनादने हिल्टनच्या ४६व्या मजल्यावर खोली घेतल्याने त्यांना नायगरा धबधब्याचे सर्व विभ्रम पाहता आले. डॉ. बाबा आढावांच्या बॉस्टनस्थित आणि टोरांटोस्थित अशा दोनही मुलांकडे जेवायला नेल्याने त्या आनंदात भर पडली. या सर्व दोन अडीच हजार किमीच्या प्रवासात भाई एकदाही थकलो असे म्हटले नाहीत.

गेल्या वर्षी साहित्य कला प्रसारिणीने भाईंचा एकोणनव्वदावा वाढदिवस भव्य प्रमाणावर साजरा केला. या कार्यक्रमाला शरद पवार, डॉ. बाबा आढाव, सुशीलकुमार शिंदे, डॉ. डी. वाय. पाटील, बाळासाहेब थोरात असे अनेक दिग्गज उपस्थित होते. कोणाचाही हात न धरता भाई तरातर पोडीयमपाशी आले आणि त्यांनी खड्या आवाजात 'बंधू भगिनींनो' असे म्हणताच सभागृहात टाळ्यांचा जो कडकडाट झाला तो पाच मिनिटे चालू होता. एखाद्या मोठ्या गवयाने पहिला सा लावताच त्याला दाद मिळावी असे ते दृश्य होते. त्यानंतरचे भाईंचे भाषण ही एक वैचारिक मेजवानीच होती.

गेल्या जुलै महिन्यात भाई औरंगाबादच्या दौऱ्यावरून आले तेच न्यूमोनिया घेऊन. हा न्यूमोनिया जरा आटोक्यात येतो न येतो तोच ३१ जुलै रोजी भाईंना हृदय विकाराचा जबरदस्त झटका आला. रात्री ११.३० वाजता एका बैठकीनंतर मी घरी आलो. त्यांनी नेहमीप्रमाणे दार उघडले. त्यांच्याशी थोडा वेळ बोलून वॉश घ्यायला वर गेलो आणि गीतांजलीने हाक मारली, अभिजित भाई खाली बोलावत आहेत. घरात त्यादिवशी माझी कन्या डॉ. सलीनाही होती. ती धावत गेली. तोपर्यंत मीही खाली गेलो. प्राचीही त्यादिवशी भाईंना भेटायला आलेली होती. भाई म्हणाले अरे छातीत जरा वेगळेच दुखत आहे. तेवढ्यात त्यांना उलटी झाली, दरदरून घाम फुटला. मी क्षणाचाही विलंब न करता औषधे दिली आणि कार्डीॲक ॲम्ब्युलंसने पूना हॉस्पिटलला पोहोचलो. कार्डीओग्राम काढताच थेट अन्जिओग्राफीसाठी घेतले. माझे मित्र डॉ. सुहास हरदास आले. एक रक्त वाहिनी १००% बंद होती. पुढील दहा मिनिटांमध्ये अन्जिओप्लास्टीने ती उघडून स्टेंट घालण्यात आला. आठवड्याभरात भाई पुन्हा ठणठणीत. या नंतर भाईंचे प्रवास मात्र मी बंद केले. रुग्णालयातून घरी आल्यावर दोन एक आठवड्यांनी चक्कर येऊन भाई बाथरूममध्ये पडले. कपाळावर मोठी खोक पडली. माझे मित्र डॉ. सेटिया यांनी घरी येऊन त्यांच्या रुग्णालयात नेऊन टाके घातले. चेहऱ्याची उजवी बाजू मुक्या माराने काळी निळी झाली होती. या घटनेच्या चौथ्या दिवशी भाईंनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात लोकायत तर्फे दीड तासाचे अविस्मरणीय असे भाषण दिले जे यु ट्यूब वर उपलब्ध आहे. आता मात्र माझी भाई अमर्त्य आहेत अशी खात्री पटत चालली. वैद्यकीय कौशल्य आणि असीम इच्छाशक्ती यांच्या मिलाफातून एक अभेद्य रसायन तयार झाले होते!

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पोट जड वाटते असे एक दोन वेळा म्हणाल्याने माझे परम मित्र डॉ. नितीन केतकर यांच्याकडे ७ मार्चला त्यांच्या पोटाची

सोनोग्राफी केली आणि आभाळ कोसळले. स्वादुपिंडाच्या शेपटाकडे कर्करोग सदृश्य छोटी गाठ होती. पुढील दोन दिवसांमध्ये एमआरआय, पेट स्कॅनसहीत रक्ताच्या सर्व चाचण्या केल्या. ९ मार्चला डॉ. थोरातांकडे नेताना त्यांनी मला शांतपणे विचारले, कर्क रोगाचे निदान निश्चित झाले का? मी अवाक झालो. आता सांगण्याशिवाय पर्याय नव्हता. ते शांतपणे मला म्हणाले, हे बघ मला खूप दीर्घ आयुष्य मिळाले. आय हॅव लिव्हड माय लाईफ वंडरफुली. आता कोणत्याही क्षणी माझी जाण्याची तयारी आहे. डॉ. थोरात म्हणाले अभिजित या वयात शस्त्रक्रिया शक्य नाही, किमोथेरपीने जास्त त्रास देईल. मुंबईतील कर्करोग तज्ज्ञांशी बोललो. तेच मत आले. यानंतरही भाईंनी अनेक कार्यक्रम केले. भाईंना कोणतेही काम लगेच करण्याची घाई असे, जाण्याची वेळ येणार हे दिसताच निरोप घेण्याचीही त्यांनी घाई केली. २६ मार्चला संध्याकाळी अचानक तब्येत बिघडल्याने मला त्यांना पूना हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात भरती करावे लागले. त्याच संध्याकाळी त्यांनी बी जे खताळ पाटील यांच्या शताब्दीला रिक्षाने जाण्याचे नियोजन केले होते. हे मला कळल्यावर मी त्यांना निक्षून सांगितले की, कृपा करून रिक्षाने जाऊ नका मी गाडी पाठवितो. रुग्णालयात सुरुवातीला थोडा आराम पडला, आम्ही रूममध्ये हलवले. सोहिलशी व्हिडिओ कॉलवर मनसोक्त गप्पा झाल्या. पण त्यानंतर तब्येत पुन्हा सर्व उपचारांना दाद न देता घसरत राहिली. पुन्हा अतिदक्षता विभागात हलवले. अनेक तज्ज्ञ आपली शिकस्त करीत होते. आता मात्र माझ्या मनात धोक्याची घंटी बाजू लागली. नेहमीप्रमाणे कोणाला पत्ता न लागू देता बरे करून घरी आणता येण्याची शक्यता मावळत चालली होती. मी कार्यकर्त्यांना कळवायला सांगितले. बातमी वाऱ्यासारखी पसरली. पुण्यातून आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो कार्यकर्ते पुण्याच्या दिशेला धावत सुटले. यात सर्व पक्षीय लोक होते. प्रत्येकाला भाईंशी किमान एखादा शब्द बोलायचा होता, नाहीतर निदान दुरूनतरी दर्शन घ्यायचे होते. अतिदक्षता विभागात इतक्या लोकांना ही परवानगी देणे शक्य नसते. ही गर्दी थोपवण्यासाठी मी मग स्वत: जमेल तेवढा तळ मजल्यावर थांबून सर्वांची भेट घेत होतो. तसे भाई शेवटच्या ४८ तासांपर्यंत बोलत होते. डॉ. बाबा आढाव चाफ्याचे फूल घेऊन शिलाकाकिंसहित रोज भेटून जात होते. त्याही अवस्थेत भाईंनी त्यांना 'एंड ऑफ कॅपिटॅलिझम' हे पुस्तक वाचले का हे विचारले. पण आता भाई-बाबांची ही जोडी तुटणार हे त्यांच्या डॉक्टरी मनाला कळून चुकले होते. डॉ. ताकवले यांच्याशी इन्टरनेटच्या येणाऱ्या क्रांत्या आणि त्यातून नवे जग, रोजगार निर्मिती यावर चर्चा झाली. वरच्या प्रतीक्षाकक्षात घरातील सर्व, खाली उपाहारगृहाच्या बाहेर आरोग्य सेना आणि राष्ट्र सेवा दलाचे सर्व दिवस रात्र मुक्काम ठोकून होते. भाई जाण्याच्या तीन दिवस आधी शरद पवार पुण्यात आले असता त्यांना ही बातमी कळताक्षणी ते रात्री १०.३० वाजता आले. भाईंनी खळखळून हसून त्यांचे स्वागत केले आणि विचारले आपली तब्येत कशी आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी भाई मला म्हणाले मी सहसा भावनाविवश होत नाही पण लोकांचे माझ्यावरचे प्रेम पाहून मला भरून आले आहे. ना. गिरीश बापट त्याच्या दुसऱ्या दिवशी आले तेव्हा मात्र भाईंची शुद्ध हरपू लागली होती. डॉ. सलीना मला म्हणाली, बाबा माणसांच्या गराड्यात आयुष्यभर राहणाऱ्या भाईंना आयसीयूमध्ये किती एकाकी वाटत असेल. त्याचक्षणी तिने, डॉ. केतकर आणि मी भाईंजवळ सतत आत थांबण्याचा निर्णय घेतला. शेवटचे १२ तास भाईंची शुद्ध हरपली आणि संध्याकाळी ७.३० वाजता हृदयक्रिया बंद पडली. बातमी वाऱ्यासारखी पसरली. लहान थोर शेकडो लोक जमले. वार्ताहर आणि वाहिन्या पोहोचल्या.

हॉस्पिटलमधून मी भाईंचे पार्थिव नव्या घरी घेऊन आलो. आरोग्य सेनेच्या सैनिकांनी गार राहणाऱ्या विद्युत शवपेटीची खास व्यवस्था केली होती. या लाडक्या नेत्याला कार्यकर्त्यांनी आणि जनतेने अभूतपूर्व असा निरोप दिला. वर्तमानपत्रे आणि वाहिन्यांनी भरभरून बातम्या दिल्या. सोशल मिडीया प्रतिक्रियांनी ओसंडून वाहत राहिला. राष्ट्र सेवा दलाच्या साने गुरुजी स्मारकावर अंत्य दर्शनासाठी भव्य असा पांढरा शुभ्र शामियाना उभारण्यात आला होता. राष्ट्र सेवा दलाचे सैनिक अश्रूंना परतवीत चोख व्यवस्था ठेवण्यासाठी दिवसरात्र झटत होते. मदतीला आरोग्य सेनेचे सैनिकही होतेच. अंत्ययात्रेसाठी आणि शेवटी वैकुंठावरील विद्युत दाहिनीवर जनसागर लोटला होता. त्यात सर्व पक्षीय नेते आणि कार्यकर्ते होते. कार्यकर्ते रडत होते पण त्यांच्या तोंडी तरीही क्रांतीची गाणी होती. एका योद्ध्या नेत्याला दिलेली ही उचित अशी सलामी होती. राज्य सरकारनेही सरकारी इतमामात राष्ट्र सेवादलाच्या झेंड्यावर तिरंगा

लपेटून बंदुकीच्या फैरींनी बँडच्या तालावर मानवंदना दिली. भाई आणि आम्ही निरीश्वरवादी असल्याने कोणताही विधी करण्याचा प्रश्न नव्हता. विद्युत दाहिनीच्या ज्वालांनी ह्या धगधगत्या अग्निकुंडाला क्षणार्धात लपेटून घेतले. भाई वैद्यांच्या अमर कहाणीत कर्करोग अचानक खलनायक बनून मागच्या दाराने आला पण भाईंनी त्याला हुलकावणी दिली आणि त्याच्या विळख्यातून निसटून न परतीच्या प्रवासाला निघून गेले. पदयात्री अनंत अवकाशाचा यात्री बनला.

भाई गेले ते कोणीही व्यापू शकणार नाही अशी एक प्रचंड पोकळी ठेवून. ही पोकळी सामाजिक, राजकीय, वैचारिक आणि पुरोगामी चळवळींमध्ये निर्माण झालेली आहे. आमच्या कुटुंबाचा विचार करता वास्तव स्वीकारता न येण्यासारखी ही पोकळी आहे. मी तर माझे वडीलच नाहीत तर गुरु आणि एक जिवाभावाचा मित्र गमावला. भाईंशी मी प्रत्येक गोष्ट शेअर करू शकत असे. आमच्या तासन्तास गप्पा रंगत. जवळपास पंचाहत्तर वर्षे वैद्यांच्या तीन पिढ्या 'भाई' या व्यक्तीभोवती स्वेच्छेने आणि आनंदाने फिरत होत्या. अण्णासाहेब आणि नानी वैद्यांचा उच्चविद्याविभूषित, पण न कमावणारा, असा हा थोरला मुलगा वैद्यांच्या घराचा शेवटपर्यंत केंद्रबिंदू राहिला. थोरल्या मुलाने देशकार्याला वाहून घेतल्याने एकट्या अण्णांच्या आयुर्वेदिक दवाखान्यावर घर चालणे शक्य नव्हते. त्यात अण्णांनी नात्यातील अनेकांना आधार देऊन घरी आणून ठेवलेले. त्यामुळे भारतकाका, विजुआत्या आणि मंगलआत्याला खूप लहान वयात नोकऱ्या करून शिक्षण घ्यावे लागले. असे असूनही या सर्वांनी भाईंवर अलोट प्रेम केले. आणि भावंडांवर प्रेम करावे तर भाईंनीच. भाई तमाम नातेवाइकांच्या प्रेमाचे आणि आदराचे स्थान राहिले. या घराने फक्त भाईंवरच प्रेम केले नाही तर त्यांच्या कामावर, विचारांवर, मित्रांवर, सहकाऱ्यांवर, पक्षावर, संघटनांवर भरभरून प्रेम केले. भाईंच्या विचारांच्या सच्चेपणाला आणि निःस्वार्थ तळमळीला ही दाद होती. यातूनच रक्ताच्या नात्यापलीकडचा 'वैद्य परिवार' उभा राहिला. भाई 'न कमावणारे' असूनही सर्वांना आधार वाटत. भाईंच्या संसारात तितक्याच उच्चविद्याविभूषित अशा आईने दिलेली समर्पित साथ तर एखाद्या चित्रपट कथेत शोभावी अशीच होती. संगमनेरचे थोर समाजवादी नेते स्वातंत्र्यसैनिक भास्करराव उर्फ नाना दुर्वे आणि सिन्नरचे स्वातंत्र्यसैनिक दादा दुर्वे यांची ही धाकटी बहीण, हवेली सदृश्य घरातून, 'मी कधीही नोकरी करणार नाही, फक्त सामाजिक कार्य करणार तुला घर चालवावे लागेल' अशी भाईंची अट स्वीकारून पुण्यातील गुरुवार पेठेतील सार्वजनिक संडास असणाऱ्या मेंदिवाल्यांच्या वाड्यात आली ते भाई महापौर होईपर्यंत अठरा वर्षे तेथे राहिली. तिथेही घरातील आणि वाड्यातील सर्वांची लाडकी वहिनी बनली. वैद्यांच्या घराशी आणि वाड्याशीही आई एकरूप होऊन गेली होती. आईने संसार चालविण्यासाठी पुणे मनपाच्या शाळेच्या नोकरी व्यतिरिक्त तऱ्हेतऱ्हेचे कष्ट उपसले. बसचा खर्च वाचविण्यासाठी भाज्यांच्या पिशव्या घेऊन कधी सायकलवर, कधी स्कूटरवर आणि अनेकदा चालत येत राहिली. या शाळेत तिने कल्पकतेने अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. भाईंच्या निवडणुकांमध्ये पायाचे तुकडे पडेपर्यंत हिंडली. भाईंच्या महापौरपदाचे काही महिने राहिले असताना आम्ही आईमुळे मिळालेल्या पुणे मनपाच्या साडेचारशे स्क्वेअर फुटांच्या, पण घरात संडास बाथरूम असणाऱ्या, घोरपडे पेठेतील सदनिकेत हाललो. महिन्याभरातच आणीबाणी जाहीर झाली. भाईंनी आणीबाणीला विरोध करणारी देशातील पहिली प्रचंड सभा शनिवारवाड्यावर घेऊन 'शुरू हुई है जंग हमारी' अशी घोषणा दिली. त्याच रात्री भाईंना अटक झाली आणि येरवडा तुरुंगात त्यांची रवानगी झाली. आमच्या तुरुंगाच्या वाऱ्या सुरू झाल्या. दहा मिनिटांच्या भेटीसाठी पूर्व परवानगी घेऊनही तुरुंगाच्या दाराबाहेर उन्हापावसात तासन्तास ताटकळत उभे राहावे लागे. संपूर्ण देश भीतीच्या सावटाखाली होता. महापौर भाईंच्या घरची गर्दी पूर्ण आटली होती. लोक घरी यायलाही भिऊ लागले. माझे दहावीचे वर्ष होते. आई खंबीरपणे उभी राहिली. अगदी जवळचे चिमूटभर नातेवाईक आणि भाईंचे परमभक्त मुंदडा शेट वगळता साधी विचारपूस करायलाही लोक घाबरू लागले. माझे आजोबा अण्णा, आजी नानी आणि एसेम अण्णा हेच बाकी आधार होते. त्याही परिस्थितीत मी बोर्डात २७वा आलो आणि मराठीचे २रे पारितोषिक पटकावले. एकोणीस महिन्यांनी भाई सुटले आणि आमदार होऊन थेट मंत्री झाले. भाई गृहराज्य मंत्री झाल्यावर खर्च पेलण्यासाठी आईने मुंबई मनपाच्या शाळेत बदली करून घेतली. शाळा सुटल्यावर भाज्या घेऊन दोन बसेस बदलून मलबार हिलवरील तोरणा बंगल्यावर येणारी मंत्र्याची ही

पत्नी सध्याच्या युगात दंतकथा ठरावी. मंत्रिपद जाताच भाईंनी एका दिवसात बंगला खाली करण्याचा निर्णय घेतला. हाजीअली येथील भाईंचे स्नेही आणि स्वीय साहाय्यक जवळकर यांच्या एका छोट्या सदनिकेत संसार हालला. आईवरचा ताण कमी करण्यासाठी मी माझा मुक्काम ग्रँट मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहावर हालवला. आईने स्टोव्हवर संसार थाटला आणि रॉकेलच्या रांगेत उभी राहिली. भाई तिकडे पुण्यात स्कूटरवर आणि काळजीवाहू मंत्री असल्याने मागे पोलीस गाड्या! हे सारे आज अविश्वसनीय वाटेल. महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक आणि सुपर कॉप ज्युलिओ रिबेरो यांनी 'इंडियन एक्सप्रेस; या वृत्तपत्रात 'भाई वैद्य वॉज मेड ऑफ डिफरंट मोल्ड' या हृद्य लेखात भाईंना दोनदा सॅल्युट केला आहे तो याचसाठी. त्यांनी लिहिले आहे की, 'मी लाल दिव्याच्या गाडीने सिग्नलला थांबलो असता शेजारी मला माझे माजी बॉस भाई स्कूटरवर दिसले. मी त्यांना मनातल्या मनात एक स्मार्ट सॅल्युट केला. भाईंनी त्यांना लाच देऊ करणाऱ्या स्मगलर्सना पकडण्यासाठी माझ्यावर जो विश्वास टाकला तो मी विसरू शकणार नाही. त्यांच्या पत्नी ते गृहराज्यमंत्री असतानाही नोकरी करीत आणि मलबार हिलवरील बंगल्यातून बसने जात. एका पोलिस अधिकाऱ्याने त्यांना त्यांच्या पत्नीने सरकारी गाडीने जावे हे पटविण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी त्यास साफ नकार दिला. ही गोष्ट आठवल्याने मी त्यांना पुन्हा एक स्मार्ट सॅल्युट करीत आहे.'

त्यानंतर काही वर्षांमध्ये भाई जनता पक्षाचे महाराष्ट्राचे सरचिटणीस झाले आणि त्यांचा पुन्हा झंझावाती प्रवास सुरू झाला. १९८३ साली चंद्रशेखरांच्या भारत यात्रेत सामील होऊन भाई कन्याकुमारी ते दिल्ली असे चार हजार किमी चालले. त्याचबरोबर त्या पदयात्रेचे नियोजनही त्यांनी खांद्यावर पेलले. मी एमबीबीएस करून इंटर्नशिप करीत होतो. मीही पदयात्रेत डॉक्टर म्हणून सामील व्हायचा निर्णय घेतला आणि मध्यप्रदेशात इंदूर पुढील एका खेड्यात सामील झालो. सामील झाल्यावर दीडएक महिन्यानंतर अचानक पोलीसांकरवी बातमी आली; अण्णांचे, भाईंच्या वडिलांचे निधन झाले होते. आम्ही कुठेतरी चंबळ खोऱ्यात दुर्गम भागात होतो. मी दुपारी अंघोळ करण्यासाठी नदीवर गेलो होतो. चंद्रशेखरांनी मला बोलावून जवळ घेऊन बातमी सांगितली. भाई जवळ अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी सुन्न होऊन बसले होते. भाईंचा आधारवड कोसळला होता. प्रत्यक्षात बातमी पोहोचेपर्यंत दोन दिवस उलटले होते आणि आम्ही पोहोचण्याची खात्री नसल्याने एसेमनी अंत्य संस्कार करण्याचा निर्णय घेतला होता. आम्ही दोघे पुण्याला पोहोचेपर्यंत आणखीन दीडेक दिवस गेला. पुण्याला पोहोचल्यावर भाईंनी तिसऱ्याच दिवशी पदयात्रेत परतण्याचा निर्णय घेतला. मला मात्र आजींजवळ थांबायला सांगितले. भाईंच्या समर्पणाची कल्पना असणाऱ्या कुटुंबातील कोणीही भाईंना अडविण्याचा प्रयत्न केला नाही. पदयात्रेनंतर चंद्रशेखर आणि भाईंनी देशभर ग्रामीण विकासासाठी 'भारत यात्रा केंद्रे' स्थापण्याचा निर्णय घेतला. पुण्याजवळील परंदवडी येथील केंद्राची जबाबदारी भाईंनी घेतली. भुताचा माळ म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या उजाड माळाचे बघता बघता नंदनवनात रूपांतर झाले. गांधी कुटी, आचार्य नरेंद्र देव भवन, गोशाला, रेशीम उद्योग, मेंढी पालन, मत्स्य शेती, शेतकी शाळा, जनावरांचा दवाखाना अशा एक ना अनेक उपक्रमांनी हे केंद्र रचनात्मक कार्याचे आदर्श रूप बनले. भाईंच्या एकसष्टीला जनतेने त्यांना दिलेली पाच लाख रुपयांची थैली भाईंनी या केंद्राला अर्पण केली. या केंद्रावर मी माझ्या तीस तज्ज्ञ सहकाऱ्यांच्या मदतीने 'रुरल मेडिकल रेफरल सेंटर' (आर.एम.आर.सी.) ही नावीन्यपूर्ण कल्पना मांडून वैद्यकीय तज्ज्ञ केंद्र चालविले. आठ वर्षे मी माझ्या ऐन तिशीतील प्रत्येक रविवार या केंद्रासाठी दिला. बाकी तज्ज्ञ महिन्यातील एक रविवार देत. माझा चुलत भाऊ सत्यजित न चुकता माझ्याबरोबर आला आणि त्याने तिथली प्रशासकीय जबाबदारी सांभाळली. मदतीला कमलेश हजारे, नान घोणे होते. या केंद्रावर वैद्यकीय सल्ल्यासाठी २४० गावांमधून रुग्णांचा ओघ सुरू झाला. या केंद्रावर केस पेपरचा आम्ही एक रुपया घेत असू. यातूनच पुढे आरोग्य सेनेची कल्पना मला सुचली आणि मी मावळातील गावागावांत जाऊन या अभिनव संघटनेची बांधणी करायला सुरुवात केली, खेडोपाड्यातील लोकांना आपत्ती व्यवस्थापन आणि वैद्यकीय मदत कार्याचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. पुढे ही संघटना अधिक व्यापक बनून ती या बरोबर सार्वजनिक, सामाजिक आणि राजकीय आरोग्याच्या प्रश्नांवर लढणारी देशव्यापी संघटना बनली. भाई या सर्व वाटचालीच्या मागे भक्कमपणे उभे होते. पुढे

'भारत यात्रा समिती'तील काही महाभागांना हे केंद्र आपल्या ताब्यात यावे असे वाटू लागले आणि भाईंनी क्षणार्धात ते सोडले. याच महाभागांनी भाईंनी आपल्या मुलाला वैद्यकीय पाया तयार करून दिला असा आरोप केला. पुढे आरोग्य केंद्र पंचक्रोशीत गाजायला लागल्यावर आणि भारत यात्रा केंद्राची ओळख बनल्यावर, अभिजितला आम्हीच ही कल्पना कशी दिली हे सांगायलाही कमी केले नाही. भाई भारत यात्रा केंद्रापासून दूर होताच आरोग्य केंद्र बंद करण्याचा आम्ही निर्णय घेतला. पुढे देशातील भारत यात्रा केंद्रांची आणि परंदवडीच्या या केंद्राची काय दुरवस्था झाली हे सर्वश्रुतच आहे. काळ कसा सूड उगवतो पहा. चंद्रशेखर यांच्या निधनानंतर भारत यात्रा केंद्राच्या केंद्रीय समितीला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून भाईंची निवड करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नाही.

पुढे काही वर्षांनी भाई जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस झाले आणि त्यांची पुन्हा देशभ्रमंती सुरू झाली. भाईंनी पक्षाकडून कधीही मानधन, प्रवास खर्च वा इतर खर्च घेतले नाहीत. हे खर्च त्यांच्या माजी आमदार म्हणून मिळणाऱ्या निवृत्ती वेतनातून आणि कुटुंबाकडून पेलण्यात येत.

भाईंच्या या सर्व धकाधकीच्या जीवनात आईने मला आणि प्राचीला घडवले, शिकवले. तुमचे वडील सामाजिक कार्यकर्ते आहेत त्यामुळे तुम्हांला तुमच्या बालसुलभ आणि पुढे तारुण्यसुलभ आवडीनिवडी विसरून आयुष्य जगावे लागेल, शिक्षणासाठीही शिष्यवृत्ती मिळवावी लागेल हे तिने आमच्या मनावर ठसवले. त्यामुळे आम्ही कधीही आमच्या जगण्याची तुलना इतरांशी केली नाही. अत्यंत साध्या, जवळ जवळ गरिबीच्या आयुष्याचा आम्हांला अभिमानच वाटला कारण आमच्याकडे इतर कोणाकडे नसलेली श्रीमंती होती आणि ती म्हणजे आमचे देशासाठी सर्वस्व त्याग करणारे वडील. आम्हांला हे मिळाले नाही, ते मिळाले नाही असे कधी वाटले नाही. कारण आईला जीवनातील कोणत्याही सुखसोयी न मिळता, कष्ट उपसत तृप्त आयुष्य जगताना आम्ही पाहत होतो. हाच तर अध्यात्म! पण प्रचंड व्यापातही मिळणाऱ्या वेळात आमच्याशी संवाद साधण्याची भाईंचीपद्धत आदर्शच होती असे म्हणावे लागेल. मते न लादता वैचारिक घडण करावी ती भाईंनीच. आमचे वाढदिवस भाई अल्प खर्चात पण नावीन्यपूर्ण पद्धतीने साजरे करीत, नावीन्यपूर्ण भेटी आणीत. रविवारी संध्याकाळी आवर्जून फिरायला नेत. भाईंचे बोट पकडूनच मी वाचन वेडा झालो. आम्हांला कपडे आणणे, सहलीला बाहेर गावी नेणे, हॉटेलात खाऊ घालणे भाईंना शक्य नव्हते पण ते पुस्तके आणीत राहिले, निरनिराळ्या ग्रंथालयांचे सदस्यत्व घेऊन देत राहिले. आर्थिक विवंचनेतही भाईंनी रसिकता कोमेजू दिली नाही. समाजवादी मंडळी तत्त्वनिष्ठ असतात पण त्याचबरोबर हेकट, हट्टी, एककल्ली आणि अरसिक असतात या सर्व समजुती खोट्या ठरवणारे भाईंचे व्यक्तिमत्त्व होते. भाईंचे मराठी आणि इंग्रजी वाचन चौफेर होते आणि त्याला कोणताही विषय वर्ज्य नव्हता. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, धर्मकारण, तत्त्वज्ञान, साहित्य, संगीत, चित्रकला, नृत्य, शिल्पकला या प्रत्येक विषयात भाईंना रुची होती, अनेक विषयांवरचे त्यांचे वाचन सखोल होते आणि अनेक विषयांची त्यांना जाण होती.

या अशा भाईंचा संसार पेलणाऱ्या आईला भाईंनी आयुष्यभर अफाट सन्मान दिला. त्यांचे दोघांचे मतभेद झालेले, किरकोळ भांडणही झालेले मी कधी पाहिले नाही. भाई आईशी चुकूनही चढ्या आवाजात बोलले नाहीत. दोघेही विचारांनी एकरूप होते. भाईंनी स्वीकारलेल्या प्रत्येक मूल्यावर आईची डोळस श्रद्धा होती आणि त्यांनी पाहिलेल्या प्रत्येक स्वप्नावर तिचा गाढ विश्वास होता. आईकडेही असामान्य राजकीय आणि सामाजिक समज होती. ती त्यांची परखड टीकाकारही होती. पण ही टीका ती अतिशय मृदू शब्दांमध्ये करीत असे, म्हणजे, 'ह्यांचा हा निर्णय नाही बाई आवडला' किंवा 'अहो कशाला त्या कार्यकर्त्याला रागावलात हो' अशी. भाई ही टीका खिलाडूपणे घेत. प्रेमविवाह न होता ठरवून केलेल्या विवाहानंतर त्यागाच्या नेपथ्याच्या पार्श्वभूमीवर फुललेली आगळी वेगळी अशी ही प्रेमकथा. भाईंचा देशासाठी त्याग आणि आईचा भाईंसाठी त्याग. अगदी चित्रपट व्हावा अशी. पण कचकड्याच्या प्रेमकथा रंगवणाऱ्या चित्रपटसृष्टीला अशी अस्सल प्रेमकथा कुठली झेपायला? भाईंची पंच्याहत्तरी साजरी झाल्यावर काही काळात आई गेली. पंच्याहत्तरीच्या आदल्या रात्री गीतांजली आणि मी जवळच्या नातेवाइकांसाठी एक संगीताचा कार्यक्रम ठेवला आणि त्यानंतर जेवण. आम्ही दोघांनी त्यात एक द्वंद गीत सादर केले. पण हा कार्यक्रम अविस्मरणीय झाला तो आईने

भाईंवर केलेल्या भाषणाने. आई उत्तम वक्ती होती. पुढे भाईंच्या केयर टेकरची जागा माझ्या पत्नीने गीतांजलीने घेतली. आमचा ठरवून झालेला आंतरजातीय विवाह. गीतांजली गुजराती आणि शाकाहारी. आम्ही जातिवंत मावळे. बीई करून आलेल्या गीतांजलीचा एमईचा फॉर्म आईने जाऊन भरला. पुणे विद्यापीठात पहिली येऊन तिने त्याचे चीज केले. पुढे तिच्या पीएचडीसाठी आई तिच्या मागे लागली. भाईंनी सुनेचे अपरंपार लाड केले आणि तिला तितकाच सन्मान दिला. तिचा आंतरराष्ट्रीय पातळीवर शोधनिबंध प्रसिद्ध झाला की भाई आम्हा सर्वांना बाहेर एखाद्या छानशा ठिकाणी जेवण देत. नातवंडांशी संवाद साधावा तर तो भाई आईनेच. किती विषयांवर सोहिल सलीनाशी भाई गप्पा मारीत? सोहिल तर तासन्तास जगातील गाजलेल्या चित्रपटांच्या कथा त्यांना सांगे आणि न कंटाळता, न थकता भाई त्या ऐकत. मी आणि गीतांजली चित्रपट पाहून मध्यरात्री घरी आल्यावर आमच्याकडे लॅचची किल्ली आहे हे माहीत असूनही भाई गाडीचा आवाज ऐकताच पटकन येऊन दार उघडीत आणि मग आमची त्या चित्रपटाच्या रसग्रहणाची मैफल भरे. या मैफलीची सांगता भाईंच्या आवडत्या कॉफीने होई. रात्री उशिराही वानवडीच्या 'कॉफी जार'ला कॉफी पिण्यासाठी यायला भाई एका पायावर तयार असत. कॉफी जार हा तरुणाईचा अड्डा. तेथील तरुणाईलाही नव्वदीतील या तरुणाची सवय झाली होती. मी आरोग्य सेनेच्या मदत कार्याच्या मोहिमेवरून किंवा परदेशातून आल्यावर मला यायला कितीही उशीर झाला तरी मी येताच भाई उठून दिवाणखान्यात येत आणि सर्व वृत्तांत ऐकूनच झोपीत. बरे कितीही वाजता झोपले तरी सकाळी ६.३० च्या ठोक्याला उठणार, स्वत: चहा करून घेणार आणि गीतांजलीच्या ८५ वर्षांच्या वडिलांनाही करून देणार. गीतांजलीचे वडीलही एकटेच असल्याने पुणे आणि अहमदाबाद असे आलटून पालटून राहतात. आमच्याकडे असतील तेव्हा ते भाईंच्या खोलीत राहत. भाई त्यांना विठ्ठलभाई म्हणीत. भाईंचे त्यांच्याशी वागणे वृद्धांच्या सहजीवनाचा परिपाठ होता. ते त्यांना अनेक कार्यक्रमांना आवर्जून नेत.

भाई अत्यंत साधे पण तितकेच टापटीप, व्यवस्थितपणाचे आणि स्वच्छतेचे भोक्ते. आयुष्यभर खादीचे कपडे घालणाऱ्या भाईंनी गबाळेपणाला आयुष्यात स्थान दिले नाही. आजारपणातही त्यांच्या दाढीची खुंटे कधी वाढली नाहीत. गबाळे, चुरगाळलेले कपडे हे त्यांनी कधी क्रांतिकारक आणि पुरोगामी कार्यकर्त्याचे व्यवच्छेदक लक्षण मानले नाही. त्यांची प्रत्येक गोष्ट आपल्या जागेवर असे. स्टेपलर, पंचिंग-मशीन, टेप, पट्टी, कात्री अशा अनेक गोष्टी आम्हांला सापडल्या नाहीत तर त्या त्यांच्या जवळ हमखास असत. कोणाचाही फोन नंबर त्यांच्या वहीत असे आणि बहुसंख्य वेळा तो त्यांना पाठ असे. देताना ते फक्त मृदुपणे सांगत जागेवर ठेव हां. गादीवरची चादर घालण्याची, प्रवासाची बॅग भरण्याची त्यांची एक पद्धत असे. त्यात एक शिस्त असे पण ती लादण्याचा प्रयत्नही नसे. रात्री गादीवरील चादर ते स्वत: बदलीत. कपड्यांना साबण लावून ते घासून ठेवीत. आंघोळीआधी बाथरूम स्वच्छ धुऊन काढीत. घरात कोणी नसेल तर आलेल्या व्यक्तीला स्वत: चहा करून देत, मग तो कितीही सामान्य कार्यकर्ता असो. त्यांच्या जगण्याचे कर्मकांड नव्हते अगदी खाणे, व्यायाम, राहणी, विश्रांती कशाचेही! अनेकांना भाईंचे खाण्याचे कोणतेही नियम नाहीत आणि ते नियमित कोणताही व्यायाम करीत नाहीत याचे आश्चर्य वाटे. भाईसमोर येईल ते आणि जिथे जे मिळेल ते खात. प्रचंड व्यस्त जीवन आणि वेग हाच त्यांचा व्यायाम असे. आपल्या साधेपणाचे त्यांनी तत्त्वज्ञान केले नाही, त्याचे अवडंबर केले नाही किंवा नैतिक मोजपट्टी करून दुसऱ्यांच्या जगण्याची चिरफाड केली नाही. अनेक समाजवाद्यांना चिकटलेल्या भोंगळपणाच्या आणि दांभिकपणाच्या दुर्गुणापासून ते दूर राहिले. भाई उपदेशपर बोलल्याचे मला आठवत नाही.भाईंनी आम्हांला निर्णयाचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले. सल्लादेण्यापेक्षा योग्य दिशेने विचार करून योग्य निर्णय घेण्याची प्रेरणा देण्यावर त्यांचा भर असे. त्यांचे व्यक्तिगत जीवन हा लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा वस्तुपाठ होता.

मी अनेकदा विचार करतो की हे इतके लोभस, राजस, देखणे, रसिक, बुद्धिमान, द्रष्टे, धगधगते पण शीतल, करारी पण लवचीक, स्वाभिमानी पण अहंकाराचा लवलेश नसणारे, देशासाठी सर्वस्वाची आहुती देण्याची तयारी असणारे, मानवता, दया, प्रेम, करुणा यांनी काठोकाठ भरलेले रसायन कसे तयार झाले असावे? यात दोन अण्णांचा, भाईंचे वडील आणि एसेम आणि राष्ट्र सेवा दलाचा फार मोठा वाटा आहे. पण लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांच्या रसायनाचा फॉर्म्युला शोधणे वेडेपणाचे असते.

समाजजीवनाच्या मोकळ्या अवकाशातून अशी रसायने बिग बँग थियरीतील ताऱ्यासारखी अवतरत असतात. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक कृतींच्या मागील प्रेरणा शोधणे शक्य नसते. यातील अनेक प्रेरणा आंतरिक असतात. भाई हे असे रसायन होते. भाई आयुष्यभर समाजवाद, समता, धर्मनिरपेक्षता, पुरोगामित्व आणि बुद्धिवाद यांवर निष्ठेने चालत राहिले. वडील आणि आई अत्यंत धार्मिक असताना भाई बालवयातच निरीश्वरवादी कसे झाले हा प्रश्न मला पडतो. बाकी मूल्ये सेवा दलाने पेरली असावीत. पण नैतिकता आणि सत्याचा आग्रह ही मूल्ये मात्र भाईंमध्ये अशी काही रुजली होती की त्यामुळे भाई एका वेगळ्या उंचीवर राहत गेले आणि तरीही सर्व स्तरातील कार्यकर्त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही जवळचे वाटत राहिले. सेवा दलामुळे भाई समाजवादी चळवळीकडे ओढले गेले. त्यामुळे एसेम, नानासाहेब, अच्युतराव, रावसाहेब, असफली, जयप्रकाश, लोहिया, नाथ पै, मधु लिमये, प्रधानमास्तर, मधु दंडवते अशा अनेक दिग्गजांच्या सहवासात आले. बाबा आढाव, बापू काळदाते, मृणाल गोरे, किशोर पवार, सदानंद वर्दे, पन्नालाल सुराणा यांसारखे स्नेही लाभले. गांधींची सेवा करण्याचे भाग्यही त्यांना लाभले. सेवा दल आणि नाथ पैंमुळे युरोपचा प्रदीर्घ दौरा करण्याची संधी मिळाली आणि प्रगत पाश्चात्य विचारांचा परीसस्पर्श झाला. पण याच बरोबर भाई फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराकडेही जात गेले. भाईंच्या गुरुवार पेठेतील घरामागे फुले वाडा, समोरच्या गल्लीत गुरुवर्य जगताप, एका बाजूला पंच हौद मिशन दुसऱ्या बाजूला ब्राम्हणेतर चळवळीचे नेते जेधे यांचे जेधे मॅन्शन, पुढे चिंचेच्या तालमी जवळ दिनकरराव जवळकर यांचे घर होते. आमचा वाडा हा बहुजन, मुस्लीम, ख्रिश्चन आणि जैन धर्मीय या सर्वांच्या संगमावर होता. या वातावरणाचा भाईंच्या वैचारिक वाटचालीवर परिणाम झाला असावा. पण ही वाटचाल स्वतंत्रही होती. अफाट वाचनाचे वेड या वाटचालीला सतत दिशा देत राहिले. ही वाटचाल पुस्तकी नव्हती. प्रेम आणि करुणेने ओथंबून भरलेले हे मन स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजाच्या प्रश्नांनी पेटून उठत राहिले, असंख्य लढायांमध्ये झोकून देता राहिले. मग ते झोपडपट्टीवासीयांचे प्रश्न असोत, कामगारांचे प्रश्न असोत, कष्टकऱ्यांचे प्रश्न असोत, दलित-आदिवासी-महिलांचे प्रश्न असोत. समाजकारण, राजकारण, तत्त्वनिष्ठा आणि नैतिकता या गोष्टी सार्वजनिक-राजकीय जीवनात भिन्न असण्याची गरज नसते हे भाईंनी दाखवून दिले. भाईंनी अनेक संघटनांची धुरा खांद्यावर पेलली. उत्कृष्ट संघटक असलेल्या भाईंनी त्या त्या संघटनांचे ढाचेच बदलले आणि आपल्या वैचारिक ताकदीच्या बळावर त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी भक्कम दिशाही दिली. पण भाईंनी कधीही ती संघटना दीर्घ काळ ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला नाही. योग्य वेळी त्या त्या संघटनांच्या अगदी सर्वोच्च पदांवरूनही ते पाय उतार झाले आणि तरुण रक्ताला त्यांनी जाणीवपूर्वक पद खाली करून दिले. त्यातील काही प्रयोग यशस्वी ठरले काही फसले, अनेकदा विश्वास घात झाला. भाईंनी त्याची पर्वा केली नाही. संघटना किंवा संस्था ताब्यात न ठेवल्याने भाईंना आयुष्यभर हक्काचे कार्यालय, मदतनीस, कर्मचारी आणि वहान मात्र बाळगता आले नाही. घर हेच कार्यालय आणि हिंडण्यासाठी सार्वजनिक वहाने या पद्धतीने ते जगले. याचे त्यांना यत्किंचितही वैषम्य वाटले नाही. अठ्यांशिव्या वयापर्यंत रात्रीबेरात्री रिक्षाने स्टेशनवर जाऊन रेल्वेने देशभर प्रवास करणे, कार्यक्रमाला गाडीची मागणी न करता रिक्षाने जाण्याची तयारी ठेवणे, बाहेर गावी वेळ पडल्यास स्व खर्चाने गाडी घेऊन जाणे याला नेत्याने एका वेगळ्या मुशीतूनच जन्म घ्यावा लागतो. नाही म्हणायला गेली तीस वर्षे मी जमेल तसा आणणे-नेणे करीत राहिलो, माझ्याकडे गाडी-ड्रायव्हर आल्यावर ती पाठवीत राहिलो, माझ्या क्लिनिकमधील कर्मचारी त्यांच्या कार्यालयीन कामाचा फार मोठा भार पेलत राहिले. पण त्यांच्या कामाचा आवाका इतका मोठा होता की त्याला ही यंत्रणा पुरी पडणे शक्य नव्हते.

त्यांचे जीवन हे एक महापर्वच होते. स्वातंत्र्य संग्राम, राष्ट्र सेवा दल, समाजवादी पक्ष, कामगार संघटना, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, दीर्घ काळ पुण्याचे नगरसेवक, महापौर, आणीबाणी, जनता पक्ष, त्यातून मिळालेले अल्पकालीन आमदार पद आणि महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री पद, जनता दल असा हा एक सुमारे पाच दशकांचा प्रदीर्घ टप्पा आणि त्यानंतर शेवटपर्यंत पुन्हा समाजवादी पक्षाच्या उभारणीच्या ध्यासाने झपाटून सोशलिस्ट फ्रंट त्यातून समाजवादी जनपरिषद, त्यातूनच पुढे सोशलिस्ट पार्टी, शिक्षण हक्काच्या लढ्यासाठी याला समांतर अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा हा पुढील सुमारे तीन

दशकांचा दुसरा टप्पा. या प्रदीर्घ वाटचालीत भाई राष्ट्र सेवा दलाचे काम निरनिराळ्या निमित्तांनी खांद्यावर घेत गेलेच. संघटना असो, राजकीय पक्ष असो किंवा प्रशासकीय पद असो भाईंनी त्या पदावर अमिट छाप पाडली. नगरसेवक असताना झोपडपट्टीवासीयांना पहिले नळ कोंडाळे, त्यांना ओळखपत्रे, बिबवेवाडीला ओटे देऊन पुनर्वसन, पुण्यातील रस्त्यांचे डांबरीकरण, शुद्ध पाणी प्रकल्प आणि हिरवा पट्टा, डनलॉप टायर, दादा देसाई अशा अनेक भ्रष्टाचाराच्या प्रकरणांना वाचा, महापौर झाल्यावर गाजर गवत निर्मूलन मोहीम, पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे शहराचा प्रथम नागरिक म्हणून स्वागत आणि पुढे जाऊन काळे झेंडे, जयप्रकाश नारायण यांना मानपत्र, आणीबाणीला विरोध आणि अखिल भारतीय महापौर परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून अटक, आमदार म्हणून नामांतर विधेयक सादर, गृहराज्यमंत्री मंत्री म्हणून लाच देऊ करणाऱ्या तस्करांना अटक, पोलिसांना फुल पँट.

पण प्रत्यक्षात भाई आयुष्यभर समाजवादी स्वप्न भूमीच्या शोधात वाटचाल करीत राहिले. भाईंनी देशात समाजवादी राजकीय पर्याय उभा करण्यासाठी अविश्रांत प्रयत्न केले. मेधा पाटकरांनी समाजवादी जनपरिषदेचे नेतृत्व करावे अशी त्यांचे मनोमन इच्छा होती. पुढे नव्या सोशलिस्ट पार्टीचेतरी नेतृत्व त्यांनी स्वीकारावे असे त्यांना वाटले. त्यासाठी ते नेतृत्वावरून पायउतार व्हायला एका पायावर तयार होते. मेधाताई राजकारणात पडायला नकार देत राहिल्या. पण पुढे त्या आप पुरस्कृत उमेदवार म्हणून उभ्या राहिल्यावर भाईंनी कठोर भूमिका घेतली. हा कठोरपणा त्यांना किती वेदनादायी होता याची मला कल्पना होती. आप हा समाजवादी विचाराचा पक्ष नाही अशी त्यांची आणि न्या. राजेंद्र सच्चर यांची भूमिका होती. भारतीय राजकारणात पद्धतशीरपणे उठवण्यात आलेली ही एक वावटळ आहे आणि ती समाजवादी चळवळीला घातक आहे असे दोघांचे स्पष्ट मत होते. अण्णा हजारे प्रकरणात अनेक समाजवादी वाहवत जात असताना भाई दूर राहिले. भाईंच्या राजकीय समजेच्या जवळ जाण्याची योग्यता नसणाऱ्या काही समाजवाद्यांनी भाईंवर करंटेपणाचा आरोप केला. मी त्यावेळी सोशलिस्ट युवजन सभेचा राष्ट्रीय अध्यक्ष होतो. आम्ही युवजनचे देशभरातील कार्यकर्ते या भूमिकेबरोबर राहिलो. आज मागे वळून पाहताना वाटते की चुकीची भूमिका घेतली असती तर नव्याने उभी केलेली सोशलिस्ट पार्टी अल्पावधीतच संपली असती. पण या घडामोडींमध्ये देशभरातील समाजवादी चळवळीची आणखीन वाताहत झाली. वास्तविक समाजवादी पक्ष जनसंघाबरोबर विलीन करून जनता पक्ष जन्माला घालणे ही एक ऐतिहासिक चूक होती की काय असा प्रश्न पडतो. पण देशावर कायम स्वरूपाच्या हुकूमशाहीच्या धोक्याला परतवून लावण्यासाठी दुसरा पर्याय नव्हता. हा निर्णय जेपी, एसेम, नानासाहेब, मधु लिमये यांसारख्या दिग्गजांनी घेतला होता. येरवड्याच्या तुरुंगात सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्याबरोबर भाईंची घनिष्ठ मैत्री झाली आणि एक दिवशी बाळासाहेबांनी अनौपचारिक गप्पांमध्ये संघ बदलेल अशी ग्वाही दिली. तुरुंगातून सुटल्यावर देवरस भाईंना भेटण्यासाठी आमच्या गुरुवार पेठेतील घरीही येऊन गेले. पण संघ बदलला नाही. संघ बदलेल असा भ्रम भाईंना कधीच नव्हता. तरीही भाईंनी 'हे कधीतरी सांगितले पाहिजे' या नावाने लेख लिहून त्यांना त्यांच्या म्हणण्याची आठवण करून दिली. पण पुढे जनसंघ जनता पक्षातून भाजपा हे नाव घेऊन बाहेर पडला तेव्हा भाईंनी आपणही सर्व समाजवादी बाहेर पडून पुन्हा आपला पक्ष सुरू करू यासाठी तमाम नेत्यांची मने वळवण्याचा प्रयत्न केला. जनता पक्षाचा जनता दल झाल्यावर भाईंनी शांतपणे दूर होण्याचा ठाम निर्णय घेतला. चंद्रशेखर पंतप्रधान झाल्यावर त्यांच्याशी अत्यंत घनिष्ठ असणाऱ्या भाईंनी त्यांनी विनंती करूनही त्यांच्या पक्षात जायला नकार दिला. पुढे मुलायम सिंग यांनी त्यांच्या पक्षात भाईंनी मोठी जबाबदारी घ्यावी अशी इच्छा व्यक्त केल्यावरही भाईंचा निश्चय ढळला नाही. नंतर देशातील समाजवादी व्ही.पी. सिंग नावाच्या गारुडात सापडले. मंडल आयोग स्वीकारल्यामुळे मंडल मसीहा बनलेल्या व्हीपींपासून वेगळे होणे समाजवाद्यांना शक्य झाले नाही. त्यात अल्पकाळ का होईना सत्ता हाती राहत गेली. शेवटी व्ही.पी.सिंग यांनीच जनता दलात आपण गेलो ही चूक होती अशी कबुली दिली. या सर्व वाटचालीत समाजवादी मंडळी स्वतंत्र पक्ष उभा करण्याचा आत्मविश्वास आणि इच्छाशक्ती गमावून बसली. अनेक जण निरनिराळ्या कारणांसाठी निरनिराळ्या राजकीय वाटांवर दाखल झाले. पण भाई मात्र समाजवादी राजकीय उभारणीसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झुंजत राहिले. एकदा देवेगौडा यांना जसलोक रुग्णालयात भेटायला गेले असता ते म्हणाले, 'भाई आय सॅल्युट युवर

सोशलिस्ट स्पिरीट.'

भाईंनी समाजवादावर विपुल लिखाण करून लोकशाही समाजवादाचे तत्त्वज्ञान आपल्या मांडणीने समृद्धही केले. एका लेखात भाई म्हणतात, 'समाजवादाचा विचार करताना त्या विचारधारेची मूल्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था या दोन्हींचाही विचार करावा लागेल. मूल्यव्यवस्थेच्या पायावरच समाजव्यवस्थाही उभी राहत असते. त्यातील पाया स्थिर, खंबीर व भक्कम हवा. मात्र त्यावरील रचना ही प्रवाही व स्थलकाल यानुसार बदलतही राहणार हे गृहीत धरले पाहिजे. मूल्यव्यवस्थेचा विचार करताना जगाच्या आधुनिक इतिहासात विशेषत: विविध राज्यक्रांत्यांद्वारे जी मानवी मूल्ये समाजापुढे आली त्यांचाच प्रामुख्याने विचार करावा लागतो. अमेरिकन, फ्रेंच, रशियन राज्यक्रांत्यांनी याबाबत फार मोठे योगदान दिलेले आहे. त्यातूनच स्वातंत्र्य, समता, व बंधुता या त्रिसूत्रीचा उदय झालेला आहे. भारतामध्ये विशिष्ट सामाजिक परिस्थितीचा विचार करून त्यात सामाजिक न्याय या मूल्याचा समावेश करावा लागला. त्यामुळेच भारताच्या सरनाम्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही चतु:सुत्री समाजापुढे ध्रुव ताऱ्यासारखी आढळ बनली आहे. समाजवादाची ही भक्कम मूल्यप्रणाली आहे. मात्र समाजामध्ये या मूल्याच्या आधारावर कशी व कोणती समाजव्यवस्था निर्माण करायची आणि तिचे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्वरूप काय असणार हे मात्र स्थलकालानुसार ठरवावे लागते. त्यामुळेच समाजवादी विचारधारा ही प्रवाही व गतिमान बनली आहे. बदलत्या संदर्भात समाजवादाची मांडणी स्वाभाविकपणे बदलत जाते व त्या त्या समाजात उचित असे रूप धारण करते. त्यामुळेच समाजवादाचे भारतीय रूप आपल्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.' भाईंनी हे भान आयुष्यभर जपल्याने ते कधी कालबाह्य झाले नाहीत आणि त्यांचे पाय भारतीय मातीत घट्ट रोवलेले राहिले. भाईंनी नुसते समाजवादी राजकारणाचे स्वप्न पाहिले नाही तर डाव्यांच्या तिसऱ्या पर्यायाची व्यापक मांडणी केली. 'पँथर ते नक्षलवादी' हे त्या मांडणीचे सूत्र होते. या मांडणीत भाई म्हणतात, 'ही एक केवळ राजकीय ऐक्याची हाक नाही. पँथर एका टोकाला व नक्षलवादी दुसऱ्या, यांच्यामधील सर्व शक्तींना हा पुकारा आहे. शोषितपीडित अशा सर्व सामाजिक समूहांना आज आपल्यावरील अन्याय निवारणासाठी एकत्र येण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.' भाई पुढे म्हणतात, 'हे ऐक्य कसे होणार हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. त्यासाठी ऐक्याचा रोड-मॅप बनवावा लागेल. परिवर्तनवादी पक्ष व संघटनांत तात्त्विक व वैचारिक मतभेद नाहीत असे मानण्याचे कारण नाही. अंतर्गत मतभेदाच्या रेषेजवळ देशावरील संकटाची मोठी रेष काढल्यास आपापसातील मतभेदांची रेषा खचितच छोटी ठरेल. पण त्यासाठी संघटनात्मक अहंकाराची थोडीफार छाटणी करावी लागेल.' हे लिहिताना भाईंना मार्क्सवाद, आंबेडकरवाद, नक्षलवाद, समाजवाद, गांधीवाद अशा सर्व छटांची जाणीव होती. भाईंनी या ऐक्यासाठी पूर्ण रोजगार, कृषी औद्योगिक अर्थव्यवस्था, मोफत शिक्षण, सर्वांना आरोग्य, आणि जाती निर्मूलन अशी पंचसूत्री दिली होती. यावरून हेही लक्षात येते की भाईंची ही मांडणी व्यवहारात यायला कठीण वाटली तरी स्वप्नाळू नव्हती, देशापुढील आव्हानांचा भविष्यवेधी सामना करणारी होती. जातीयवादाच्या पारंपरिक आव्हानाबरोबर देशापुढे आता जागतिकीकरण आणि जमातवाद ही आव्हाने उभी ठाकत असल्याची वास्तववादी जाणीव होती. भाईंनी आयुष्यभर समाजवादी विचारसरणीला आधुनिक जगाशी आणि बदलत्या काळाशी जोडण्याचा प्रयत्न केला.

यामुळेच असेही म्हणता येईल की भाईंचे आयुष्य तीन व्यापक संघर्षांना समर्पित होते; जातीयवाद, जागतिकीकरण आणि जमातवाद.

हिंदू धर्मातील जातीयवादाला जन्म घालणाऱ्या जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेला त्यांचा प्रखर विरोध होता. याबाबत त्यांच्या भूमिका या महात्मा फुले यांचे वाङ्मय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'अनिहीलेशन ऑफ कास्ट' यांवर आधारलेल्या होत्या. भाई मनुस्मृतीचे कट्टर विरोधक होते. अर्थात याबरोबर सर्व धर्मांच्या मांडणीच्या सखोल अध्ययनाची जोड होतीच. 'कार्ल मार्क्स आणि भारतीय जातिप्रथा' या लेखात भाई लिहितात, 'कार्ल मार्क्स याने जातिप्रथा उन्मूलनाला प्राधान्य देण्याचा विचार मांडलेला असो नसो, भारतीय समाजाने जातीविध्वंसन ही बाब प्राधान्याची मानण्याची गरज आहे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मांडणी स्वीकारण्याची नितांत आवश्यकता आहे. इतकेच नव्हे तर गौतम बुद्धाने मांडलेल्या दोन बाबी भारताच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत.

अनित्यता व अनात्मता या दोन बाबींवर भर दिल्याशिवाय भारतातील व जगातील समाजाचे विभक्तीकरण थांबणार नाही...' 'भारतीय समाजवाद' या लेखात भाई लिहितात, 'लोकशाही समाजवादाच्या रचनेमध्ये डॉ. आंबेडकर व डॉ. लोहिया यांच्या वैचारिक मांडणीमुळे वर्गीय विचाराबरोबर वर्णभेद व जातिभेद नष्ट करण्याच्या भूमिकेचा समावेश झाला आहे. यापुढे कोणतीही समाजवादी विचाराची मांडणी जातीनिर्मुलनाच्या भूमिकेशिवाय पूर्ण होऊच शकणार नाही. याचा अर्थ असा नव्हे की या पूर्वी समाजवाद्यांनी जातीव्यवस्थेविरोधी आवाज उठविलेला नव्हता. किंबहुना लोकशाही समाजवादी विचार हा जाती-धर्मातीतच आहे.' 'राखीव जागेचा इतिहास' या पुस्तकासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेत भाई लिहितात, 'भारताचा इतिहास एका अर्थाने राखीव जागांचाच इतिहास आहे. सुरुवातीची काही हजार वर्षे उच्च वर्णीयांना आणि त्यातही ब्राम्हण जातीला सवलतींची खैरात होत होती. त्याचे तर्कशास्त्र साधे होते. समाजाचे नेतृत्व ३ ते ४ % असलेल्या ब्राम्हण वर्गाकडेच दिले पाहिजे आणि त्यासाठी शिकणे आणि शिकवणे याचा सर्व अधिकार त्यांना दिला पाहिजे. त्यासाठी जगात अन्यत्र कोठेही नाही अशी आध्यात्मिक व धार्मिक युक्ती आपल्या देशात निर्माण करण्यात आली.' भाईंनी लिहिलेली 'मंडल आयोग आहे तरी काय?' ही पुस्तिका राखीव जागांच्या समर्थकांचे हत्यार बनली. भाई जातीअंत जगले. ते खऱ्या अर्थाने डी कास्ट झालेले अपवादात्मक नेते होते. या भूमिकेची राजकीय किंमतही त्यांनी मोजली. पण महाराष्ट्रातील सर्व दलित कार्यकर्त्यांना ते फार जवळचे वाटत. अनेक दलित कार्यकर्ते त्यांना 'भाई म्हणजे महाराष्ट्राची आई' असे म्हणत. मी आणि प्राचीने ठरवून आंतरजातीय विवाह आणि तेही नोंदणी पद्धतीने केले याचा त्यांना खूप अभिमान होता. यानंतर आमच्या घरात पुढे अनेक आंतरजातीय विवाह झाले आणि होत आहेत.

सामाजिक विषमतेबरोबर आर्थिक विषमता ही गोष्टही त्यांच्या चिंतनाचा आणि चिंतेचा विषय होता. जागतिकीकरणाच्या धोरणाचा देशाने स्वीकार केल्यावर त्यावर तुटून पडणारे देशात दोनच नेते होते, चंद्रशेखर आणि भाई. 'भारतापुढील आर्थिक आक्रमणाचे अरिष्ट' या चंद्रशेखरजींच्या पुस्तकाचे भाईंनी मराठीत भाषांतर केले. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या 'खाउजा' धोरणाविरुद्ध भाई अखेरच्या श्वासापर्यंत लढले. हे धोरण भारतातच नव्हे तर जगभर न भूतो न भविष्यति अशा आर्थिक विषमतेला जन्म घालणार आहे, पण ही विषमता मुळातच सामाजिक विषमता असणाऱ्या भारतासारख्या देशाला परवडणारी नाही, उलट आर्थिक विषमता सामाजिक विषमतेला बळकट करेल असे भाईंचे म्हणणे होते. मुठभरांकडे अमाप संपत्ती ओसंडून वाहायला लागली की ती तळागाळाकडे पाझरते हा संपत्तीचा पाझर सिद्धांत त्यांना कधीच मान्य नव्हता. 'मागास वर्ग आणि जागतिकीकरण' या लेखात भाई लिहितात, 'बाबासाहेबांनी मनमाड येथील भाषणात आपले दोन शत्रू समाजाच्या लक्षात आणून दिले होते आणि ते म्हणजे ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही.' भाईंचे म्हणणे किती खरे होते हे जगातील 'ऑक्युपाय दि वॉल स्ट्रीट', काही प्रमाणात 'अरब स्प्रिंग', 'ब्रेक्झीट', इंग्लंडमधील जेरेमी कॉरबाईन आणि अमेरिकेतील क्षमा सावंत आणि बर्नी सँडर्सचा उदय यांनी दाखवून दिले आहे. जगात चाललेल्या या सर्व उलथापालथींची भाईंना अद्ययावत माहिती असे. जोसेफ स्तिग्लीत्झचा 'वी दि ९९%' हा लेख, थॉमस पिकेटी चा ग्रंथ 'कॅपिटल' यांचे उल्लेख त्यांच्या भाषणात असत. याच 'खाउजा' धोरणातून शिक्षणाचे जे खासगीकरण देशात सुरू झाले त्याच्या विरुद्ध भाई अक्षरशः दंड थोपटून उभे राहिले. या विरुद्ध लढण्यासाठी त्यांनी अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेला जन्माला घातले आणि घोषणा दिली, 'के जी टू पी जी सर्वांना मोफत, समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळालेच पाहिजे' आणि एक अभूतपूर्व असे आंदोलन उभे राहिले. या आंदोलनाचा तात्त्विक पाया भाईंनी 'संपूर्ण शिक्षण फी-विना, समान व गुणवत्तापूर्ण का व कसे ?' या पुस्तिकेत घालून दिला. या पुस्तकात भाई लिहितात, 'आपण आज शिक्षणात जी पेरणी करू त्याचीच उगवण उद्या समाजात दिसून येणार आहे. आपल्याला समाजात ज्या तऱ्हेचे पीक हवे त्याचे बी आपण शिक्षणव्यवस्थेत रुजवले पाहिजे. शिक्षण व समाज हे परस्परावलंबी आहेत. भारतीय समाज हा शिक्षण व समाज अलग समजतो. ते खासगी व व्यक्तिगत काम आहे असे मानतो. त्यासाठी आपण निवडून दिलेल्या शासनाला जबाबदार धरत नाही. आज समाजात जो भ्रष्टाचार, स्वार्थ, गळेकापू स्पर्धा, दुराचार, अनीती, गुंडगिरी पसरत आहे त्यामुळे सर्वसामान्य माणूस चिंतेत असतो. त्याला

समाजात असुरक्षितता वाटू लागली आहे. मात्र हे असे का घडते, याकडे त्याचे पुरेसे लक्ष नाही. केवळ राज्यकर्त्यांना दोष देऊन तो नामानिराळा होऊ पाहतो. या परिस्थितीचे मूळ कारण आपल्या सबंध शिक्षणव्यवस्थेत आहे याची मात्र त्याला तितकीशी जाणीव नाही.' या आंदोलनाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६% खर्च शिक्षणावर केला जावा अशी मागणी केली. आपल्या देशाने १९६४ साली हे करण्याचे जाहीर केले होते पण आजतागायत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. येणाऱ्या विविध सरकारांनी शिक्षणाला प्राधान्य न दिल्याने हे घडले आहे असे भाई म्हणत. १२वी पर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे असले पाहिजे त्याचबरोबर उच्च शिक्षण सक्तीचे असू नये पण मोफत असले पाहिजे अशी या आंदोलनाची मागणी आहे. देशातील किमान ९ कोटी बालके प्राथमिक शिक्षणालाही वंचित आहेत. यात श्रीमंतांच्या मुलांनाही मोफत शिक्षण देण्याला काहींचा विरोध आहे. पण श्रीमंत आणि गरीब यांच्यासाठी वेगळ्या शिक्षण व्यवस्था समाजातील भेद वाढवतात. भाईंच्याच शब्दांत, 'कृष्ण आणि सुदामा जसे एकत्र वाढले आणि शिकले अशी शिक्षण मला अभिप्रेत आहे.' जगभरातील विकसित देशांनी १९ व्या शतकातच प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. आशिया व आफ्रिकेतील कित्येक देशांनी २० व्या शतकात हे पाऊल उचलले. देशात मंजूर झालेला 'शिक्षण हक्क कायदा'हे या लढ्याचेच यश आहे. या विधेयकावर सही केल्यावर राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी स्वत: फोन करून भाईंना हे सांगितले. याच लढ्यासाठी भाई वयाच्या ८९व्या वर्षी सत्याग्रह करून रस्त्यात ठाण मांडून बसले आणि त्यांनी अटक करून घेतली. हा त्यांचा बहुतेक २८वा तुरुंगवास होता.

शिक्षण हक्काबरोबरच भाई आरोग्य सेनेच्या 'आमचे आरोग्य हा आमचा हक्क आहे' या आंदोलनाच्या मागेही भक्कमपणे उभे राहिले. राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ४ ते ५% सार्वजनिक आरोग्यावर खर्च केले पाहिजेत ही आरोग्य सेनेची मागणी आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था खिळखिळी करून ती पूर्णपणे खासगी आणि विशेषत: कॉर्पोरेट क्षेत्राच्या हाती सोपविण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. गरिबाच्या उत्पन्नाचा बहुतांश भाग हा आरोग्यावर खर्च होतो आणि नाहीतर त्याला मरण कवटाळावे लागते. आरोग्य ही पण कोणत्याही लोकशाही कल्याणकारी राज्याची जबाबदारी असते. आरोग्य सेनेच्या देशभरातील आणि देशाबाहेरील आपत्तीकालीन वैद्यकीय मदत कार्याच्या मागे भाई जसे उभे राहिले तसेच ते कचरा डेपो, दूध भेसळ अशा अनेक आंदोलनांच्या मागेही उभे राहिले. आरोग्य सेनेच्या जेनेरिक औषधांच्या 'जनलोक मेडिकल्स' या दुकानांच्या साखळीचे उद्घाटनही भाईंच्या हस्ते झाले. आरोग्य सेनेच्या 'जनलोक डायग्नॉस्टीक' या अल्प दरात अत्याधुनिक सेवा पुरविणाऱ्या केंद्राला भाईंनी त्यांच्या माजी आमदार आणि स्वातंत्र्य सैनिक निवृत्ती वेतनातून तब्बल १२ लाख रुपयांचा टेकू दिला. ही रक्कम आरोग्य सैनिकांनी भाई वैद्य फौंडेशन मध्ये घालण्याचा संकल्प केला आहे.

जागतिकीकरणाचा आणखीन एक बळी म्हणजे शेतकरी. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय आज गाजत आहे पण भाई त्याबद्दल गेले दीड दशक भारतीय समाजाला जागे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. दोन लाखापेक्षा अधिक शेतकरी आत्महत्या करतात आणि समाजमनावर ओरखडाही उमटत नाही असे ते म्हणत. देशाने कृषी औद्योगिक धोरण स्वीकारण्याची गरज आहे असे त्यांचे मत होते. मुंबईतील रस्त्यावर फेकल्या गेलेल्या अडीच लाख गिरणी कामगारांबद्दलही भाई असेच पोटतिडकेने बोलत. कष्टकरी, शेतमजूर, कामगार, खाणकामगार, महिला आणि आदिवासी यांच्या देशभरातील अनेक आंदोलनांचा ते आधार होते. हमाल पंचायतीच्या स्थापनेपासून ते या चळवळीच्या मागे उभे राहिले आणि मंत्री झाल्यावर पुण्यातील मार्केट यार्ड येथे त्यांनी मिळवून दिलेल्या जागेवर हमाल नगर दिमाखात उभे राहिले. विदर्भातील कुरखेड्यासारख्या छोट्या आदिवासी गावी चंद्रशेखर यांच्या उपस्थितीत 'महाराष्ट्र जंगल व मानव बचाव परिषद' आयोजित करून जंगले, त्यावर जगणारी माणसे, आदिवासी आणि शेतकरी यांच्या समस्यांना वाचा फोडली होती. एसेम आणि नानासाहेब यांच्या बरोबर भाईंनी त्यावेळच्या अशांत पंजाबचा दौरा केला आणि भिंद्रनवालेची सुवर्ण मंदिरात जाऊन भेट घेतली. पंजाबमधील बहुसंख्य शीख समाज हा खलिस्तानवादी नाही हे सत्य सांगितल्याबद्दल माध्यमांचा रोषही ओढवून घ्यावा लागला. पुढे सेवा दलातर्फे पेटलेल्या काश्मीरचाही दौरा भाईंनी केला. कोणतेही सरकारी संरक्षण न घेता हे पथक अतिरेक्यांनी वेढलेल्या भागात जाऊन काश्मिरी जनतेशी

संवाद साधून आले. त्यावेळेसही बहुसंख्य काश्मिरी पाकिस्तान बरोबर जाऊ इच्छित नाही, या प्रश्नावर उत्तर लष्करी नसून राजकीय आहे अशी मांडणी त्यांनी केली. भाई राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष असताना त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी भरविलेली 'परित्यक्ता परिषद' न भूतो न भविष्यति अशी झाली होती. 'सावित्रीच्या लेकी आम्ही मागे आता हटणार नाही' ही घोषणा देशातील महिला आंदोलनांचा चेहरा बनली. नर्मदा बचाव आंदोलनाच्या मागेही ते भक्कमपणे उभे होते. पर्यावरणाच्या अनेक लढायांमध्ये भाई सहभागी होते. एन्रॉनचा लढा असो, जैतापूरचा लढा असो भाई त्या मागे उभे असतं. पण तरीही भाईंच्या पर्यावरणवादी भूमिका टोकाच्या, एकांगी आणि विकास विरोधी नव्हत्या.

आपल्या देशाला जमातवादाचा धोका आहे हे भाई कित्येक दशकांपासून ओळखून होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना हमीद दलवाई यांनी आमच्या गुरुवार पेठेतील घरात केली. मुस्लिमांमधील धर्मांधतेला हे उत्तर होते तसेच मुस्लीम समाजाला पुरोगामित्वाकडे नेऊन देशाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा हा प्रयत्न होता. काळाच्या फार पुढचे हे पाऊल होते. गेल्या काही दशकांमध्ये जगभर निर्माण झालेल्या तालिबान, अल कायदा, बोको हराम आणि इसिस सारख्या हिंसक अतिरेकी संघटनांवर भाई तुटून पडत आणि सांगत की हमीद दलवाई यांच्या विचारांची देशाला कधी नव्हे एवढी गरज आहे. याच बरोबर भाईंनी संघप्रणित हिंदुत्ववादाचा धोका फार पूर्वीच ओळखला होता. भारताची उभारणी ही एका धर्माच्या आधारावर होऊ शकत नाही आणि देशाची संस्कृती ही पण एका धर्मातून घडलेली असू शकत नाही असे त्यांचे मत होते. भारतासारख्या देशात तर हिंदुराष्ट्र म्हणजे मनुस्मृतीवर आधारित राज्य, म्हणजेच मनुस्मृतीप्रणीत जन्माधिष्ठित जातिव्यवस्था हे विसरून चालणार नाही असे ते सातत्याने सांगत. या देशात हिंदू आणि मुस्लीम यांच्यात महाभारतासारखे युद्ध होणार आहे असे पूर्वीचे सरसंघचालक सुदर्शन यांचे वक्तव्य ते उद्धृत करीत. गोळवलकर हे मुसलमान, ख्रिश्चन आणि कम्युनिस्ट या तिघांना देशाचे शत्रू मानीत. सावरकर यात बौद्धांचा समावेश करीत. छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला, म्हणजे शत्रूच्या हाती लागलेल्या स्त्रीला, खणा-नारळाची ओटी भरून सन्मानाने पाठविले म्हणून त्यांना इतिहासातील सहा सोनेरी पानांमध्ये स्थान देता येत नाही हे सावरकरांचे म्हणणे ते आवर्जून सांगून प्रश्न विचारीत की आपल्याला शिवाजी महाराजांची संस्कृती स्वीकारायची आहे का सावरकरांची? भाई एवढ्यावर थांबले नाही तर त्यांनी 'संघाचा असली चेहरा' ही संघावर घणाघाती टीका करणारी पुस्तिका २००२ मध्ये प्रसिद्ध केली. त्यात भाई लिहितात, 'एक गोष्ट सर्वप्रथम कबूल केली पाहिजे की रा. स्व. संघाने आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत आपले उद्दिष्ट कधीही लपवून ठेवले नाही. ते उद्दिष्ट म्हणजे भारतात हिंदुराष्ट्राची संस्थापना करणे. किंबहुना अनेक वेळी डॉ. हेडगेवारांच्या तोंडी असे उद्गार आहेत की, 'हे हिंदू राष्ट्र आहे.' भारताचा उल्लेख ते आवर्जून हिंदुस्थान असा करतात. वास्तविक हिंदू हा शब्द वेद, उपनिषदे, गीता इ. कोणत्याही धर्मग्रंथात नाही. किंबहुना मनुस्मृतीतही नाही. या देशाला हजारो वर्षे भारत म्हणून संबोधण्यात आले. हिंदू हा शब्द परकीय आक्रमकांनी दिला. त्याचा अर्थ 'सिंधूपलीकडचे' असा असून काहींच्या मते 'काळे लोक' असा अवहेलनात्मक आहे.' भाई पुढे लिहितात, 'सावरकरांचे 'हिंदुत्व' आणि गोळवलकरांची 'आम्ही' व 'विचारधन' ही पुस्तके म्हणजे संघाच्या हिंदुराष्ट्र विचाराची आधारशीला आहेत. गोळवलकरांनी 'आम्ही' या पुस्तकात स्पष्टपणे मांडले आहे की, गैर हिंदूंनी हिंदू वंश व संस्कृतीचे गोडवे गायलेच पाहिजेत, अन्यथा नागरीहक्काविना दुय्यम भूमिका स्वीकारून त्यांना राहावे लागेल. त्यांनी हिटलरच्या वंश शुद्धत्वाच्या कल्पनेची भलावण 'आम्ही' या पुस्तकात केलेली होती. 'विचारधन' मध्ये गोळवलकरांनी प्रादेशिक राष्ट्रवाद पूर्णपणे धिक्कारला आहे. ते म्हणतात, 'प्रादेशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेमुळे प्रेरणादायी अशा राष्ट्रवादाच्या भूमिकेला आपण मुकतो' आज राष्ट्रसंघामध्ये जवळ-जवळ दोनशे राष्ट्रे सदस्य आहेत. यातील ९५% राष्ट्रे तरी प्रादेशिक राष्ट्रवादाच्या भूमिकेवर उभारलेली आहेत. त्यामुळेच इंग्लंड, जपान, जर्मनी, फ्रान्स आदी राष्ट्रांमध्ये गेलेल्या भारतीयांना तेथे पूर्ण नागरिकत्व मिळालेले आहे. ही गोष्ट प्रादेशिक राष्ट्रवादामुळेच शक्य होते. राष्ट्रांच्या सीमांनी वेढलेल्या प्रदेशात जी विविध भाषा व धर्मांची मंडळी राहतात, त्यांना तेथील पूर्ण नागरिकत्व मिळतेच, परंतु त्याशिवाय आज जगामध्ये बहुसंस्कृती वादाची, 'मल्टी-कल्चरीझमची' कल्पना रूढ झालेली आहे. अमेरिकेची

संस्कृती बाहेरून आलेल्या आशियाई व लॅटीन अमेरिकन मंडळींमुळे प्रत्यक्ष बदलत आहे आणि त्याचे अमेरिकेमध्ये स्वागत आहे. इंग्लंडमध्ये बाहेरून आलेल्या मंडळींची बहुसंख्या होण्याचा संभव आहे, आणि इंग्रजांनी ही गोष्ट सहजपणे मान्य केली आहे. त्यासाठी त्यांनी आपले नागरिकत्वाचे कायदे विशेष बदलले नाहीत. आज जगामध्ये बहुसंख्य राष्ट्रांतून बहुसांस्कृतिक वाद प्रचलित झाला आहे. राष्ट्रामध्ये प्रबळ संस्कृतीबरोबर अनेक उप संस्कृती वावरणार हे गृहीत धरले जाते. वंशवाद, धर्मवाद, धर्माधिष्ठित संस्कृतीवाद या सर्व जुनाट कल्पना आहेत. त्यांचा आग्रह जगामध्ये ५६ मुस्लीम देशांपैकी काही निवडक मुस्लीम देशच धरीत आहेत. त्यांचे शिष्यत्व पत्करून संघाने प्रादेशिक राष्ट्रवादाचा निषेध करायचा आणि हिंदू संस्कृतीचा आग्रह धरून अल्पसंख्याकांना दुय्यम स्थान द्यायचे ही गोष्ट राजेशाही व जुनाट संस्कृतीच्या कल्पनांशी सुसंगत असेल परंतु त्यामुळे भविष्यात गंभीर प्रश्न निर्माण होऊन देशाचे तुकडे पडल्याशिवाय राहणार नाहीत. सावरकरांनी या देशात प्रथम १९२३ साली द्विराष्ट्र सिद्धांत मांडला आणि जिनांनी १९४० साली तो उचलून धरला. त्यातून फाळणीचे संकट ओढवले. रा. स्व. संघ आता पुढील फाळणीची पूर्वतयारी करीत आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आजही काश्मीरची तीन

अशी भरा वर्गणी

पुरोगामी जनगर्जना

'पुरोगामी जनगर्जना' मासिकाची वार्षिक वर्गणी पोस्टेजसह ३३० रुपये

वर्गणी आपण बँकेत प्रत्यक्ष वा ऑनलाईन भरून आम्हांला फोनवर तपशील कळवा किंवा एमेलने पाठवा.

बँक तपशील

खाते नावः आरोग्य सेना – बँक नावः बँक बँक ऑफ बडोदा
शाखाः सुभाषनगर, पुणे – खाते क्रमांकः 07910100006583
खाते प्रकार : सेविंग्ज - IFSC कोडः BARB0SUBHAS

सुचना : पुरोगामी जनगर्जना मासिक 'आरोग्य सेने' तर्फे प्रकाशित होते. त्यामुळे धनादेश लिहिताना 'आरोग्य सेना' या नावे काढावा ही विनंती.

आपण बँकेत वर्गणी भरल्यानंतर आपला पिनकोडसह पूर्ण पत्ता (जवळच्या खुणेसह) व मोबाईल नंबर आम्हांला त्वरित कळवावा म्हणजे आपणांस अंक पाठविणे सुलभ होईल.

आमचे फोन नंबर- ०२०-२४४७३०२८ (सकाळी ९ ते ५)
व्यवस्थापक रमाकांत सोनवणी- ९५०३७५३०४५ इमेलः puja.monthly@gmail.com

राज्यांत धर्माधिष्ठित विभागणी करण्याचे मनसुबे त्यांनी रचलेच आहेत. तोच प्रयोग भारतात व्यापक प्रमाणात करायचा त्यांचा विचार असावा. मात्र १२ ते १३ कोटींच्या अल्पसंख्याकांना दुय्यमत्व देण्याने जो अनवस्था प्रसंग ओढवेल त्याची पुढची पायरी हिटलरचा फासीवाद असेल. रा. स्व. संघाची पावले फासिवादाच्या दिशेने पुढे पडत आहेत. हे भारतीयांनी लक्षात घेतले पाहिजे. हिटलरने अखेरीस वंश शुद्धतेच्या भूमिकेतून जर्मनीचा सर्वनाश केला होता, हे न विसरलेले बरे. हिटलर वंश शुद्धीच्या आहारी गेला होता तरी त्याने ख्रिश्चन धर्माला महत्त्व दिले नाही. परंतु संघाचा फासीवाद हा धर्माधिष्ठित होण्याचा संभाव आहे.' पावणेदोन दशकांपूर्वी भाईंनी देशाच्या भवितव्याबद्दल केलेली भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली.

भाईंमध्ये एक द्रष्टेपण होते हे त्यांच्या वैचारिक मांडणीत सतत दिसून येई. अनेक नेते काळाबरोबर न धावता आल्याने कालबाह्य बनतात, अनेक नेते काळाबरोबर जुळवून घेतात, लोकप्रियता टिकवण्यासाठी केलेली ही तडजोड असते. पण फार थोडे नेते असे असतात की त्यांना फार पुढचे आधीच दिसत राहते, लोकानुनय न करता ते मांडणी करत राहतात, कशाचीही पर्वा न करता चुकीच्या विचारसरणीला प्रखर विरोध करीत राहतात. पण समाज एखाद्या विचारसरणी बरोबर भरकटत निघालेला असतो आणि त्यांची मांडणी प्रवाहा विरोधी मानली जाते. प्रवाहाविरुद्ध जाऊन समाज आणि राष्ट्र यांच्या दीर्घकालीन हिताची मांडणी करायला अलौकिक धैर्य लागते. असे धैर्य भाईंकडे होते. पण अनेक वेळा प्रवाहाविरुद्ध जाणाऱ्या नेत्याला समाजाच्या रोषाचे आणि अप्रियतेचे धनी व्हावे लागते. इथे मात्र भाई अपवाद ठरले. भाईंची लोकप्रियता आणि त्यांच्याबद्दल असणारा आदर त्यांच्या वाढत्या वयाबरोबर वाढतच गेला. याचे एक कारण असावे की भाईंच्या विचारांच्या उंचीबद्दल आणि प्रामाणिकपणाबद्दल शत्रूच्या मनातही शंका येत नसे आणि भाई कोणा व्यक्तीला कधी शत्रू मानीत नसत. अनेक विरोधी विचारसरणीच्या नेत्यांशी त्यांचे वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळे अण्णा जोशी मुंबईला तोरण्यावर येऊन; वहिनी दोन हजार वर्षांचा बॅकलॉग भरून काढायचा आहे माशांचे कालवण होऊन जाऊ द्या अशी फर्माईश करू शकायचे आणि अरविंद लेले लिहिलेली प्रत्येक कविता भाईंना वाचून दाखवायचे. एसेमचा पुतळा विधानभवनाच्या आवारात बसवावा या मागणीसाठी वेळ न ठरवता जाऊनही बाळासाहेब ठाकरे पुढील सर्व ॲपॉटमेंटस रद्द करून मातोश्रीवर तासभर गप्पा मारीत. वैचारिक मतभेदांच्या पलीकडे जाऊन वैयक्तिक जिव्हाळा जपता येतो हे भाईंनी जगून दाखविले. पण ना. रामदास आठवले भेटीस आल्यावर तुम्ही संघाच्या हिंदुराष्ट्राच्या अजेंड्याला विरोध केला पाहिजे हे ही ते परखडपणे सांगत. मदतीला आलेल्या कोणालाही भाईंनी विन्मुख पाठविले नाही किंवा 'अरे तू तर माझ्यावर गरळ ओकली होतीस' याची आठवण दिली नाही. अशा लोकांनाही भाई मदत करीत मात्र सन्मान करायला स्पष्ट नकार देत. भाई कोणाकोणाला अबोलपणे आर्थिक मदत करीत याची गणती नसे. कोणाकोणासाठी भाई कोणाकोणाला भेटत, फोन करीत, पत्रे देत याचीही गणती नसे. पण मदत करताना कोणाच्याही डोक्यावर उपकारांचे ओझे ठेवणे त्यांच्या स्वभावात नव्हते. कोणत्यातरी भन्नाट अशा अमायनो ॲसिडसनी बनलेला हा डीएनए होता.

अशा या लोकोत्तर नेत्याचे आणि तेही २०१९च्या तोंडावर जाणे हा देशावर झालेला एक भयानक आघात आहे. पण मी भाईंना कधीही निराश झालेले वा हताश होऊन बसलेले पाहिले नाही. अगदी ज्या एसेमवर भाईंनी भक्ती सदृश्य प्रेम केले त्यांच्या जाण्यानंतरही! उलट परिस्थिती जेवढी प्रतिकूल तेवढे भाई अधिक पेटून उठत. भाई एक धगधगणाऱ्या विचारांचे कृतिशील अग्निकुंड होते. असे अग्निकुंड हे खऱ्या अर्थाने कधी विझत नसते. त्याच्या विचारांच्या ज्वाला आपल्याला लढण्यासाठी अखंड इंधन पुरवीत असतात. आपण डोळ्यांमधले अश्रू पुसून या अग्निकुंडातून विचारांच्या ज्वालांचा अंगार आपल्या डोळ्यांमध्ये घ्यायचा असतो आणि घोषणा द्यायची असते, 'भाई आपके सपनोंको मंजिल तक पहुचायेंगे.' ✻✻✻

BHAI VAIDYA: TAKING THE SOCIALIST DREAM TO THE MASSES

ANIL SADGOPAL

The thousands of people who walked in the last journey of Bhai Vaidya on the streets of Pune on 3rd April 2018 must have nurtured multiple perceptions of one of the finest citizens of the Indian Republic. Bhai Vidya's public life spanning over 75 years ranged from participation in Quit India movement (1942) at the age of 14 years, joining Rashtra Sewa Dal (a significant social movement in the genre of renaissance) in 1943 and joining Congress Socialist Party in 1946 to facing brutality of the Portuguese Police during the Goa Liberation Struggle as a *Satyagrahi* in 1955 (which substantially impaired both of his arms for the rest of life), being imprisoned in the political emergency under MISA (1975-77) and serving as Minister of State for Home in Maharashtra Government (1978-80). This is just a tiny glimpse into Bhai Vaidya's diverse engagements. He would be remembered as an intensely political person in the highest sense of the politics who (a) worked from outside the corridors of state power, preferring to be with the masses instead; (b) became an indefatigable advocate of the socialist philosophy and, acknowledging the logic of the eventual collapse of capitalism, presented Democratic Socialism and its socialist model of development as an alternative to capitalism; and (c) was recognised as a deeply reflective human being while also being a lifelong organiser of mass movements for which he was incarcerated more than 28 times as an eternal *Satyagrahi*. The breathtaking range of issues on which he participated in or led movements included Sanyukta Maharashtra Agitation (1957), Bharat Padayatra (1983) from Kanyakumari to Rajghat (Delhi) organised by the Late Prime Minister Chandrashekhar; and a series of Satyagrahas and Yatras to resist communal violence, inflation, land alienation of the oppressed, denial of education of equitable quality and privatisation and commercialisation of education. Hence, no one should be surprised when told that Bhai Vaidya was the first MLA in the Maharashtra assembly in 1977 to present the Bill to rename Marathwada University as Dr Babasaheb Ambedkar Marathwada University in the wake of which the historic Namantaran Movement caught the imagination of the oppressed masses.

Such is the dimension and depth of the multiple diverse perceptions of Bhai Vaidya in the public mind that history shall not permit his imagery to be reduced to that of a linear political leader. Instead, the future generations will recognise him as one who raised the level of politics itself to the politics of *Insaaniyat* and whose honesty in terms of not just money but in terms of ideology, political commitment and human

relations as well became a legend.

At the core of Bhai Vaidya's varied engagements was his uncompromising commitment to socialism in the pursuit of which he successively joined various socialist parties like Praja Socialist Party, Janata Party, Samajwadi Jana Parishad and finally co-founded Socialist Party (India), holding senior offices of responsibility in them.

It was Bhai Vaidya's incessant pursuit of a socialist vision of education as a means to building a democratic, secular, egalitarian, just and enlightened society that brought me closer to him in the early years of 2000s. With the declaration of globalisation of economy in 1991, the first neoliberal assault was on the elementary school system when the Indian government kowtowed to the World Bank-IMF conditionality of structural adjustment. The conditionality required the government to steadily reduce public expenditure on education, health and all social welfare programmes. The cynical objective was to dismantle the state-funded school system, thereby opening the vast market of school education. The outcome was the misconceived Sarva Shiksha Abhiyan (2000) rooted in a multi-layered school system with massive contractualisation of the teacher cadre, reduction of education to literacy and multi-grade teaching (one teacher teaching more than one classes in a single room) - meant only for the oppressed classes and castes, particularly girls and the disabled in each of these social sections. This was just the right milieu in which the Kothari Commission's call (1966) for Common School System began to make more sense than ever before. Bhai Vaidya recognised this state-promoted privatisation of the school system as part of the broader political economy of neo-imperialism.

In one of my Pune visits in 2007-08, I got a message from Bhai Vaidya to have lunch with him and his colleagues from Akhil Bharatiya Samajwadi Adhyapak Sabha (ABSAS) of which he was the Founder-President. It was in this interaction that Bhai Vaidya expressed the unflinching support of ABSAS for Common School System based on Neighbourhood School. He also shared the slogan coined by him years ago for ABSAS viz., 'Free, Equal and Quality Education from KG to PG' - a slogan that was to change the very shape of the education movement in so far it also brought higher education within the

आरोग्य सेना
AROGYA SENA • HEALTH ARMY

आरोग्य सेनेचे जनलोक मेडिकल्स

शाखा क्र. १ मार्केट यार्ड, पुणे

शॉप नं. ४, बिल्डिंग नं. १६, हमाल नगर,
गंगाधाम चौक, मार्केट यार्ड,
बस स्टॉप, पुणे ४११०३७

संपर्क: राजश्री दळवी (मो:९४२०३१८९०४)



scope of the democratic right as a Constitutional imperative (Articles 41 & 46). When the All India Forum for Right to Education (AIFRTE), constituted in June 2009, began to focus attention on the then emerging signs of neoliberal attacks on higher education as well (November 2009), I shared the Bhai Vaidya slogan and it made immediate sense to all. As AIFRTE evolved, the slogan also evolved steadily. By this time, Bhai Vaidya had accepted our invitation to be on our Board of Advisers and ABSAS joined AIFRTE as our member-organisation. In my next visit to Pune, I shared the evolved slogan with Bhai Vaidya and ABSAS members viz., 'Fully State-funded Free, Equitable and mother tongue-based Common Education System from KG to PG.' After due reflection, with a smile, he patted me on my back, *"Achha hai, hamaaree baat ko aage badha diya, naya arth de diya."* [Well done, you have enriched our idea, gave it a new meaning.] Emboldened by this green signal from the author of the slogan, AIFRTE has since then taken the slogan way beyond the borders of Maharashtra, literally around the country. The evolved (and still evolving) slogan presented to the people an alternative vision of education to counter the neoliberal market assault on the Constitutional vision of education.

In 2010, ABSAS under the leadership of Bhai Vaidya organised an all-Maharashtra Education Yatra to create people's consciousness in order to resist privatisation and commercialisation of education and to build a Common School System based on Neighbourhood School. Recognising the increasing hold of the imperialist agenda on the Indian state, Bhai Vaidya soon followed up the Yatra with *Satyagrah* in 36 districts of Maharashtra, with supporting Satyagraha organised in Kerala and Bihar as well. As expected, with encouragement from Bhai Vaidya, ABSAS also joined the Parliament March organised by AIFRTE in February 2010 on the same issues.

There is a beautiful story which I am tempted to put on record. Despite sharing a common educational perspective, there was one issue where AIFRTE as a federal organisation could



not adequately convince ABSAS, its member-organisation. This pertained to our uncompromising critique of the anti-Constitutional neoliberal 'Right to Education (RTE) Act, 2009' and the strategy to be adopted to resist it. Yet, there were informal signs that the then ABSAS National President Bhai Vaiya, with his broader understanding of neo-imperialism and the political economy of the neo-liberal assault, could appreciate our stand. However, being a democratic person, he chose to refrain from imposing his views. In 2013, having completed his 10-year stint as National President of ABSAS, he resigned. In the following year, I visited Pune to seek his support for the All-India Shiksha Sangharsh Yatra-2014 (AISSY-2014). He readily assembled several senior ABSAS members available in Pune at his residence. He told them, "Now that I am no more your President and my energy is focused on building the Socialist Party (India), I suggest that you take advice henceforth from Anilji whenever you have any doubt." This soft-spoken subtle hint was more than adequate. His former ABSAS colleagues happily endorsed the suggestion and joined AISSY-2014 while continuing to maintain their difference of stance on the RTE Act, 2009. This story is evidence of the tremendous moral authority which Bhai Vaidya held over his colleagues in various social and political organisations, irrespective of whether held an office in the said organisation or not.

Bhai, we bow our head to you for the historic gift of your slogan to India's people's movement fighting to thwart the imperialist design to commercialise education while, at the same time, striving to reconstruct the education system for emancipation, as per the Constitutional mandate.

Dr. Prem Singh, one of the closest political colleagues of Bhai Vaidya in the Socialist Party (India), states, "Brought up in the womb of the socialist movement, Bhai Vaidya had a deep imprint on him of Phule and Ambedkar, in addition to that of Gandhi."

Farewell, Bhai: Your name may not be printed henceforth in the list of AIFRTE's Board of Advisers. But you have made your place as an eternal adviser of all educational movements that stand committed to democracy, equality, freedom from discrimination, and social justice in and through education as well as to emancipation of the oppressed classes and castes from the hegemony of patriarchy, language, regions, 'normal' body, irrationality and superstition, market and commoditized knowledge. We shall continue the struggle to realise your dream to save our education system from the neoliberal-cum-Manuwadi fascist assault and to build a democratic secular, socialist, egalitarian, just and enlightened India, as per the principles enshrined in the Constitution!

Jai Bheem, Lal Salaam!! ✻✻✻

भाई – डॉ. बाबा आढाव

भालचंद्र सदाशिव वैद्य ऊर्फ भाई वैद्य. आम्ही म्हटलं तर अगदी बालमित्र! समाजवादी व राष्ट्र सेवा दल परिवारात भाई – बाबा हा द्वंदसमाजास सतत बोलण्यात असतो. पुण्यातील व महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनात आमची जोडी सुपरिचित ठरली. तिच्यात एक सहजता आहे. १९४१ साली माझा श्री. शिवाजी मराठा हायस्कूलच्या इंग्रजी इयत्ता पहिली इयत्तेत प्रवेश झाला. भाई त्यावेळी दुसरीत होते. माझ्यापेक्षा एक वर्ष पुढे. १९४१, १९४२, १९४३, १९४५, १९४७ ही वर्षे आमच्या आयुष्यात नोंदली गेलेली आहेत. १९४२ ची म. गांधींची ''चलेजाव'', ''करेंगे या मरेंगे!'' ही घोषणा आणि एकूणच स्वातंत्र्य चळवळीने भारावलेले वातावरण! भाई १४ वर्षांचे; परंतु वयापेक्षा जास्त प्रौढत्व भाईंना सुरुवातीपासूनच लाभलेलं. भाईंचा खादी वेषातील पेहेराव. कोट-टोपी-पायजमा-शर्ट, भाईंच्याकडे आम्हा विद्यार्थ्यांत पुढारीपण सहज लाभलेलं. तो आमचा नेता! शाळेत त्याच्यासारखा सदाशिव बोराटे नावाचा तरुणही होता. मॅट्रिकची परीक्षा आम्ही दोघांनी तिथूनच दिलेली. त्यावेळी मुंबई विद्यापीठातून मॅट्रिक्युलेशन होते. शाळेबरोबरच राष्ट्र सेवा दलामुळे भाईंचा आमचा संबंध. त्यामुळे शाखा, बौद्धिके, शिबिरे, यातून आमची जडणघडण होत गेली, १९४५ साली साने गुरुजींचे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेशासाठी आमरण उपोषण झाले. सेवादलाने खेडोपाडी जाऊन प्रचार केला. त्यावेळी मुंबई राज्य होते आणि नामदार बाळासाहेब खेर मुख्यमंत्री होते. या मंदिराचे दरवाजे दलितांसाठी खुले झाले. विठोबा मुक्त झाला. या आंदोलनात तर खेडोपाडी प्रचारासाठी जावे लागत होते. पुण्यालगतच्या खेड्यापाड्यात सायकल फेऱ्या सुरू होत्या. १९४५ साली जागतिक युद्धाला वेगळी कलाटणी मिळाली.सतत शिस्तीत माघार घेत राहिलेल्या ब्रिटिशांना टयुनिशिया विजय झाला. आणि पुण्याच्या तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी शाळाशाळांतून शासनाच्या वतीने पेढे वाटप केले. आश्चर्याची बाब म्हणजे आमच्या शाळेतल्या एकाही विद्यार्थ्याने पेढा खाल्ला नाही. सारे पेढे शाळेच्या पटांगणावर फेकून दिले. अर्थातच भाई वैद्य आमचे नेते होते. १९४७ नंतर आमच्या वाटा बदलल्या. मी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. भाई अगोदरच कला शाखेत दाखल झाले होते. मात्र राष्ट्र सेवा दलाच्या कामामुळे आम्ही सतत भेटत राहिलो. शाखा कार्य वाढलेले होते. आमची गट्टी जमत गेली. भाईंच्या घराबरोबर मैत्री जमली. भाईंचे वडील अण्णा. अण्णांच्या बरोबर गप्पा हा माझा विशेष हक्क ठरत गेला. अण्णांच्या कुटुंबात भाई सर्वांत थोरले चिरंजीव, त्यांच्या पाठीवर शरद नंतर भारत, विजया आणि मंगल अशी पाच भावंडे. आईंना सर्वजण नानी म्हणत. असा ३३, गुरुवार पेठ, मेहेंदीवाले नाईकवाडा, पुणे येथे पहिल्या मजल्यावरच्या तीन खोल्यांत वैद्यांचे कुटुंब भाड्याने राहत होते. त्यापूर्वी हे कुटुंब पंचमुखी मारुतीजवळ नंतर पानघंटी चौकात राहत असल्याचे भाईंनी मला नुकतेच सांगितले. ३३, गुरुवार पेठ मध्ये असतानाच भाई नगरसेवक झाले. महापौर झाले. आमदार झाले. पुढे म्युनिसिपल कॉलनी नं. ७ नंतर दत्तवाडीलगतच्या राजेंद्र नगरमधील जलधारा सोसायटी तेथेच पार्श्वनाथ सोसायटी बिबवेवाडी येथील तोरणा आणि आता प्रभात रोडचा शेवट यातच दोन-अडीच वर्षे मुंबईच्या मलबार हीलवर मंत्रीनिवासात त्यांचे नावही भाईंनी तोरणा ठेवलेले. भाईंचा जन्म वेल्हे महालातील दापोडे गावचा. त्यांच्याजवळचा तोरणा किल्ला आहे. शिवछत्रपतींनी स्वराज्याचे तोरण प्रथमच तेथे बांधले म्हणून तोरणा नाव पडले. भाई ही घटना नेहमी सांगतात. मंत्री झाल्यावर भाईंनी आपल्या बंगल्याला 'तोरणा' नाव दिले.

भाई हाडाचा शिक्षक. तो एम.ए.बी.टी. झाला आणि भाईंनी नाना पेठेतील अहिल्याश्रमातील महात्मा फुले शाळेतील शिक्षकाची नोकरी स्वीकारली. पुढे भाईंचा विवाह नलिनी दुर्वेशी झाला. त्यांचे बंधू भास्करराव दुर्वे संगमनेरचे नामांकीत वकील. समाजवादी चळवळीतील व विडी कामगारांचे चळवळीतील ते अग्रगण्य नेते. वैद्य-दुर्वे संबंध जमला. नलिनीताईंनी शिक्षिकेची नोकरी केली. माझ्या आईने नलिनीताईंना मुलगी मानले होते. आमचा

कुटुंबसंबंधही काहीसा आगळावेगळा होता. भाई मंत्री झाले आणि आईला पाहुणचारासाठी घेऊन गेले. आई महिना-दीड महिना तेथे राहिली, असे आमचे संबंध. मला आठवते हमाल पंचायतीच्या चळवळीतील पहिले सत्याग्रही भाई वैद्य. १९५६ सालची गोष्ट, हमालांचा संप सुरू झाला. एक दुकान बंद पाडावे म्हणून त्या दुकानासमोर १०० हमाल भाई वैद्यांच्या समवेत आडवे पडले. भाईंनी नेतृत्व करण्याचे कारण त्यावेळी मी कोर्टात अडकलो होतो. भाईंच्या सोबत १०० हमालांना अटक झाली. रिमांड घेण्यात आला. सर्वांची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली. तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. ए. यु. शेख यांच्या मध्यस्थीने संप मिटला. पूना मर्चंटस् चेंबर व हमाल पंचायत यांच्यात झालेल्या तडजोड मसुद्यावर जिल्हाधिकारी डॉ. ए. यु. शेखांनी सही केली आणि तो दस्तऐवज नोंदला गेला. जिल्हाधिकाऱ्यांनी रिमांडमध्ये असलेल्या सर्वांच्या सुटकेचा हुकूम केला. पुढे भाई पुण्याचे

राजर्षि शाहू सहकारी बँक मर्या., पुणे

मुख्य कार्यालय ५९७, शुक्रवार पेठ, शाहू कॉम्प्लेक्स शिवाजी रोड, पुणे ४११००२

website: http://rajarshishahubankpune.com

बँकेची ठळक वैशिष्ट्ये

★ नेट एन.पी.ए.चे प्रमाण ०% व ग्रॉस एन.पी.ए.चे प्रमाण ५% पेक्षा कमी राखल्याबद्दल सलग १० वर्षे पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनकडून उत्कृष्ट एन.पी.ए. व्यवस्थापन पुरस्काराने सन्मानित.

★ स्थापनेपासून सतत ऑडीट वर्ग अ. ★ सभासदांना १३% लाभांश सन २०१५- २०१६.

★ नियमित व वेळेत कर्ज हप्ता भरल्यास व्याजदरात १ ते २ % रिबेट सवलत.

★ RTGS, ABB, ATM, ई फ्रॅन्किंग, ई लॉबी, SMS बँकिंग, EMV डेबिट कार्ड, मेगा बँकर सुविधा, पॉझ मशीन सुविधा, इत्यादी सेवा उपलब्ध. ★ सर्व शाखा स्वमालकीच्या जागेत कार्यरत.

मा. श्री प्र. दि. उर्फ आबासाहेब शिंदे
अध्यक्ष

मा. श्री सुधाकर हरिभाऊ पन्हाळे
उपाध्यक्ष

मा. श्री. रमेश लक्ष्मण पासलकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

मा. संचालक मंडळ व सेवक वृंद

राजर्षि शाहू सहकारी बँक मर्या.पुणे



२०१०-२०११ २०११-२०१२ २०१२-२०१३ २०१३-२०१४ २०१४-२०१५ २०१५-२०१६

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स फेडरेशन लि. मुंबई यांचेकडून राज्यस्तरीय बँक स्पर्धेत सलग ६ वर्षे सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळवणारी महाराष्ट्र राज्यातील अग्रगण्य सहकारी बँक

महापौर झाले. भाईंनी हमाल पंचायतीला भवानी पेठेत जागा दिली. पुढे मंत्री झाल्यावर हमाल नगरला मार्केटयार्डालगत पाच एकर जागा गुलटेकडीला मिळवून दिली.

पुणे महानगरपालिकेत आम्ही दोघे सभासद होतो. पी. एम. टी. ची कमिटी, स्थायी समिती अशा महत्त्वाच्या समित्यांत भाई असत. नागरी संघटनेच्या वतीने आम्ही निवडून गेलो होतो. गुरुवर्य बाबुराव जगतापांना महापौर करण्याची संधी आम्हाला मिळाली. गुरुवर्यांचे ऋण फेडता आले. विशेष म्हणजे एस. एम. जोशी आणि नानासाहेब गोरे, महाराष्ट्र सरकारचे चीफ इंजिनिअर श्री. चाफेकर यांच्यासारखी मंडळी त्यावेळी सभागृहात होती. समाजवादी पक्ष फुटलेला होता. त्यातील संयुक्त समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. एम. जोशी तर प्रजासत्ताकवादी पक्षाचे अध्यक्ष नानासाहेब गोरे. दोघेही महानगरपालिकेचे सभासद. हे मोठे विलक्षण घटीत होत होते. महानगरपालिकेमध्ये भाई वैद्यांनी त्यावेळच्या पी. एम. टी.तील कारभाराची लक्तरे चव्हाट्यावर आणली. आम्ही दोघांनी मिळून एक सत्याग्रह केला. त्यावेळी औद्योगिक क्षेत्रात संप झाला तर फुटीर कामगारांना घेऊन जाण्यासाठी पी. एम. टी. च्या गाड्या दिल्या जात होत्या. आम्ही दोघांनी एका पी. एम. टी. गाडीपुढे बसून सत्याग्रह केला. तुरुंगवास पत्करला. मात्र पुढे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संप काळात फुटीर कामगारांस गाड्या देण्यास बंदी घालणारा ठराव एकमताने मान्य केला. अशा आमच्या तुरुंगवाऱ्या अनेकवेळा झाल्या. आणीबाणीत आम्ही येरवडा कारागृहात एकत्रच होतो. पुण्याचे महापौर असताना भाईंना स्थानबद्ध करण्यात आले होते. मुस्लीम सत्यशोधक समाजाची स्थापनेची सर्व चर्चा भाईंच्या घरीच झाली. औपचारिक समारंभ साधनेत झाला. नाना-भवानी पेठेतून जोरदार मिरवणूक साधना सभागृहात गेली.

भाई राष्ट्र सेवा दलाचे अनेक वर्षे सैनिक होते. पुढे अध्यक्षही झाले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, गोवामुक्ती लढा, महागाई, बेरोजगारी विरुद्धतेच्या आंदोलनात भाई कधीही मागे राहिले नाहीत. १९५३-५४ ची गोष्ट असेल, थोर स्वातंत्र्य शिरुभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखाली गोवा मुक्ती आंदोलनाची पहिली तुकडी गोव्यात गेली. भाई त्यात सामील झाले. फार मार खावा लागला. मात्र डाव्या हाताचे हाड मोडले तरी भाईंनी हातातला तिरंगा सोडला नाही. पुढे तो हात कायमच अधू राहिला. मात्र हा हात अधू असतानाही १९५५ सालच्या अखिल भारतीय गोवा मुक्ती सत्याग्रहात बेळगाव ते कुणकुंबी असा ५० किमी. चा प्रवास पायी करून भाईंनी यात भाग घेतला. मोडलेला हात गळ्यात बांधलेला आणि तशा अवस्थेत जखमी झालेल्या अन्य सत्याग्रहींच्या स्ट्रेचरला खांदा देऊन १० किमी.ची वाटचाल भाईंनी केली. मी त्या घटनेचा साक्षीदार व सहभागी होतो. चळवळीत आम्ही वारंवार एकत्र आलो. जेलयात्रा केल्या. मात्र १९७१ नंतर मी राजकीय वाट सोडली. भाईंनी समाजवादी एकजुटीचा ध्यास घेतलेला. त्यासाठी त्यांनी सोशलिस्ट पार्टीची स्थापनाही केली. भाईंची राजकीय वाटचाल ही माझ्या दृष्टीने स्वतंत्र विषय आहे. आणीबाणीनंतर 'जनता दल' स्थापन झाला. भाईंनी चंद्रशेखरांबरोबर भारत यात्रेत सहभाग घेतला. मावळ तालुक्यातील जयप्रकाशपट्टम व भारत यात्रा केंद्र परंदवडीत सुरू झाले. भाई त्याचे विश्वस्त बनले. कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची त्यांना आस होती. भाईंचे चिरंजीव डॉ. अभिजित वैद्य यांनी तेथे वैद्यकीय सहाय्य केंद्र उभारले.

भाईंचे वाचन अफाट. नुकत्याच एका भेटीत त्यांनी मला एका नव्या पुस्तकाचा परिचय घडविला. 'एन्ड ऑफ कॅपिटॅलिझम' लेखकाचे नावही मला सांगितले पण मी विसरलो. त्या पुस्तकाची ओळख करून दिली. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांची दृष्टी शाबूत होती. भाईंच्या जाण्याने समाजवादी चळवळीची, पुरोगामी चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. आम्ही सगळेच एका चांगल्या मित्राला व चांगल्या नेत्याला मुकलो आहोत. ✻✻✻

साभार: प्रजापत्र

समाजवादाचे ध्यासपर्व – गजानन खातू

भाई वैद्य यांचे जीवन म्हणजे समाजवादाचे ध्यासपर्व होते. उभे आयुष्य त्यांनी समाजवादी विचारांचा राजकीय पक्ष आणि समाजवादी विचार-धारेच्या प्रस्थापनेसाठी आणि प्रसारासाठी व्यतीत केले. देशाच्या राजकीय पटलावरून समाजवादी विचारांची झालेली पीछेहाट, समाजवादी चळवळीत झालेले चढउतार, एका अपरिहार्य परिस्थितीत समाजवादी पक्षाचे जनता पक्षात झालेले विलीनीकरण अशा प्रतिकूल परिस्थितीतही समाजवादी पक्षाच्या पुनर्स्थापनेचा अखंड प्रयत्न भाईंनी केला. समाजवादी जनपरिषदेच्या स्थापनेत त्यांना किशन पटनाईक, योगेंद्र यादव, विनोद प्रसाद सिंग, केशवराव जाधव, विनोद प्रसाद सिंग, केशवराव जाधव, जुगल किशोर रायबीर, सुनील जोशी, जेकब सारख्या देशभरातील अनेक विचारवंतांचा आणि सक्षम कार्यकर्त्यांचा सहभाग मिळाला. पण तो प्रयत्न पुरेसा पुढे गेला नाही. तरीही नाउमेद न होता ऐंशीच्या घरातील भाईंनी सोशलिस्ट पार्टी ऑफ इंडियाची स्थापना केली. सद्यःस्थितीत सक्षम समाजवादी पक्ष उभा करणे केवळ दुरापास्त आहे असे नव्हे तर जवळपास अशक्य आहे हे भाईंसारख्या ज्येष्ठ राजकीय नेत्याला माहीत नव्हते असे कुणी म्हणू शकत नाही. पण देशात आपल्याला अभिप्रेत असलेल्या विचारधारेचा पक्ष नाही म्हणून तक्रार करीत बसण्याऐवजी आपणच राजकीय पर्याय उभा करावा. अशी हिंमत फक्त भाईच करू शकतात. अशा प्रयत्नाच्या यशापयशाचा प्रश्नच त्यांच्या पुढे नव्हता. देशाला जर समाजवादी राजकीय पर्यायाची गरज आहे तर कुणाची वाट न पाहता आपणच त्यासाठी पुढे व्हावे ही शेवटपर्यंत झुंज देण्याची एका सैनिकाची वृत्ती होती. असा पक्ष राजकीय सत्ता संपादन करू शकणार नाही, पण आजच्या वैचारिक शून्यतेच्या काळात ठोस वैचारिक मार्गदर्शन करू शकतो असा विश्वास त्यांना होता. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, मधू लिमये, पासून एस. एम. जोशी, नाना साहेब गोरेंपर्यंत अनेक समाजवादी नेत्यांनी सत्तेत नसतानाही भारताच्या राजकारणावर व देशाच्या जडण-घडणीवर प्रभाव पाडला याला इतिहास साक्षी आहे. देशामध्ये उदारमतवादी, परिवर्तनवादी, समता स्वातंत्र्य

समाजवादाचे ध्यासपर्व ... पान क्र. ३८ वर

निवेदन आणि सूचना

२ एप्रिल २०१८ रोजी आदरणीय भाई वैद्य यांचे निधन झाले. त्यांना आदरांजली म्हणून पुरोगामी जनगर्जना मासिकाने भाईंवर विशेषांक प्रसिद्ध करण्याचे ठरविले. भाई आमचे वाचक आणि मार्गदर्शक होते. पुरोगामी जनगर्जनेच्या माध्यमातून आम्ही नेहमीच समतेचा- पुरोगामी विचार पुढे घेऊन जात असतो. आपल्या समोर हा विशेषांक घेऊन येताना भाईंचे विचार आपल्या सर्वांना पुढे घेऊन जायचे आहेत याचेही स्मरण आणि जबाबदारी वाटते आहे. त्यांच्यावरील लेखांचा हा विशेषांक आपणास आवडेल व आपल्याला मार्गदर्शक ठरेल अशी आशा करतो.

याबरोबरच एक सूचना अशी की, हा विशेषांक हा मे आणि जून महिन्याचा जोड अंक म्हणून निर्मिला असल्याने जून महिन्याचा स्वतंत्र अंक प्रसिद्ध होणार नाही याची सर्व वर्गणीदारांनी नोंद घ्यावी.

संपादक

BHAI VAIDYA WAS OF A DIFFERENT MOULD - JULIO RIBEIRO

When I belatedly recognised the man on a bicycle on a crowded street in Pune City, I cut him a salute. I was travelling by car on one of my infrequent visits to Pune and did not expect to see my former boss on a cycle! I had forgotten that Bhai Vaidya was of a different mould than the normal politician. Using a form of transport that he could afford to pay for from his own resources was par for the course.

Bhai Vaidya was the Minister of State for Home in 1980 when I headed the Crime Branch in the Mumbai City Police. The Police Commissioner, Madhusudan Kasbekar, dealt with the Chief Minister and the Home Minister on a daily basis. As Crime Branch chief, I did interact with Bhai Vaidya but not as frequently as the Commissioner.

But Vaidya had more confidence and trust in me than he had for my chief as I found out later. I got a call from him to come and meet him at his home. He told me that he had been approached by a despicable character who wanted some work done for which he offered him a bribe of Rs 2 lakh. He wanted the man caught. I was in a fix. Obviously my boss, the Commissioner had not been informed. The Minister had warned me to not inform him about this operation. I consulted a close confidant in the police who advised me to share this information with the Anti-Corruption Bureau and entrust them with the job. By doing so, I could escape my immediate senior's wrath. The operation was successful. The criminal was caught red-handed and later convicted.

Bhai Vaidya's wife was a working woman. If my memory serves me correctly, she was a teacher. Every day she set off to work by public transport. Some psychophantic officers tried to convince the Minister to advise his wife to travel in the government car provided to him for official use. Bhai Vaidya refused.

Bhai Vaidya is dead. He was made of different stuff from the politicians of today and even the majority of politicians of his day. I mourn his death as I would for any good man or woman. And in my imagination I will cut him another smart salute.

(The writer, a retired IPS officer, was Mumbai Police commissioner, DGP Gujarat and DGP Punjab)

Courtesy: Daily Indian Express

'पुरोगामी जनगर्जना' मासिकाची वार्षिक वर्गणी पोस्टेजसह ३३० रुपये

वर्गणी आपण बँकेत प्रत्यक्ष वा ऑनलाईन भरून आम्हांला फोनवर तपशील कळवा किंवा इमेलने पाठवा.

भाई वैद्य एक दंतकथा – आ. कपिल पाटील.

मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराच्या सुरस कथा ऐकण्याची सवय झालेल्या आपल्या वर्तमानाला भाई वैद्य दंतकथा वाटावेत. पुलोद सरकारमध्ये ते गृह राज्यमंत्री होते(१९७८-१९८०). तेव्हा ३ लाख रुपयांची लाच घेऊन आलेले एका मोठ्या स्मगलरचे साथीदार त्यांनी पोलिसांच्या हवाली करून तुरुंगात पाठवले.

समाजवादी पक्षाची निशाणी होती वडाचं झाड. भाई वैद्य पुरातन वटवृक्षासारखे होते. १९४६ला काँग्रेस सोशलिस्ट पार्टीची स्थापना जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया आणि एस. एम. जोशी यांनी केली. तेव्हा मिसरूडही न फुटलेले तरुण भाई वैद्य त्या चळवळीत सामील झाले होते. पक्षाचं नाव बदललं पण समाजवादाचा झेंडा, सोशलिस्ट पार्टीचा झेंडा भाईंनी अखेरपर्यंत खाली ठेवला नाही. भाई कट्टर सत्यशोधक. फुले आणि आंबेडकरांना मानणारे आणि गांधींचा मार्गही चिवटपणे अवलंबणारे. स्वातंत्र्याच्या चळवळीत आणि गोवामुक्ती चळवळीत भाई वैद्य होते. त्याहून अधिक तडफेने ते समतेच्या संगरात सामील होत होते. हमीद दलवाईंना भाईंनी दिलेली साथ आणि मुस्लीम सत्यशोधक चळवळीत त्यांनी स्थापनेपासून दिलेलं योगदान पुन्हा पुन्हा आठवावं असं आहे. आणीबाणी लागू झाली तेव्हा ते पुण्याचे महापौर होते. पण मिसा बंदी होऊन १९ महिने तुरुंगात गेले. आणीबाणी गेली.जनता सरकार आलं. पुलोद सरकारमध्ये भाई गृहराज्यमंत्री बनले. त्यांनी पहिलं काय केलं असेल, तर हाफ पॅन्टीतील पोलिसांना फुल पॅन्टीत आणलं. पोलिसांना प्रतिष्ठा दिली. पोलिसांना त्यांनी लोकांमध्ये आणलं. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव देण्याचं विधेयक त्यांनीच सर्वप्रथम विधानसभेत मांडलं. भारत यात्रेत चंद्रशेखर यांच्या समवेत ते कन्याकुमारी - दिल्ली असे चार हजार किलोमीटर चालले. राष्ट्र सेवा दलाचे ते काही काळ अध्यक्ष होते. मंडल आयोगाच्या चळवळीतलं त्यांचं वैचारिक मार्गदर्शन मोलाचं ठरलं. अलीकडच्या काळात शिक्षणाच्या प्रश्नावर त्यांनी देशभर जागृतीची मोहीमच हाती घेतली होती. सेवा दल आणि समाजवादी चळवळीतल्या कार्यकर्त्यांच्या शिबिरांमधून भाई अगदी परवा परवा पर्यंत अभ्यासवर्ग घेत होते. गांधीवादी ते नक्षलवादी. आंबेडकरवादी ते कम्युनिस्ट. साऱ्यांनी लोकशाही समाजवादी विचारांच्या किमान कार्यक्रमावर एकत्र यावं यासाठी ते अखेरपर्यंत प्रयत्न करत होते.

केंद्रात मोदी सरकार आल्यापासून भाई अधिकच अस्वस्थ होते. शरीर थकलं होतं, तरी दौरे थांबवत नव्हते. खणखणीत आवाज आणि तल्लख स्मरणशक्ती यांनी त्यांना अखेरपर्यंत साथ दिली होती. त्या जोरावर सामान्य कार्यकर्त्यांपासून राष्ट्रीय नेत्यांपर्यंत प्रत्येकाशी ते बोलत होते, सांगत होते, एकत्र यायला हवं.

एकत्र तर यायलाच हवं पण आधार द्यायला आधारवड कुठे असणार आहे?

भाई वैद्य यांना विनम्र आदरांजली! ✻✻✻

साभार: प्रजापत्र


आरोग्य सेना
AROGYA SENA • HEALTH ARMY

आरोग्य सेनेचे
जनलोक मेडिकल्स

शाखा क्र. २ शिवाजी रोड, पुणे

५३४, शुक्रवार पेठ, मामलेदार कचेरी व वनराज मंडळाच्या पुढे, राजर्षी शाहू बँकेसमोर, शिवाजी रोड, पुणे ४११००२

संपर्क: स्वप्निल वैद्य (०२०-२४४६०००८)



समाजवादाचा श्वास – डॉ. कुमार सप्तर्षी

ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांचे निधन झाले. भाईंनी आयुष्यभर वैयक्तिक आणि सामाजिक राजकीय कारकिर्दीतही लोकशाही आणि समाजवादी मूल्यांची जोपासना केली. मूल्याधारित राजकारण त्यांनी प्रिय मानले. शालेय जीवनात म्हणजे विद्यार्थिदशेत असतानाच १९४२च्या चलेजाव चळवळीत त्यांनी भाग घेतला. भाईंचा मूळ पिंडच चळवळीचा आणि संघर्षाचा होता. भाईंचे वैशिष्ट्य असे की, ते आंतरराष्ट्रीय परिप्रेक्ष्यातून इथल्या समाजवादाचा विचार करायचे. असं म्हणतात की, दिल्ली समजल्याशिवाय गल्ली समजत नाही; मात्र दिल्लीपेक्षाही भाईंचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटना-घडामोडींचे वाचन अफाट होते. असा सहकारी एस. एम. जोशींना मिळाला. भाईंचे वडील खूप साधे होते. त्यांनी सांगितले की एस. एम. जोशींची साथ कधीच सोडायची नाही. काही बरोबर किंवा चूक असा काही संदेह मनात आला, तर एस. एम काय म्हणतील ते करायचे, कारण, प्रामाणिक माणूसच अचूक निर्णय घेतो, अशी अण्णांची म्हणजेच भाईंच्या वडिलांची श्रद्धा होती. भाईंनीही ते व्रत शेवटपर्यंत पाळले.

स्वातंत्र्य चळवळीत असताना स्वयंसेवक म्हणून उरळी कांचनला महात्मा गांधींकडे लक्ष ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली होती; तेव्हा भाई केवळ१५ वर्षांचे होते. महात्मा गांधींबरोबरचा प्रत्यक्ष सहवास भाईंना लाभला. भाई हे कुशल संघटक होते. त्यांनी ७० ते ८० जणांचा समूह करून स्वातंत्र्य चळवळीला वाहून घ्यायचे असे ठरवले. एस. एम. जोशींनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेतृत्व केले तेव्हा भाई त्यांच्यासोबत होते. म्हणजे त्यावेळी प्रभू रामचंद्र आणि हनुमान अशी ती जोडी होती. एस. एम जोशींच्या आंदोलनामागचे संघटन भाई करायचे. नंतरच्या काळात जेव्हा पुण्यात नागरी संघटना स्थापन झाली, तिचेही नेतृत्व भाई करत होते. त्यानंतर भाई जनता पक्षात गेले, पुढे पुण्याचे महापौर बनले. मला आठवतंय त्यावेळी भाईंनी जयप्रकाश नारायण यांची मोठी सभा घेतली होती. आणीबाणी लादल्याच्या दिवशीच भाईंना अटक करण्यात आली. १९ महिने ते येरवडा तुरुंगामध्ये राहिले. त्यावेळी आम्ही काही लोक भूमिगत झालो होतो. पुढे तीन महिन्यांनी आम्ही तुरुंगात गेलो. तेव्हा बराकीत आम्ही भाईंच्या शेजारीच राहत होतो. आमच्या बराकीमध्ये प्रधान सरही होते. १६ महिने आमचा आणि भाईंचा तुरुंगवास शेजार होता. त्या काळात भाई काय वाचतात याची माहिती आम्हांला असायची. एकमेकांच्या वाचनाची चर्चा व्हायची.

भाईंना चहाचे फार वेड होते. ते असे म्हणत मला स्वर्गाचे आकर्षण नाही. कारण, तिथे अमृत मिळते; पण चहा मिळत नाही. त्यांना अमृततुल्य चहा आवडे. हे सर्वांना माहीत होते. ते रात्री बराच वेळ तुरुंगात वाचत बसायचे. सायंकाळी सहा वाजता कोठडी बंद व्हायची आणि सकाळी सहा वाजता उघडायची. त्यावेळी ११-१२ वाजता पहाऱ्यावर असणारे पोलीस चहा करायचे, त्यात भाईंचा वाटा असायचा. कर्दळीच्या पानाच्या सुरळी करून भांड्यात घालून भाईंना चहा मिळायचा. चहाला नाही म्हणायचे नाही. कारण, चहाचा अपमान होतो. असे भाई म्हणायचे चहा, समाजवाद, एस. एम. जोशी या तीन गोष्टीप्रति भाईंना निष्ठा वाहिलेली होती. समाजवाद तर त्यांच्या रक्तात भिनलेला होता. त्यामुळे शेवटपर्यंत ते समाजवादीच राहिले. आत्ताच्या काळातील राजकारणात राजकीय नेते श्वास घेताना व्यक्ती एका पक्षात असतात, तर श्वास सोडताना दुसऱ्या पक्षात असतात. अशा काळात भाईंच्यातील निष्ठावंतपणा नक्कीच वाखाणण्यासारखा म्हणावा लागेल. कारण, आज हा गुणच दुर्मीळ होत चालला आहे. असा हा निष्ठावान नेता काळाचे प्रतीक होता.

सेवा दलाची कल्पना एस. एम. जोशी यांची होती. एसेम युथ लीगचे प्रमुख होते. युथ लीग म्हणजे काँग्रेसमधील सुभाष बाबूंची संघटना. सुभाषबाबूंवर निष्ठा ठेवणारे, भूमिगत होऊन काम करणारे या लीगमध्ये असायचे. १९४२ च्या आंदोलनात एस. एम जोशी मुसलमानाच्या रूपात भेंडी बाजारमध्ये राहत होते. या चळवळीला तरुणांची गरज होती. ब्रिटिशांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला परवानगी दिलेली आहे. मग आम्हीही तसेच खेळ खेळतो

असे म्हणत एसेमनी राष्ट्र सेवा दलाची स्थापना केली. राष्ट्र सेवा दलाच्या स्थापनेपासून ते कार्यरत होते. सेवा दलाचा कोणताही निर्णय घ्यायचा असेल, तर भाईंना विचारून घेतले जात. सेवा दलाच्या शाळेत भाईंनी तरुण जोडले. राष्ट्र सेवा दलामधून लोकशाही, सेक्युलॅरिझम, समाजवाद याचे प्रशिक्षण अनेक तरुणांना दिले. आजही भाई अखिल भारतीय समाजवादी पक्षाचे अध्यक्ष होते. हा पक्ष वाढला नसला, तरी तो समाजवादाचा श्वास होता. भाई म्हणायचे की, माझ्यानंतर समाजवादाची गरज लागेल तेव्हा पक्ष तयार आहे.

जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस, समाजवादी जन परिषदेचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशी अनेक पदे भाईंनी भूषविली आणि त्या पदांची उंची वाढविली. राज्याचे गृहमंत्री म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचे पहिले विधेयक मांडणे, गृहमंत्री या नात्याने पोलिसांना फूल पँट देणे आणि सेवानिवृत्तांच्या निवृत्तिवेतनाची महागाईशी जोडणी करण्याचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. सत्ता असो किंवा नसो, पद असो किंवा नसो, तळागाळातील जनता, गोरगरीब नागरिक, विद्यार्थी अशा कोणावरही अन्याय झाला, की धावून जाण्याचे व्रत वैद्य यांनी सतत अंगीकारले आणि सदैव न्यायाची बाजू घेतली. विरोधी बाजूही शांतपणे ऐकून घेणे आणि लोकशाही मार्गाने त्याचा प्रतिवाद करण्याचा त्यांचा स्वभाव आजच्या गोंगाटाच्या काळात नक्कीच उठून दिसणार होता. चंद्रशेखर यांनी भारत यात्रा काढली होती. त्यामध्ये भाईंनी पहिल्या दिवसापासून शेवटपर्यंत त्यांना साथ दिली होती. भाईंनी एकदा एखादी गोष्ट ठरवली, ते त्यावर ठाम असत.

बहुतेकदा निधन झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या मागे पोकळी निर्माण झाली आहे असे म्हटले जाते; मात्र दादा धर्माधिकारी असे म्हणत असत की, मी गेल्यानंतर पोकळी झाली असे कधीही म्हणू नका. कारण, मग मी काहीच काम केले नाही, असा त्याचा अर्थ होईल. म्हणूनच भाई वैद्य गेल्यानंतर पोकळी जाणवते आहे, असे मी म्हणणार नाही. कारण, भाईंच्या पश्चात पोकळी नसून, त्यांच्या समाजवादी कार्यकर्त्यांची शाळा असणारे राष्ट्र सेवा दल आहे. त्यासाठी भाईंनी आयुष्य वेचले होते. महाराष्ट्रात एस. एम. जोशी आणि नानासाहेब गोरे यांच्या नंतरचा समाजवादी चळवळीचे नेतृत्व करणारा बापू काळदाते, पन्नालाल सुराणा, भाई वैद्य, बाबा आढाव हा एक गट होता. भाईंच्या जाण्याने त्या युगातील एक महत्त्वाचा दुवा निखळला; पण त्यांनी केलेले कार्य अनेकांना मार्गदर्शक राहणार आहे.

साभार: दै. पुढारी

द्रष्टा समाजवादी: भाई वैद्य – डॉ. कुमार सप्तर्षी


तो १९६२-६४ चा काळ. मी मेडिकल कॉलेजला शिकत होतो. कॉलेज संपल्यानंतर रोज बुधवार पेठेतील संयुक्त समाजवादी पक्षाच्या कार्यालयात थांबा घ्यायचो. वाराणशीच्या अधिवेशनात समाजवादी मंडळीचे दोन वेगळे भक्कम गट तयार झाले. एक संसोपा (संयुक्त सोशालिस्ट पार्टी) आणि दुसरा प्रसोपा (प्रजा सोशालिस्ट पार्टी) भाईंची ‘संसोपा’च्या कार्यालयात पहिली भेट झाली. भाईंनी आयुष्यभर एसेम जोशी ऊर्फ अण्णा यांचे नेतृत्व

द्रष्टा समाजवादी... पान क्र. ४१ वर

आरोग्य सेनेचे
जनलोक मेडिकल्स

शाखा क्र. ३ दिघी, पुणे

स.नं. ८२/६/१, सोलर पार्क, दत्त नगर,
पुणे आळंदी रोड, दिघी, पुणे ५११०१५
संपर्क: अतुल रुणवाल (मो:०९९२२४३९४८५)



पाऊणशे वर्षांची मैत्री – मधुकर निरफराके

१९४२ मध्ये पुण्यातल्या श्री. शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवीत मी प्रवेश घेतला. त्या वेळी ११ वर्षांचा होतो. ऑगस्टमध्ये 'चले जाव, ब्रिटिशांनो चलेजाव', 'महात्मा गांधी की जय', 'भारतमाता की जय'च्या घोषणांनी शाळा दणाणायच्या. घोषणा देणारा शाळेतीलच, माझ्यापेक्षा २-३ वर्षांनी मोठा विद्यार्थी होता. त्याच्याभोवती मुलांचा घोळका असे. गोरापान, चुणचुणीत, हालचालीत वेग असलेल्या या मुलाला सगळे भाई म्हणत. भाईंची मुलांच्या घोळक्यातच माझी ओळख झाली. शाळेच्या शेजारीच अवस्थी वाड्याच्या मैदानात राष्ट्र सेवा दलाची शाखा होती. शे-दीडशे मुले खेळण्यासाठी सायंकाळी जमत. आमची मैत्री शाखेत पक्की झाली. स्वातंत्र्याने भारलेल्या वातावरणात आमचे बालपण गेले. पुणे कॅम्पमध्ये एल्फिस्टन रोडवरील कॅपिटल थिएटरमध्ये स्वातंत्र्यसैनिकांनी बॉम्बस्फोट घडवला. चार इंग्रज अधिकारी ठार झाले. या बातमीने विद्यार्थ्यांच्या उत्साहाला भरते आले. वर्गावर्गात घोषणा झाल्या. मैदानात भाईंभोवती विद्यार्थी जमले. 'अप अप तिरंगा झेंडा - डाउन डाउन युनियन जॅक' च्या घोषणांनी परिसर दणाणला. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांचा-दोस्त राष्ट्रांचा विजय झाला. विजयाप्रीत्यर्थ कलेक्टरसाहेबांनी विद्यार्थ्यांना मिठाई वाटपाचा कार्यक्रम आखला. ''आपण मिठाई खायची नाही'' असा आदेश भाईंनी वर्गावर्गात जाऊन दिला. मिठाईच्या पुड्या मैदानात फेकल्या. त्यावर नाचत-नाचत ''ब्रिटिशांनो चले जाव''च्या घोषणा दिल्या.

भाईंच्या जवळ अफाट संघटनकौशल्य होते. त्यांच्याच पुढाकाराने बालपणापासूनचे ४० मित्र-सख्खे मित्र झालो. त्यांच्या हयातीपर्यंत दरवर्षी १ जानेवारीला लोणी काळभोर येथील दादासाहेब बोरकरांच्या शेतावर जमून जेवण करण्याचा संकल्प पार पडला. त्यांचा सुवर्णमहोत्सवी केला.

मैत्रीच्या संवर्धनासाठी संघटनकौशल्याची गरज असते. १९५५पासून २००५ पर्यंत डॉ. राम ताकवले, डॉ. बापू काळदाते, शिवाजीराव जवळकर, शिवाजीराव खैरे, अमीर शेख, राजाराम बोरकर, दादा बोरकर, वसंत जाधव, निळू फुले, चंद्रकांत बोराटे, डॉ. दोरगे, चंदू चव्हाण, जगन्नाथ बाठे, दत्तात्रेय माळवदकर, कृष्णा कापसे,केशवराव रपांगारे आणि खुद्द भाई वैद्य, प्रा. प्रधान, मुरलीधर पोतनीस आदी ४० मित्रांनी दरवर्षी जमणे, ही अवघड बाब भाईंच्या मैत्रीच्या दोरखंडाने जखडली होती.

***

साभार: दै. सकाळ

वार्षिक वर्गणी
तसेच जाहिराती संबंधी चौकशी व व्यवहारासाठी



संपर्क– रमाकांत सोनवणी

मोबाईल– ९५०३७५३०४५

मूल्य जपणारे राजकारणी: भाई वैद्य - मनवेल तुस्कानो

त्यांनी आपल्या देशाचा आणि समाजाचा विचार प्रमाण मानला. सत्ता अल्पकाळ हाती आली त्याचा वापर जनतेसाठी कसा करतात, त्याचे धडे समाजवाद्यांनी देऊन ठेवले आहेत. केंद्रीय रेल्वेमंत्री जॉर्ज फर्नांडीस, अर्थमंत्री मधू दंडवते यांनी कोकण रेल्वे मार्गी लावली तशीच गृहमंत्रीपदी असताना भाई वैद्य यांनी पोलिसातला माणूस जपला आणि त्यांचा गणवेश बदलला.

थोर समाजवादी नेते, माजी गृहमंत्री, पुण्याचे माजी महापौर भाई वैद्य यांचे स्वादुपिंडाच्या कॅन्सरने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्यामागे मुलगा डॉ. अभिजित वैद्य, सून आणि नातू असा परिवार आहे.

१९४२ चा छोडो भारत संग्राम, देशाचा स्वातंत्र्यलढा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवामुक्ती आंदोलन यात त्यांचे मोठे योगदान होते. समाजवादी विचार व आपले तत्त्व त्यांनी अखेरपर्यंत जपले. राम मनोहर लोहिया, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, जॉर्ज फर्नांडीस, मधू लिमये, ग.प्र. प्रधान, जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, मधू दंडवते असे एकापेक्षा एक विचारवंत व राजकीय नेत्यांचे ते मंतरलेले दिवस होते. या सर्व आणि त्यांचे समकालीन समाजवादी नेते आपल्या देशाचे मौल्यवान ॲसेट होते. त्यांच्या नसण्याने देशात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा समाजवादी नेत्यांनी सामाजिक मूल्याधिष्ठित राजकारणाचे व जनतेच्या प्रश्नाचे भान होते. त्यांनी आपल्या देशाचा आणि समाजाचा विचार प्रमाण मानला. सत्ता अल्पकाळ हाती आली त्याचा वापर जनतेसाठी कसा करतात त्याचे धडे समाजवाद्यांनी देऊन ठेवले आहेत. केंद्रीय रेल्वेमंत्री जॉर्ज फर्नांडीस, अर्थमंत्री मधू दंडवते यांनी कोकण रेल्वे मार्गी लावली तशीच गृहमंत्रीपदी असताना भाई वैद्य यांनी पोलिसातला माणूस जपला आणि त्यांचा गणवेश बदलला.

भाई वैद्य गृहराज्यमंत्री असताना एक स्मगलरची टोळी त्यांना भेटायला गेली होती. पैशांची मोठी बॅग घेऊन ते भाईंना भेटले. तेव्हा त्यांचे गैरकानुनी काम करण्याऐवजी भाईंनी पोलिसांचा सापळा लावून ठेवला होता. त्यात ते स्मगलर अलगद अडकले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. हा विषय १९७८-८९ च्या काळात वर्तमान पत्रातून खूप गाजला. पैशांसाठी वाट्टेल ते करणाऱ्या आत्ताच्या युगात असा निरपेक्ष मंत्री होणे नाही. भाईंनी कायम समतेचा पुरस्कार केला. पाऊण शतकाच्या आपल्या सामाजिक-राजकीय जीवनात त्यांनी आपल्या कार्यात कधीच तडजोड केली नाही. उन्मादी हिंदुत्वाचा त्यांनी कडाडून विरोध केला. मुस्लीम सत्यशोधक समाज, राष्ट्र सेवा दल, हमाल पंचायत ही त्यांची कार्यस्थळे होती. ती त्यांनी अखेरपर्यंत जपली. आर्थिक कारणे आणि सत्तास्थानासाठी भाईंनी आपल्या निष्ठा कधीच बदलल्या नाहीत.

आजच्या राजकारणात असे मूल्य शोधूनही भेटणार नाही. आज नितीमूल्यांचा पुरता ऱ्हास उघडउघड पाहावयास मिळतो. कंत्राटदाराशी साटेलोटे करून देशाची संपत्ती लुटणाऱ्या आजच्या जमान्यात आणि धर्म, जात

आरोग्य सेना
AROGYA SENA • HEALTH ARMY

आरोग्य सेनेचे

जनलोक मेडिकल्स

शाखा क्र. ४ सावंतवाडी, सिंधुदुर्ग

संचयनी पॅलेस, बिट्स कॉम्प्युटर जवळ,

शॉप नं. ५, गाळा जी ५१, सावंतवाडी,

सिंधुदुर्ग -४१६५०१

संपर्क: महेश परुळेकर (मो:९४२११४४८६७)



यांच्या नावाने लोकांना मूर्ख बनवून खिसे कापण्याच्या युगात 'भाई वैद्य' नावाचे रत्न कालपरवापर्यंत जिवंत होते. आता त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणार नाही.

पोलिसांना जाड्या-भरड्या कपड्याचा गर्द निळा हाफ पँट आणि शर्ट असा गणवेश, पायाच्या मांडीखाली पोटरीला घट्ट गुंडाळलेला मफलर होता. तो पोलिसांना त्रासदायक झाला होता. भाई वैद्य गृहराज्यमंत्री झाले आणि पोलिसांच्या वेदनेला वाचा फुटली. भाईंनी पोलिसांचा गणवेश बदलला. खाकी फूलपँट आणि खाकी शर्ट असा गणवेश बदलून दिला. या गणवेशामुळे आज पोलिसांत अधिकारी हवालदार सारखेच दिसतात. ही माणुसकीची समता त्या आधीच्या सरकारांना सुचली नव्हती. भाईंचा हा निर्णय ऐतिहासिक ठरला. देशभर त्याचे स्वागत झाले.

चंद्रशेखर यांच्या कन्याकुमारी ते दिल्ली या ४ हजार किमी. च्या पदयात्रेत भाई त्यांच्या बरोबर कायम होते. पुण्याचे महापौर असताना ते ऑल इंडिया मेअर्स कॉन्फरन्सचे अध्यक्ष होते. आजचा राजकीय व्यवहारवाद त्यांना मान्य नव्हता. म्हणून आणीबाणीत ते १९ महिने तुरुंगात होते. देशाच्या अनेक चळवळी, आंदोलनात भाईंना अनेक वेळा तुरुंगवास घडला. वाचन, लेखन करण्याचा त्यांचा पिंड होता. यातून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. 'समाजवाद्यांचे चिंतन', 'मंडळ आयोग', 'समाजवाद', 'संपूर्ण शिक्षण', 'परिवर्तनाचे साथी', 'शब्दांमागचे शब्द' अशी अनेक पुस्तके भाईंनी लिहिली. राष्ट्र सेवा दलाच्या कार्यात त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. पुणे महानगरपालिकेत सेवानिवृत्त संघ त्यांनी स्थापन केला. सोशालिस्ट पार्टीचे ते अध्यक्ष होते. समाजवादी अध्यापक जनसभेचे काम त्यांनी सुरू केले होते. समाजवादी विचारधारेसंबंधी लेखन, प्रबोधन आणि संघर्ष ते आयुष्यभर करत राहिले. विशेष म्हणजे वयाच्या ८८ व्या वर्षात त्यांना आंदोलनामुळे अटक झाली होती. ग. प्र. प्रधान, एस. एम जोशी, नानासाहेब गोरे या पुण्यातील समाजवादी नेत्यांबरोबरीने भाईंनी सभ्यतेचे राजकारण आणि समाजकारण केले.

राजकीय, सामाजिक जीवनात स्वत: पलीकडे समाजाच्या विचाराने कार्य केलेल्या भाईंना महाराष्ट्र जनता दल, राष्ट्र सेवा दल आणि आमच्या निर्भय परिवारातर्फे आदरांजली. ❋❋❋

साभार: वसई समता

आपले विशेष आभार

❋ न्या. जी.डी. पारेख ❋ डॉ. अभिजित वैद्य (आरोग्य सेना राष्ट्रीय प्रमुख) ❋ लक्ष्मीकांत मुंदडा (आरोग्य सेना राष्ट्रीय सरचिटणीस) ❋ डॉ. नितीन केतकर (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) आशिष आजगांवकर (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) ❋ कमलेश हजारे (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) ❋ प्रा. डॉ. गीतांतली वैद्य (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) ❋ प्रा. डॉ. मृणाल केतकर (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) प्रा. प्रमोद दळवी (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) ❋ वर्षा गुप्ते (आरोग्य सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य) ❋ स्वप्निल वैद्य (व्यवस्थापक, जनलोक मेडीकल्स शाखा क्र. २)

भाई वैद्य विशेषांकाच्या निर्मितीमध्ये आर्थिक हातभार लावणाऱ्या आमच्या सहृदय हितचिंतकांचे आम्ही आभार मानतो.

धन्यवाद
पुरोगामी जनगर्जना

ठसा – मेधा पालकर

स्वातंत्र्य सेनानी तसेच समाजवादी आणि प्रागतिक चळवळीचे एक मार्गदर्शक म्हणून आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे डॉ. भाई वैद्य यांच्या निधनाने जुन्या पिढीतील एक 'चळवळीतील शिलेदार' निघून गेला आहे. शाळकरी वयातच भाई वैद्य स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित झाले. वेल्हा तालुक्यातील दापोडे हे त्यांचे मूळ गाव. शालेय जीवनात त्यांनी १९४२च्या चलेजाव चळवळीमध्ये भाग घेतला. गोवा मुक्ती संग्रामात त्यांचा सहभाग राहिला. लोकनेते जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया आणि एस.एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीचे सदस्यत्व स्वीकारून त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. त्यानंतर समाजवादी पक्षाच्या सर्व घडामोडींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींमध्ये सहभाग घेतल्याबद्दल त्यांना सातत्याने तुरुंगवास पत्करावा लागला. १९६१ मध्ये कच्छ येथे झालेल्या सत्याग्रहामध्ये भूज ते खावडा पदयात्रेमध्ये ते सहभागी झाले होते. शोषित, पीडित, कष्टकरी समाजासाठी सातत्याने कार्यरत राहणाऱ्या भाई वैद्य यांनी पुणे महापालिकेची निवडणूक लढविली. १९७४ मध्ये पुण्याच्या महापौरपदी त्यांची निवड झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीला विरोध करणारे भाई वैद्य 'मिसाबंदी' म्हणून १९ महिने तुरुंगामध्ये होते. पुढे जनता पक्षाने जनसंघाबरोबर युती करून स्थापन केलेल्या पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) सरकारमध्ये भाई यांच्याकडे गृह राज्यमंत्रिपदाची धुरा आली. मंत्रिपदाच्या काळात त्यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचे पहिले विधेयक मांडले. राज्यातील पोलिसांना फुल पॅन्ट देण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांच्याच काळात घेतला गेला. सेवानिवृत्त आणि त्याची महागाईशी जोडणी त्यांनी करून घेतली. त्यांनी समाजवादी जन परिषदेचे राष्ट्रीय महामंत्रिपद भूषविले. एस. एम. जोशी मेमोरियल मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष राष्ट्रसेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष, समाजवादी अध्यापक जनसभेचे ते मार्गदर्शक होते. भाई यांचा सामाजिक कार्य, राजकीय सहभाग असला तरी त्यांनी लेखन केले. 'एका समाजवाद्याचे चिंतन' 'मंडल आयोग व अन्य मागासवर्ग', 'समाजवाद', 'संपूर्ण शिक्षण':फीविरहित समान व गुणवत्तापूर्ण का व कसे', 'आर्थिक आक्रमणाचे अरिष्ट', 'परिवर्तनाचे साथी व सारथी', 'शब्दामागचे शब्द' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. गेल्या सात दशकांमध्ये भाई वैद्य यांना पुण्यभूषण फौंडेशनतर्फे पुण्यभूषण पुरस्कार, महात्मा फुले पुरस्कार, राष्ट्रीय बंधुता पुरस्कार, महर्षी पुरस्कार, नारायण सुर्वे जीवनगौरव पुरस्कार अशा प्रतिष्ठेच्या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. लोकशाही समाजवाद ही विचारधारा त्यांनी अखेरपर्यंत जपली. स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय अशा सांविधानिक मूल्यांसाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. मोकाट अर्थव्यवस्थेच्या विरोधात कायम आवाज उठवत गोरगरिबांच्या हिताच्या अर्थकारणाचा आग्रह त्यांनी धरला. भाई वैद्य यांच्या जीवनकार्यावर दिग्दर्शक धनंजय भावलेकर यांनी पाच वर्षांपूर्वी 'भाई वैद्य एक सामाजिक पर्व' हा माहितीपट केला. जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी ते दिल्ली अशा चार हजार किलोमीटर अंतराच्या भारत यात्रेमध्ये भाई वैद्य यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. दिल्ली येथील भारत यात्रा ट्रस्टचे राष्ट्रीय अध्यक्षपद त्यांनी भूषविले. स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेतल्याबद्दल अनेकदा त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. स्वातंत्र्योत्तर काळातही विविध आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. वेगवेगळ्या आंदोलनामध्ये मिळून त्यांनी २५ वेळा तुरुंगवास भोगला. शिक्षण हक्काच्या मागणीसाठी डिसेंबर २०१६ मध्ये आंदोलन केल्याबद्दल वयाच्या ८८व्या वर्षी त्यांना अटक झाली होती. सत्ता असो अथवा नसो, पद असो वा नसो, पण तळागाळातील जनता गोरगरिबांसाठी कायम धावून जाणे, त्यांच्यावर होणारा अन्याय कधी सहन न करणे हेच व्रत त्यांनी अंगीकारले. कायम न्यायाची बाजू ते घेत राहिले. लोकशाही मार्गाने ते प्रतिवाद करायचे, पण त्याच वेळी ते विरोधी बाजूही

शांतपणे ऐकून घ्यायचे वयाच्या नव्वदीतही त्यांचा उत्साह कायम होता. आज ते आपल्यात नसले तरी अन्यायाविरोधात लढण्याची त्यांची तडफ तरुणांना पिढ्यान्‌पिढ्या प्रेरणादायी राहील. ✼✼✼

साभार: दै. सामना

समाजवादाचे ध्यासपर्व ... **पान क्र. २९ वरून**

आणि बंधुतेसाठी लढणारे, दलित आदिवासी, शेतकरी कामगार, कष्टकरी स्त्रिया, अल्पसंख्याक, उपेक्षित यांच्यासाठी लढणारे, जे प्रवाह ज्यांच्यामुळे शिल्लक आहेत त्यामध्ये समाजवादी चळवळीचा आणि नेत्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे, हे नाकारता येणार नाही. सत्ताधाऱ्यांची धोरणे डावी आहेत की उजवी आहेत, पुरोगामी आहेत की प्रतिगामी, परिवर्तनवादी आहेत की परिवर्तनाला खीळ घालणारी आहेत, आहे रे वर्गाच्या बाजूने आहेत की नाही रे वर्गाच्या हे समाजवादी विचारांच्या संदर्भरेषेने ठरविता येते.

भाईंच्या व्यक्तिगत आणि राजकीय वाटचालीत हीच संदर्भ रेषा दिसून येते. गोवा मुक्ती, संयुक्त महाराष्ट्र, एन्रॉन, नामांतर या आंदोलनातील सहभाग, पुण्याचे मेयरपद असो की, महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री पद असो भाईंची दिशा नेहमी सुस्पष्ट असे. हीच स्पष्टता चंद्रशेखरांच्या नेतृत्वाखालील पदयात्रेतील सहभागात आणि त्यानंतरच्या भारतयात्रा केंद्राच्या कामात होती, तशीच समाजवादी अध्यापक सभा स्थापन करण्यात आणि पर्यायी समाजवादी पक्ष उभारणीतही होती. या प्रचंड खटाटोपात आपल्या जगण्यासाठी संदर्भ रेषा आहे.

भाई हे महाराष्ट्रातील मोजक्याच अभ्यासू राजकीय नेत्यांपैकी एक होते. व्यसन असल्यासारखा भाईंचा अखंड प्रवास आणि कार्यक्रम चालायचे. पुण्यातल्या प्रत्येक कार्यक्रमात त्यांची उपस्थिती असायची. एवढे करून त्यांचे अखंडित वाचन चालायचे. आर्थिक विषयावरील पुस्तकात त्यांना विशेष रुची होती. त्यामुळे भाईंबरोबर चर्चा ही मोठी आनंददायी बाब असायची. त्यांची माहिती अद्ययावत असायची. त्यामुळेच जागतिकीकरणवादी त्यांची भाषणे सखोल विश्लेषणाची असायची. त्या विषयी त्यांनी लेखनही केले. पुस्तकही लिहिले. जागतिक कीर्तीचे अर्थ शास्त्रज्ञ जोसेफ स्टिगलीझचे अनेक संदर्भ त्यांच्या भाषणात असत. दोन वर्षापूर्वी थॉमस पिकेटीच्या कॅपिटल ग्रंथासंबंधी भाईंशी चर्चा करण्याची संधी मिळाली तेव्हा भाईंना ते पुस्तक अगोदरच वाचल्याचे लक्षात आले. त्यामुळेच वाढत्या वयामुळे त्यांची नव्या पिढीशी आणि नव्या विचारांशी त्यांची कधी फारकत झाली नाही. उलट त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक अनुभवसमृद्ध आणि ज्ञानसमृद्ध होत गेले. ✼✼✼

साभार: पंचायत भारती

शुभेच्छा!

पुरोगामी जनगर्जना
मासिकाच्या वाटचालीस माझ्या शुभेच्छा!

सचिन भानू, बदलापूर

भाई वैद्य न रहने का अर्थ – मेधा पाटकर


भाई अब नहीं रहेंगे, यह खबर मिलते ही उनकी तमाम यादें उभर आती रही, लेकिन उन्हें दूर जाने के पहले मिल पाऊंगी, यह आशा भी अब झूठी ख्वाहिश ठहरी। भाई वैद्यजी एक मित्र, साथी, विचारवंत, मार्गदर्शक, उम्र का तकाजा न रखते हुए प्यार बरसाते, दूर सतपुडा में या लवासा में पहुँचते... कायम 'तरूण तुर्क' रहकर ही चले गये! एक कठोर, कर्तृत्ववान समाजवादी साथी के रूप में वे थे, सदा उपलब्ध, और हाजिर भी।

महाराष्ट्र के मान्यवरों की सूची में पहला नाम रहता था – भाई वैद्य! ... और उनके हस्तारक्षर के बिना कोई समर्थन क्वचितही शुरू हो सकता था। उनके गहरे वक्तव्य के बिना पुणे में आयोजित कोई विशेष सभा का समारोप संभव नहीं था। 'लोकशाही समाजवादी' विचारधारा के साथ देश और दुनिया की, हर समस्या की दखल ही नहीं, पोल-खोल करनेवाले भाई वैद्यजी का समाजवादी विश्लेषण पा कर ही किसी महत्त्व की विषयवस्तू का आकलन पूरा होता था। कई मंचों पर, कईं मोर्चों में भाई की कठोर टिप्पणी, उनके बिना – समझौते, स्पष्टवक्ता और राजनीतिक आशय के साथ ही सामाजिक मुद्देपर अपनी भूमिका रखनेवाले व्यक्तित्व की खासियत थी। उनके विचार और मार्गदर्शनपर कई सारे मोड पार करते हुए चले, चलते रहे तमाम साथी-कार्यकर्तागण, हमारे सहित। आज से आगे उनकी कुर्सी खाली पाते हुए मन ही मन अनाथ होने की भावना महसूस करेंगे ही...।

भाई वैद्य एक राजनेता थे, अस्सल! जब भी वे सत्ता में रहे, तब भी उनकी भूमिका 'तरूण तुर्क' की रही। मूल्यवान राजनीति के प्रति श्रद्धा और विश्वास रखते हुए, आज की विपरित परिस्थिति में भी, उनकी विभिन्न राजनीतिक समीकरण व समन्वय बनाने की ख्वाहिश उनमें ऊर्जा जगाती रही। शुद्ध समाजवादी विचारधारा को आजकी राष्ट्रीय, वैश्विक समस्याओं पर सुलझाव निकालने की और, धरातल पर उतारने की कुशलता भाई में थी। वैश्वीकरणविरोधी मोर्चा, चौथा समाजवादी-रिपब्लिकन मोर्चा, दलित-शोषित-बहुजन मोर्चा, जनआंदोलनोंका – प्रस्थापित विकास को चुनौती देनेवाला मोर्चा, सांप्रदायिकता व जातिवाद विरोधी मोर्चा, आदि हर विशेष पहलू पर सघन वैचारिक मंथन के साथ ठोस कृति-कार्यक्रम ले कर अपनी छाप डालनेवाला भाई का प्रदीर्घ कार्यकाल भूलना असंभव है। हर समाजवादी, राजनीतिक और सामाजिक परिवर्तन के संघर्ष में, निर्माण में, उन्हें ढूंढ़ते रहेंगे, हम।

समाजवाद को ही अपनी मंजिल मानकर कार्यरत हर जनआंदोलन और निर्माणकार्य के साथ भाई का रहना, पिछले कई दशकोंतक अपरिहार्य बात रही। वे अर्थात् अपेक्षा रखते थे कि ये आंदोलनकारी और निर्माणकारी भी दलीय/चुनावी राजनीति में भी सक्रिय रहेंगे। उनकी यह अपेक्षा उन्होंने कभी छुपायी नहीं थी। उन्होंने एक दिन विशेष समय तय कर के आ कर मुझे समझाया था – ''यह

भाई वैद्य न रहने का अर्थ... पान क्र. ९० वर

आरोग्य सेनेचे
जनलोक मेडिकल्स
शाखा क्र. ५ रत्नागिरी
कांचन सागर बिल्डिंग, उद्यमनगर, रत्नागिरी
संपर्क: अतिक पाटणकर (मो:९९२२५६२४३२)
बाळ पाटणकर (मो:९४२१२३३७८६)


एक तुफान का शमन – डॉ. नीलिमा अनिल वैद्य

भाईकाका और मेरी मुलाकात हमारे विवाह से पहले हुई थी। मेरे पती श्री. अनिल वैद्य के भाई वैद्य चाचा लगते थे। हम सभी उन्हें 'भाईकाका' कहते थे। आरंभ में हमारे विवाह को दोनों परिवारों से विरोध था। आखिर मेरे पिता श्री. दशरथसिंह परदेशी ने हमारे विवाह को अनुमति दे दी, लेकिन वैद्य परिवार से कोई आएगा ऐसा नहीं लग रहा था। अनिल जी की भाईकाका पर अटूट श्रद्धा थी, वे जरूर आएँगे ऐसा उन्हें विश्वास था। हम दोनों जब भाईकाका को विवाह का आमंत्रण देने गए तब उन्होंने बडे प्यार से स्वागत किया। सुबह का समय था तो आग्रह कर नाश्ते के लिए बिठाया। तब सौ. नलुकाकी से भी भेंट हुई थी। भाईकाका ने हमारे विवाह में आने का आश्वासन दिया और काका-काकी दोनों विवाह में आकर हमें आशीर्वचनों का उपहार दे गए।

उसके बाद जब भी भाईकाका से भेंट होती वे बडे प्यार से दिलखुलास हँसकर पूछताछ करते। उन्होंने अनेक बडे-बडे पदों को विभूषित किया था। राजनीतिक क्षेत्र में वे सक्रिय थे। पूना के माजी महापौर, माजी गृह राज्यमंत्री रह चुके थे। विविध संस्थाओं पर महत्त्वपूर्ण पदों पर वे विराजमान थे। वे इतनी बडी हस्ती थी, पर परिवार से हमेशा जुडे रहे। उन्होंने परिवार के हर अच्छे-बुरे प्रसंगों में परिवारवालों का साथ निभाया । मेरे रेडिओ पर प्रसारित हुए समारोह और सूत्र-संचालन के लिए भाईकाका हमेशा दिल से प्रशंसा करते थे। मैं हमेशा इस बात का गौरव अनुभव करती हूँ कि मेरी पी.एच.डी. पूरी होने पर भाईकाका मुझे बधाई देने के लिए मेरे घरपर पधारे थे। काफी देर तक मेरा थिसीस पढते रहे और खूप बाते कीं। वह दिन मेरे लिए आज भी अविस्मरणीय हैं।

भाईकाका जितने बातुनी और खुलकर मिलने-जुलनेवाले थे, उनकी पत्नी सौ. नलुकाकी उतनी ही शांत और धीरगंभीर थी। मुझे तो काकीजी हमेशा सागर में दुफान आनेपर भी नाँव को धीरगंभीरता से मार्ग दिखानेवाले एक दीपस्तंभ की तरह प्रतीत होती थी। भाईकाका के जीवन में भी अनेक तुफान आए। उन्हे कई बार जेल-यात्राएँ सहनी पडीं। कई महिनों तक परिवार से दूर रहना पडा था, लेकिन नलुकाकी ने बिना शिकायत किए बडी धीरता से परिवार की नैया को संभाला था। दोनों संतानों पर कर्तव्यनिष्ठता और उच्च शिक्षा के संस्कार किए। फलस्वरूप आज बेटा डॉ. अभिजीत नामवंत हृदयरोग तज्ज्ञ है और बेटी डॉ. प्रा. प्राची सफल प्राध्यापक के रूप में कार्यरत है। नलूकाकी के पुण्यस्मारण समारोह में भाईकाका और परिवार सदस्यों से उनकी सहनशीलता और त्याग का बखान सुनने का सुअवसर मिला था।

हिंदी के प्रसिद्ध साहित्यकार कमलेश्वर सन २००२ में समाजवादी समारोह के लिए पूना में पधारे थे। कमलेश्वर जी को कॉलेज के द्विदिवसीय सेमीनार के लिए अध्यक्ष के रूप में बुलाने की मनिषा थी। पर उनसे मुलाकात कैसे हो यह बहुत बडी समस्या थी। मैने जब भाईकाका से इस बारे बें बात की तो उन्होंने तुरंत कमलेश्वर जी जहाँ ठहरे थे वहाँ का पता दिया और स्वयं कमलेश्वर जी से फोन पर बात कर मेरा परिचय देकर उनसे मुलाकात तय की। मैं और मेरे सहकारी साहित्यकार कमलेश्वर जी से मिल पाए और उन्होंने भी द्विदिवसीय सेमीनार के लिए आने का आमंत्रण स्वीकार किया। हमारी खुशी का तो ठिकाना न रहा। इतने बडे साहित्यकार का दोन दिन सेमीनार के लिए उपस्थित रहना, असंभवनीय था जो भाईकाका के कारण ही संभव हो पाया।

मेरे बेटे वरद के उपनयन संस्कार (व्रतबंध) के समय जब मैं उन्हें आमंत्रण पत्रिका देने गई तब उन्होंने मुझे साफ-साफ शब्दों में कह दिया था कि ऐसे उपनयन संस्कार जैसे रिति-रिवाज जातिभेद को बढावा देते हैं। उच्च-निच्च भेद को स्पष्ट करते हैं। इसलिए मैं तुम्हारे इस समारोह में नहीं आ पाऊँगा। मेरे विवाह के अवसर पर खास तौर पर उपस्थित रहनेवाले और मेरे पी.एच.डी होने पर स्वयं घर आकार बधाई देनेवाले भाईकाका का उपनयन संस्कार में आने से साफ-साफ मना करना उनके कट्टर समाजवादी होने का परिचय था। उस दिन से भाईकाका के प्रति श्रद्धा तथा आदर और भी बढ गया।

राजनीतिक नेताओं की झूठ, फरेबी, भ्रष्टाचार से भरी दुनिया में भाईकाका जैसे चारित्र्यसंपन्न, ध्येयवादी, निष्ठावान, अपने नैतिकमूल्यों को आजन्म संभालनेवाले बिरले ही होते हैं। मैंने राममनोहर लोहिया को किताबों में पढा था,एस. एम. जोशी को पिताजी से सुना था, पर उन्हों के पदचिन्हों पर बढते हुए, जीते हुए भाईकाका को प्रत्यक्ष अनुभव किया था। उनका सानिध्य हमेशा ही एक प्रेरणा और उत्साह देता था। प्रतिवर्ष २२ जून को भाईकाका के जन्मदिवस पर जब हम जाते थे तब सामने सोफा पर खादी के शुभ्र वस्त्रों में मुस्कुराते भाईकाका सभी का प्रेरणास्थान थे। लेकिन २ अप्रैल को शांत, चिरन्निद्रा में सोए भाईकाका को देखकर मन विचलित हो गया था। दिलखुलास, निरागस हँसी से सबका मन जीतनेवाले भाईकाका को उस स्थिति में देखकर लग रहा था जैसे एक तूफान शांत हो गया था। भ्रष्टाचार, जातिभेद के विरोध में समानता के लिए लडनेवाला एक ऐसा तूफान जिसन समाज में कई क्रांतियाँ लाई थी, कई सामाजिक विचारों के रूख बदल दिए थे। ऐसे समाजवादी तूफान को शतश: प्रणाम। ***

द्रष्टा समाजवादी... **पान क्र. ३३ वरून**

मानले. स्वातंत्र्यलढा, संयुक्त महाराष्ट्र समिती, प्रसोपा, नंतर संसोपा आणि अखेरीस जनता पक्ष असा अण्णांसोबत त्यांचा राजकीय प्रवास झाला. 'संसोपा'च्या याच कार्यालयात प्रभाकर मानकर, सदाशिवराव बागाईतकर, विनायकराव कुलकर्णी, बाबा आढाव, पन्नालाल सुराणा ही मंडळी भेटली.

१९६८ मध्ये एसेम जोशींनी आमरण उपोषण चालू केले. विषय होता केंद्र सरकारच्या कामगारांच्या संपाचा. अण्णा राष्ट्रीय संरक्षण उत्पादन कारखान्यातील कामगारांच्या ट्रेड युनियन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. त्या संघर्षात एका टोकाला होते संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण आणि दुसऱ्या टोकाला एसेम जोशी. खडकी येथील दारूगोळ्याच्या कारखान्यातील कामगार संपावर गेल्यास त्यांच्या नोकऱ्या जाणार होत्या. तसा केंद्र सरकारचा वटहुकूम होता. त्या आंदोलनात मी आणि ज्योतिप्रकाश सराफ हे युक्रांदीय सामील झालो. सत्याग्रहींनी रेल्वेगाडी अडवली. कामगारांच्या रेल्वेला खडकीच्या कारखान्याचे दरवाजे बंद होईपर्यंत उशीर करायचा उद्देश सफल झाला. दुपारी न्यायालयाने आम्हांला दोन महिन्यांची सक्तमजुरीची सजा दिली. येरवडा तुरुंगातील एका खोलीत मी, भाई वैद्य व कासमभाई जानजोत होतो. आयुष्यातला पहिला कारावास विचारधनाचे आदानप्रदान होई. त्यांची मुले अभिजित व प्राची लहानपणी उपचारासाठी माझ्या दवाखान्यात येत. भाईंचे वडील अण्णा भारदस्त व्यक्तिमत्त्व. त्यांनी भाईंना मंत्र दिला होता, 'एसेम जोशींची साथ कधीही सोडू नकोस.' माझी पत्नी ऊर्मीला तिच्या थोरल्या बहिणीची मुलगी गीतांजली. ती इंजिनिअर. भाईंचा मुलगा डॉ. अभिजित. अभिजित आणि अंजूचा आंतरजातीय विवाह झाला. या विवाहानंतर नातेवाईक बनलो. नागरी संघटनेतर्फे भाई पुण्याचे महापौर बनले. त्यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात जयप्रकाश नारायण यांची अभूतपूर्व सभा झाली. काही दिवसानंतर देशात आणीबाणी लागली. सर्वांत प्रथम भाईंना अटक झाली. काही काळ भूमिगत राहून नंतर आम्ही काही जण येरवडा कारागृहात दाखल झालो. आम्ही एका बराकीत स्वतंत्र खोल्यांमध्ये राहत होतो. प्रधान सरही त्याच बराकीत होते. भाईंच्या मनमोकळ्या स्वभावामुळे आमची जवळीक वाढली. अलीकडच्या काळात भाई खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण याच्या कट्टर विरोधात बोलत. सद्यपरिस्थितीबाबत त्यांचे विश्लेषण नेहमीच धारदार असे. आगामी परिस्थितीबाबत ते सातत्याने गंभीर इशारे देत.

***

साभार: दै. सकाळ

लढाऊ बाणा, सुस्पष्ट विचार - पन्नालाल सुराणा

''परधर्मद्वेष शिकवणाऱ्या अतिरेकी शक्ती आणि जागतिकीकरणाच्या गोंडस नावाखाली बेबंद भांडवलशाहीचे तुफान या दोघांविरुद्ध आपल्याला एकाच वेळी लढायचे आहे. देशाचे ऐक्य व व्यक्तीचे माहात्म्य जोपासायचे आहे. वयात आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला उपजीविकेचे योग्य साधन उपलब्ध देणाऱ्या विकास धोरणाचा अंगीकार करावयाचा आहे. स्वत:ला समतावादी म्हणवणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाने समाजवादी आंदोलन शक्तिशाली बनवण्यासाठी अहोरात्र झटले पाहिजे.'' असे प्रत्येक छोट्या मोठ्या मेळाव्याचे उद्‌घाटन करताना भाई म्हणत असत. त्यांचा लोकसंग्रह विलक्षण होता. महाराष्ट्राच्या अनेक तालुका पातळीवरील कार्यकर्त्यांशी त्यांचा जिवलग संपर्क असायचा. पश्चिम बंगाल, केरळ, पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार अशा अनेक राज्यातील साथींशी त्यांची सतत देवाणघेवाण चालत असे. आमची साथ सत्तर वर्षांची आहे. त्यावेळच्या इंग्रजी पाचवीत शिकायला मी पुण्याला नानीजींकडे राहिलो. गाडगे महाराज धर्मशाळेत जवळच्या सेवादल शाखेवर जायचो. भाई वैद्य त्यावेळी पुण्याचे शहर शिक्षक होते. भाईंची औपचारिक ओळख झाली. साताऱ्याच्या मेळाव्याला जाता येताना आमची गट्टी जमली ती अखेरपर्यंत. १९५४ साली बी.ए. पास होऊन मी विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात एम.ए. ला प्रवेश घेतला. भाईने त्यावेळी बी.टी. केले. भूदान आंदोलनाचे मला विशेष आकर्षण होते. जे.पी.नी जीवदान दिले होते. बिहार ही जमीन फेर वाटपाची प्रयोगशाळा करण्याचे ठरवले होते. त्या भागात सेवादलासारखी संघटना उभी करावी असेही त्यांच्या मनात होते. एसेमना त्यांनी दोन कार्यकर्ते पाठवायला सांगितले. अण्णांनी मला चिठ्ठी देऊन गयेला पाठवले. मी तिकडे गुंतलो. इकडे गोव्याचा सत्याग्रह सुरू झाला होता. भाईंच्या नेतृत्वाखाली गेलेल्या सत्याग्रहींना पोर्तुगीज पोलिसांनी जनावरासारखे झोडपले होते. भाईंचा हात तेव्हापासून अधू झाला. गोवा पाठोपाठ संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाईने महत्त्वाची कामगिरी बजावली. १९५९ ला मी पुण्यात समाज प्रबोधन संस्थेचे काम करत असताना भाई सांगेल ते सेवादलाचे व पक्षाचेही काम करत होतो. १९५७च्या झंझावातात शुक्रवार पेठ मतदार संघातून काँग्रेसचे मातब्बर नेते बाबूराव सणस यांना टक्कर द्यायला समितीने एसेमना उभे केले. चळवळीचा रेटा त्यांच्या पाठीशी होताच. पण निवडणूक जिंकण्यासाठी मतदानकेंद्र पातळीपर्यंतचे संघटन फार चांगले उभे राहवे लागते. भाईने आपले सर्व संघटनकौशल्य पणाला लावून यश खेचून आणले. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला. यशवंतरावांनी बेरजेचे राजकारण केले. विरोधी पक्षातले अनेक तरुण कार्यकर्ते काँग्रेसमध्ये घेतले. पुण्यातील रामभाऊ तेलंग यांना काँग्रेसच्या तिकिटावर एसेमच्या विरोधात उभे केले. निवडणूक मोहिमेचे सूत्रधार भाईच होते. त्यांनी मला नाना-भवानी या भागात काम करायला सांगितले. अनेक तरुणांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण यशाने झुकांडी दिली. भाई पुणे महापालिकेच्या राजकारणात लक्ष घालत होते. नगरसेवक म्हणून आपल्या मतदारसंघातल्या जनतेचे प्रश्न सोडवण्याकडे ते लक्ष द्यायचेच पण एकूण स्थानिक स्वराज्य संस्थांचे काय महत्त्व आहे याचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. १९६५ साली प्रसोपा व सोपा यांचे ऐक्य होऊन संसोपा या नावाने आम्ही काम करू लागलो. पुण्यात नानासाहेब गोरे, ग.प्र. प्रधान यांनी प्रसोपा पुनरुज्जीवित केला. भाईंची त्यांच्याशी खूप जवळीक होती. पण वैचारिकदृष्ट्या नरनारी समता, मागास जातींना विशेष संधी, राजकीय व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण या मुद्यांवर डॉ. लोहियांनी ज्या मूलगामी धोरणांचा पुरस्कार केला होता त्यांना उचलून धरण्यानेच देशातील दलित, वंचित व कष्टकरी जनतेला न्याय मिळणार आहे अशी भूमिका एसेमनी घेतली म्हणून भाई, दशरथ पाटील, बापू काळदाते, डॉ. बाबा आढाव, मी आदींनी संसोपात राहणेच पसंत केले. मुंबईत मृणाल गोरे, सोहनसिंग कोहली, जॉर्ज फर्नांडिस आदींनी मुंबई महापालिकेत चांगली कामगिरी बजावली होती. मुंबई महापालिकेचा कायदा आधीच झालेला होता. महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती

अशा विविध महापालिकांसाठी एकच कायदा केला जात होता. पुण्यात रामदास परांजपे, भाई, बाबा, राम वडके व मुंबईच्या मृणालताई आणि बाबूराव सामंत यांच्या अनेक एकत्र बैठकांत तपशीलवार चर्चा करून संसोपाच्या वतीने आम्ही सरकारला सूचनांचे विस्तृत निवेदन सादर केले. त्यातल्या बहुतेक सूचना स्वीकारल्या गेल्या.

भाईने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले. देशातल्या सर्व महापौरांचे संघटन उभारण्यात त्याने पुढाकार घेतला. सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, प्राथमिक शिक्षण, झोपडपट्टी सुधारणा आदींबाबत देशातल्या इतर महापालिकांच्या नियमांची व अनुभवांची देवाणघेवाण आणि राज्य सरकारांशी संबंध – या विषयावर चर्चा घडवून आणल्या. भाईने स्वत: अनेक वृत्तपत्रात लेखही लिहिले. त्या सगळ्यांचा ''एका समाजवाद्याचे चिंतन'' हा ग्रंथ सुगावा प्रकाशनाने प्रसिद्ध केला. तो ग्रंथ हा मराठीतील या विषयावरील संदर्भ कोष म्हणून मानला जातो.

१९६७च्या सार्वत्रिक निवडणुकीत पुणे लोकसभा मतदारसंघातून एसेमना निवडून आणण्यात भाईंचा महत्त्वाचा वाटा होता. संसोपाचे अध्यक्षपदही अण्णांकडे आले होते. पक्षांतर्गत ओढाताण असायची. देशाच्या राजकारणातही महत्त्वाच्या घटना घडत होत्या. अण्णांना कार्यालयीन साह्य देण्यासाठी बा. न. राजहंस, भाई व मी बरीच मेहनत करत होती. पक्षाच्या राष्ट्रीय संमेलनात आम्हांला अन्य राज्यातील सहकाऱ्यांबरोबर खूप विचार विनिमय करावा लागे. १९६७च्या निवडणुकीत काँग्रेस हटावचा नारा डॉ. लोहियांनी दिला होता. काँग्रेस, कम्युनिस्ट व जनसंघ यांच्यापासून समान अंतरावर राहून आपण आपले परिवर्तनवादी राजकारण चालवावे असे बहुसंख्य कार्यकर्त्यांचे मत होते. मात्र उत्तरेकडील राजनारायण आदी नेते हे काँग्रेस हटाव हे धोरण पोथीबंदपणे चालवावे व त्यासाठी जनसंघ, संघटना काँग्रेस, स्वतंत्र या पक्षांशीही हातमिळवणी करावी असे म्हणत होते. संसोपाने आपले परिवर्तनवादी चारित्र्य जोपासले पाहिजे. या हेतूने १९७० साली राष्ट्रीय अधिवेशन पुण्यात घ्यायचे असे आम्ही ठरवले. भाईने भगीरथ प्रयत्न करून ते अधिवेशन यशस्वीरीतीने पार पाडले. उजव्या पक्षांशी सहकार्य करायचे नाही असे राजकीय ठरावात नमूद करण्यात आले. मात्र अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीच इंदिराजींनी लोकसभा बरखास्त करून मध्यावधी निवडणुका जाहीर केल्या. दोन तीन दिवसात दिल्लीत राजनारायण वगैरे नेत्यांनी संघटना काँग्रेस व जनसंघ यांच्याशी हातमिळवणी करून बडी आघाडी उभी केली. आम्हांला वज्राघात झाल्यासारखे वाटले. इंदिराजींनी 'गरिबी हटाव' चा नारा दिला. आमचा दारुण पराभव झाला.

शेतजमिनीचे फेरवाटप हा प्रश्न अडगळीत टाकला जात आहे. म्हणून आपण भूमिमुक्ती आंदोलन करावे असे आम्ही महाराष्ट्र कार्यकारिणीत ठरवले. राष्ट्रीय पातळीवरही तो कार्यक्रम ठरला. एसेम जोशींनी बिहारमध्ये पुर्णियात सत्याग्रह केला. महाराष्ट्रात आम्ही बऱ्याच ठिकाणी सत्याग्रहींच्या तुकड्या पाठवल्या तेवढ्यात बांगलादेशाचे आंदोलन सुरू झाले. १९७१ च्या डिसेंबरात पाकिस्तानी आक्रमणाचा जोरदार मुकाबला करून भारतीय सैन्याने दिमाखदार विजय मिळवला. पाकिस्तानची फाळणी होऊन बांग्लादेश अस्तित्वात आला. त्याचा स्वाभाविक फायदा इंदिराजींना मिळाला. १९७२च्या विधानसभा निवडणुकांत बहुतेक विरोधी पक्षांप्रमाणे समाजवाद्यांची ससेहोलपट झाली. प्रसोपा व संसोपा यांचे एकत्रीकरण करून सोशालिस्ट पार्टीची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी लोणावळ्याला राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक घेतली. सर्व व्यवस्था भाईंनी अतिशय चांगल्या रीतीने केली. यापुढे सहकार्य करायचे तर ते फक्त डाव्या पक्षांशीच असा ठराव झाला. जॉर्ज फर्नांडिस अध्यक्ष व प्रा. मधू दंडवते सरचिटणीस असे पदाधिकारी निवडले गेले. महागाई दुष्काळ आदी प्रश्नांवर ठिकठिकाणी मोर्चे काढले गेले. १९७२ ते १९७४ या तीन वर्षात दुष्काळाचा सामना करण्यासाठी सोशालिस्ट पार्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. राज्यचिटणीस म्हणून भाई व मी काम करत होतो. मुंबईत मृणालताई व अहिल्याताईंचे लाटणे मोर्चे सत्ताधाऱ्यांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडत होते. १९७४च्या मे महिन्यात रेल्वेचा देशव्यापी संप झाला. त्यात आम्हा बहुतेक सगळ्यांना तुरुंगवास घडला. गुजरातमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू झाले. बिहारमध्ये नवनिर्माण आंदोलनाला जेपींनी नेतृत्व दिल्याने सत्ताधाऱ्यांना हादरे बसू लागले. त्यातच अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरवली. जेपींच्या नेतृत्वाखालील लोकसंघर्ष समितीने त्यांच्या

राजीनाम्याची मागणी केली. देशभर वातावरण तापले. २५ जून १९७५ रोजी मध्यरात्री इंदिराजींनी अंतर्गत आणीबाणीची घोषणा करून वृत्तपत्रांवर सेन्सॉरशीप लादली. विरोधी पक्ष नेत्यांची धरपकड केली. त्यावेळी भाई पुण्याचे महापौर होते. त्यांनी आणीबाणीचा निषेध करण्यासाठी शनिवार वाड्यावर सभा घेतली. सभेनंतर त्यांना अटक करण्यात आली. मी त्यावेळी बिहारमध्ये होतो. मृणालताई व मी भूमिगत राहून काम करावे असे ठरले. त्या सगळ्या संघर्षात आमच्या प्रत्यक्ष भेटी होणे शक्य नव्हते. तरी देवाणघेवाण सतत चालू होती. संघटना काँग्रेस, जनसंघ, लोकदल व सोशालिस्ट पार्टी यांची मिळून जनता पार्टी करावी, असा प्रस्ताव आला. बाबा आढाव व मी त्याच्या विरोधात होतो पण भाई, बापू, मृणाल वगैरे सगळे अनुकूल होते. १९७७ च्या मार्चमध्ये लोकसभेच्या निवडणुकीत जनता पार्टीला बहुमत मिळून सरकार बनले. पुढे पुढाऱ्यांच्यात भांडणे झाली. गंगा यमुनेप्रमाणे मुळामुठेतूनही बरेच पाणी वाहून गेले.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव द्यावे असा ठराव विधिमंडळात जुलै १९७८ मध्ये झाला. मात्र मराठवाड्याच्या अनेक जिल्ह्यात दलितांच्या वस्त्यांवर हल्ले झाले. नोव्हेंबर १९७९ मध्ये डॉ. बाबा आढाव आदींनी लाँग मार्च काढला. त्यांना मध्येच अटक झाली. औरंगाबादेत क्रांती चौकात सत्याग्रह चालला होता. दिनकर साक्रीकर व मी ११ वाजता तेथे पोहोचलो. एका बाजूला सत्याग्रहींचे जथ्ते उभे होते. त्यांना पाणी मिळाले नव्हते. बसेस येत नव्हत्या. अस्वस्थता वाढत चालली. दुसऱ्या बाजूने पोलीस अधिकारी हातात पिस्तूल घेऊन दरडावू लागला. मी पुढे घुसलो, ''हात खाली करा'' जोरात ओरडलो. दोन तीन क्षण गेले त्या अधिकाऱ्यांलाही शहाणपण सुचले. पुढे काही दिवसांनी आमची भेट झाल्यावर भाई म्हणाले - पोलिसांचा क्षणाक्षणाला वायरलेस येत होता, पन्नालाल जोरात पुढे घुसले. तू तिथे अन् मी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर काय विलक्षण सिच्युएशन होती.

शेवटी १९९५ साली समाजवाद्यांनी आपला पक्ष चालवावा. या निर्णयाला आम्ही काहीजण आलो. भाईंनी पुढाकार घेऊन समाजवादी जनपरिषदेची स्थापना केली. त्यानंतर २८-२९ मे २०११ ला हैद्राबादला सोशालिस्ट पार्टी इंडियाची आम्ही स्थापना केली. भाईंनी सलग पाच वर्षे अध्यक्षपद सांभाळले. देशातल्या १७ राज्यात या पक्षाच्या शाखा संघटित झाल्या. काम चालू आहे. सेवादलाच्या कामात आम्ही रस घेत होतोच. १९८६ साली एसेमच्या सूचनेवरून अध्यक्षपद मी घेतले. १९९१ ला भव्य प्रमाणात सुवर्ण महोत्सव साजरा केला. संघटनेला ५४ लाखाचा (३ कोटी आजपर्यंत) स्थायी निधी उभा करून देण्यात भाईने महत्त्वाची कामगिरी बजावली. पुढे भाईने काही काळ अध्यक्षपद स्वीकारून हीरक महोत्सव साजरा केला.

१९९१ साली भारत सरकारने जागतिकीकरणाचे नवे आर्थिक धोरण स्वीकारले आमचे अनेक ज्येष्ठ सहकारी त्याला पाठिंबा देऊ लागले. साधना साप्ताहिकात प्रा. सदानंद वर्दे वगैरेंनी तसे लेख लिहिले. भाई व मी मिळून साधना विश्वस्तांच्या बैठकीत असे मांडले की, साने गुरुजींचे, ''भारतात लोकशाही समाजवाद फुलो'' हे शेवटचे कथन आपण विटाळू नये. मधू दंडवते व किशोर पवार यांनीही या भूमिकेला पाठिंबा दिला. ''ग्यानबाचे अर्थकारण'' हे पुस्तक मी लिहिले व भाईने एखाद्या मिशनऱ्यांप्रमाणे त्याची विक्री केली. पूर्ण रोजगार हे प्रमुख उद्दिष्ट मानूनच सर्व आर्थिक धोरणे आखली पाहिजेत असे अभियान आम्ही चालवत राहिलो. ते काम चालू ठेवणे हीच खरी भाईंना श्रद्धांजली ठरेल. ✻✻✻

साभार: सा. वैनतेय – संपादकीय.

पुरोगामी जनगर्जना
मासिकाच्या फेसबुक पेजला
सामिल व्हा.
www.facebook.com/puja.monthly

GOODBYE BHAI : THE STRUGGLE WILL CONTINUE

DR PREM SINGH

His full name was Bhalchandra Bhai Vaidya but people used to call him Bhai Vaidya. I always addressed him as 'Bhai'. In our village, it was an accepted norm to call a father 'Bhai' and a majority of people followed this practice. I came in personal contact with Bhalchandra Bhai Vaidya after my father passed away, therefore I never really missed that close connection one feels with one's father. Before the re-launching of the Socialist Party, he used to call me Professor, but I would always call him 'Bhai'. An invisible thread of the almost familial relationship that developed between us from the very first meeting continued for all the time ever since.

While he was working in the Socialist Party for the last seven years, he considered everything suggested by me in the policy matters of the party very seriously and had an endearing sense of respect which he displayed clearly. He would give brief hints when was asked about his opinion about policy decisions, resolutions, memorandums, even press notes/releases of the party. Whether it was a government decision or a national-international incident or event, in order to send a statement of the party, he, as president of the party, used to every time send an SMS through his mobile phone from Poona, giving some directions and suggestions regarding it. I worked with him as general secretary and spokesperson of the party.

I remember when I took a stand against the so called India Against Corruption (IAC) and the Aam Aadmi Party, on the basis of the Constitution of India and the socialist ideology, Bhai always said that the party was firmly behind me. There was no deviation from any member of the Socialist Party during the deceptive headiness provoked and organized by those vested interests in defense of neo-liberalism. This unequivocal support could happen solely due to Bhai's personality, understanding and ideological perseverance.

He died on 2 April 2018 from pancreatic cancer, shortly after he was admitted to Poona Hospital on March 26, barely three weeks after his ailment was first detected. I learnt about his illness only after he was admitted to the hospital. Dr. Abhijit Vaidya told me on phone that operation or chemotherapy at his age was not suitable. He also told that Bhai was insisting to go back home from the hospital. But this was not to be and he took his last breath in the clinical confines of the hospital. Several comrades from Poona and Maharashtra visited him there . The news of Bhai's death was a sudden blow for the comrades our side Maharashtra.

I reached Poona on 3rd April to bid a last good-bye to Bhai. His mortal body was kept for the last glimpse at Sane Guruji Smarak, the headquarters of the

Rashtra Seva Dal (RSD). There was a continuous flow of people from the morning to the late afternoon who were coming to pay their last salute. There were a large number of women among them. Sainiks and Sainikayen of the RSD kept working whole day with promptness to help and facilitate the visitors. At 4 pm the officers of police administration came and wrapped the body of Bhai in the national flag. On reaching the crematorium, a police band played in his respect and he was also given a gun salute, after which his body was taken to the electric crematorium. This state honor was given to him due to his position as a former State Home Minister of Maharashtra (1978-1980) and former Mayor of Poona (1974-75).

I was surprised that thousands of people participated in the last journey of a leader who was away from the corridors of power for the past three decades, who fought anonymously in remote towns and villages against governments bringing in neo-imperialist slavery to the nation. People thronged the funeral journey to the cremation ground, a distance of about two and a half kilometers. Among the crowds that surged to bid their last farewell and respects, the activists of the Socialist Party (SPI) and Socialist Yuvjan Sabha (SYS), forcefully raising revolutionary slogans like 'Bhai Vaidya amar rahe' (Bhai Vaidya will remain immortal), 'Bhai tere sapano ko ham manzil tak pahunchayenge' (Bhai we will bring your dreams to the destination), 'Lokshahi samajwad – zindabad zindabad' (democratic socialism – long live long live), 'Bhai Vaidya ko lal salaam' (red salute to Bhai Vaidya), 'ladenge jeetenge' (will fight will win), 'samajwad lana hai – bhoolo mat bhoolo mat' (have to bring socialism – do not forget do not forget), were merely a fraction of the milling sea of humanity.

Most of the people present there were not activists but those from the general

अशी भरा वर्गणी

'पुरोगामी जनगर्जना' मासिकाची
वार्षिक वर्गणी पोस्टेजसह ३३० रुपये
वर्गणी आपण बँकेत प्रत्यक्ष वा ऑनलाईन भरून आम्हांला
फोनवर तपशील कळवा किंवा इमेलने पाठवा.

बँक तपशील
खाते नावः आरोग्य सेना
बँक नावः बँक बँक ऑफ बडोदा
शाखाः सुभाषनगर, पुणे
खाते क्रमांकः 07910100006583
खाते प्रकार : सेविंग्ज
IFSC कोडः BARB0SUBHAS

सूचनाः पुरोगामी जनगर्जना मासिक 'आरोग्य सेने'तर्फे प्रकाशित होते.
त्यामुळे धनादेश लिहिताना 'आरोग्य सेना' या नावे काढावा ही विनंती.

आपण बँकेत वर्गणी भरल्यानंतर आपला पिनकोडसह
पूर्ण पत्ता (जवळच्या खुणेसह) व मोबाईल नंबर
आम्हांला त्वरित कळवावा म्हणजे आपणास अंक
पाठविणे सुलभ होईल.

आमचे फोन नंबर- ०२०-२४४७३०२८ (सकाळी ९ ते ५) व्यवस्थापक रमाकांत सोनवणी- ९५०३७५३०४५
इमेलः puja.monthly@gmail.com

civil society. It was evident they were influenced by the rare personality of Bhai that was an amalgam and wonderful combination of love, service and compassion. Almost all the newspapers of Marathi and English published reports on his demise. One newspaper wrote that his honesty was actually the stuff of legends. I found that like Kishan ji, Bhai had no sense of bitterness or malice towards anyone. Medieval saints have described 'sahajta' (innateness) as a rare quality which, it is acknowledged that can be attained only by a rigorous practice of austerities. Bhai had attained this innate spiritual nature through great perseverance in life.

He participated in the Quit India movement of 1942. When some people were acting as informers of the imperialists, then at the age of14, Bhai was participating in the decisive battle of the Independence Movement. Gandhi gave a call for the Quit India Movement, but it was led by young socialist leaders. It is natural that in 1946, at the age of 18, Bhai became a member of the Congress Socialist Party (CSP). In1948, he joined the Socialist Party, through which he continued his long political struggle that prominently includes the Goa Liberation struggle (1955-1961) and the JP Movement 1974-74). During the Emergency he remained in jail under Maintenance of Internal Security Act (MISA) from 1975 to 1977. He had an important role in the Rashtra Seva Dal and became its president in 2001. Bhai's wish was that the Rashtra Sewa Dal should take the responsibility of cadre building for the Socialist Party so that the youth could be saved from the grip of communal politics.

Bhai was an MA in Sociology and Political Science. He was a multi-dimensional and studious person. However, he was essentially a political person. Borne out of the womb of socialist movement, Bhai, along with Gandhi, was deeply influenced by the thoughts of Jyotiba Phule and B.R. Ambedkar. At the global level he had done a thorough study of the ideologies/systems of capitalism and communism. He used to keep him updated with the articles and books published on various subjects.

In my opinion, the political inning of Bhai that started after 1991 is more

Imprint Media & Publishing

आमची वैशिष्ट्ये

- मजकूर निर्मिती आणि संपादन
- पत्रकार परिषदांचे आयोजन आणि प्रसिद्धी
- वेबसाईट डिझाइनिंग आणि सोशल मिडिया मार्केटिंग
- कॉर्पोरेट फिल्म निर्मिती
- प्रोसेस डॉक्युमेंटेशन
- पुस्तके आणि नियतकालिकांची निर्मिती

संपर्क संकेतस्थळ: www.imprintweb.in | **इमेल** contact@imprintweb.in | **मोबाईल ९६८९० २७१०६**

important. This year, against the constitutional values and provisions, the Congress imposed New Economic Policies on the country. At that time senior BJP leader Atal Bihari Vajpayee had said that "Congress has now taken over the work of his party (BJP)". This illegitimate decision was to breed the disastrous consequences for the society and the nation building, to whom the society and nation are facing. It is true that instead of putting a political fight to the neo-imperialist attack, most of the socialists made power the goal of politics. In doing so, they not only destroyed the socialist movement but also defamed it.

However, the fact remains that a comprehensive and decisive ideological challenge to the neo-imperialism was put by the socialists. Socialist leaders/thinkers such as Kishan Patnaik, Sachchidand Sinha, Vinodprasad Singh, Surendra Mohan, Bhai Vaidya, Justice Rajindar Sachar, Pannalal Surana, Dr. G.G. Parikh, Sunil initiated a big venture to create a small but new political stream as a genuine alternative to neo-imperialism. It is also notable that in the mainstream politics, socialist leader Chandrashekhar had constantly opposed the New Economic Policies from the beginning.

Bhai became the general secretary of Samajwadi Jan Parishad (SJP), formed in 1995. When the Socialist Party was reinstated in 2011, he was made its president. At that time his age was eighty plus. He did not want to take this responsibility. But on the insistence of Justice Sachar and young socialists, he agreed to be the president. He sustained that responsibility actively. After 1991, Bhai's life was spent in constant struggle against neo-imperialism. He fought a long struggle against the privatization of education.

It is not that other leaders or political organizations are not active in opposition to neo-imperialism. But they are either confused with the concept of development or they accept capitalism, the conjoined twin of imperialism, as the only path of development. Bhai clearly stated in the Socialist Party's policy statement and in his several comments that actually communists are not ready to leave the idea and model of capitalist development. They consider industrialism as the yardstick of development. Bhai used to consider democratic socialist ideology as an alternative to capitalism. He had firm conviction in the imminent defeat of capitalism. From this ground of faith, he continued to inspire Socialist Party workers. That inspiration is alive even after his death.

Goodbye Bhai! You rest in peace but the struggle of equality and freedom will continue against neo-imperialist designs. ✻✻✻

Courtesy : countercurrents.org

VETERAN SOCIALIST LEADER BHAI VAIDYA PASSES AWAY

QURBAN ALI

Bhalchandra Vaidya, popularly known as Bhai Vaidya, passed away on April 2, 2018 at Poona Hospital in Pune, at about 8 in the evening. 89-year-old Bhai Vaidya was admitted to Poona Hospital on March 26, 2018, after he became seriously ill. He had been diagnosed with cancer in the pancreas only 18 days ago. He was cremated at Vaikunth crematorium in Navi Peth, Pune on 3rd April, 2018. He is survived by his son Abhijit, daughter Prachi Rawal, a grandson and grand-daughter.

According to his son Abhijit who is a cardiologist, "on March 9, Bhai Vaidya complained on heaviness in the abdomen following which he was advised a sonography test. It was indicative of cancer. The next day he underwent magnetic resonance imaging and other tests which diagnosed him with pancreatic cancer." On March 26, he complained of breathlessness following which he was admitted to Poona Hospital and REasearch Centre. "His condition slowly deteriorated," said Abhijit. "He was conscious and had a 10 minute talk with NCP leader Sharad Pawar when he visited him in the hospital on March 28. "He led a very active and energetic life till the very end, said Abhijit.

Born on June 22, 1928, at Dapode village of Pune's Velhe Tehsil, Bhai Vaidya did MA in Sociology and enthusiasm of the 1942 Quit brush with political activism before he turned 15 as an Indian freedom.

He joined the congress Socialist Party (CSP) in 1946. Then played a major role in socialist movement while working in the Socialist Party, Praja Socialist Party, Samyukt Socialist Party



and Janata Party. He actively participated in the Quit India Movement of 1942, the Goa Liberation Movement of 1955, the Kachch Satyagraha of 1956 and the movement of 1974.

Bhai Vaidya was a vocal opponent of Emergency even during his Mayor ship, when he organized a rally of 20,000 people at Shaniwar Wada in Pune and got arrested. He was jailed during the Emergency from 1975 to 19777. As a freedom fighter and a lifelong activist who fought for the rights of Dailits, farmers and backward classes, Bhai was in jail 28 times. Bhai Vaidya was at the forefront of the Samyukta Maharashtra Samiti movement with his mentor Shreedhar Mahadev Joshi and other influential leaders of the time.

In is political career which spanned over 60 years, he was elected several times to the Municipal Corporation and later he became the Mayor of Pune city during 1974-75. He was the first president of the All India Mayor Association. He was elected as a Member of the Maharashtra Legislative Assembly in 1978 and was Minister of State for Home in Sharad pawar's cabinet between 1978-80, in Maharashtra State.

He is well known for many reformative decisions during his short stint in the Home Ministry especially changing the police uniforms from half pants to full pants and refusing huge bribes from smugglers with his honest and uncompromising attitude.

He participated in the Bharat Yatra in 1983 with former Prime Minister and then Janata Party President Chandra Shekhar. He was also the National General Secretary of Janata Party from 1986 to 1988. He took over as National General Secretary in the Samajwadi Jan Parishad (SJP) formed in 1995 and held the post till 1999. In 2011, after the re-establishment of the Socialist Party in Hyderabad, he became its first National President and guided the party till 2016.

Bhai Vaidya was an uncompromising opponent of neo-liberalism/neo-imperialism that came with the new economic policies introduced in 1991, and led several movements against its impact on Indian society.

In an age of corruption and compromised political ideals, he stood above the squalor of petty realpolitik, maintaining his dignity through his rectitude and near legendary honesty.

For last 10 years of his life he fought for free health and education. He is known as an honest politician and a fierce socialist leader/activist who never compromised on his morals and values during his career. He was one of few prominent survivors of socialist movement in India.

Vaidya was among the last in a fading constellation of socialist leaders. Renowned for probity in public life, he was a staunch adherent of socialist values and ideals. RIP Bhai Vaidya.

✻✻✻

Courtesy: weekly Janata

'पुरोगामी जनगर्जना' मासिकाची वार्षिक वर्गणी पोस्टेजसह ३३० रुपये

वर्गणी आपण बँकेत प्रत्यक्ष वा ऑनलाईन भरून आम्हांला फोनवर तपशील कळवा किंवा इमेलने पाठवा.

भाई वैद्य आणि समाजवादी चळवळ – राम ताकवले

भाई वैद्य यांचे २ एप्रिल २०१८ला निधन झाले आणि आमचा सातदशकांचा स्नेही अनंतात विलीन झाला. दोनच दिवस अगोदर आय.सी.यू.मध्ये जाऊन भाईंना भेटलो होतो. ऑक्सिजनच्या मास्कमुळे स्पष्ट बोलता येत नव्हते. म्हणून नर्सला बोलावून मास्क काढला व नळी नाकाला जोडली. आम्ही ३-४ मिनिटे बोललो. अंतिम वेळ जवळ आली आहे याची जाणीव आम्हा दोघांनाही होती पण त्या दिवशी भाई खूप खुषीत होते. अमेरिकेतील नातू सोहीलशी व्हिडिओ कॉन्फरन्सवरून बोलणे झाले होते. दोन्ही नातवंडांच्या यशामुळे भाई सुखावले होते व भरभरून बोलत होते. मीही म्हणालो, आपली नातवंडे नवीन जग निर्माण करीत आहेत, व यशस्वीपणे कार्यकरताहेत. यामुळे दोघेही आनंदाने बोलत होतो. परंतु सातदशकाच्या वाटचालीत जे लोकशाही समाजवादाचे कल्पचित्र रेखाटले ते मात्र आपल्या हयातीत साध्य होत नाही म्हणून मी खंत व्यक्त केली. त्याचवेळी डिजिटल क्रांतीच्या या कालखंडात आपली पुढची पिढी आपले ध्येय साध्य करील हा विश्वासही मी भाईंना देत होतो.

भाईंच्या मृत्युदिनी माझ्या मनात एस.एम. जोशी ऊर्फ अण्णा यांच्या मृत्यूचा दिवस आठवला. त्यावेळी मी पुणे विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू होतो. त्यावेळचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी दोन नव्या विद्यापीठांची घोषणा केली होती; जळगाव येथील 'उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' आणि नाशिक येथे 'महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ'. मुक्त विद्यापीठाची संकल्पना माहीत नसल्यामुळे त्यांनी माझ्याकडे त्या विद्यापीठाचे कार्य व व्याप्ती नाशिककरांना समजावून सांगण्याची जबाबदारी सोपवली होती. १एप्रिल १९८९ रोजी नाशिकच्या सायखेडकर सभागृहात सायंकाळी माझे व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी निदर्शने होतील म्हणून माझे व्याख्यान 'शासन संरक्षणात' चालू होते. व्याख्यान संपत आले होते, तेवढ्यात माझ्या हातात चिठ्ठी आली. श्री.एस.एम. जोशींचे निधन झाले असून; सभा शोकप्रस्ताव संमतकरुन व आदरांजली वाहून सभा संपवावी. ते मी केले. व पोलीस बंदोबस्तात मी बाहेर पडलो. पोलिसांनी मला 'नाशिक जिल्ह्याबाहेर'पडेपर्यंत साथ दिली. त्यादिवशी मी महाराष्ट्रातील अनौपचारिक शिक्षणाच्या क्रांतीबद्दल बोललो होतो. बरोबर २९ वर्षांनंतर मी भाईंच्या बरोबर 'डिजिटल क्रांती' व ती मधून येणाऱ्या २१व्या शतकांतील क्रांतीबद्दल बोलत होतो. भाईंचे गुरू व मार्गदर्शक अण्णा होते, त्यांचे मार्गदर्शन त्यांच्याबरोबर आम्हालाही लाभले होते.

भाईंचा आणि माझा परिचय

भाईंची आणि माझी ओळख प्रथम औंध येथे भरलेल्या सेवादलाच्या उन्हाळी शिबिरात १९४८ साली झाली. भाई शिबिराचे प्रमुख होते. मी सासवडहून ८वीचा विद्यार्थी व तेथील सेवादलातील एक सैनिक म्हणून आलो होतो. दोन आठवडे आमचे निरनिराळ्या कृती, खेळ आणि बौद्धिक कार्यक्रमात जात होते. सकाळी ग्रामसफाई, नंतर व्यायाम व खेळ, एक बौद्धिक व चर्चा. सकाळचा नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण असे. बौद्धिके सकाळी व दुपारीही असत. त्यावेळी भाई, बापू काळदाते, बाबा आढाव, कॅपिटल बॉंबखटल्यात सहभागी झालेले हरिभाऊ लिमये, प्रधान मास्तर हे आम्हाला जगातल्या निरनिराळ्या विषयाबद्दल माहिती देत होते. त्यांची टिप्पणे आम्ही वहीत नोंद करून ठेवीत होतो. मी केलेल्या नोंदीवरून भाईंनी मला शाबासकी दिली. सायंकाळी चर्चा व करमणूक असे. शिबिरात लाभलेले औंधचे नागेश झुरुंगे व रानवडे हे चांगले मित्र झाले. नागेशबरोबर आयुष्यभर विद्यापीठात घट्ट मैत्रीचे संबंध राहिले.

वडील एक व्ह.फा. झालेल्या व सेकंड इयर ट्रेंड असलेले नावाजलेले शिक्षक होते. गावची शाळा मोठी करणे, पालकांना मुलाला शाळेत पाठवण्याची प्रेरणा देणे, यात ते प्रसिद्ध होते. परंतु ते तेवढेच शिस्तीचे भोक्ते व रागीट होते. महात्मा गांधींच्या 'मूलोद्योगाचे' शिक्षण देऊन प्राथमिक शिक्षणाच्या शाळा, 'जीवन-शिक्षणाच्या' शाळा करणे, या नव्या कार्यक्रमासाठी त्यांची निवड झाली. पुणे

जिल्ह्यातून दोनच शिक्षकांची निवड झाली. माझे वडील व श्री वाल्हेकर गुरूजी, त्यांच्या प्रशिक्षणाचा १० महिन्यांचा कार्यक्रम वर्ध्याच्या विनोबांच्या पवनार आश्रमात पूर्ण झाला. व त्यांना पुणे जिल्ह्याचे एडीइआय (Assistant Deputy Education Inspector) म्हणून नेमणूक झाली. आम्ही जून १९४९ला पुण्यात आलो व स्वारगेट जवळच्या 'खडकमाळ आळी' मध्ये राहू लागलो. तिथूनच माझा व आमच्या कुटुंबाच्या 'शहरीकरणाचा व शिक्षणाचा' नवा मार्ग सुरू झाला. मी सेवादलाच्या खड्डा पटांगणाच्या शाखेत जाऊ लागलो. तिथे मधू निरफराके शाखानायक होता व भाई वैद्य त्या भागातील शाखा संघटक होते. तेथेच मला सेवादलातील अनेक मित्र लाभले. आमची मैत्री आयुष्यभर टिकली.

राष्ट्रसेवादलातील जडण-घडण

पुण्यातील माझा सेवादलाशी नियमित संबंध हा १९४९ ते १९५९ सालापर्यंतचा. या दशकात भारतात स्वातंत्र्यानंतर आणि भारतीय राज्यघटना स्वीकारल्यानंतर एक नवे राज्य, भारतात आणि राज्यांमध्ये उभे राहत होते. ही एक 'राजक्रांती' (Political Revolution) चालू होती. लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्था, आणि समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित एक नवीन समाज व्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय या देशाने सर्व लोकांपुढे (We, the People) ठेवले होते. ते शासन व समाजलोकांनीच तयार करावयाचे ही जबाबदारी भारतीय राज्यघटनेने आपल्या सर्वांवर सोपवलेली आहे. संसदीय व प्रातिनिधिक राज्यव्यवस्था स्वीकारून, हे ध्येय भारतीय समाजाला साध्य करावयाचे आहे. सर्व प्रौढांना समानतेने एक-एक मत देऊन आपण लोकशाहीचा स्वीकार केला.

त्या काळात राष्ट्र सेवादलातील शिबिरे, बौद्धिके, कृती कार्यक्रम यातून युवकांच्या विचार, आचार व बदल घडवण्याचे कार्य होत असे. नवीन सेवादल सैनिकाची जडण-घडण यातूनच होत होती. राष्ट्रसेवादल शाखेवरील खेळ आणि संस्कार, बौध्दिके-शिबिरे आणि समाजसेवेचे कार्यक्रम यातून मी घडत होतो. गांधी वधानंतर दर शुक्रवारी आणि ३० तारखेला आम्ही सफाई करीत असू. दर सुट्टीत श्रमदान शिबिरात सहभागी होत होतो. तिथेही आम्हाला अनेक विचारवंतांचे विचार व सहवास लाभत होता. त्याचवेळी गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यासाठी, 'समाजकार्यातून विकास' ही संकल्पना आम्ही त्यांना सांगत होतो. त्यावेळी प्रधान मास्तर आणि इतर प्राध्यापकांनी दिलेली एक व्याख्यानमाला आम्हाला प्रेरणा देऊन गेली. विषय होता 'जग परिवर्तनाच्या कल्पना' (Ideas that changed the World). आता त्यांनाच विशाल कल्पना (Big Ideas) म्हणतात. व त्या युगांतराचा गरजेतून निर्माण होतात.

भाई माझ्यापेक्षा पाच वर्षांनी मोठा. परंतु त्याचे सर्वांगीण नेतृत्वाचे मोठेपण अर्ध्या पिढीपेक्षाही (१२-१५ वर्षे) जास्त होते. आम्ही आमच्या पालकांची संमती मिळवण्यासाठी भाईला पुढे करीत असू. भाई आपल्या बोलण्यातून, समजावण्यातून पालकांना खूष करीत व पालकही भाईबरोबर जाण्याची आनंदाने परवानगी देत असत. भाई हा चांगला संघटक आणि नेता होता. त्यांचे नेतृत्व आघाडीवर राहून पूर्णपणे झोकून देऊन कार्य करणारे होते. सर्वांना बरोबर नेणारे होते. त्यात एक समाजवादी-समतावादी नैतिकता होती, पारदर्शकता होती, सतत इतरांना काहीतरी विचार, कृती आणि संस्कार देण्याची धडपड होती. अन्यायाविरुद्ध चीड होती, त्यासाठी सत्याग्रह करणे ही कृतिशीलता होती. त्याचा तो स्थायिभाव होता. सुरुवातीचा हा समाजवादी पुढे लोकशाही समाजवादी झाला. त्यालाही मानवतेचे अधिष्ठान दिले. आणि ते प्रत्यक्षात स्वतःच्या जीवनात अमलात आणले.

भाईंची नेतृत्व

भाईंचे नेतृत्व मला भावले, त्याचे तीनप्रकार आहेत.

(१) **संघटन व नेतृत्व:** संघटना करणे, तिला कृतिशील राखणे, ती विचार आणि मूल्याधारीत करणे, व त्यांतूनच समाजवादी-लोकशाही कृतिशीलता निर्माण करणे.

(२) **वैचारिक नेतृत्व व प्रबोधन:** भाई समाजवादी आणि इतर विचारप्रवाहांचा सतत अभ्यास करीत. आपणास आवडलेले विचार इतरांना सांगणे, चर्चा करणे, व यांतून संघटनांना नवी दिशा देणे. त्यांच्यापुढे निश्चित ध्येय व उद्देश देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले. समाजवादी विचारवंत म्हणून स्वतःची आगळी वेगळी प्रतिमा निर्माण केली.

(३) **परिवर्तनाची चळवळ:** भाई खरे सत्याग्रही होते, कोणत्याही अन्यायावर विरोध करण्यात, त्याला समाज-प्रबोधनाची व मूल्यांचे अधिष्ठान देण्यात त्यांच्यातील विचारवंत व संघटक सतत तत्पर असे. त्यांनी केलेले

सत्याग्रह आणि भोगलेला तुरुंगवास हे त्याचे निदर्शक आहेत.

भाईंच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत एका तुकडीचे नेतृत्व करून मीही येरवडा जेलमध्ये एक आठवडा काढला. पदवीचा विद्यार्थी असताना शाखा कशी चालवावी याचे प्रत्यक्ष कार्य कसे करावे हे दाखवण्यासाठी मी चाळीसगावला दोन आठवड्यासाठी गेलो होतो. तेथील डॉ. पूर्णपात्रे यांच्या घराचा पाहुणचार आणि घरात पाळलेला बिबट्या, या जीवनभराच्या आठवणी राहिल्या.

मी विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागात जेव्हा 'व्याख्याता' म्हणून लागलो, तेव्हा माझी कार्याची व विकासाची दिशा बदलली. विद्यापीठात मला फक्त शिक्षक नव्हे तर शिक्षक-संशोधक-मार्गदर्शक या भूमिका करावयाच्या होत्या. त्यादृष्टीने मी अगदी खालच्या पातळीवर होतो. फर्ग्युसन कॉलेजमध्ये काम करताना मला यशस्वी शिक्षक- अध्यापकाची मान्यता लाभली होती. परंतु पुढची वाटचाल म्हणजे विद्यापीठातील पंडितांच्या व त्यांच्या आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या वर्गात मला स्थान मिळवावयाची होती. ते माझ्या अभ्यासावर व तपश्चर्येवर अवलंबून होते. म्हणून मी त्या मार्गाला लागलो व माझा मार्ग बदलला.

पुढील सर्व प्रवासात भाई आणि मी भेटत असू चर्चा करीत असू. गृहराज्यमंत्री असताना मराठवाड्यात विद्यापीठाच्या नामांतरावरून जो जातीय संघर्ष झाला, त्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी एक प्रकल्प त्यांनी घेण्यास सांगितले. त्यावेळी मी पुणे विद्यापीठाचा कुलगुरू होतो. समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दामले यांनी तो प्रकल्प तयार केला. शासनाने यासाठी मदत केली, प्रकल्प पूर्ण झाला, निष्कर्षही निघाले. परंतु त्याचा प्रत्यक्ष फायदा काय हा प्रश्न उरतोच.

तसेच नामांतर पुणे विद्यापीठाचे तीन दशकानंतर झाले. पुणे विद्यापीठाच्या नावात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा बदल झाला. नामांतर अत्यंत शांतपणे पार पडले. पुण्यात आणि महाराष्ट्रात परिवर्तन चटकन स्वीकारण्यात आले.

आमचा शुक्रवारातील मित्रपरिवार १९९०च्या सुमारास वयाच्या साठीला पोहोचू लागला. त्यावेळी सर्वांना एकत्र करून 'समता प्रतिष्ठान' नावाची स्वयंसेवी संघटना भाईंनी संगठीत केली. तीमध्ये आम्हा सर्वांना निरनिराळ्या भूमिका व कामे दिली. तीचे कार्य १९९३पासून आजतागायत चालू आहे. त्यावेळची एक चर्चा मला आठवते, आम्ही भाईंना विनंती करीत होतो; त्यांनी आपले अद्ययावत समाजवादी विचार पुस्तकरूपाने लिहावेत, तीच जबाबदारी माझ्यावर 'मुक्त शिक्षणावर' दिली; त्यावर पुस्तक लिहावयास सांगितले.

भाईंनी त्यातून एक नवी चळवळ उभी केली. 'के.जी. ते पी.जी. मोफत, समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण हक्काची' ती चालवण्यासाठी 'समाजवादी अध्यापक सभा' ही संघटना उभी केली. असा हक्क केंद्रीय आणि राज्य शासनाने प्रत्येकास देणे हे शासनाचे कर्तव्य असून, त्याचे अर्थशास्त्रही त्यांनी तयार केले. भाईंच्या जीवनाच्या उत्तरार्धात त्यांनी निर्माण केलेला हा समाजवादी कार्यक्रम शिक्षणाच्या माध्यमातून आणणे शक्य आहे. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर व देशभर ही चळवळ चालवली. समाजवादी अध्यापक संघ या संघटनेवर या कार्याची धुरा त्यांनी सोपवली.

अलीकडच्या काळात समाजवादाचा हा सर्वात क्रांतिकारी कार्यक्रम आहे. त्यांत शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची बीजे आहेत. शिक्षण संस्थात व कार्यात शिकणारे सर्व समान आहेत. प्रत्येकाने आपल्या टॅलेंट प्रमाणे, प्रयत्नांतून-अभ्यासातून आणि स्वयंप्रेरणेतून शिक्षण घ्यावयाचे. त्यावेळी समाजातील विषमतेची उच्च-नीचतेची आभूषणे बाहेर काढून ठेवावयाची. आणि गुरुकुलात ज्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थी समतेने व समानतेने शिकतो, आपल्या विशेष बुद्धिमत्तांचा विकास करतो, त्यांचा अत्युत्तम विकास साधतो, आणि समर्थपणे जीवन जगण्यासाठी व्यवहारी जगात पदार्पण करतो. तसाच हा कार्यक्रम आहे. सर्वच शिक्षण व्यवस्था-संस्था व शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील अध्ययनाचे-अध्यापनाचे मार्ग जीवनाशी निगडित करावयाचे.हा नवसमाज निर्मितीचा मार्ग अद्वितीय आहे, क्रांतिकारी आहे.

भाईंच्या या कार्यक्रम-चळवळीच्या संदर्भात माझी काही निरीक्षणे आहेत. केजी टू पीजी मोफत शिक्षण हे शासनाने निर्माण करावयाचे आहे. अशा प्रकारचे मार्ग फिनलँड, जर्मनी, नॉर्वे, स्विडन या देशात निर्माण करण्यात आले आहेत. परंतु ते सर्व प्रगत देश आहेत. लोकशाही समाजवादी रचना तेथे स्वीकारली गेली आहे. भारतामध्ये

अनेक प्रकारच्या विषमता, शोषण व्यवस्था, व जात-धर्म यावर आधारलेली विविध भाषा व बोली असलेल्या या खंडप्राय आणि अनेक प्रकारे भंगलेल्या देशात हे शक्य होईल का ही मला शंका होती. शासकीय योजनांची अंमलबजावणी व तिचा फायदा घेणाऱ्या यंत्रणा केंद्रीय सत्ता असणाऱ्या व्यवस्थांमध्ये अस्तित्वात असतात. त्यांतून त्या योजनांचा व फायद्यांचा पाझर खालपर्यंत कसा पोहोचेल हा नेहमीचाच यक्षप्रश्न असतो. महात्मा गांधी यांनी आपल्या मूलोद्योगावर आधारित नई तालीम मध्ये समाजाधारित शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार केला. ती खरोखरच स्वायत्त व स्वावलंबी बनेल असा त्यांचा विश्वास होता. जे.पी. नाईक यांनी डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली सादर केलेला 'शिक्षण आयोगा'च्या अहवालात 'शिक्षण व राष्ट्रीय विकास' यांचा परस्पर संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. त्या अहवालात शिक्षणाची दोन प्रारूपे दिले होती. एक पाश्चात्य शिक्षणाचे, त्यांतून देशाचा 'औद्योगिक विकास' करण्याचे उद्दिष्ट होते. त्यातून 'लोकशिक्षण' आणि समाज/राष्ट्र विकास साधावा हा उद्देश होता. त्या दुसऱ्या प्रारूपाचे खोलवर विवरण 'शिक्षण-आयोगा'च्या अहवालात दिले होते. एक तपानंतर त्या अहवालाची कशी अंमलबजावणी झाली, व त्यातून काय यशापयश लाभले, याचा विचार नाईक यांनी आपल्या 'शिक्षण-आयोग व नंतर' या पुस्तकात केला आहे. त्यात शैक्षणिक क्रांती कशी फसली-नव्हे सुरूच झाली नाही याची कारणमीमांसा दिली आहे. त्यामध्ये भांडवलशाही व साम्यवादाच्या विकास प्रारूपांना आपल्याकडे तिसरे पर्यायी प्रारूप नव्हते हे त्यांनी मान्य केले. शैक्षणिक क्रांती ही शिक्षक आणि प्रशासनाच्या मदतीने करता येईल असे गृहीत धरले होते. तो मार्गही चुकीचा निघाला. यातून मार्ग काढण्यासाठी जे.पी. नाईक यांनी आपल्या पुस्तकात पाच-पाढ-धडे /नियम सांगितले आहेत. त्याच्या आधारावर जर शैक्षणिक प्रारूप तयार केले तर शैक्षणिक क्रांती शक्य आहे असा माझा विश्वास होता.

भारतीय राज्य घटनेतील तीनक्रांतीचे विचार

भारतीय राज्यघटनेत तीन क्रांतीचा उल्लेख आहे. राजक्रांती (Political Revolution), अर्थक्रांती (Economic Revolution) आणि शिक्षण क्रांती (Educational Revolution). पैकी राजक्रांती प्रातिनिधिक स्वरूपाच्या आणि केंद्रीय शासन व प्रशासनाच्या आधारावर अमलात आली. त्याला लाभलेली लोकशाहीच्या निवडणुकीमधील जनसहभागाचे यश, आणि अंमलबजावणीतील भ्रष्ट व अनैतिक व्यवहार हे दोन्हीवर आले. त्यावर लोकशाही व्यवस्थेत जनसहभागाचे स्वरूप विस्तारून 'ग्रामस्वराज्य'सारखा उपाय शोधणे आज सुरू आहे. इथेही आपणास महात्मा गांधींनी सांगितलेला स्वराज्यातील 'स्वायत्त' आणि स्वावलंबी' व्यवस्थेचा शोध आपणास घ्यावा लागणार आहे. ती मधून समाज व लोकसहभागाचा मार्ग शोधावा लागणार आहे.

दुसरी अर्थक्रांती (Economic Revolution). १९-२० व्या शतकाच्या 'औद्योगिक क्रांती'मधून कारखानदारीमधून जी उत्पादन व्यवस्था निर्माण झाली व ती मधील उत्पादने जगभरातील मार्केटमध्ये विकत, काही व्यक्ती व कॉर्पोरेशन प्रत्येक देशात 'अति श्रीमंत' (Super Rich) म्हणून तयार झाले. देशातील व जगातील अर्ध्या लोकांची संपत्ती काही व्यक्तींच्या हाती केंद्रित होत आहे. आर्थिक विषमता आणि श्रीमंत-गरीब दरी रुंदावत आहे. भांडवलशाही व्यवस्थेचा हा परिणाम आहे. त्यामधील प्रक्रिया या स्पर्धा, भांडवल निर्मिती व समृद्धी, आणि जास्तीत जास्त फायदा (Profit Maximization) यामुळे सध्या सर्व काही पैशातच मोजले जात आहे. अर्थसंपत्ती हीच सर्वश्रेष्ठ; व इतर सर्व प्रकारची संपत्ती नगण्य, असा मुल्याविचार समाजमनावर आरूढ होत आहे. त्यातून 'स्वार्थ' आणि 'पैसा' हा सर्व व्यवहारात येत असून, बाकी सत्ता-राजसत्ता व शिक्षण सत्ता ह्या अर्थसत्तेचे दास होत आहेत. एकूणच सर्व समाज व्यवस्था व संस्था या अर्थसत्तेने पूर्ण व्यापल्यामुळे, समाजामधील इतर संपत्ती, नैतिक मूल्ये आणि सामाजिक मूल्य ही लयाला जाऊ लागली आहेत. लोकही या भ्रष्टाचाराला व अनैतिकतेला मूक प्रेक्षक बनून साथ देत आहेत.

तिसरी क्रांती 'शिक्षण क्रांती'. शिक्षण आयोगाच्या (१९६६) अहवालात स्वीकारलेले शिक्षण प्रारूप आपण विस्तारीत आहोत. सर्व क्षेत्रात तेच वापरीत आहोत. ते पाश्चात्य शिक्षणाचे प्रारूप असून, औद्योगिक समाज निर्माण करणाऱ्या प्रक्रियांना ते साहाय्यक आहे. म्हणूनच तिला औद्योगिक शिक्षणाचे प्रारूप म्हणतात. तिची मूलतत्त्वे आहेत: रेषीय अभ्यासक्रम (Linearity),ठरावीक साचाची घडणी (Conformity), आणि वर्गवारी (Class) करून विद्यार्थी जगाच्या नोकरीच्या मार्केटमध्ये

पाठवला जातो. ही अवस्था समता निर्माण न करता समाजात विषमता निर्माण करते. यातील शिक्षकवर्गही शासनाला वेठीस धरून चांगला पगार व शिक्षण सोई मिळवतात. व्यवसाय शिक्षणाच्या सुविधा वाढवणे हे जेव्हा शासनाच्या आवाक्याबाहेर गेले, तेव्हा 'खासगीकरणाचा' मार्ग स्वीकारला. भली मोठी फी आकारून 'मलईदार (Creamy) पाठ्यक्रम' दिले जात आहेत. ते शिक्षण आता फक्त अभिजनांनाच साध्य होत असून, 'बहुजन' समाज शिक्षणापासून वंचित होत आहे. शिक्षकांमध्ये सुद्धा तीन वर्ग झाले आहेच. स्केलवरचा शिक्षक, कॉन्ट्रॅक्टवरचा शिक्षक आणि तासवारीचा शिक्षक. शिक्षणाचे 'वस्तूकरण' झाले असून तिला मार्केटमध्ये अधिक किंमत मिळवणे, व श्रीमंत संस्था निर्माण करणे; हा शिक्षण-उद्योग चांगलाच वाढत आहे.

भाई वैद्य यांनी या सर्व दुरवस्थेमधून मार्ग काढण्याचा मोठा प्रयत्न केला. शिक्षणाचा बंध समाजविकासाशी जोडला तर नवा मार्ग निर्माण होईल हा भाईंचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी केजी ते पीजी मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मार्ग सुचवला व त्यासाठी शैक्षणिक चळवळ उभारली. त्याला राजकीय सत्तेची साथ असावी म्हणून नक्सली ते दलित सर्वांची एक पुरोगामी आघाडी करून चळवळ-संघर्ष करावा ही कल्पना मांडली. परंतु अशा राजकीय चळवळी उभ्या राहिल्या नाहीत. आधुनिक इ-माध्यमांचा वापर करून समाजाचे विविध गट आपआपल्या प्रश्नासाठी एकत्र येत आहेत. महत्त्वाच्या प्रश्नांच्या व विचारांच्या आधारे महाराष्ट्रात गेल्या वर्षांत लक्षावधी लोकांचे अनेक शिस्तबद्ध मोर्चे निघाले. मोठ्या गर्दीचे दर्शन झाले, त्यामध्ये चांगली स्वयंशिस्त होती व ते कार्यकर्ते तळातून निर्माण होत आहे. 'वरच्या' नेतृत्वाबद्दल त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. स्त्रियांना कमी लेखणाऱ्या समाजाचे निराळे विचार दिसले. त्यांनी मुलींना-स्त्रियांना आघाडीवर ठेवणे, व राजकीय पुढाऱ्यांना पिछाडीवर ठेवले. हा गर्दीच्या सामर्थ्याचा (Crowd Power) जो क्षणिक उद्रेक दिसला त्यातून त्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची तीव्रता होती. प्रचलित व्यवस्थेबद्दल असंतोष दिसत होता. परंतु ही गर्दी जशी जमली तशी ती पांगली. नंतर सर्व काही शांत. कारण पुढचा मार्ग काय, उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे काय हे ना शासनाला, ना पुढाऱ्यांना माहीत. हा शोध आता सर्वांनाच घ्यावयाचा आहे.

डिजिटल युगातील मार्ग आणि उत्तरे

आईन्स्टाईनने म्हटले आहे की, ज्या काळात-युगात आणि पातळीवर प्रश्न उपस्थित होतात. त्यांची उत्तरे त्याच काळाच्या मार्गातून सापडत नाही. त्यासाठी वरच्या पातळीवर-कालखंडात,युगात ती शोधावी लागतात. वर उपस्थित केलेले प्रश्न १९-२०व्या शतकाच्या औद्योगिक समाजाच्या व्यवस्थेमधून निर्माण झाले आहेत. त्यांची उत्तरे त्याच समाजाची प्रस्थापित व्यवस्था देऊ शकत नाही. नव्या डिजिटल युगाच्या औद्योगिक क्रांतीमध्ये व या क्रांतीतून निर्माण होणाऱ्या समाजव्यवस्थेमध्ये या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहेत. डिजिटल युगाची क्रांती ३ व ४ थी औद्योगिक क्रांती ही दोन कालखंडात चालू आहे. तिसरी क्रांती ही डिजिटल तंत्रज्ञानातून समाज जोडला जाण्याची प्रक्रिया १९९५ ते २०१५ पर्यंत चालली. त्यांतून डिजिटल युगाचा फायदा घेऊन तंत्रज्ञान मार्केट करणारा एक नवा क्लास, श्रीमंत वर्ग निर्माण झाला. चौथी डिजिटल क्रांती २०१५ पासून मोबाईल तंत्रज्ञानाच्या वापरातून सुरुवात झाली. येत्या दोन दशकांतील (२०१५-२०३५) कालखंडात ती बरीचशी सुस्थिर होणार आहे. ही मास / लोकक्रांती आहे. त्या व्यवस्थेच्या पाऊलखुणा आज सर्वत्र दिसत आहेत.

तिसऱ्या औद्योगिक डिजिटल क्रांतीने नव्या प्रक्रिया व परिणाम (Process-Result) साधले जात आहेत. समाज स्थानिक-जागतिक (Local-Global)पातळीवर माहिती संपर्क तंत्रज्ञानामुळे, सर्व लोक व संस्था जोडल्या जात आहेत. प्रक्रिया-फल डिजिटल करण्यातून आता आभासी प्रक्रिया करता येऊ लागल्या आहेत. व त्यासाठी प्रत्येकास सायबर अवकाश (Cyber Space) लाभले आहे. ते सातत्याने तिच्या खऱ्या अवकाशाला जोडलेले असते. माहिती पाठविण्याचे लोक-संपर्काचे नवे साधन मिळाले आहे. तसेच तेच मासकम्युनिकेशनसाठी वापरून आपणास एका-एका व्यक्तीशी निराळा संपर्क साधता येतो (Mass Personalization). स्वयं-संघटना करण्यासाठी सोशल मिडीया निर्माण झाला आहे, व लोक आपली अभिव्यक्ती मोकळेपणे करू लागली आहेत. अगदी जागतिक पातळीवर एक नव्या जागतिकीकरणाची सुरुवात झाली. त्याचा फायदा व्यक्ती, संस्था व उद्योग घेत आहेत. आणि मुक्त व मोफत माहिती लोक परस्परांना देऊ लागले

आहेत. त्यातूनच 'मुक्तज्ञान स्त्रोता'ची (Open Knowledge Resources) चळवळ सुरू झाली. शिक्षणाची एक जागतिक पद्धती व व्यवस्था निर्माण होऊ लागली. त्यासाठी कोर्सइरा, (Corusera) इडीएक्स (Edx), युडसीटी (Udacity), आदी अनेक प्लॅटफॉर्म तयार झाले आहेत. जगातल्या ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्यापीठांतील ज्येष्ठ प्राध्यापकांनी 'मुक्त शिक्षणाची' चळवळ सुरू केली आहे. जगामधल्या सर्व विषयांचे जागतिक दर्जाचे पाठ्यक्रम (जवळजवळ ६०० हून अधिक) सर्वांना सर्वत्र उपलब्ध करून दिले जात आहेत. त्यात शिकणाऱ्यांची संख्या साडेचार कोटी झाली आहे. त्यातील १०% भारतीय आहेत.

डिजिटल औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली असून, तुमच्या माझ्या हातातील स्मार्टफोन हे निर्मिती कार्य करणारे मशीन आहे. तसेच ते संपर्काचेही साधन आहे. औद्योगिक युगातील ७-८ जणांची कामे आज स्मार्ट फोन करतो आहे. अनेक जणांची ती जुन्या जमान्यातील कामे नाहीशी झाली आहेत. त्यांना आता ती कामे डिजिटल युगाच्या वरच्या तंत्रज्ञानाच्या आणि तज्ञतेच्या पातळीवर जाऊन आता करावी लागतात. आपण वापरतो त्या यंत्राची किंमत, व त्यात वापरल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या आज्ञावलींची निर्मितिमूल्य दिल्यास, आपल्याला आपण निर्माण केलेल्या डिजिटल वस्तू नेटवर्कवर ठेवता येते, कुठेही पाठवता येते, डाऊनलोड करता येते. डिजिटल वस्तूंची सीमांती किंमत (Marginal Cost) जवळजवळ शून्य असून ती सर्वांना सर्वत्र उपलब्ध होतील अशा आहेत.

चौथ्या औद्योगिक क्रांतीने मोबाईल तंत्रज्ञान वापराचा पुढचा टप्पा गाठला आहे. तिसऱ्या क्रांतीने नव्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रक्रिया व पद्धती दिल्या आहेत. परंतु चौथ्या औद्योगिक मोबाइल तंत्रज्ञान, कार्य करणारे

'आरोग्य सेने'चे 'पुरोगामी जनगर्जना' मासिक.

संपादकः डॉ. अभिजित वैद्य

मनुष्य समाज आणि पर्यावरणाच्या सकारात्मक भविष्यासाठी व्यापक दृष्टिकोनाचे नियतकालिक. केवळ माहिती नव्हे तर विचार, केवळ विचार नव्हे तर विश्लेषण, केवळ विश्लेषण नव्हे तर पर्यायी मार्ग दर्शविणारे मासिक. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, संस्कृती, कला...यांवर नव्या दमाच्या विचारवंत, अभ्यासक, संशोधक, तज्ज्ञ, कलाकार, सामाजिक कार्यकर्त्यांनी... केलेले लिखाण, मांडलेली भूमिका... सर्वांसाठी वाचनीय आणि संग्राह्य मासिक!!!

वार्षिक वर्गणी, पोस्टेजसहः ३३०₹. संपर्कः ९५०३७५३०४५
फेसबुक पेज संपर्क- www.facebook.com/puja.monthly

(Function) तंत्रज्ञान निर्माण करीत/ केले आहे. त्यामध्ये SMAC तंत्रज्ञानाचा समावेश असून त्यांच्या वापरातून समाज पुनर्रचनेचे (Social Reconciliation) तंत्रज्ञान, मोबाइल तंत्रज्ञान (Mobile Tech),बीग डाटा (Big Data) वरून विश्लेषणातून पुढे येणाऱ्या पुढील परिस्थितीची सूचना दिली जाणे (Predicative Analysis),आणि क्लाऊड तंत्रज्ञान (Cloud Technology) यांचा समावेश आहे. या नवीन तंत्रज्ञानाचा व त्यांनी साध्य होणाऱ्या कार्याच्या उपयोजनांतून स्वावलंबी व स्वनियंत्रित वाहने; 3-D छपाईतून वस्तू निर्मिती; प्रगत रोबो तंत्रज्ञान; भौतिक, डिजिटल आणि जैव वस्तूंची निर्मिती करण्याचे इंजिनिअरिंग विकास पावत आहे. या सर्व कार्य प्रक्रिया, नवनव्या वस्तू व सेवा निर्माण करून व जीवनात आणि विविध कामात वापरून आपण नव्या जगाला जन्म देत आहोत. या नव्या जगात २०व्या शतकातील औद्योगिक युगाच्या भारतातील सुमारे ७०% नोकऱ्या नाहीशा होतील, आणि त्यांची जागा नव्या तंत्रज्ञानाच्या वापरातून निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवा घेतील. नित्याची (Routine) कामे, नियमानुसार कामे, उदा. प्रशासन, माहिती साठवण्याची, शोधण्याची, देण्याची कामे,रोबो आणि स्मार्ट वस्तू करू लागतील. या बदलाची गती मागच्या शतकाच्या तुलनेत पाच पटीहूनही जास्त आहे. या बदलाचा धक्का (Shock) आलविन तोफलर या लेखकाने तीन दशकांपूर्वीच त्यांच्या Future-Shock या पुस्तकातून दिला होता. तो येत्या दशकात प्रत्यक्ष बसणार आहे.

या बदलाची सुरुवात झाली आहे. ॲमेझॉन कंपनीने बाजारात आणलेला रोबो अलेक्षा कोणत्याही प्रश्नाची उत्तरे देते. जगातील सर्व ज्ञानस्रोत सर्च इंजीनने शोधून हवे ते उत्तर ती पटकन सांगते. ही तिची पहिलीच पिढी (First Generation) आहे. येत्या काही वर्षांतच तिच्यापुढच्या पिढ्या बाजारात येतील. पुढच्या पिढीतील रोबो संकल्पना समजावून सांगतील; त्यासाठी इ-मिडीयाचा वापर करतील, वैयक्तिक गरजा पाहून ज्ञान व माहिती देतील, हे ती एका विद्यार्थ्यासाठी किंवा गटासाठी/ वर्गासाठीही करेल. दुसरा रोबो गुगल साहाय्यक (Google Assistant) बाजारात आला असून तो घरांतील बऱ्याच कामाबद्दल तुम्हाला सांगतो. भविष्यात ते विविध स्टोअरमध्ये, प्रशासनात, माहिती देण्यात हे साहाय्यक कार्य करतील. एकूणच डिजिटल युगातील नवा समाज पूर्णपणे वेगळा असून तिथे उद्योग, जीवन जगण्याचे व कार्य करण्याचे मार्ग, व त्यासाठी AI (Artificial Intelligence) आधारित साहाय्यक तुमच्या आमच्या घरात, समाजात, संस्थांमध्ये विविध कार्यासाठी वापरले जाणार आहेत. मानवाला मदत करणार आहेत. या नव्या जगात माणसाचे स्थान काय; कार्य, जीवन-मार्ग, काय; माणूस आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करू शकेल का? का तो बुद्धिमान यंत्राचा गुलाम होईल. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपणास शोधावयाची आहेत. या लेखाची व्याप्ती मर्यादित करून नवीन डिजिटल समाजातील लोकशाही समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष समाज व्यवस्था कशी प्रस्थापित करता येईल याचा थोडक्यात विचार करू.

मोबाईल क्रांती आणि नवसमाज निर्माण

वर उल्लेखलेल्या चार औद्योगिक क्रांती, पहिल्या दोन स्वयंचलित यंत्रामुळे - स्टीम इंजीन व नंतर ऑइल व विजेचे इंजीन यांच्या जीवनातील व कामकाजातील सर्व क्षेत्रातील व्यापक वापरातून निर्माण झाल्या. तर नंतरच्या दोन ३री व ४थी क्रांती - डिजिटल यंत्रामुळे आणि नंतर मोबाइल यंत्रामुळे निर्माण होत आहेत. इथे तंत्रज्ञान हे कारण (Cause) आहे. परंतु ती यंत्रे वापरताना सामाजिक जीवनात, आर्थिक व्यवहारात आणि वस्तू व सेवा निर्मितीच्या क्षेत्रात जो बदल होतो, त्यांतून क्रांती घडते. जीवनाच्या व कार्याच्या सर्वच क्षेत्रातील मूलभूत प्रक्रिया, उदाहरणार्थ विचार, आचार व सुधार करणे, यांच्यात पूर्वीच्या प्रक्रियेपेक्षा नवीन तंत्रज्ञान वापरून एक नवीन समाज धारणा होत असते. तंत्रज्ञान व टूल्स हे व्यक्तीला, स्वतःच्या कार्यकरण्याच्या प्रक्रिया व पद्धतीप्रमाणे कृती करावयास भाग पाडते. यातूनच नव्या युगाच्या नव्या प्रक्रिया जन्म पावतात. व त्यांतूनच आता डिजिटल युगाचा नवसमाज तयार होत आहे. सध्याच्या कालखंड हा युगांतराचा, युगपरिवर्तनाचा आहे. आपण २०व्या शतकातील औद्योगिक समाजापासून बदलत असून नवीन डिजिटल समाजात पुनर्रचित होत आहोत. याच वेळी हा नवा समाज कोणत्या मूल्यांवर, समाज संघटनेवर रचला जावा याचा विचार आताच करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तो घडवण्याची धडपड आताच करावी लागणार आहे. याच वेळी भाई वैद्य यांनी सांगितलेली केजी ते पीजी- मोफत

दर्जेदार शिक्षण सर्वांसाठी प्रत्यक्षात आणावयास पाहिजे.

नवीनशिक्षण व्यवस्था व लोकशाही समाजवाद

डिजिटल समाज हा माहिती व ज्ञान यावर आधारलेला समाज आहे. समाजव्यवस्था आणि ज्ञानार्जनव्यवस्था समाकारी व समरूप झाल्यास, ती चांगली समाजव्यवस्था ठरेल. त्या दृष्टीने विद्यार्थी व शिक्षक यांची संघटना खालपासून छोटा गट (३-५ व्यक्ती), मोठा गट परिवार (३-५ गटांचा एक परिवार) असा पंचकांनी जोडल्यास तो निसर्गातील 'Fractal' या रचनेचा किंवा समाजातील 'पंचायत' व्यवस्थेचा भाग ठरेल.

या छोट्या गट-परिवारातील प्रत्येकाचा निर्णयप्रक्रियेतील आणि कामातील सहभागावर कम्युनिटीचे संघटन उभारता येईल. त्यांच्यातील परस्पर बंध व भाव यांनाही योग्य ते स्थान दिल्यास ते एकजुटीने व परस्पर सहकार्याने (Cooperation) व सहभागाने (Collaboration) कार्य करतील. त्यातील सर्वांनी एकत्रित येऊन सहभागाने सर्वांना महत्त्वाचे व आवश्यक असलेले कार्य केल्यास, त्यातून इर्जिक किंवा विकीप्रक्रिया तयार होते व संपत्ती निर्माण होऊ शकते. सहनिर्मितीमधून तयार झालेली, सहकाऱ्यांनी समाज उपयोगासाठी दिलेली संपत्ती यातून समाज-संपत्ती निर्माण होते. ती दोन प्रकारची असू शकते एक भौतिक आणि अर्थ संपत्ती; व दुसरी समाज संघटनेची, नैतिकतेची आणि उन्नत मनःशक्तीची. या दोन्ही भौतिक आणि आधिभौतिक/ आध्यात्मिक शक्तींच्या बळावर समाज प्रगत व आधुनिक स्वरूपात निर्माण करता येईल.'स्वराज्य' व 'स्वावलंबी' तत्त्वावर समाजाची बांधणी केल्यास, आणि आपल्या गट, परिवार व कम्यूनिटिमधील सर्वांचे दारिद्र्याचे, विषमतेचे व शोषणाचे प्रश्न सोडवल्यास समाज समाजवादी रचनेच्या जवळ जाईल. त्यासाठी केंद्रीय विभागीय-स्थानिक सहकार्य आणि सायबर अवकाश आणि तंत्रज्ञान यांचा वापर केल्यास सबलीकरणाची प्रक्रिया दृढ होईल.

डिजिटल युगाची विकेंद्रित उत्पादन व्यवस्था, व्यक्तीचे व गटांचे नेटवर्क यामुळे संघटन व व्यवस्थापन, सहसंपत्तिमधून व समाज या सर्वांच्या सहकार्यातून २०व्या शतकाच्या प्रश्नांची सोडवणूक करणे अत्यंत गरजेचे आहे.यामधून आपण समतेच्या आधारावर समर्थ समाजाची निर्मिती करण्याचा प्रयत्न करीत आहोत. स्थानिक-जागतिक मार्ग आपणास उपलब्ध होत आहेत. या मार्गाने जाऊन आपले स्थानिक विकासाचे, जगण्याचे, कामाचे व उपजीविकेचे प्रश्न सोडविण्यात नव्या डिजिटल युगाची मदत होणार आहे.

भाई वैद्य यांनी दूरदर्शीपणे केजी ते पीजी- मोफत दर्जेदार आणि समान शिक्षण हक्क ही संकल्पना मांडून आणि तिच्यासाठी देशभर एक चळवळ निर्माण करून मोठे कार्य केले आहे. ही संकल्पना नव्या युगात कशी साकार करता येईल याचे दिग्दर्शन वरील लेखात केले आहे. ते प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रचंड कार्य आणि संघर्ष करावा लागणार आहे. विसाव्या शतकातील सत्ता आणि संपत्ती संचय असणाऱ्या व्यक्ती आणि संस्था आपले हितसंबंध जोपासण्यासाठी विरोध करतील. त्या विरोधाला समाजाच्या जीवनाचे प्रश्न सोडवण्यासाठी समाज सहकार्यावर आणि शिक्षणावर आधारलेल्या व्यवस्था निर्माण करणे, आणि समाजाच्या जीवनाच्या प्रश्नाची सतत सोडवणूक करणे. आणि निर्माण झालेल्या समाज संपत्तीचे रक्षण करणे, ती सतत वाढवणे. आणि समता आणि न्यायासाठी सतत जागरूक राहून रचनात्मक संघर्ष करणे. हा मार्ग शोधावा लागणार आहे. जयप्रकाश नारायण यांनी दाखवलेला संपूर्ण क्रांतीचा मार्ग शोधावा लागणार आहे, आणि त्यातून डिजिटल युगाची नवी समाज रचना साकार करावी लागणार आहे. ज्ञान आणि संपत्ती निर्मिती सतत केंद्र स्थानी ठेवून, आणि मूल्याधारित भूमिका घेऊन ही चळवळ सतत प्रगतीतील ठेवावयास पाहिजे. नवीन शिक्षणावर आधारलेला लोकशाही समाजवादी समाज निर्माण करण्याचा संकल्प सोडणे, त्यासाठी संघटन करणे आणि निर्मिती कार्य हे प्रबोधनाच्या बरोबरच केंद्र स्थानी राखणे, आणि भाई वैद्य यांना अपेक्षित असलेला जीवन मार्ग शोधणे; हे कार्य प्रत्येकास आपापल्या विकास क्षेत्रात करावयाचे आहे. त्या दिशेने सतत प्रयत्नशील राहणे, मोफत आणि दर्जेदार शिक्षण सर्वांना मिळावे यासाठी निर्मिती कार्यात सतत संघटित आणि कार्यरत राहणे, हीच भाई वैद्य यांना आदरांजली ठरेल. ✻✻✻

भाईंनी दिलेला वस्तुपाठ – रझिया पटेल

या वर्षी भाईंच्या कितीतरी सभांना हजर राहिले. भाईंशी घरी जाऊनही काही वेळा बोलावसं वाटलं आणि भाई कधीही नाही म्हणाले नाहीत. आज जेव्हा त्यांच्या सर्व भेटींची आणि भाषणांची गोळाबेरीज केली, तर असं लक्षात येतं की, आत्ताच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीबाबत भाई खूप अस्वस्थ होते, आणि त्याबाबत कार्यकर्त्यांना, समाजाला ते सतत आवाहन करत होते, ते म्हणजे 'सावध ऐका पुढल्या हाका' याचे. देशातली आणि जगातली अस्वस्थ परिस्थिती आणि त्याचे भीषण परिणाम याबाबत. प्रत्येक सभेमध्ये ते बोलत होते, आणि या परिस्थितीशी लढायची त्यांची जिद्द शेवटपर्यंत कायम होती. त्यांच्या नव्वदाव्या वर्षात पदार्पणाचा कृतज्ञता सन्मान सोहळा जेव्हा टिळक स्मारक मंदिरात करण्यात आला तेव्हा केवळ सभागृह भरले होते इतकेच नाही तर सभागृहाच्या बाहेरही तुडुंब गर्दी होती. आणि सभागृहात रांगांच्या मधल्या मोकळ्या जागेत ही लोक दाटीवाटीने बसले होते. यात अनेक नामवंत बोलले, पण जेव्हा भाई बोलायला उभे राहिले आणि खड्या आवाजात भाषण सुरू केले, तेव्हा संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. तेव्हा हे जाणवलं की सध्याच्या संपूर्ण राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहता लोकांच्या अस्वस्थतेला प्रकट करणारा हा आवाज आहे असं लोकांना वाटल्यास नवल नाही.

भाईंची या काळातली सर्व भाषणं ऐकली तर असं दिसतं की, जे त्यांना कळीचे मुद्दे वाटत होते त्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शिवाजी महाराजांनी सांगितलेले हिंदवी स्वराज्य की हिंदू राष्ट्र आम्हांला हवे आहे? आत्ताचे सरकार हे भारतीय जनता पक्षाचे वा नरेंद्र मोदींचे सरकार नसून ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार आहे. हे ते बहुतेक सभांमध्ये स्पष्ट करून सांगत असत, जगभर सुरू झालेला फायनान्शिअल कॅपिटॅलिझम, इस्लामच्या नावाने सुरू असलेला दहशतवाद, गांधी, आंबेडकरांना परस्पर विरोधात उभे करण्याचे राजकारण, स्त्रियांची वाढती असुरक्षितता, वाढत जाणारी विषमता या सर्व आव्हानांशी लढण्यासाठी सर्वच डाव्या, दलित, समाजवादी, पुरोगामी आणि स्त्रीवादी चळवळींनी एकत्र आले पाहिजे आणि या सामाजिक राजकीय संकराचा मुकाबला केला पाहिजे असे त्यांना प्रकर्षाने जाणवत होते. आणि ते हे बोलू शकत होते, कारण डाव्या चळवळीतील सर्वच विचार छटांचा आदर त्यांनी नेहमीच केला. त्यामुळे जवळपास सर्वच चळवळींतल्या कार्यकर्त्यांना त्यांच्याबद्दल आदर. अगदी तरुण कार्यकर्त्यांनाही ते बरोबरीने वागवायचे आणि अगदी विरोधी मतही शांतपणे ऐकून घ्यायचे. त्यामुळे भाईंचे भय किंवा दरारा वाटायचा नाही. ते आपलं मत लादून कार्यकर्त्यांवर दबाव कधीच निर्माण करायचे नाहीत. संघटना आणि चळवळींमध्ये लोकशाहीचा अवकाश कसा असावा याचं उदाहरण त्यांनी घालून दिलं. मुस्लीम समाजातील सुधारणावादी चळवळी रुजायला येणाऱ्या अडचणी, समाजाचा होणारा विरोध, धार्मिक नेतृत्वाबद्दलची भूमिका या बाबत त्यांचे म्हणणे आणि आम्हा काही मुस्लीम कार्यकर्त्यांचे म्हणणे यात त्यांचा काही मुद्यांना विरोध असायचा. देशाच्या फाळणीच्या काळातल्या मुस्लीम लीगची भूमिका आणि मुस्लीम लीगचे नेतृत्व, त्यांची आडमुठी भूमिका हे सर्व खरे होते, पण याच समाजामध्ये या परिस्थितीच्या विरोधात उठलेले क्षीण का होईनात आवाज होते, अगदी ऐतिहासिक काळापासून कर्मठ, धर्मांध भूमिकांना विरोध झाला आहे, हे ही वास्तव लक्षात घेतले जावे असे आम्हांला वाटत असायचे.

ही मते मतांतरे सोडली तरी मला आठवते ज्या दिवशी बाबरी मशीद हिंदुत्ववाद्यांनी उध्वस्थ केली त्या दिवशी भाईंच्या सोबत एका जाहीर कार्यक्रमात मी सहभागी होते आणि ही बातमी ऐकताच भाईंना जो धक्का बसला आणि त्यांच्या चेहऱ्यावर दु:खाचे जे भाव दिसले ते आजही मला स्पष्टपणे आठवतात. गुजरात दंगलीत मुसलमान समाजाचा जो वंशसंहार करण्यात आला त्यांच्या वेदना त्यांनी नेहमी व्यक्त केल्या. मी जेव्हा जेव्हा मुस्लीम कार्यकर्त्यांच्या बैठका आणि कार्यक्रम घेतले तेव्हा त्यांना मीच मार्गदर्शनासाठी निमंत्रित केलं. मुस्लीम कार्यकर्ते त्यांचं भाषण ऐकून अंतर्मुख होत, आणि त्यांना आधारही वाटे.

शेवटी जाताना भाईंचा हात हातात घेण्यासाठी त्या सर्वांची झुंबड उडे अगदी मागच्याच वर्षी मुस्लीम कार्यकर्त्यांची जी राष्ट्रीय बैठक आम्ही घेतली तेव्हा त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना ग्लोबल इकॉनॉमिक्स आणि पॉलिटिक्स समजून घेणं कसं आवश्यक आहे, पोस्ट इंडस्ट्रियल कॅपिटॅलिझम म्हणजे काय आणि आत्ताचे फिनान्शियल कॅपिटॅलिझम काय आहे, त्याचा जगावर होणारा परिणाम आणि विशेषत: इस्लामिक जगतावर आणि म समुहांवर झालेला परिणाम विषद करून मुस्लीम चळवळींनी या गोष्टी ध्यानात घेऊन, मुस्लीम समाजातील लढ्यांचं स्वरूप आता बदलायची वेळ आली आहे असे त्यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडलं. या कार्यक्रमाला देशातील जवळपास बारा प्रांतांमधील मुस्लीम कार्यकर्ते उपस्थित होते. त्यातील बहुतेकांना भाई माहिती असण्याचा कधी प्रसंग आला नव्हता. पण भाईंचे भाषण ऐकल्यावर ते खूप प्रभावित झाले. भाषणानंतर ते भाईंच्या भोवती गोळा झाले. इतकेच नाही तर भाईंसोबत आम्हांला फोटो काढून घेऊन सोबत न्यायचा आहे असा आग्रह त्यांनी धरला.

भारतीय शिक्षण संस्थेत जेव्हा ते काही सेमिनार्स, किंवा बैठकांना आले तेव्हा संशोधक, विद्यार्थी, वेगवेगळ्या संस्थांचे डायरेक्टर सर्वच त्यांच्या भाषणाने प्रभावित होत, ते मुख्य म्हणजे त्यांचं अद्ययावत वाचन आणि विश्लेषण यामुळे. बऱ्याचदा चळवळीत वाचणाऱ्या लोकांची 'पढाऊ' म्हणून टर उडवली जायची. भाईंच्याकडे पाहिलं की अभ्यास आणि चळवळ हे किती परस्परपूरक महत्त्वाचं आहे हा वस्तुपाठ मिळायचा.

ते ज्या पद्धतीने श्रोत्यांशी संवाद साधायचे तोही वस्तुपाठच. त्यांच्या भाषणाला तरुणांचीही गर्दी असायची. मुख्य म्हणजे ते तरुणांमध्ये लोकप्रिय होते. जनरेशन गॅप हा प्रकार त्यांच्या बाबतीत नव्हताच. तरुणांच्या सद्यकाळातील अनेक प्रश्नांबाबत ते जिव्हाळ्याने बोलायचे, आणि 'आमच्या काळात आम्ही असं केलं आणि तुम्ही असं केलं पाहिजे' अशी वाक्यं त्यांच्या तोंडात सहसा नसायची. शिवाय जगभरातील परिस्थितीचा संदर्भ त्यांना वर्तमानकाळाशी जोडून ठेवत असे. डिसेंबर २०१७ मध्ये झालेलं माजवादी महिला संमेलन, त्यात त्यांनी जे भाषण केलं, त्यात 'मी-टू' या चित्रपट क्षेत्रात केल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या शोषणाबाबत पाश्चिमात्य जगातून सुरू झालेल्या चळवळीचा त्यांनी उल्लेख केला तेव्हा या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या माझ्या मुलीने भाईंचे भाषण आणि त्यांनी आजच्या जगातल्या स्त्रियांच्या समस्यांची घेतलेली दखल यामुळे ती प्रभावित झाल्याचं सांगितलं.

भाईंनी फक्त चळवळ आणि राजकारणातीलच प्रश्नांना प्राधान्य दिलं असं नाही, तर कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेऊन ते पाठीशी उभे राहत. हे आपले कार्यकर्ते, हे दुसऱ्यांचे असा तर भाग भाईंच्या बाबतीत नव्हताच. चळवळीतल्या सर्वच कार्यकर्त्यांची काळजी भाईंनी वाहिली. अगदी ते शीतल सचिन असू देत की आमच्यासारखे कार्यकर्ते असू देत. एकदा प्रधान सरांनी गांधीजींची एक आठवण सांगितली होती की, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भूमिगत अरुणा असफ अली गांधीजींना भेटायला आल्या होत्या आणि त्या सुरक्षितपणे परत गेल्याचे कळल्यावर मगच रात्री उशिरापर्यंत निरोपाची वाट बघत असलेले गांधीजी झोपायला गेले. मला भाईंच्या बाबतीत ती आठवण खूपदा व्हायची. त्यांना फोन केल्यावर 'काय रझिया!' हे खूप आपुलकीच्या स्वरात ते विचारायचे. ते गेल्यानंतर आता हे वाक्य आपल्याला परत कधी ऐकायला मिळणार नाही या जाणिवेने मनात दु:ख दाटून येते.

सर्वच चळवळींवर आणि माणसांवर प्रेम करणारे भाई शेवटच्या काळात 'सावध ऐका पुढल्या हाका' हे सांगतांना आता आपण एकत्र येऊन मुकाबल्यासाठी सज्ज व्हावे असं आवाहन करत होते. भाईंनी भारताची स्वातंत्र्य चळवळ आणि आणीबाणी विरोधातली दुसरी स्वातंत्र्य चळवळ, यासाठी लढा दिला होता पण यावेळी भारतातली आणि जगातली परिस्थिती याबाबत प्रचंड अस्वस्थता त्यांच्या मनात होती आणि त्यासाठी याही वयात ते वारंवार रस्त्यावर उतरत होते. भाई तीच अस्वस्थता आपल्याला देऊन गेले आहेत. लढल्याशिवाय आता पर्याय नाही. सत्तरच्या दशकातील युवा चळवळीचे गीत आठवते आहे 'इस बुरे वक्त में भारत को संभलना होगा, आज इस राज का अंदाज बदलना होगा.' भाईंनी दिलेली प्रेरणा हीच आहे असं मला वाटतं. तीच त्यांना आदरांजली ठरेल. ***



पुण्याच्या महापौरपदी भाई.



पुणे महानगरपालिकेत,महापौर भाई वैद्य,
मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, मंत्री शरद पवार.



मेधा पाटकरांबरोबरच्या एका प्रसंगी भाई.



जयप्रकाश नारायण यांच्या स्वागतासाठी पुणे रेल्वे स्थानकावर महापौर भाई आणि उपमहापौर नामदेवराव सूर्यवंशी



भारत यात्रा केंद्रासाठी परंदवडी येथे घेतलेल्या जागेची पाहणी करताना भाई व चंद्रशेखर.



राष्ट्र सेवादल दस्ता नायक प्रशिक्षण शिबिर, बिहार.



समाजवादी जनपरिषदेच्या पाणी हक्क परिषदेच्या मंचावरून भाषण करताना भाई.



सोशालिस्ट पार्टी (इंडिया)च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्यानिमित्त आरोग्य सेनेतर्फे भाईंचा सत्कार.



मधू दंडवत्यांसमावेत एका कार्यक्रमात.




महापौर भाई वैद्य, आचार्य अत्रे पुतळा अनावरण सोहळ्यात. सोबत पु.ल. देशपांडे, अत्रे यांच्या कन्या व कवयित्री शिरीष पै, ग.दी. माडगूळकर.



माजी राष्ट्रपती के आर नारायण आणि मधू दंडवते, राष्ट्र सेवादलाच्या हीरक महोत्सवावेळी.



बंधुता साहित्य संमेलनपूर्व मिरवणूक.



जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सातव
यांच्याबरोबर मैदानात उतरताना भाई.



युरोप दौऱ्यावरून परतलेले भाई विमानतळावर.



भीमसेन जोशींबरोबर भाई.



भाई आणि नलिनीताईंचा विवाह सोहळा.
उपस्थितात एसएम देखील दिसत आहेत.



डॉ. अभिजित वैद्य व डॉ. गीतांजली यांच्या विवाह प्रसंगी, चंद्रशेखर, एसएम जोशी, नानासाहेब गोरे, भाई आणि नलिनीताई.



भाईंच्या षष्ठीपूर्ती कार्यक्रमात,
भाईंबरोबर मोहन धारिया, चंद्रशेखर,
अंकुश काकडे व इतर



किशोर पवार आणि डॉ. अभिजित
वैद्यांबरोबरच्या एका अनौपचारिक क्षणी
भाई त्यांच्या ८०व्या वर्षाच्या वाढदिवशी.



भाईंच्या अमृत महोत्सवात भाईंबरोबर मंचावर
मधू दंडवते,बापूसाहेब काळदाते,
चंद्रशेखर, नलिनी वैद्य, सुभाष वारे,
बाबा आढाव व इतर साथी.



भाईंचे वडील व मातोश्री-
श्री. अण्णासाहेब व पार्वतीबाई.



नलिनीताई व भाई कन्येच्या विवाहप्रसंगी.
डॉ. प्रताप रावळ (जावई), डॉ. प्राची (कन्या),
डॉ. गीतांजली (शहा) (सून)
डॉ. अभिजित (चिरंजीव).



भाई आपल्या कुटुंबीयांसमवेत-
डावीकडून नात डॉ. सलिना,नातू सोहिल,
चिरंजीव डॉ. अभिजित आणि
सून डॉ. गीतांजली.

पोरकेपणाचा अर्थ उमजला - डॉ. शमशुदिन तांबोळी

राष्ट्र सेवादलात मुस्लीम सत्यशोधक मंडळास कामासाठी जागा देण्यात आली याचा सर्वाधिक आनंद भाईंना झाला. या राष्ट्र सेवादलातील मंडळाच्या कार्यालयात २९ मार्चला, गुरुवारी आम्ही कार्यकर्ते जमलो होतो. तेव्हा संजय पवार म्हणाले भाईंना पूना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलंय. त्यांची तब्येत बरी नाही. असा डॉ. अभिजित वैद्य यांचा निरोप आलाय तेवढ्यात ॲड. संतोष म्हस्के तेथेच भेटले आणि त्यांनी या बातमीला दुजोरा दिला. या पूर्वी भाई बाथरूममध्ये पडले होते, त्यांच्या कपाळाला दुखापत झाली होती. ही बातमी डॉक्टरांकडूनच समजली होती. तेव्हा ते म्हणाले होते. आता बरं आहे. काळजी करण्याजोगे काही नाही पण हे कार्यकर्त्यांना आत्ताच सांगू नका. भाईंना विश्रांती हवी आहे. पण या वेळी डॉक्टरांनीच निरोप दिलाय म्हटल्यावर त्यातील गांभीर्य लक्षात आले. आम्ही पूना हॉस्पिटल गाठलं... तेथे कार्यकर्ते जमले होते. डॉक्टर अगदी शांतपणे सर्वांना समजावून सांगत होते. डॉ. राम ताकवले सर भाईंना भेटून आले. ते म्हणाले भाईंशी काय बोलावं समजत नव्हते. भाईंनीच मास्क काढायला सांगितला. डॉ. ताकवले भाईंशी बोलत होते... भाई आपलं आयुष्य मस्त गेलं नाही का? हे बदललेलं जग आपल्याला बघता आलं. समाज किती पुढे गेलाय... पण आपल्याला समाजवाद अजून आणता आला नाही बघ... पण हा समाजवाद लवकरच येणार आहे बरे का... वगैरे. ताकवले सरांना भाईंचा श्वास माहीत होता. या दोघांना एकमेकांबद्दल फार आदर होता. त्यांची मैत्री होती. तसे भाई सर्वांचेच मित्र होते. कार्यकर्त्यांबरोबरच आपल्या कुटुंबीयांचेही. भाई कोणाशीही कधीही अंतर ठेवून वागले नाहीत. सर्वांना वाटत राहिले भाई हे आपले मित्र, मार्गदर्शक आणि आदर्श आहेत. भाईंबद्दलचा आदरभाव सर्वच लहान थोरांना कायम वाटत राहिला आहे. मला आठवतं; अमीर शेख सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या घरी निवडक मित्रांना रात्री भोजनासाठी निमंत्रित केलं होतं. भाई पोचण्यापूर्वी निळूभाऊ फुले आणि मित्र मंडळी जमली होती. भाई येणार असल्यामुळे निळूभाऊंनी सिगरेट पेटवली नाही... भाईंबद्दलचा असा आदर ताहेरभाई पुनावाला यांच्याही घरी जाणवला. ताहेरभाई आजारी असल्याचे; ते आता बाहेर पडत नाहीत हे समजल्यानंतर भाई म्हणाले शमू तुला वेळ असेल तेव्हा आपण ताहेरभाईंकडे जाऊन येऊ. दोन दिवसात आम्ही जाऊन आलो. ताहेरभाई आणि भाई यांची मैत्री, मोकळ्यामनाने झालेले वादप्रतिवाद मला ऐकायला मिळाले आणि खरी मैत्री काय असते याची मला अनौपचारिक शिकवण झाली. मी हमीद दलवाईंवर पीएचडी करीत असताना भाई हेच माझे खरे मार्गदर्शक ठरले. ते म्हणाले होते, हमीदशी माझी ओळख होणे आणि ओळखीचे मैत्रीत रूपांतर होणे ही माझ्या जीवनातील विशेष उपलब्धी आहे. हमीदभाई नंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी भाईंचे मार्गदर्शन, समर्थन आणि पाठबळ ही विशेष उपलब्धी ठरली. मेहरुन्निसा दलवाई भाभींना भाईंबद्दल विशेष विश्वास आणि आदर होता. भाईंनी दलवाई भाभींना सांगितलं होतं, तू पुण्यात जेव्हा जेव्हा येशील तेव्हा तू दुपारच्या जेवणासाठी माझ्याकडे यायचं. भाभी भाईंकडे जायच्या त्यांच्याशी गप्पा मारायच्या, मार्गदर्शन घ्यायच्या. भाईंनी दिलेले हे अनुभव अनेकांच्या स्मरणात कायम राहणारे आहेत.

दहा महिन्यांच्या अंतरात अशा काही घटना घडणार आहेत हे कल्पनेपलीकडचे होते. ८ जून रोजी भाभी गेल्या, ३१ जुलै रोजी ताहेरभाई गेले आणि २ एप्रिलला भाई. या घटना आम्हा कार्यकर्त्यांसाठी क्लेशदायक आहेत. मोठ्याप्रमाणात नुकसान करणाऱ्या आहेत आणि पोरकेपणाची जाणीव देणाऱ्याही...

तरलता, तर्कशुध्दतता, संवेदनशीलता आणि स्थितप्रज्ञता यांची गुंफण. ही गुणवैशिष्ट्ये एकत्रित असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे भाई! समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही या मूल्यांसाठी भाईंनी आपली वाणी आणि शरीर झिजवले. भाई विपुल लेखन करू शकले नाहीत कारण तसा वेळ त्यांना मिळत नव्हता. असे असले तरी भाईंनी अनेक कार्यकर्ते, लेखक यांच्या पुस्तकांना ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत, त्याने त्या त्या पुस्तकांची उंची तर

वाढतेच, शिवाय त्या त्या पुस्तकांतील अपुरेपणा देखील भरून निघतो. अनेकवेळा पुस्तकांपेक्षा या प्रस्तावना अधिक वैचारिकतेने समृद्ध आहेत. त्या विषयाला न्याय देणाऱ्या आहेत. हमीद दलवाई यांचे अलीकडे प्रकाशीत झालेले पुस्तक, राष्ट्रीय एकात्मता व भारतीय मुसलमान दलवाईंवरील अनेक आक्षेपांना उत्तर देणारे आहे. हे पुस्तक उपलब्ध झाले पाहिजे यांसाठी भाईंनी विशेष प्रयत्न केले. या पुस्तकासाठी भाईंनी १३ पृष्ठांची प्रस्तावना लिहिली आहे. दलवाईंनंतर २५ वर्षांनी प्रकाशीत झालेल्या या पुस्तकाला खऱ्या अर्थाने न्याय दिला तो भाईंनी. मी मौलाना अबूल कलाम आझादांवर पुस्तक संपादन करीत असताना भाईंकडे प्रस्तावनेसाठी गेलो. भाईंनी माझी विनंती तत्काळ स्वीकारली आणि आझाद कलामला ९ पानांची प्रस्तावना लिहिली. आझाद कलामांबद्दलचा केवळ आदरच नाही तर त्यांचे व्यक्तिमत्त्व योगदान आणि आक्षेपांचे खंडन भाईंनी ज्या पद्धतीने केले ती वाचून त्यांचा अचाट अभ्यास, मांडणी आणि काळसुसंगततेचे दर्शन या प्रस्तावनेतून होते. असेच माझ्या मुस्लीम समाज – व्यक्ती विचार साहित्य या पुस्तकासही त्यांची प्रस्तावना लाभली आहे. माझ्यासाठी जे भाईंनी केलं तेच अनेकांसाठी केलं. मला डॉ. अभिजित वैद्य यांचे विशेष आभार यासाठी मानायचे आहेत की, त्यांनी भाईंनी लिहिलेल्या प्रस्तावनेचे एक स्वतंत्र पुस्तक प्रकाशीत केले आहे आणि राहिलेल्या प्रस्तावनेचे पुस्तक तयार करणार आहेत.

अनेकांना याची कल्पना आहेच की, मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना भाईंच्या घरात झाली. त्यांनी राष्ट्र सेवादल व अन्य निमित्ताने संपर्कात असणाऱ्या मुस्लीम कार्यकर्त्यांना दलवाईंची ओळख करून दिली आणि महत्त्व ही सांगितले.

बाबुमियाँ बँडवाले हे मंडळाचे अध्यक्ष होते. भाईंना स्वातंत्र्य सैनिक बाबुमियाँ बँडवाले यांच्याबद्दल नितांत प्रेम आणि आदर होता. मंडळाच्या स्थापनेनंतर भारत पाकिस्तान युद्ध झाले तेव्हा बाबुमियाँ बँडवाले यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत रायगडाला जेव्हा जाग येते हे नाटक बसवले आणि महाराष्ट्रभर त्याचे प्रयोग केले. या नाट्य प्रयोगातून जो निधी जमा झाला तो बँडवाले यांनी पाकिस्तानशी युद्धात जे भारतीय सैनिक कामी आले त्यांच्या कुटुंबीयांना देण्यासाठी भारतीय संरक्षण मंत्रालयाकडे दिला. हे नाटक पाहण्यासाठी भाई वैद्य स्वतः हमीद दलवाईंसोबत श्रीगोंद्याला गेले होते.

दलवाईंच्या निधनानंतर पुणे महानगर पालिकेतील काही नगरसेवकांनी पेढे वाटले होते. याच पुणे महानगरपालिकेत दलवाईंच्या मृत्यूबद्दल भाईंनी शोकप्रस्ताव मांडला व विरोधकांची बोलती बंद केली. हमीद दलवाईंचा विचार विस्तार झाला पाहिजे दलवाईंच्या नावाने पुरस्कार दिला गेला पाहिजे म्हणून भाईंनी आपल्या पेन्शनच्या रकमेतून मोठी रक्कम ठेव स्वरूपात भाभींकडे दिली होती. हा अचाट विश्मयात्मक ध्येयवाद अन्य कोणाकडे अपवादात्मक दिसेल. मुस्लीम जगतात काय घडतंय, आयसिस, तालिबानचा धोका कसा आहे, त्याची दखल भाईंनी घेऊन आम्हांला मार्गदर्शन केले. क्लॅशेस ऑफ सिव्हलायझेशन या पुस्तकात काय मांडणी केली आहे...या बद्दलचं अचूक तपशील भाईंनी शिकवला.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ घेत असलेली भूमिका योग्य की अयोग्य हे तपासण्याची हक्काची जागा म्हणजे भाई! 'हमीद दलवाई स्टडी सर्कल'ची स्थापना भाईंच्या हस्ते झाली. अलीकडच्या काळात तलाक प्रश्न ऐरणीवर होता. न्यायालयाने निर्णय दिला आणि शासनाने कायदा करावा अशी सूचना केली. शासन कायदा आणणार आहे हे समजल्यानंतर आम्ही पंतप्रधान व इतर पक्षांच्या नेत्यांना भेटून निवेदन देण्याचे ठरवले. त्या निवेदनाचा मसुदा घेऊन भाईंकडे गेलो. भाईंना विचारले, आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटून निवेदन देऊ इच्छितो. तुम्हांला काय वाटते? भाई म्हणाले, जरूर भेटले पाहिजे, आम्हांला काय अपेक्षित आहे हे त्यांना सांगितलं पाहिजे. तुम्ही भारताच्या पंतप्रधानांना भेटत आहात. पाकिस्तानच्या नाही. तुम्ही नरेंद्र मोदींना भेटत नाहीत. देशाच्या पंतप्रधानांना भेटताय. या वेळी त्यांनी निवेदनाचा मसुदा वाचून त्यात काही दुरुस्त्या सुचवल्या. दिल्लीला गेल्यावर न्या. राजेंद्र सच्चर यांना भेटण्याचा सल्ला दिला त्यांचा फोन नंबर दिला. आम्ही दिल्लीला गेल्यावर सच्चर साहेबांना फोन केला. भाईंनी आपणास भेटायला सांगितल्याचा निरोप देताच त्यांना आनंद झाला. त्यांनी आमचे स्वागत केले, पाहुणचार केला. मसुद्यावर चर्चा केली. न्या.सच्चर यांना भाईंबद्दल असणाऱ्या नितांत आदराची अनुभूती घेतली. पंतप्रधानांना भेटण्याच्या आमच्या निर्णयाला अनेकांनी विरोध केला. तेव्हा भाई आमच्या पाठीशी होते. तेवढी शक्ती आम्हांला

पुरेशी होती. अलीकडेच मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा वर्धापन दिन होता. 'मुस्लीम सत्यशोधक पत्रिके'चा विशेषांक आम्ही काढणार होतो. यात भाई व बाबा आढाव यांच्या मुलाखती असाव्यात असे ठरले. त्या प्रमाणे भाईंना फोन केला आणि समीर - साजिदला पाठवले. ही दीर्घ मुलाखत या पत्रिकेत प्रसिद्ध झाली. २१ मार्च रोजी मंडळाच्या वर्धापनदिनाचा कार्यक्रम होता. या दिवशी सकाळी भाईंचा फोन आला. मला या कार्यक्रमाला येण्याची इच्छा होती पण आजारी आहे. येता येणार नाही. आम्हांला यावेळी भाईंच्या आजाराची कल्पना नव्हती. त्यांच्या या झुंजीची कल्पना नव्हती. पण भाईंनी आमचा वर्धापनदिनाचा कार्यक्रम लक्षात ठेवला होता. एका आठवड्यातच पुढे हे घडणार आहे याची आम्हांला कल्पना नव्हती. आम्ही भाईंना बोलावले किंवा भाईंकडे जायचे ठरवले तेव्हा भाईंनी आम्हांला साथ दिली. त्यांच्या घरी त्यांनी थरथरत्या हातांनी बनवलेला चहा घेताना आपण किती भाग्यवान आहोत याची जाणीव होत होती. पण भाईंसाठी हे अंगभूत वैशिष्ट्ये होते. हा अनुभव अनेकांचा आहे.

माझ्याप्रमाणेच इतरही कार्यकर्त्यांना आलेला अनुभव म्हणजे भाईंबरोबरचा प्रवास. मी भाईंसोबत मुंबई, चिपळूण , नगर, बीड, नांदेड, गोवा अशा अनेक ठिकाणांचा प्रवास केला. या प्रवास काळात अनुभवलेले भाई, अनेकांसाठी जीवनातील उपलब्धी ठरले आहे. भाईंचे वाचन, विश्लेषण, स्मरणशक्ती, त्या त्या विषयातील ज्ञान, विविध व्यक्ती, गाव, संघटना या बद्दलचा तपशील ते सांगायचे. भाईंची विनोदबुद्धी फारच मार्मिक. विनोदातूनही ते अंतर्मुख करायला भाग पाडायचे. इतरांच्या मर्यादा, उणिवा समजून घेऊन त्यांच्यावर प्रेम करणारे भाई, अनेकांना सामावून घेत असत. भाई म्हणजे खरोखरच चालता बोलता ज्ञानकोश... आणि परिवर्तनवादी विचाराचे व्याकरण उमजलेले नेते व कार्यकर्ते होते. समाजवादी अध्यापक सभेतील मासिक निबंध वाचनाच्या वेळी त्यांची उपस्थिती त्या त्या विषयाला न्याय देणारी व वेगळा दृष्टिकोन देणारी असत. इतरांच्या प्रतिक्रिया ऐकल्यानंतर ते प्रत्येकाच्या प्रतिक्रियेबद्दल टिपणी देऊन वस्तुनिषटपणा कसा असावा हे सूक्ष्मपणे नोंदवत असत. खऱ्या अर्थाने ते लोकशिक्षक होते. फुले, शाहू आंबेडकर यांच्या विचारांचे वाहक होते.

आमच्या प्रेमापोटी, आदरापोटी आम्ही भाईंना उसंत दिली नाही. त्यांचा, त्यांच्या ज्ञानाचा, मार्गदर्शनाचा लाभ घेण्यासाठी त्यांना अजाणतेपणे त्रास दिला. तो त्रास भाईंनी आनंदाने स्वीकारला. भाईंना व्यक्तिगत आयुष्यच राहिले नव्हते. तरीही काही छंद भाईंनी जपले होते. वाचन, संगीत हे त्यापैकीच. मला पंचवीस/ तीस वर्षांपूर्वी, भाईंबरोबर कॅम्पातल्या कॅपिटल थिअटरमध्ये नसिरुद्दिन शाह यांचा खंडहर हा चित्रपट पाहण्याची संधी मिळाली. सिनेमा झाल्यानंतर त्या बद्दलचे बारकावे त्यांनी सांगितले. आपण पाहिलेला सिनेमा आणि भाईंनी पाहिलेला तोच सिनेमा किती वेगळा होता. हे नंतर समजले.

आमच्यावर खरे उपकार आहेत ते डॉ. अभिजित वैद्य आणि कुटुंबीयांचे. त्यांनी भाईंची काळजी घेतलीच शिवाय भाईंचा भला मोठा सामाजिक- राजकीय परिवार सांभाळला. भाई हे एक व्यक्ती नव्हतेच ते स्वतः एक चळवळ होते. त्यांचा परीघ विस्तीर्ण होता. या परिघाला खरचटू नये याची काळजी या कुटुंबाने घेतली. भाईंच्या आजारपणाची गांभिर्यता लक्षात येऊन सुध्दा डॉक्टरांनी ही परिस्थिती ज्या धैर्याने सांभाळली ते नावाजण्यासारखे आहे. भाई आयसीयुमधे असताना डॉ. अभिजित आपल्या इतर रुग्णांच्या तपासणीला जाताना पाहिले. भाई जाण्यापूर्वीचा एक महिना डॉक्टरांनी कसा सांभाळला असेल याची कल्पना करता येणार नाही. अंतिम दिवशी तर ते अनेक कार्यकर्त्यांना धीर देत होते. ही अचाट शक्ती येते कुठून? भाईंची इहवादी मूल्य, विवेकवाद हा डॉक्टरांनी जपला आहे तो त्यांच्यात पूर्णतः उतरला आहे. हा भाईंचा वैचारिक वारसा मूर्तरुपात अभिजितकडे आहे. याचा आम्हांला सार्थ अभिमान वाटतो. यातील काही वैशिष्ट्ये आम्हीही आचरणातून नक्कीच दाखवू.

भाईंना आपल्या कुटुंबीयांबद्दल प्रेम आणि आदर होता. मी भाईंना एका कार्यक्रमासाठी घेऊन गेलो होतो. कार्यक्रम संपल्यानंतर भाई म्हणाले, तू मला फक्त स्वारगेटपर्यंत सोड. मी तेथून रिक्षाने जाईन, तुला उलट्या दिशेला जायचय. मला फक्त एक मदत कर. मला येथे कुठे खेळण्याचं दुकान असेल तर पहायचय...सोहीलला नाटकाची तयारी करायची आहे आणि त्याला खेळण्यातला पिस्तूल हवय. आम्ही पाच सात दुकाने शोधली पण हवे तसे पिस्तूल मिळाले नाही. हे पिस्तूल मी घेऊन येतो असे मी सोहीलला सांगितले पण मला तसेच पिस्तूल न घेता जावे

लागणार याचे दुख त्यांना होत होते. गृहराज्यमंत्री पद भूषवणारे भाई खेळण्यातले पिस्तूल मिळाला नाही म्हणून दुखी: झाले. हा अनुभव मानवातील संवेदनशीलता किती उंचीची असते हे दाखवणारा व ती संवेदनशीलता भाईंच्या व्यक्तिमत्त्वात कशी शोभते हे दाखवते.

डॉ. रामचंद्र गुहा यांनी 'मेकर्स ऑफ मॉडर्न इंडिया' हे पुस्तक लिहलय. त्यात त्यांनी हमीद दलवाईंचा समावेश केलाय. ही बातमी देताना, जो आनंद मी भाईंच्या आवाजात पाहिला तो शब्दात मांडता येणारा नाही. हे पुस्तक मला हवं आहे. पुण्यातील डेक्कनवर पॉप्युलर किंवा इंटरनॅशनलमध्ये मिळेल. माझ्यासाठी हे पुस्तक विकत घेऊन ये. मी तुला पैसे देतो. मी ते पुस्तक घेतले. भाईंना दिले. मी म्हणालो, भाई हे पुस्तक माझ्याकडून तुम्हाला भेट द्यायचय. भाई म्हणाले, हे पुस्तक विकत घेण्याचा आनंद मला हवाय तो आनंद तू का हिरावून घेतोस? माझ्याकडे उत्तरासाठी शब्द नव्हते. पण योगायोगाने भाईंकडे मला देण्यासाठी सुट्टे पैसे नव्हते. याचा मला आनंद झाला. पण भाई त्यांच्या खोलीत गेले आणि चेकबुक आणले. त्यावर रक्कम न लिहिता सही करून तो कोरा धनादेश मला दिला. हा धनादेश मी बँकेत टाकला नाही. तो कोरा चेक अजूनही जपून ठेवलाय. भाईंची आठवण म्हणून.

४ एप्रिल रोजी राष्ट्र सेवादलाचे निळू फुले सांस्कृतिक खुले सभागृहात भाईंना आदरांजली वाहण्यासाठी गच्च भरले होते. या दिवशी सकाळी मा. पन्नालाल सुराणा यांचा फोन आला. नळदूर्गला आयोजित कार्यक्रमात हिंदू मुस्लीम ऐक्य या विषयावर मी शिबिरात बोलण्यासाठी हा फोन होता. मी विचारले, भाऊ आज भाईंची आदरांजली सभा आहे तुम्ही येणार ना? भाऊ म्हणाले, मी मध्यंतरी भाई आजारी असताना भेटून आलो. डॉक्टर म्हणाले तुमचंही वय झालय आता हा प्रवासाचा त्रास घेऊ नका. पण हेच भाऊ प्रवास करून नळदूर्गला श्रमछावणी शिबिराची तयारी करायला त्याच दिवशी गेले होते. भाई - भाऊ यांनी समता - समाजवादी चळवळीला जीवन ध्येय म्हणून बांधून घेतले होते. माझ्यादृष्टीने भाऊंनी भाईंना केलेलं हे अनोखे अभिवादन होते.

डॉ. अभिजित वैद्य यांचे शालेय वर्ग शिक्षक आणि साहित्यिक डॉ. न. म. जोशी यांनी आदरांजली सभेत भाईंद्दल आठवण सांगितली. भाईंचा समतावादी आणि वंचितांच्या समान संधीवादी अनुभव सांगितला. त्यांनी कविवर्य बा. भ. बोरकर यांची देखणे ते चेहरे... या कवितेच्या काही पंक्ती ऐकवून त्या भाईंना कशा लागू पडतात हे दाखवले. पण जोशी सरांनी या कवितेचे शेवटचे कडवे ऐकवला नव्हते, जे या प्रसंगी जास्त चपखल होता. ते असे...

देखणा देहांत तो ,जो सागरी सूर्यास्तास,
अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा.

भाईंचा देहांत असाच देखणा आहे. आज फॅसिस्ट मानसिकता, जागतिकीकरण, जमातवाद, अराजकता, विषमता वाढत आहे. संविधानात्मक मूल्यांची हेटाळणी होताना दिसत आहे. भारतात आणि जगात दहशतवाद वाढत आहे. एकूणच मानवतावादासमोर मोठे संकट आणि आव्हान उभे आहे. भाई शेवटपर्यंत या विषयावर चिंतन करीत होते. ती चिंता व्यक्त करीत होते. या विषयावर बोलत होते. कार्यकर्त्यांना सावध करीत होते. त्यांचे हे विचार आमचा अग्नी आहे. येऊ घातलेल्या अंधारात उजेड दाखवणारा आहे. आशावाद देणारा आहे अन् अराजकता संपवणारा आहे. म्हणून त्यांचा देहांत मानवासाठी वरदान आहे. देखणा आहे. भाई आजच्या स्थितीत आपल्यासोबत असायला हवे होते पण आपण हतबल होण्याचे कारण नाही कारण भाईंचे विचार आपल्यासोबत आहेत.

भाईंच्या अंत्यविधी नंतर मी घरी आलो. तेव्हा माझे पोस्ट बॉक्स पाहिले. त्यात एक पोस्टाने आलेले पाकीट पाहिले. हे पाकीट भाईंनीच पाठवले होते. त्यात त्यांनी बदललेल्या घराचा पत्ता पाठवला होता. कांचन गल्लीतला...

***

पुरोगामी जनगर्जना

वार्षिक वर्गणी तसेच जाहिराती संबंधी चौकशी व व्यवहारासाठी
संपर्क- रमाकांत सोनवणी : मोबाईल- ९५०३७५३०४५

सूर्य पाहिलेला माणूस! – शरद जावडेकर

अनुकूल परिस्थितीत एखाद्या विचाराची पताका खांद्यावर घेणे सोपे असते व असे अनेक असतात; पण प्रतिकूल परिस्थितीत विचाराच्या निष्ठेची खरी परीक्षा असते ! लोकांच्या उपेक्षेची, चेष्टेची पर्वा न करता, त्याही परिस्थितीत आपला विचार जनतेला पटवून देण्याची धडपड करणारे फार थोडे असतात, भाई त्यातले एक होते भाई द्रष्टे होते ! द्रष्टा माणूस काळाच्या, वर्तमानाच्या पुढे बघतो! त्यामुळे प्रतिकूल वर्तमानात भाई अढळपणे उभे राहिले. म्हणूनच भाईंना 'सूर्य पाहिलेला माणूस' असेच म्हणावे लागेल.

१९७७ ला आणीबाणीनंतर पुलोद व जनता पक्षाचा प्रयोग केला गेला; परंतु अंतर्गत मतभेदामुळे हा प्रयोग अयशस्वी झाला व त्याचे खापर मात्र प्रसार माध्यमांनी व जनसंघाने समाजवाद्यांवर फोडले. राजकीय मुत्सद्देगिरीचा अभाव, बोलघेवडेपणा व व्यक्तिवाद यामुळे समाजवादी चळवळ व नेते बदनाम झाले व त्यांना बदनाम केले गेले.

सन १९८०-८५ च्या काळात साम्यवादाचा मोठा गड USSR ढासळला ! गोर्बाचेव्ह यांच्या 'गाल्सनोस्त व पेरेस्त्रोईका'मुळे साम्यवादाच्या विचारासमोरच प्रश्नचिन्ह उभे राहिले गेले. चीनने आर्थिक उदारीकरणाचे धोरण ८० च्या दशकात स्वीकारले. स्वत:ला साम्यवादी, समाजवादी म्हणविणाऱ्या देशांतच प्रचंड उलथापालथ होत होती. या पार्श्वभूमीवर अमेरिका, युरोपातल्या भांडवलशाही देशांनी 'समाजवाद संपला', 'भांडवलशाहीला पर्याय नाही' अशी हाकाटी देण्यास सुरुवात केली व जागतिकीकरणाचे वारे जगभर विना अडथळा वाहू लागले! End of Ideology, End of History, The Third Wave यांसारख्या संकल्पनांनी उच्च मध्यमवर्गीय व प्रसारमाध्यमांच्या मनाचा ताबाच घेतला होता.

जनता पक्षाच्या प्रयोगामुळे समाजवादी आधीच बदनामच झाले होते व जागतिक आर्थिक बदलामुळे साम्यवादाच्या वैचारिक अधिष्ठानाला आव्हान मिळाले होते. त्यामुळे ८० व ९०च्या दशकात समाजवाद 'विरोधी' वातावरण भारतात व जगात तयार झाले होते. समाजवादी चेष्टेचा विषय झाले होते. भले भले स्वत:ला समाजवादी म्हणवून घेण्याचे टाळत होते. पूर्वी स्वत:ला समाजवादी म्हणवून घेणारे अर्थशास्त्राचे अध्यापक नेते जागतिकीकरणाची भलावण करू लागले होते! या संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीत भाई भक्कमपणे उभे होते, ते म्हणत होते, 'होय, मी समाजवादी आहे व जागतिकीकरणाचे धोरण धोकादायक आहे!'

एका बाजूला ८०-९०च्या दशकातील नव्या आर्थिक सुधारणांमुळे मध्यमवर्ग, उच्च मध्यमवर्ग यांना 'करियरच्या' नव्या संधी प्राप्त होत होत्या. दुसरीकडे 'चंगळवादाची' संधी मध्यमवर्गीयांना खुणावत होती. त्यामुळे बोलका उच्च मध्यमवर्ग खा-उ-जा च्या प्रेमात पडला होता. प्रसार माध्यमे, कम्युनिस्ट व समाजवादी काही गट सोडून सर्वच राजकीय पक्ष, खा-उ-जा चे समर्थक झाले होते. अशा संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीत एकाकीपणे भाई सांगत होते, 'ही नवी धोरणे बेकारी व विषमता वाढवतील, शेतीवर अरिष्ट येईल, शिक्षण, आरोग्य यांच्या समस्या गंभीर होतील, कल्याणकारी राज्य कल्पना मोडीत निघेल, जीवनाचेच बाजारीकरण होईल.'

२५ वर्षांपूर्वी भाई जे सांगत होते ते आत्ताचे वास्तव आहे व याच समस्यांनी भारतीय समाजाला आज घेरले आहे. शेतकऱ्यांचे 'मोर्चे व आत्महत्या' भाईंच्या द्रष्टेपणाचे द्योतक आहे! समाजवादावर अविचल निष्ठा हेच भाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे वैशिष्ट्य होते.

जागतिकीकरणाचे धोरण १९८५ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान असताना सौम्य प्रमाणात भारतात आले व मनमोहनसिंग अर्थमंत्री असताना १९९० मध्ये आर्थिक धोरणांची दिशाच बदलली गेली. त्यानंतर जवळजवळ १०-१५ वर्षांनंतर २०००च्या दशकात जगातील अनेक देशांत जागतिकीकरणाच्या विरोधात कामगार, विद्यार्थी, शेतकरी, मध्यमवर्ग उघडपणे रस्त्यावर येऊ लागला व भांडवलशाही विरोधी आवाज उठवू लागला आहे.

त्याला जोडून युरोप व अमेरिका येथील अनेक

अर्थशास्त्राच्या अभ्यासकांनी जागतिकीकरण विरोधी भूमिका घेतल्या. IMFच्या माजी संचालक Chrirtin Legarde जागतिक बँकेचे माजी सल्लागार Joseph Stiglitz, Thomas Piketty, Anthony Atkinson यांनी जागतिकीकरणाच्या धोरणाबद्दल नापसंती व्यक्त केली. अमेरिकेत बर्नी सँडर्स यांनी लोकशाही समाजवादाची उघड भूमिका घेतली. तर इंग्लंडमध्ये जेरीमी कॉर्बिन यांनीही समाजवादाचा नारा दिला. हे सर्व २०००च्या पहिल्या व दुसऱ्या दशकात घडत होते.

पण भाईंनी हा धोका ९०च्या दशकातच ओळखला होता. हे धोके भाई प्रत्येक ठिकाणी तेव्हा मांडत होते; पण भाईंची उपेक्षा झाली. समाजवादाला कालबाह्य मानले गेले; पण आज जगात अनेक देशांत जनतेचा जागतिकीकरणाला विरोध संघटित होत आहे! भाईंचा द्रष्टेपणा यात जास्त उठून दिसतो. अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेची स्थापना करताना भाईंनी 'समाजवादी' हा शब्द आग्रहाने नावात अंतर्भूत केला होता. जागतिकीकरणाच्या परिप्रेक्षात, नव्या आर्थिक व राजकीय बदलाच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या प्रश्नाची मांडणी करणारे भाई हे महाराष्ट्रातील व भारतातील पहिले कृतिशील विचारवंत होते असे म्हणायला हरकत नाही. 'के. जी. ते पी. जी. सर्व शिक्षण समान, मोफत व गुणवत्तापूर्ण मिळाले पाहिजे' हा भाईंचा नारा मार्क्सच्या 'जागतिक कामगारांनो एक व्हा!' यासारखा क्रांतिकारक आहे.

संपूर्ण मोफत शिक्षण ही संकल्पना सुरुवातीला अनेकांना पटत नव्हती! अशक्यप्राय वाटत होती! भाई आपल्या भूमिकेवर ठाम होते! फार उशिरा All India Forum For Right to Educationचे प्रवर्तक अनिल सद्गोपाल यांनी भाईंचा संपूर्ण 'मोफत शिक्षणाचा' मुद्दा कृतज्ञतापूर्वक स्वीकारला. 'मोफत, समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे चार शब्द फ्रेंच राज्यक्रांतीतील 'स्वातंत्र्य, समता व बंधुता' या शब्दांसारखे भारावून टाकणारे आहेत.

शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संघटनांपेक्षा अ. भा. समाजवादी अध्यापक सभेचे वेगळेपण भाई नेमकेपणाने सांगायचे की, 'आपली चळवळ बहुजनांच्या शिक्षणहक्काची आहे, शिक्षकांच्या व सेवकांच्या पगारवाढ, नोकरभरतीसाठी नाही! हे प्रश्न महत्त्वाचे आहेत व ते प्रश्न सोडविणाऱ्या अनेक संघटनाही आहेत. शिक्षणक्षेत्रातल्या सर्व समस्यांचे मूळ भारतातील शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या धोरणात आहे. तकलादू प्रशासकीय बदलात न जाता, शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या धोरणात बदल घडवून आणणे हे आपले ध्येय आहे.' अशी स्पष्ट मांडणी भाई करायचे. या विचाराला जनतेचा म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. याला भाई शिवाजी महाराजांचे उदाहरण द्यायचे. 'एका टप्प्यावर महाराजांनी मोगलांना सर्व किल्ले दिले होते; पण निराश न होता, पुन्हा स्वराज्याची मुहूर्तमेढ रचली. आपलेही असेच आहे!'

भाईंनी भारतातील शिक्षण चळवळीला एक क्रांतिकारक दिशा दिली हे मात्र निश्चित आहे. 'पँथर ते नक्षलवादी ऐक्य' हा भाईंनी गेले ३०-३५ वर्ष सतत सांगितलेला विचार आहे. ल.सा.वी. काढून एकत्र आले पाहिजे असा आग्रह भाई सतत धरत होते. याची यथेच्छ टिंगल टवाळी केली गेली आहे; पण आज 'मोदी'च्या रूपाने उभा राहिलेला 'फॅसिझम'चा धोका हा पुरोगामी चळवळीतील फाटाफुटीची परिणती आहे हे वास्तव आहे. रा.स्व. संघाच्या धर्मांधतेला उत्तर देण्यासाठी भाईंनी सांगितलेल्या मार्गाने जाण्याशिवाय पर्याय नसणार हेही खरेच आहे!

गांधी-आंबेडकर हे भारतीय राजकारणातील एक मोठे द्वैत आहे. गांधी-आंबेडकरांचे संघर्ष प्रचंड झाले. बाबासाहेबांनी गांधी व गांधीवादावर कठोर तर्कशुद्ध टीका केली आहे. त्यामुळे पूर्वी व आजही गांधी आपले शत्रू क्रमांक एक असे अनेकांना वाटतात! पण आज ६०-६५ वर्षांचे पाणी पुलाखालून वाहून गेल्यावर गांधी-आंबेडकर संबंधांचा तटस्थपणे विचार करणाऱ्या चळवळीची गरज आहे. म्हणून भाईंनी 'गांधी-आंबेडकर विवाद आवश्यक आहे का?' असा मुद्दा मांडून या थोर व्यक्तिमत्त्वांची विरोधी व साम्य स्थळे शोधून नव्या परिप्रेक्षात या महापुरुषांना समाजासमोर ठेवले आहे! महाराष्ट्राच्या व भारताच्या चळवळीला एक नवी दिशा देण्याचा भाईंचा हा प्रयत्न होता व या बदलाचे चित्र अलीकडेच दिसून आले आहे. बाबासाहेबांचे नातू मा. बाळासाहेब आंबेडकर यांनी

सूर्य पाहिलेला माणूस!... पान क्र. ८४ वर

संविधान-समाजवाद आणि भाई वैद्य यांचा अमर अनुबंध!

डॉ. श्रीपाल सबनीस

समाजवादाची चळवळ आणि नेते क्रमाक्रमाने काळाच्या आड जात असताना भाई वैद्य यांच्यासारखे तपस्वी व व्रतस्थ समाजवादी, डॉ. लोहिया-जयप्रकाश - एस. एम. जोशी - ना. ग. गोरे- प्रा. ग. प्र. प्रधान, यांचा समृद्ध वारसा स्वतःच्या निष्ठेने पेलुन नेत होते. त्यांच्या भूमिकेच्या रूपाने महाराष्ट्रासह बिहार-उत्तरप्रदेश - उत्तर भारतीय समाजवाद्यांसाठी समाजवादी विचार व कृतीचा आधार होता. कारण भाई वैद्य म्हणजे चालते-बोलते-लिहिते समाजवादी विद्यापीठ होते. भाईंच्या मृत्युने समाजवादी भारताचे प्रचंड नुकसान झालेय.

भाईंच्या मृत्यूनंतरची पुण्यातील श्रद्धांजली सभा सुमारे चार तास चालली. त्यातील शोकात्म भाषणे विविध जाती-धर्माच्या कार्यकर्त्यांनी-पदाधिकाऱ्यांच्या हृदयातून उमटली.

ताडीवाला रोडच्या या अत्यंत गरिब मुस्लीम दलित वस्तीच्या चौकातील श्रद्धांजली सभा विठ्ठल गायकवाड, दादासाहेब सोनवणे व लताताई राजगुरुंनी आयोजित केली. त्यात माझ्यासह डॉ. अभिजित वैद्यही सहभागी होते. रात्रीच्या वेळी शेळ्या व दारुडे सभेच्या मध्यातून ओरडत जात होते, पण रस्त्यावरच्या माणसात रमलेल्या भाईंना रस्त्याच्या साक्षीनेच श्रद्धांजली अर्पण केली गेली. झोपडपट्टीधारकांना पास देण्याचे काम-सुविधा पुरविण्याचे काम भाईंनी केल्याचे ऋण त्या सभेतील वक्ता सांगत होता. रेल्वेच्या पुलासाठी भाईंनी केलेले प्रयत्न आणि त्यांच्या गृहमंत्रीपदाच्या काळात पोलिसांची अर्धी चड्डी जाऊन फुलपँटचा घेतलेला निर्णयही वक्ते सांगत होते.

खराखुरा समाजवाद झोपडपट्टीच्या माणसाच्या कैवारातूनच उभा राहतो. या सत्याची जाणीव भाई वैद्यांच्या झोपडीच्या आत्मियतेतून सिद्ध होते.

भाई लोकशाही समाजवादाचे कट्टर कैवारी असल्याने या संदर्भात त्यांनी किंचितही तडजोड केली नाही, म्हणूनच जागतिकीकरणाच्या नव्या वरवंट्याखाली भारतीय दीन-दलित आदिवासी मजूर गरिबांचे होणारे दमन त्यांनी ओळखले आणि पोटतिडकीने अभ्यासाच्या बळावर जागतिकीकरणाचा त्यांनी तह-हयात विरोध केला.

मी धुळ्याच्या विद्यावर्धिनी महाविद्यालयाचा प्राचार्य असताना भाईंना व्याख्यानासाठी निमंत्रित केले होते. त्या भाषणातही त्यांनी सप्रमाण जागतिकीकरणाच्या नव्या संकटाचा विरोध केला होता.

साने गुरूजी प्रणित 'साधना'च्या अग्रलेखात त्याच जागतिकिकरणाबाबत समर्थन केल्याचे वाचून भाई संतापले होते व त्यांनी कडक शब्दात संपादकीयाचा पंचनामा करणारे पत्र पाठवण्याची आठवण डॉ. अभिजित वैद्य यांनीच सांगितली.

वसंत बापट व नानासाहेब गोरे यांनी भाईंच्या विरोधात भूमिका घेऊन समाजवादी वर्तनातील संघर्ष उजागर केला. उभ्या भारत देशात भाईंच्या भूमिकेला सुसंवादी समांतर भूमिका फक्त चंद्रशेखर मांडत होते.

आज जागतिकीकरणामुळे चंगळवाद व भांडवलशाही संस्कृतीचे अतिक्रमण वाढून सर्व उपेक्षित समाजघटकांची सर्वार्थाची शोकांतिका वाढत आहे. तेव्हा भाई वैद्य यांचा गरिबांचा कळवळा व त्यांच्या कैवारातील भूमिका अधिक महत्त्वाची ठरू लागते.

भाईच्या जिवंतपणी बिहारसारख्या प्रांतातील खेड्यात भरलेल्या शिबिर - परिसंवादामधून त्यांच्या नावाचा जयजयकार होत होता. आज त्यांच्या मृत्यूनंतर मी राधानगरी-कोल्हापूर भागात व्याख्यानांसाठी गेल्यावर भाईंच्या श्रद्धांजलीचे बोर्ड लागलेले पाहिले. भाईंचा समाजवाद राधानगरी-लातुर-नांदेड ते बिहारपर्यंत पोचल्याच्या साक्षी त्यांच्या वैचारिक भूमिकेचे मूल्य सिद्ध करणाऱ्या आहेत.

पुण्याच्या शोकसभेत बाबा आढाव यांनी भाईंच्या भूमिकेचे महत्त्व सांगितलेच, पण विलास वाघ यांनी भाईंच्या रूपात त्यांना 'बुद्धाचे दर्शन' घडल्याचे सांगणे; बुद्ध धम्म आणि समाजवादाचा अनुबंध सिद्ध करणारे आहे. भाईंचे कतृत्व असे बहुआयामी आहे, म्हणून तर त्यांच्या गोतावळ्यात मुस्लीम, दलित, कोळी - माळी - बौद्ध - ख्रिश्चन गोरगरिबांचा ठसा कायमचा उमटला.

भाईंचे जीवन सततच्या प्रबोधन व संघर्षाच्या रणधुमाळीत गेलेय. लोकशाही समाजवादाच्या केंद्राभोवती त्यांनी सर्व पुरोगामी चळवळींचा गोफ गुंफुन देशाच्या व विश्वाच्या कल्याणाचे स्वप्न पाहिले.

तरुण वयात स्वातंत्र्य चळवळीचा वारसा स्विकारून त्यांनी तह-हयात समाजवादी निष्ठा जपली. स्वत:चा बुद्धीवाद, व्यक्तीवाद किंवा राजकीय अंधश्रद्धेत तसेच स्वार्थवादात काळवंडू दिला नाही. अभ्यासाच्या बळावर, स्वतंत्र भूमिकेतून भाईंनी संघपरिवार आणि इतर सर्वच विरोधकांचा विरोध निष्ठापूर्वक केला. समाजवादी वर्तुळातील मतभेद दु:खकारकच होते, पण भाईंची सत्यनिष्ठा इथेही ठाम राहिली.

भाईंचा समाजवाद लिबरल होता. अनेक समाजवादी दांभिक व स्वार्थी निघाले. काही समाजवाद्यांनी कर्मठपणा जोपासला, काहींनी समाजवादी बुद्धीवाद जोपासला, पण माणूसकीला पारखे होते. कोरडे ठणठणीत होते.

भाई वैद्य अंत:करणाने शुद्ध व मायाळू होते, आणि बुद्धिवादाने ते तर्कशुद्ध व सत्यनिष्ठ होते, म्हणूनच मृत्यूच्या दिवसापर्यंत त्यांना वेगवेगळ्या जनप्रवाहातून कार्यक्रमांचे निमंत्रण येत असत आणि भाई वैद्य कसलीही अडचण न दाखवता प्रत्येक कार्यक्रमाला आनंदाने जाऊन, विषयाला व संबंधितांना समर्थ न्याय देत असत.

माझ्या माहितीनुसार भाईंच्या आयुष्यातील १५ मार्च २०१८ चा ललिता श्रीपाल सबनीस यांच्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा हा शेवटचा कार्यक्रम ठरला. भाईंनी ललिताचा व माझा यथार्थ असा गौरव केला.

डॉ. पी. डी. पाटील, भाग्यश्रीताई पाटील यांच्यासह मसाप सभागृह गच्च भरले होते. भाईंना कॅन्सर झाल्याचे ९ मार्चलाच समजले होते. पण भाईंनी ही गंभीर बाब आम्हाला कुणाला सांगितली नाही. कार्यक्रमाला येण्यास टाळाटाळही केली नाही. खणखणीत आवाजात उभे राहून त्यांनी ललितासह पुस्तकाला व श्रोत्यांना न्याय दिला. कॅन्सरसारखा रोग पोटात घेऊन भाईंनी मृत्यूच्या सावलीत असताना मला व ललिताला आशिर्वाद दिला. माणसाच्या मनाची ही लांबी-रुंदी त्यातील सद्भावनेमुळे किती मूल्यात्मक बनते याची प्रचिती आम्ही घेतली.

हजारो लोक भाईंवर व त्यांच्या भूमिकेवर प्रेम करीत. हेच त्यांच्या जगण्याचे टॉनिक होते आणि जगण्याचा खरा अर्थही होता.

भाईंच्या पत्नीचे निधन झाल्यावर त्यांना एकटेपणा जाणवत असणे स्वाभाविकच पण तरीही भाईंचे कार्यक्रम सतत चालत. त्यांचा प्रवास महाराष्ट्राच्या दऱ्या-खोऱ्यापर्यंत तर होताच, पण राज्याचा भूगोल ओलांडून अनेक वेळा भाई भारताच्या कानाकोपऱ्यात प्रबोधनाच्या ध्यासाने जात असत.

अलिकडे त्यांची अँजोप्लॅस्टी झाली होती. डॉ. अभिजीत व त्यांच्या डॉक्टरांनी प्रवास व कार्यक्रम यावर बंधने घातली, पण भाई पुण्यात कार्यक्रमाला जात. आठवड्यातून २-४ कार्यक्रमाच्या बातम्या झळकतच! भाईंचे विचार ऐकणे-वाचणे हा ज्ञानात्मक आनंदाचा सोहळा असे. समाजाच्या बहुसंख्याक उपेक्षित घटकांना भाईंचा आधार वाटे. त्यांचा उमाळा दाटून येत असे.

भाईंच्या श्रद्धांजलीची सभा आटोपून घरी परत येताना रिक्षावाल्याने भाईंच्याबद्दल व्यक्त केलेला कळवळा मी विसरू शकत नाही. समाजवादी नेत्यांच्या चारित्र्याची ही रिक्षावाल्याची प्रेमाची पावती सर्वोच्च प्रमाणपत्र आहे.

भाईंचे इंग्रजी वाचन व आकलन कमालीचे गौरवास्पद होते. माझ्या 'सेक्युलॉरिझम: प्रबोधनाचा मानदंड' या पुस्ताच्या प्रकाशनाला भाईंना मी १९९६ मध्ये धुळ्यात निमंत्रित केले होते. त्यांचा या विषयावरील अभ्यास अत्यंत प्रगत असल्याचे सर्वांनाच जाणवले. भाईंनी मला नंतर पत्र पाठवून सेक्युलॅरिझमच्या विविध अवस्थांचे मी केलेले विश्लेषण पूर्णत: नवे असून 'सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता, निधर्मी, धर्माचा विलय व इहवाद या स्टेज आहेत ते पर्यायी अर्थाचे शब्द नव्हेत. ' या माझ्या मांडणीचा त्यांनी लिखित गौरव केला. तसेच इंग्रजी ग्रंथातही अशी मांडणी नसल्याचे त्यांनी सांगून माझ्या भूमिकेचे मूल्य स्पष्ट केले. माझा आत्मविश्वास वाढला.

भाई वैद्य समारंभ-सोहळ्यात संबंधित व्यक्तीचा गौरव करण्यात पान्हा चोरत नसत पण पुस्तकात किंवा भाषणात जर त्यांना चूक जाणवली तर वडिलकीच्या व अभ्यासाच्या बळावर ते स्पष्टपणे मर्यादा दाखवत असत. पण त्यात कटूता नसे. आक्रमकपणा किंवा तर्कटपणा नसायचा. त्यामुळे कविता ते वैचारिकता अशा व्यापक वाङ्मयाच्या सांस्कृतिक प्रवाहातील शेकडो कार्यक्रमांना भाई वैद्य आत्मियतेने हजेरी लावून कार्यक्रमाची मूल्यात्मक उंची व शोभा वाढवत असत. नव्या-जुन्या सर्व वयोगटात भाई सांस्कृतिक नायक म्हणूनच रूजले.

भाईंना बहुजन समाज आपला-मानतो. कम्युनिस्ट व समाजवाद्यांचे कधीच जमले नाही. पण कॉ. कुमार

शिराळकर ते कॉ. अजित अभ्यंकरांपर्यंतच्या सर्व उजव्या-डाव्या साम्यवाद्यांना भाई वैद्य हक्काचे व जवळचे वाटत. कसबे-कांबळे तर भाईंच्या गोतावळ्यातील जवळचे होते. वाहरू सोनवणे पासून श्रीपाद भालचंद्र जोशी पर्यंतचे सर्व प्रवाहातील सुधारणावादी, क्रांतीवादी, पुरोगामी, साम्यवादी, फुलेवादी, बुद्धवादी, समाजवादी, आंबेडकरवादी कार्यकर्ते - नेते भाई वैद्य यांना जवळचे मानत, कारण भाईंची भावना व भूमिका सर्वस्पर्षी होती. त्यांचा विरोध फक्त संघवाद्यांना व हिंदुत्ववाद्यांना होता आणि तो स्पष्टपणाने कुठलाही पडदा न ठेवता भाई अभिव्यक्त करीत. पण तेसुद्धा विषयानुरूप व आवश्यक तेव्हाच! कावीळ झाल्यासारखा विरोध त्यांनी कधीच मनात बाळगला नाही व केलाही नाही.

संघविरोधाची सैद्धांतिक मांडणी भाईंनी सप्रमाणच केलीय. त्यांची भूमिका राजकीय स्वार्थातून जन्माला आली नव्हती. त्यामुळे त्यांनी तात्विक तडजोड कधीच केली नाही.

कधी कधी मी व भाई एकाच व्यासपीठावर असू, आणि मी उजव्या व डाव्या दोन्ही प्रवाहातील दोषांवर सडेतोड टीका करीत असे. अर्थात ही तिसरी भूमिका मी त्यांच्या समक्ष अनेक वेळा मांडली. माझे व कॉ. शरद पाटलांचे तसेच डॉ. आ. ह. साळुंखे यांचे मतभेद त्यांना माहीत होते. पण त्यांनी पाटील-साळुंखे सबनीस यांना निर्णायक चूक म्हणले नाही. संघशक्तीच्या बलाढ्य आक्रमणाचा विरोध करण्याचे आव्हान त्यांच्या नजरेत महत्त्वाचे असावे.

संघ व हिंदुत्ववाद्यांना भाई वैद्य शत्रू मानत होते का विरोधक? माझ्या दृष्टीने भाई त्यांना विरोधक मानत असावेत.

हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधकचा भाईंशी असणारा अनुबंध संस्थेच्या जन्मापासूनचाच रूजलाय. प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांच्या समकालीन कार्याशीही भाईंचा जिव्हाळ्याचा संबंध होता. पुरोगामी मुस्लीम विचारवंत व कार्यकर्त्यांचा अनुबंध भाईंशी जरूर होता. पण एकूणच मुस्लीम प्रवाहातील मागास व धर्मांधता दूर करण्याचे आव्हान भाई वैद्य यांनी किती पेलून नेले? याबाबत परिस्थितीच्या मर्यादा लक्षात येतात. भाईंचा समाजवाद हिंदू व इस्लामच्या धर्मांध प्रवृत्तीची पाठराखण करणारा नव्हता. कारण निवडणूकीतील मतदानाचे गणित धर्मांध वृत्तीशी जुळवून मगच भूमिका मांडण्याचे राजकारण भाईंनी कधीच केले नाही. त्यांचा समाजवाद लोकशाहीच्या कल्याणकारी ध्येयवादातून जन्माला आला होता.

शिक्षणाच्या मुलभूत हक्कासंबंधीचे भाईंनी केलेले जनजागरण अगदी वर्तमानातील ज्वलंत प्रश्नावरचे आंदोलन आहे. म्हणून तर त्यांच्या मृत्यूच्या दिवशी व सलगपणे समाजवादी अध्यापक सभेने पूर्वनियोजित आंदोलन चालूच ठेवले. नेत्याच्या मृत्यूनंतर दुःखात वाहून न जाता, भाईंच्या भौतिकवादी ध्येयाला अनुसरून कार्यकर्त्यांनी उपोषण चालूच ठेवले. खरेतर भाईंना अर्पण केलेली हीच कृतीशील श्रद्धांजली मानायला हवी.

भाईंचा बराच काळ तुरुंगात गेला. स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळी अशा निर्णायक चळवळीत भाईंचा सहभाग होता. तेव्हा तुरुंगवास अटळच ठरला.

आणिबाणीच्या काळातही भाईंनी सुमारे १८-१९ महिने तुरुंगवास भोगला. स्वातंत्र्यनिष्ठा आणि समाजवाद यांचा अनुबंध भाईंनी आयुष्यभर जपला व पुजला. म्हणून तर कामगार, मजूर, शेतकरी, दलित, मुस्लीम, स्त्रिया या सर्वच उपेक्षित समाज घटकांचा अकृत्रिम कळवळा भाई वैद्य प्रत्येक क्षणाला पेरत राहीले.

'बंधुता' संकल्पनेला आयुष्य समर्पित करणारे प्रकाश रोकडे ''सर्वांची आई म्हणजे भाई'' असे म्हणाले, त्यानंतर

उद्धव कानडे व विठ्ठल गायकवाड यांनी भाईंची प्रतिमा 'आई' म्हणूनच गिरवली आणि रूजवली. भाईंच्या कामाचा पसारा शिक्षक, विद्यार्थी, शेतकरी, कामगारांपासून सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेपर्यंत पसरल्याची साक्ष मिळते.

समाजवादी प्रवाहातील काही मोजके जुने कार्यकर्ते नाराज दिसले. त्यांच्या स्वतंत्र सेवादल संघटनेच्या उद्घाटनाला त्यांनी मला बोलावले होते. भाईंना प्रिय असणारा समाजवाद मलाही प्रिय असल्याने मी गेलो. काही मतभेद जाणवले. पण भाईंच्या प्रती काही कार्यकर्त्यांनी आदारभावनाच व्यक्त केली. भाईंना हा प्रसंग कळवला. माझे विचार-आचार स्वातंत्र्य त्यांनी प्रमाण मानून प्रगल्भतेचाच प्रत्यय दिला. पण हा संदर्भ काहीसा दुखरा असल्याचे सत्य नाकारता येत नाही. अर्थात त्यामुळे माझ्या व भाईंच्या संबंधात फरक पडण्याचे कारणही नव्हते. समाजवादी विचार ज्या संस्था पेरूपाहतात त्यांचे स्वागत करण्याची भूमिका योग्यच ठरावी. भाई कुणाचाही द्वेष करीत नसत.

संविधान-समाजवाद आणि... पान क्र. ८२ वर

मूल्याधिष्ठित राजकारणाची मोठी हानी – सुभाष वारे

भाई वैद्य यांच्या निधनाने मूल्याधिष्ठित राजकारणाचा आग्रह धरणारा नेता आम्ही गमावलाय. भाई वैद्यांच्या सोबत अनेक वर्षे काम करण्याचा आनंद मला घेता आला. सहकाऱ्यांना प्रेरणा देत सार्वजनिक कामासाठी प्रेरित करण्याची त्यांची एक खासियत होती. तरुण वयापासून ते वयाच्या नव्वदीपर्यंत ते समाजवादी विचारांसाठी, शोषितांच्या राजकीय हितसंबंधांसाठी ते अखंड कार्यरत राहिले. अनेक समाजवादी संघटनांना कृतिशील बनवण्यासाठी आणि त्याचबरोबर त्यांच्या वैचारिक स्पष्टतेसाठी भाई वैद्य आग्रही असायचे.

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय अशा संवैधानिक मूल्यांसाठी आयुष्यभर लढा दिलेल्या भाई वैद्य यांच्या निधनाने स्वच्छ आणि पारदर्शी राजकारणाचेही फार मोठे नुकसान झाले आहे. मोकाट अर्थव्यवस्थेच्या विरोधाचा आवाज असणाऱ्या भाईंनी सातत्याने गोरगरिबांच्या हिताच्या अर्थकारणाचा आग्रह धरला. आयुष्यभर ते समाजवादी विचारांच्या प्रसारासाठी आग्रही राहिले. स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय अशा संवैधानिक मूल्यांसाठी आयुष्यभर लढा दिलेल्या भाई वैद्य यांच्या निधनाने स्वच्छ आणि पारदर्शी राजकारणाचेही फार मोठे नुकसान झाले आहे. मोकाट अर्थव्यवस्थेच्या विरोधाचा आवाज असणाऱ्या भाईंनी सातत्याने गोरगरिबांच्या हिताच्या अर्थकारणाचा आग्रह धरला. आयुष्यभर ते समाजवादी विचारांच्या प्रसारासाठी आग्रही राहिले. सतत कार्यरत राहणं आणि सहकाऱ्यांनाही कृतिशील बनवणं ही भाईंची खासियत होती. आजच्या काळातील सार्वजनिक जीवनात सर्व काही लौकिक यशाच्या फुटपट्टीने मोजायची पद्धत आहे. भाईंनी लौकिक यश तर काही प्रमाणात मिळवलेच पण त्याचबरोबर आजच्या काळाची सर्वात मोठी गरज कुठली असेल तर ती म्हणजे यशापयशाचा विचार न करता योग्य वेळी योग्य भूमिका घेण्याची. भाई हे रोखठोक भूमिका घेणारे नेते होते. विषमतेच्या विरोधात समतेच्या बाजूनं, अन्यायाच्या विरोधात सामाजिक न्यायाच्या बाजूनं, धार्मिक विद्वेषाच्या विरोधात सामाजिक सलोख्याच्या बाजूनं, टोकदार जातीय अस्मितांच्या विरोधात जातीअंताच्या बाजूनं, पुरुषी अरेरावीच्या विरोधात स्त्री-पुरुष समृद्ध सहजीवनाच्या बाजूनं बोलणारे आणि लिहिणारे नेते होते हे महत्त्वाचं आहे. भाईंच्या या जिद्दीला मनापासून सलाम आणि आदरांजली.

साभार: प्रजापत्र

चारित्र्यसंपन्न, ध्येयवादी – सुभाष वारे

महाराष्ट्राच्या समाजवादी आंदोलनातून अनेक चारित्र्यसंपन्न आणि ध्येयवादी व्यक्तिमत्त्व आकाराला आली. त्यातील अग्रगण्य नाव म्हणजे भाई वैद्य. भाईंची 'जिद्दी समाजवादी' अशी ठसठशीत ओळख निर्माण झाली ती त्यांनी समाजवादी संघटनांसाठी दिलेल्या भरीव योगदानातून. समाजवादी शीलाचे नागरिक घडविण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच केजी टू पीजी समान गुणवत्तापूर्ण आणि मोफत शिक्षण मिळावे, अशी भूमिका घेणाऱ्या समाजवादी अध्यापक सभेचे अध्यक्ष अशा अनेक संघटनांच्या आर्थिक स्थिरतेसाठी, सातत्यपूर्ण उपक्रमशीलतेसाठी आणि वैचारिक भरण-पोषणासाठी भाई सातत्याने प्रयत्नशील राहिले. कार्यकर्त्यांसमोर अशक्यप्राय उद्दिष्टे ठेवायची आणि त्यांच्या पूर्ततेसाठी त्यांच्यामधल्या रचनात्मक ऊर्जेला चेतवत, कार्यकर्त्यांसोबत स्वत:ही प्रचंड मेहनत घेत अशक्यप्राय उद्दिष्ट शक्यतेच्या पातळीवर आणायचे, ही भाईंची खासियत. संघटनेच्या बैठकीत एकदा निर्णय करवून घेतला की त्याला वास्तवात उतरविण्यासाठी भाई स्वत:ही शांत बसायचे नाहीत आणि सहकाऱ्यांनाही शांत बसू द्यायचे नाहीत.

भाई वैद्य आणि पन्नालाल सुराणा यांच्यासारखी माणसे पाहत असलेले मूल्याधिष्ठित समाजवादी राजकारणाचे स्वप्न आणि आजच्या काळातील

चारित्र्यसंपन्न, ध्येयवादी... पान क्र. ८६ वर

सोबत असण्याचे क्षण – सुनीती सु. र.

भाईबद्दल अनेक कार्यकर्ते भरभरून लिहिताहेत. माझी अवस्थाही त्यापेक्षा वेगळी नाही. अनेक आठवणींनी मन भरून आलंय. मागचा आठवडाभर, म्हणजे त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यानंतर आणि आता काही आशा नाही हे कळल्यापासूनच ही अवस्था होतीच मनाची. पण निदान त्यावेळी भाई 'होते'. आज ते नाहीत. किती किती क्षण आठवताहेत... भाईंच्या 'सोबत असण्याचे'. सोबतच कारण मनात काठोकाठ आदर असला तरी मोठ्या नेत्याचा वाटतो तसा दरारा त्यांचा कधीच वाटला नाही. ते नेहमीच सहज ॲक्सेसिबल असायचे. स्नेहभराने, प्रसन्नतेने त्यांच्या आपल्यातलं वयाचं, अनुभवाचं, कर्तृत्वाचं, पदांचं अंतर मिटवून टाकायचे. ते इतकं सहज व्हायचं की ते आपल्याला कळायचंही नाही.

भाई आठवताहेत ते मेधाच्या फेरकुवाच्या उपोषणाच्या वेळी (जानेवारी १९९१) केंद्र आणि गुजराथ सरकारशी शिष्टाईचा निष्फळ प्रयत्न करून थकून परतलेले. मेधाला समजावणारे, की आता सरकार काही ऐकेल असं दिसत नाही, प्रत्येक वेळी यश मिळतंच असं नसतं... उपोषण थांबवावं!

भाई आठवताहेत ते जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या जन्मापासून (१९९३) त्या प्रक्रियेत एक प्रमुख मार्गदर्शक राहिलेले. भाई, किशनजी (किशन पटनायक) हे समाजवादी आणि सिद्धराजजी (ढड्ढा), ठाकुरदासजी (बंग) हे सर्वोदयी असा एक समृद्ध वारसाच होता - आहे तो. सेवाग्राम आश्रमात झालेल्या उद्‌घाटनाच्या त्या तीन दिवसांच्या अखंड चर्चेत या एका दीर्घ पल्ल्याच्या प्रक्रियेसाठी पुरणारं वैचारिक पाथेय आम्हांला देणारे ... भाई आणि ते सारेच ... त्यात आता नसलेले साथी सुनील,संजय संगवई... साऱ्यांचीच आठवण अपरिहार्य आहे.

भाई आठवताहेत ते एन्रॉनविरोधी सत्याग्रहावेळी (१९९७) मेधा आणि कार्यकर्त्यांना माणगावला बसमधून ओढून काढून तथाकथित पोलिसांकरवी बेदम मारहाण झाली तेव्हा पुण्यात तत्कालीन गृहमंत्री गोपीनाथ मुंढेंना जाब विचारणारे. त्या दिवशी त्यांनी आधी मला बोलायला लावलं. भयंकर चिडलेल्या स्थितीत माझा तोलच जाईल की काय असं वाटत होतं. पण भाई होते सोबत, पाठीशी. ... तसे त्या दिवशी नेनेही होते, विद्याताई होत्या. (मी चुकत नसेन तर सत्यरंजन साठे आणि दाभोळकरही होते का?)

भाई आठवताहेत ते सेझविरोधी लढ्यात मुंबई-पुणे हायवेवर रास्ता रोको करणारे आणि पोलिसांच्या गाड्यांमधून सामान्य निदर्शक कार्यकर्त्यांसारखे पोलीस स्टेशनमध्ये पोहोचलेले. (भाई असले की एक बरं असायचं. पोलीस फारच अदबीने वागायचे. आणि बहुतेकदा गुन्हा वगैरे दाखल व्हायचा नाही!)

भाई आठवताहेत ते एसेमांच्या शताब्दी वर्षात वर्षभर पायाला भिंगरी लावून फिरलेले. त्यावेळी त्यांच्या टीममध्ये मी होते हे माझं भाग्यच. त्या वर्षी त्यांच्या त्या 'ओपन युनिव्हर्सिटी'त इतकं काही शिकायला मिळालं. प्लॅनिंग, व्यवस्थापन, स्थानिक संयोजकांच्या मर्यादा जाणून मृदुतेने पेश येणं, वेळापत्रकाबाबत काटेकोर असणं, मीटिंग छोटी असो की मोठी, तितकाच जीव ओतून पूर्ण करणं... इथपासून ते हास्य-विनोद, विशिष्ट हॉटेलात चहा-नाश्त्याला थांबणं (आणि खरोखरच ते साधंसं हॉटेल 'खास' असणं) यातून कामा-प्रवासाचा ताण-थकवा घालवून टाकणं, इथपर्यंत... एकदा तर ताम्हिणी घाटातून येताना प्रचंड पाऊस अचानक सुरू झाला तर मी आणि रझिया जीप थांबवून वेड्यासारख्या पावसात नाचून भिजून आलो, त्यावर आमची चेष्टा करणं (भाईंचं दडपण नसावं म्हणजे किती!) त्यानंतर मात्र त्यांच्या शिक्षणहक्कासंबंधीच्या लढ्यात मी त्यांच्यासोबत असू शकले नाही याची खंतही वाटतेच कधीकधी.

आठवताहेत ते लवासामधल्या लढ्याच्या त्या कठीण दिवसांत १५ ऑगस्टला (२०१०) मोसे खोऱ्यात आलेले आणि आमच्या भुगावमधल्या पत्र्याच्या कार्यालयाचं

सोबत असण्याचे क्षण ... पान क्र. ८८ वर

अग्रलेख

समाजवादाचा नंदादीप

'साने गुरुजींचा धडपडणारा मुलगा' हे बिरुद सार्थ ठरवीत वयाच्या ८८ व्या वर्षीही आंदोलन करून तुरुंगवास पत्करणारे ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या निधनाने समाजवादी मूल्यांची जोपासना करणारा एक सच्चा कार्यकर्ता आपल्यातून निघून गेला आहे. व्यक्तीपेक्षा समूहाचा विचार करून धर्म, जात, लिंग, भाषा यांपैकी कोणताच विचार न करता मनुष्याकडे केवळ निखळ माणूस म्हणून पाहणाऱ्या भाईंनी साने गुरुजींचा वारसा आयुष्यभर जपला. मूल्याधिष्ठित राजकारणाचा वसा जपत समाजकारण हेच आपले साध्य ठेवणाऱ्या भाईंनी आयुष्यभर मानवतावादाची कास धरली. सक्रिय राजकारणात राहूनही त्यांनी कधी तडजोडीच्या स्वार्थी राजकारणाला थारा दिला नाही. संधिसाधूपणा केला नाही. त्याचा त्यांना त्रासही झाला. गृहराज्य मंत्री असताना एका स्मगलरच्या साथीदारांनी त्यांना तीन लाख रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न केला. भाईंनी त्यांना अटक करवली. ही देशातील आजवरची पहिली आणि कदाचित शेवटची घटना सेवा दलाचे हेच संस्कार पुढील पिढ्यांमध्ये यावेत, असा त्यांचा आग्रह होता. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचे पहिले विधेयक भाईंनीच मांडले. गृहराज्य मंत्री या नात्याने पोलिसांना फुलपँट देणे आणि सेवानिवृत्तांच्या निवृत्तिवेतनाची महागाईशी जोडणी करण्याचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. सत्ता असो किंवा नसो, पद असो किंवा नसो; तळागाळातील जनता, गोरगरीब नागरिक विद्यार्थी अशा कुणावरही अन्याय झाला, की धावून जाण्याचे व्रत वैद्य यांनी सतत अंगीकारले आणि सदैव न्यायाची बाजू घेतली. साने गुरुजी, एस. एम. जोशी, ना. गा. गोरे यांच्याकडून समाजवादाचे बाळकडू घेतलेल्या भाईंनी आयुष्यभर चळवळीशी नाते ठेवले. शालेय जीवनातच १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांनी भाग घेतला. गोवामुक्ती आंदोलन आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही ते सक्रिय होते. राममनोहर लोहिया यांच्या समाजवादी विचारांवर गाढा विश्वास असलेल्या भाई वैद्यांनी १९४६ मध्ये काँग्रेस समाजवादी पक्षात प्रवेश केला. साने गुरुजींनी स्थापन केलेल्या राष्ट्र सेवा दलातही त्यांनी ११ वर्षे पूर्णवेळ सेवक म्हणून काम केले. आणीबाणीनंतर स्थापन झालेल्या जनता पक्षाचे ते राष्ट्रीय सरचिटणीसही होते. पुरोगामी लोकशाही दलाच्या सरकारमध्ये ते गृह खात्याचे राज्यमंत्री होते. जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस, समाजवादी जन परिषदेचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशी पदे त्यांनी भूषविली आणि त्यापदांची उंची वाढविली. पुण्याचे महापौर म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली; मात्र पदाचा सोस कधीही ठेवला नाही. केवळ शहरातीलच नव्हे तर दलित वस्तीतील, झोपडपट्टीतील, मोहल्ल्यातील माणसांना ते आपलेच वाटायचे. माणसे जमविणे, त्यांच्याशी संवाद साधणे हा त्यांचा आयुष्यभराचा छंद राहिला. यातूनच कार्यकर्त्यांचे मोठे जाळे त्यांनी निर्माण केले. माणसाकडे माणूस म्हणूनच पाहण्यास सुरुवात केल्यास लवकरच जग सुखी होईल, असे ते नेहमी म्हणत. पोथीनिष्ठ समाजवादापेक्षा विरोधकांचेही शांतपणे ऐकून घेऊन त्याचा वैचारिक प्रतिवाद करण्यास भाईंचा भर असे. कुठल्याही सरकारने धर्म, जात, पंथ या अजेंड्याच्या आधारे राजकारण करण्यास भाईंनी कायमच विरोध केला. जातीयवादी, हिंदुत्ववादी संघटनांवर ते कायमच परखड बोलायचे. संविधानाच्या मूल्यावर त्यांची अढळ निष्ठा होती. सर्व जातींना बरोबर घेऊन जाण्याची मांडणी भाई प्रभावीपणे करायचे. समाजवादी चळवळ क्षीण झाली असतानाही भाईंनी तिला मानवतावादाची जोड देऊन कार्यकर्त्यांना प्रेरित केले. दिल्ली येथील भारत यात्रा ट्रस्टचे २०११ पासून राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या वैद्यांनी स्थापन केलेल्या सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्षपद भूषविले. समाजवादी अध्यापक जनसभेचे ते मार्गदर्शक होते. शिक्षकांची एक पिढी त्यांनी निर्माण केली. समाजवादाशिवाय देशाला तरणोपाय नाही, अशी मांडणी करून तरुणांना समाजवादी विचारांकडे आकृष्ट हा नंदादीप आता विझला आहे.

***

साभार: लोकमत– संपादकीय

तत्त्वनिष्ठ लढवय्या

समाजवादी विचारसरणी अनुसरून तत्त्वनिष्ठ राजकारण करणे जवळ जवळ अशक्य बनलेले असताना भाई वैद्ययांच्यासारख्या नेत्यांचे जाणे पोकळी निर्माण करणारे आहे. विविध शेलक्या विशेषणांनी समाजवाद्यांचा उद्धार करण्याचे आजच्या काळाचे धारिष्ट्य, भाईंच्या जाण्याने आणखी वाढण्याचा धोका आहे. दीर्घ काळ राजकारणात राहूनही भाईंनी कधीही तत्त्वांशी तडजोड केली नाही. तत्त्वबद्ध राहत ध्येयपूर्तीच्या मार्गाने जाता येते हे त्यांनी दाखवून दिले. आपला मार्ग खडतर आहे, त्यात 'शॉर्टकट' नाहीत, याची भाईंना जाणीव होती. मात्र, मानवाच्या भल्यासाठी, समता प्रस्थापित करण्यासाठी आणि मानवतावाद जपण्यासाठी हाच मार्ग असल्याचे ते सांगत. ते बोलघेवडे समाजवादी नव्हते; परंतु तरुण मनांना प्रज्वलित करण्याची शक्ती त्यांच्या वाणीत होती. शब्दांपुढे शब्द रचत, अनुप्रास साधत बोलण्याची वक्तृत्वशैली त्यांच्याच नव्हती; परंतु भांडवलशाहीच्या, जातिवादाच्या आणि मूलतत्त्ववादाच्या विरोधात ताजी उदाहरणे देत, त्यांची कटकारस्थाने उघड करत ते कार्यकर्त्यांचे प्रबोधन करीत. माणसे जोडण्याची किमया भाईंनी साधली होती. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभर त्यांनी आपल्या संघटनकौशल्याने कार्यकर्त्यांचे जाळे विणले होते. भाई सच्चे समाजवादी होते आणि तितकेच सच्चे कार्यकर्ते होते. समाजवादाच्या सैद्धान्तिक चर्चांबरोबर ते गरीब, उपेक्षित, वंचित जनतेसाठी सदैव लढण्याकरिता सज्ज असत. म्हणूनच नव्वदीच्या उंबरठ्यावर असतानाही ते कधीच निव्वळ मार्गदर्शकाच्या भूमिकेत गेले नाहीत. चळवळी, आंदोलने, अभ्यासगट, शिबिरे, परिषदा या माध्यमांतून ते सतत कार्यरत असत आणि विशीच्या कार्यकर्त्याच्या उत्साहाने ते रस्त्यावर उतरत. समतेच्या तत्त्वाने ते भारलेले होते. सर्वांचे कल्याण व्हायला हवे, सर्वांना समान संधी मिळायला हवी आणि त्यासाठी केंद्र आणि राज्यांतील सरकारांनी पूरक धोरणे राबवायला हवीत, यासाठी ते सतत आग्रह धरत. आणीबाणीनंतर राज्यातील पुरोगामी लोकशाही दलाच्या (पुलोद) सरकारमध्ये काही काळासाठी मंत्री झाल्यानंतर राज्यातील पोलिसांच्या गणवेशात पूर्ण पँट आणण्यापासून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवावेतन आणि त्याची महागाईशी जोडणी करण्यापर्यंत त्यांनी अनेक मूलभूत कामे केली.

❊ निवेदन आणि सूचना ❊

२ एप्रिल २०१८ रोजी आदरणीय भाई वैद्य यांचे निधन झाले. त्यांना आदरांजली म्हणून पुरोगामी जनगर्जना मासिकाने भाईंवर विशेषांक प्रसिद्ध करण्याचे ठरविले. भाई आमचे वाचक आणि मार्गदर्शक होते. पुरोगामी जनगर्जनेच्या माध्यमातून आम्ही नेहमीच समतेचा- पुरोगामी विचार पुढे घेऊन जात असतो. आपल्या समोर हा विशेषांक घेऊन येताना भाईंचे विचार आपल्या सर्वांना पुढे घेऊन जायचे आहेत याचेही स्मरण आणि जबाबदारी वाटते आहे. त्यांच्यावरील लेखांचा हा विशेषांक आपणास आवडेल व आपल्याला मार्गदर्शक ठरेल अशी आशा करतो. याबरोबरच एक सूचना अशी की, हा विशेषांक हा मे आणि जून महिन्याचा जोड अंक म्हणून निर्मिला असल्याने

जून महिन्याचा स्वतंत्र अंक प्रसिद्ध होणार नाही याची सर्व वर्गणीदारांनी नोंद घ्यावी.

संपादक

तत्त्वनिष्ठ वगैरे असल्याचे दाखविणाऱ्या अनेकांची भाषा सत्तेत आल्यानंतर बदलते, असा अनुभव आहे. भाई त्यांपैकी नव्हते. त्यामुळे सुमारे सत्तर वर्षांच्या सार्वजनिक जीवनात भाईंनी ना कधी राजकीय कोलांट्याउड्या मारल्या, ना कधी आपल्या विचारांशी, तत्त्वांशी प्रतारणा केली. पुण्याच्या पूर्व भागातील विविध जाती-धर्मांच्या संमिश्र वस्तीत गेलेले बालपण, स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी, शालेय जीवनातच 'चले जाव'सारख्या आंदोलनात घेतलेला सहभाग यांतून भाईंची जडणघडण झाली. जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया आणि एस. एम. जोशी यांच्या 'काँग्रेस सोशालिस्ट पार्टी'चे सदस्यत्व १९४६मध्ये स्वीकारून भाईंनी आपली राजकीय आणि सामाजिक भूमिका पक्की केली. पुढे आयुष्यभर हीच भूमिका घेऊन त्यांनी मार्गक्रमणा केली. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर काँग्रेसमध्ये जाऊन त्यांनी सत्तेचे राजकारण केले नाही. त्याऐवजी समाजातील उपेक्षितांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याच्या चळवळीत त्यांनी स्वत:ला झोकून दिले. त्यासाठी ते लढे देत राहिले. सत्याग्रह करीत राहिले आणि प्रसंगी मारहाणही सहन केली. गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, आणीबाणी अशा सर्व लढ्यांत सक्रिय सहभागी होत त्यांनी अनेकदा तुरुंगवास भोगला. गोरगरिबांच्या विकासासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक सद्भाव निर्माण करण्यासाठी लढे देत असतानाच भाईंचे समाजवादी राजकारणही सुरू होते. आपला विचार रुजविण्यासाठी मिळतील तेवढ्या कार्यकर्त्यांच्या मदतीने ते झटत राहिले. भाईंच्या कार्याला शहराची वा राज्याची सीमा कधीच नव्हती; परंतु भाई आणि पुणे यांच्यातील अनुबंधही खास आहेत. १९७४मध्ये पुण्याचे महापौर भूषविलेल्या भाईंबद्दल पुणेकरांत नितांत आदर होता. पुण्यातीलच नव्हे, तर राज्यातील कार्यकर्त्यांचे ते आधारवड होते. नव्वदच्या दशकानंतर स्वीकारण्यात आलेल्या खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण (खाउजा) या धोरणाला; तसेच उन्मादी हिंदुत्ववादाला त्यांचा कडाडून विरोध होता. या दोहोंच्या विरोधात त्यांनी लढे उभारले आणि या विरोधातील चळवळींना सक्रिय आधार दिला. उन्मादी राजकारणावर स्वार होऊन भांडवलवादी शक्ती सर्वसामान्यांचे खच्चीकरण करीत असल्याकडे ते लक्ष वेधत आणि लढण्यासाठी आवाहन करीत. आज भाई नसले, तरी मानवतावाद रुजविण्यासाठी हा लढा सर्वांना लढावा लागणार आहे. तीच भाईंना खरी श्रद्धांजली ठरेल.

साभार: दै. महाराष्ट्र टाइम्स -अग्रलेख ❊❊❊

संविधान-समाजवाद आणि... **पान क्र. ७७ वरून**

संघाचा सुद्धा त्यांनी विरोध केला पण द्वेष केला नाही.

भाई वैद्य यांना १०० वर्षाचे आयुष्य मिळाले म्हणून लताताई राजगुरू व विठ्ठल गायकवाड यांनी १०० महिलांसह त्यांच्या वाढदिवशी शुभेच्छा दिल्या होत्या.

रमाई आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या विठ्ठल गायकवाड या सच्चा कार्यकर्त्याला उर्मी व उभारी भाईंनीच दिली शिवाय पेन्शनमधून १०,०००/- रुपये देणगी दिली. रमाईच्या गाण्याचे पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी भाईंनी स्वत:चे नाव न सांगता दादासाहेब सोनवणे यांच्यावर जबाबदारी टाकली. अशी मदत अनेकांना करताना डॉ. अभिजित वैद्य यांचे समंजसपण महत्त्वाचे ठरले. स्वत:च्या कुटुंबासाठी हक्काचा पैसा कुणाला नको? पण वैद्य बाप-ल्योकाने समाजातील गरजुंना अधिक मदत करून औदार्य सिद्ध केले.

माझ्या पंतप्रधान मोदींवरील टीका प्रकरणातील सर्व बाजूंनी वादळ निर्माण झाले. टिव्ही चॅनल्सच्या चर्चेत भाईंनी माझी पाठराखण केल्याचे मी स्वत: अनुभवले. द्वेषभावनेने अंध बनलेल्या अँकरने त्यावेळी भाईंचा अवमान केल्याची खंत माझ्या काळजाची दुखरी वास्तवता आहे. माझ्यासाठी भाईंना अवमान सहन करावा लागला, पण एका शब्दानेही त्यांनी मजवर उपकार केल्याचे दाखवले नाही. मी त्यांच्या वारशातला प्रामाणिक सहप्रवासी असल्याचा त्यांचा विश्वास होता. मी आणि ललिता दोघेही भाईंना वाकून विनम्रपणे नमस्कार करण्यात धन्यता मानत असू! समाजवादी सत्तांवर संविधान उभे आहे आणि संविधानाची बांधिलकी भाईंनी मृत्यूपर्यंत जपली. म्हणून भारताच्या भवितव्याशी समाजवाद व भाई वैद्य यांचा अनुबंध अमर झाला आहे. ❊❊❊

तपस्वी समाजवादी

पुण्याच्या सामाजिक जीवनातील तपस्वी नेता अशी ज्यांची गेली अनेक दशके ओळख आहे ते ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांचे काल वृद्धापकाळाने निधन झाले. समाजवादासाठी आणि सामाजिक कार्यासाठी ज्यांनी आपली सारी हयात वेचली ते थोर व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. समाजवादी चळवळीतील कार्यकर्त्यांची सर्वोच्च ऍथॉरिटी या निमित्ताने हरपली आहे असेच म्हणावे लागेल.अलीकडच्या काळात समाजवादी विचारसरणी मागे पडली ही वस्तुस्थिती आहे. या विचारसरणीतील त्रुटी आणि कमतरता गेल्या काही काळात ठळकपणे समोर आल्या आहेत. विशेषत: १९९१ साली देशाने आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर देशाची चौफेर आर्थिक प्रगती झाल्याच्या पार्श्वभूमीवर लोक असे म्हणू लागले की समाजवादी विचारांची कास धरल्यानेच आर्थिक प्रगतीत आपण मागे पडलो अन्यथा देश खूप आधीच आर्थिक बाबतीत पुढे निघून गेला असता.

रशियाच्या पाडावानंतर कम्युनिस्ट विचारसरणीतील फोलपणाही स्पष्ट झाला होता. त्यामुळे लौकिकार्थाने समाजवादी आर्थिक विचारसरणीची सारी हवा अलीकडच्या काळात साफ निघून गेली आहे. पण तरीही भाई वैद्य यांच्या सारखे थोर तपस्वी आपल्या विचारसरणीला धरून अखेर पर्यंत कार्यरत राहिले. गरीब आणि उपेक्षितांना न्याय मिळावा ही त्यांची त्या मागची धारणा होती. समाजातील धार्मिक तेढ आणि जातीयवादाच्या भिंती कायमच्या गाडून टाकण्याच्या ध्येयाने पछाडलेल्या व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश होता. बदलते वारे लक्षात घेऊन आपल्या राजकीय भूमिकेत बदल करणारे राजकीय नेते आपल्याला गल्लोगल्ली दिसतात. पण भाईंसारखे आपल्या राजकीय तत्त्वप्रणालीवर आणि विचारांवर ठाम असलेले नेते क्वचितच बघायला मिळतात. उलट आपल्या विचारांनुसार नवी राजकीय मांडणी करून नवीन राजकीय फोर्स निर्माण करण्याचा प्रयत्नही त्यांनी सोडला नव्हता. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावरही समाजवादी विचारांवर आधारीत एक नवा राष्ट्रीय पक्ष त्यांनी स्थापन केला होता. त्यांचा हा अट्टहास आणि धडपड अचंबित करणारी होती.

काही वेळा त्या प्रयोगाची कुचेष्टाही झालेली पाहायला मिळाली पण भाईंनी त्याला भीक घातली नाही. एक वेगळी मांडणी म्हणून त्यांनी अलीकडेच स्थापन केलेल्या नव्या राजकीय पक्षाकडे पाहवे लागते. आयुष्याच्या उमेदीच्या राजकीय काळात त्यांना महापौर, आमदार , मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मंत्रिपदापर्यंतची संधी मिळाल्यानंतर राजकीय क्षेत्रातील नेता उतारवयात थोडा निवांतपणा शोधतो. पण भाई मात्र शेवटपर्यंत सामाजिक जीवनात सक्रिय राहिले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक ऐतिहासिक महत्त्वाच्या चळवळींमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक सामाजिक चळवळींचे ते प्रणेते ठरले आहेत. पुण्याच्या हमालांच्या चळवळीला त्यांनी प्रोत्साहन आणि पाठिंबा दिला. त्यातून पुढे उभे राहिलेले कार्य पुणेकरांच्या डोळ्यापुढे आहे. मुस्लीम सत्यशोधक चळवळीलाही त्यांच्या घरातच प्रारंभ झाला असे सांगतात. आज ही चळवळही चांगली बाळसे धरून तगून आहे. वास्तविक अशा स्वरूपाची चळवळ सुरू करणे हेच मुळात धाडसी काम होते. पण त्या समाजातील काही निष्ठावंत अनुयायांमुळे मुस्लीम सत्यशोधक चळवळीचे काम आता चांगले फोफावले आहे. त्यांच्या लढ्याला काही बाबतीत यशही येताना दिसत आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही भाईंनी दिलेले योगदान अविस्मरणीय आहे. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्याशी भाईंचे अतिशय जिव्हाळ्याचे नाते होते. चंद्रशेखर यांच्या भारत यात्रेत ते सहभागी झाले होते. या यात्रेच्या निमित्ताने पुण्यात परंदवडीजवळ उभारण्यात आलेल्या भारत यात्रा केंद्राच्या कार्यातही त्यांचा मोठा पुढाकार होता. या केंद्राचा योग्य उपयोग करून घेण्याचे कामही त्यांनी सुरू ठेवले होते. अन्यथा एखाद्या आड गावात उभारलेल्या अशा केंद्रांची पुढे कशी अवस्था होते ते वेगळे सांगायची गरज नाही. पुण्यात अनेक सामाजिक उपक्रम आणि कार्यक्रम नियमितपणे होत असतात. अशा कार्यक्रमांसाठी एक

भारदस्त आणि वजनदार पाहुणे म्हणून भाईंना जवळपास रोजच बोलावणे असायचे.

पुस्तक प्रकाशनाचा सोहळा असे की एखाद्या संस्थेचा वर्धापन दिन असो अशा प्रत्येक ठिकाणी भाईंची उपस्थिती शोभून दिसायची. भाईही फारसे आढेवेढे न घेता या कार्यक्रमांना उपस्थित राहत. सार्वजनिक क्षेत्रात अधिकारवाणीने लोकांना चार समजुतीच्या गोष्टी समजावून सांगणारे कोणीतरी अधिकारी व्यक्तिमत्त्व अशा ठिकाणी आवश्यक असते. ती भूमिका भाई पार पाडीत. भाईंच्या सहवासात आलेल्या कार्यकर्त्यांना त्यांनी चांगल्या चारित्र्याचे धडे दिले. त्यातून पुण्यात स्वच्छ चारित्र्याचे अनेक कार्यकर्ते घडले हेही त्यांचे एक महत्त्वाचे योगदान म्हणावे लागेल. आज सामाजिक चळवळींना कार्यकर्ते मिळेनासे झाले आहेत. प्रस्थापित राजकीय पक्षांमध्ये जे कार्यकर्ते दिसतात त्यातील बहुतेक केवळ झुंडीचे मानसशास्त्र जोपासणारे आहेत. एखाद्या स्थानिक भाऊंचे पंटर अशी त्यांची प्रतिमा असते. पण भाईंच्या आदर्श नेतृत्वाखाली मात्र चांगले सामाजिक भान असणारे आणि समाजासाठी बऱ्यावाइटाचा विचार करणाऱ्या कार्यकर्त्यांची फौज मागील काळात निर्माण झाली आहे. भाईंनी समाजाला दिलेली ही एक मोठी देणगीच मानावी लागेल. सहा दशकाहून अधिक काळ समाजासाठी, समाज हितासाठी सतत तेवत राहणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती अनेकांच्या मनात कायम तेवत राहतील. त्यांच्या स्मृतीला मनोभावे आदरांजली. ✻✻✻

साभार: दै. प्रभात– अग्रलेख

सूर्य पाहिलेला माणूस! ... **पान क्र. ७४ वरून**

अलीकडेच सेवाग्रामला भेट दिली व म. गांधींना श्रद्धांजली वाहिली तर म. गांधींचे नातू तुषार गांधी यांनी नागपूरला दीक्षाभूमीला भेट दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना श्रद्धांजली वाहिली!

भाईंच्या दूरदृष्टीला सलाम करावा तितका थोडा आहे!

हल्ली चळवळीत अभ्यासाची किंवा वाचनाची गरज वाटेनाशी झाली आहे. त्यामुळे चळवळीत अभ्यासवर्ग कधीच बंद पडले आहेत; पण भाईंचा अभ्यासाचा आवाका प्रचंड दांडगा होता. जागतिकीकरणाच्या अर्थशास्त्रीय, राजकीय, सामाजिक संदर्भातील अद्ययावत अभ्यासाचे संदर्भ भाईंकडे होते. भाईंनी वाचायला सांगितलेले शेवटचे पुस्तक होते How will Capitalism End?

भाई अभ्यासक होते; पण केवळ अभ्यासक नव्हते. कृतिशील संघर्ष भाईंनी वेळोवेळी केला. भाईंचे संपूर्ण आयुष्यच संघर्षाचे होते. वयाच्या ८० व्या वर्षी अ. भा. समाजवादी अध्यापक सभेच्या दोन जेल भरो आंदोलनांचे नेतृत्व भाईंनी केले. अध्यापक सभेच्या रस्त्यावरच्या आंदोलनाला भाईंनी प्रोत्साहन दिले.

भाई, अभ्यासक असूनही त्यांच्याकडे विद्वत्तेचे जडत्व नव्हते. त्यामुळे कोणत्याही वयाच्या व्यक्तीशी ते सहजपणे संवाद साधू शकत होते. काही मिनिटांत अगदी अनोळखी व्यक्तीला आपलेसे करण्याचे कौशल्य भाईंकडे होते. त्यामुळे महाराष्ट्रभर व भारतभर भाईंचा एक मोठा चाहता वर्ग होता.

भाईंची गंमत म्हणजे भाई खवैये होते! प्रवासात, रस्त्यात मिसळ, भजी, मटण-भाकरी, मच्छी कोठे चांगली मिळते हे त्यांना माहिती असायचे व तेथे गाडी थांबवून सर्वांना आग्रहाने खायला घालायची हौस भाईंना होती! मग प्रवासात समाजवादी चळवळीचा इतिहास त्यांच्याकडून ऐकणे हा एक अभ्यासवर्गच असायचा!

भाईंनी ११ मार्च २०१८ रोजी अध्यापक सभेच्या कार्यकारिणीसमोर जे भाषण केले ते जाहीर असे त्यांचे अखेरचे भाषण होते. भाईंनी आजारपणाचा उल्लेख न करता भाषण रेकॉर्ड करून समाजवादी अध्यापक मासिकात प्रसिद्ध करण्यास सांगितले होते. भाईंचा जो अखेरचा संदेश होता तो असा –

✻ आपण राजकीय चळवळ करत आहोत हे लक्षात ठेवा.

✻ सामर्थ्य आहे चळवळीचे! जो जो करील तयाचे.

✻ आपला लढा शिक्षणहक्कासाठी असला तरी तो अंतिमत: जागतिकीकरणा विरोधी आहे. खा-उ-जा धोरणच सर्व प्रश्नांचे मूळ आहे.

✻ थोडक्यात हा लढा व्यवस्था परिवर्तनाचा आहे.

म. गांधींनी मिठाचा संबंध भारताच्या स्वातंत्र्याशी जोडला, भाईंनी शिक्षणहक्काचा संबंध व्यवस्था परिवर्तनाशी जोडला! अशा या द्रष्ट्याला विनम्र अभिवादन! भाईंचे भक्त होण्याऐवजी भाईंचे अनुयायी होऊ या! ✻✻✻

साभार: समाजवादी अध्यापक

समाजवादी दृष्टा हरवला

ही गोष्ट आहे १९८० ची. तत्कालीन गृहराज्य-मंत्र्यांच्या निवासस्थानी काही व्यक्ती गेले. एका प्रकरणात मदत करण्यासाठी ते गृहराज्यमंत्र्यांना साकडे घालत होते. त्या बदल्यात त्या काळी भलीमोठी रक्कम देण्याची त्यांची तयारी होती. आज राजकारणाबद्दल जी काही प्रतिमा झाली आहे त्या वातावरणात हे चित्र फारसे वेगळे वाटणार नाही. मात्र १९८० साली त्या गृहराज्यमंत्र्यांनी त्या लोकांना स्वत:च्या कक्षात बसवले आणि बाजूला जाऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला संपर्क साधला. स्वत:च्या बंगल्यावर ते सात व्यक्ती आणि तब्बल ३ लाखाची रोकड त्यांनी पकडून दिली. हा प्रकार मात्र राजकारण आणि राजकारण्यांच्या एकंदर प्रतिमेला धक्का देणारा होता, ते गृहराज्यमंत्री होते भाई वैद्य. पुण्याचे महापौरपद भूषवल्यानंतर आणीबाणीला विरोध करत १८ महिने मिसाबंदी म्हणून राहिलेले भाई त्यानंतर आमदार आणि पुलोदच्या सरकारमध्ये गृहराज्यमंत्री झाले. त्यांच्या काळातील हा किस्सा राजकारण कोणत्या दिशेने जाणे गरजेचे असते याचा आदर्श वस्तुपाठ म्हणून घ्यायला हरकत नाही. अगदी उच्च न्यायालयानेही 'लोकशाहीमध्ये संवैधानिक मूल्यांची बूज राखण्याचे काम लोकप्रतिनिधींनी करणे अपेक्षित असते. समाजातील भ्रष्ट प्रवृत्तींना अटकाव करण्यासाठी लोकप्रतिनिधी समोर येणे आवश्यक असते आणि हे काम भाई वैद्य यांनी केले आहे.' या शब्दात भाई वैद्य यांचे कौतुक केले होते. उच्च न्यायालयाच्या निकाल पत्रात एखाद्या लोकप्रतिनिधीबद्दल असे भरभरून लिहिले जाण्याचा प्रसंग भारताच्या राजकीय इतिहासात एखादाच असेल. यासाठी तेवढ्याच टोकाची निष्ठा लागते. संवैधानिक मूल्यांबद्दल आदर लागतो, ती निष्ठा आणि तो आदर भाई वैद्य यांच्यामध्ये ठासून भरला होता. स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी झालेले भाई वैद्य शेवटच्या श्वासापर्यंत समाजवाद, लोकशाही, सामाजिक मूल्ये यासाठी झगडत राहिले. १९४२ ला इंग्रजांना 'चले जाव' म्हणणाऱ्या भाईंना स्वातंत्र्यानंतर स्वकीय लोकप्रतिनिधींनाच पुन्हा एकदा चलेजाव म्हणण्याची वेळ येईल असे वाटले नसावे. परंतु तशी परिस्थिती उद्भवल्यानंतर वयाची ८८ वर्ष उलटल्यानंतरही भाई कायम सत्याग्रहासाठी आणि संघर्षासाठी रस्त्यावर उतरायचे. स्वत: निवडलेल्या कामाप्रति असलेली ही श्रद्धा आज दुर्मीळ होत चालली आहे.

१९४२ च्या चळवळीत सहभागी झालेले भाई १९४३ पासून राष्ट्र सेवादलाशी जोडले गेले ते शेवटच्या श्वासापर्यंत. १९५५ ते ६१ या काळात सेवादलाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून भाई सक्रिय होते. आंदोलन आणि भाई हे समीकरण अगदी शेवटच्या क्षणापर्यंत कायम राहिले. १९४२ ला ज्या तडफेने भाई वैद्य 'चले जाव' आंदोलनात सहभागी झाले होते, जो उत्साह १९५ च्या गोवा मुक्ती आंदोलनात दिसून आला होता, ज्या तळमळीने १९५७ ला संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाई सहभागी झाले होते. ज्या करारीपणाने १९६५ला कच्छचा सत्याग्रह भाईंनी केला होता अगदी २०१४-१५ मध्ये नितीन आगेच्या खुनानंतर पुणे ते खर्डा लाँग मार्चमध्ये त्याच तडफेने भाई वैद्य सहभागी झालेले पाहायला मिळाले. आंदोलनात सहभागी होताना भाईंना वय कधीच आडवे आले नाही, इतके आंदोलन त्यांच्या रक्तात भिनलेले होते. म्हणूनच आपल्या आयुष्यात वेगवेगळ्या आंदोलनात सहभागी झालेल्या भाईंना २५ वेळा तुरुंगवास सहन करावा लागला. यातील शेवटचा तुरुंगवास ते ८८ वर्षांचे असताना त्यांनी भोगला. आंदोलक कसा असतो याची यापेक्षा वेगळी ओळख कोणती असेल?

चळवळी आणि आंदोलने नुसत्या सहभागाने मोठी होत नाहीत, तर त्यासाठी तितकीच प्रभावी मांडणीही करावी लागते. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक या सर्वच विषयांवर भाई वैद्य यांचा अभ्यास मोठा होता. या सर्वच क्षेत्रात जगामध्ये काय घडामोडी सुरू आहेत या संदर्भात भाई कायम अपडेट असायचे आणि त्यांच्या प्रत्येक भाषणातून ते स्पष्टपणे जाणवायचे. तरुणांना लाजवील असा नुसता उत्साहच नव्हे तर नव्या नव्या गोष्टींचा अभ्यासही भाईंमध्ये पाहायला मिळायचा.

कोणत्याही विषयावर भाईंकडे स्वत:चे एक मत आणि आपल्या भूमिकेतून त्या प्रश्नावरचे उत्तर कायम असायचे. आता त्या उत्तराला मात्र महाराष्ट्र मुकणार आहे.

अवघ्या दोन वर्षाच्या राज्यमंत्री पदाच्या काळात भाईंनी गृह खात्यावर स्वत:चा ठसा उमटवला. केवळ गृह खात्यावरच नव्हे तर राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय या काळात घेतले गेले. पोलिसांना फुल पॅन्ट देण्याचा निर्णय भाई गृहराज्यमंत्री असतानाच झाला, तर सेवानिवृत्ती वेतन महागाई दराशी जोडण्याचा निर्णयही भाईंचाच. आज सेवानिवृत्ती वेतन घेताना किती व्यक्तींना हे माहीत असेल हे सांगणे अवघड आहे, कारण कर्तव्य म्हणून घेतलेल्या निर्णयाचा गाजावाजा करण्याची ना भाईंची सवय होती ना ते ज्या राजकीय, सामाजिक मुशीत घडले त्या मुशीचा तो पिंड.

मराठवाड्याच्या दृष्टीने भाईंची वेगळी ओळख आहे. ज्या मराठवाड्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरावरून मोठा संघर्ष अनुभवला त्या नामांतर आंदोलनातला सच्चा शिपाई म्हणून भाईंकडे पाहावे लागेल. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचे पहिले विधेयक विधिमंडळात भाई वैद्यांनी मांडले होते. हे देखील आज आवर्जून सांगावे लागणार आहे. या सर्व गोष्टींचा उल्लेख याचसाठी करायचा की यातून भाई वैद्यांच्या राजकीय, सामाजिक जाणिवांचा परिघ किती मोठा होता आणि त्यांच्या राजकीय, सामाजिक कॅनव्हासला किती वेगवेगळ्या छटा होत्या हे आजच्या पिढीला कळणे गरजेचे आहे. प्रजापत्रशी भाई वैद्य यांचे वेगळे नाते होते. बीडमध्ये चळवळीला वाहिलेले दैनिक ही भूमिका घेऊन जे काम प्रजापत्रने सुरू केले ते बीज भाई वैद्य यांच्या हस्ते रोवले गेले होते. प्रजापत्रच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन भाईंच्या हस्ते झाले होते. त्यामुळे भाईंचे जाणे हा प्रजापत्रसाठी देखील आघात आहे.

राजकारण, समाजकारण, शिक्षण, अर्थ आदी सर्वच क्षेत्रामधून शेवटच्या घटकाची चिंता वाहणारा एक दृष्टा समाजचिंतक आज हरवला आहे. साने गुरुजींना जी धडपडणारी मुले अपेक्षित होती त्यांच्या स्वप्नातील धडपडणारा मुलगा म्हणून भाईंकडे पाहिले जायचे. एस. एम. जोशी यांच्या विचारांचा दांडगा प्रभाव असलेल्या भाई वैद्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्य आहे. मात्र ज्या लोकशाही समाजवादासाठी भाई वैद्य सातत्याने धडपडत राहिले त्यांचा तो लोकशाही समाजवाद प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण प्रत्येकाने धडपडणे हीच खऱ्या अर्थाने भाईंना आदरांजली ठरेल.

***

दै. प्रजापत्र– विशेष संपादकीय.

चारित्र्यसंपन्न, ध्येयवादी... **पान क्र. ७८ वरून**

निवडणुकीच्या राजकारणातील मूल्यांची मोडतोड यांच्यातील अंतर त्यांना अस्वस्थ करायचे. समाजवादी ध्येयाने प्रेरित होऊन समाजहितासाठी भूमिका घेऊ शकत असले तरी त्यासाठी ते पूरक अशाच भूमिकेत राहायचे. समाजवादी राजकारणाचा आदर्श आणि वास्तव स्थिती यांच्यातील सांगड घालण्याचा भाईंनी मोठ्या नेटाने प्रयत्न केला.

आजच्या सार्वजनिक जीवनात सर्व काही लौकिक यशाच्या फूटपट्टीने मोजायची पद्धत आहे. भाईंनी लौकिक यश मिळवलेच, तथापि, यशापयशाचा विचार न करता योग्य वेळी योग्य भूमिका घ्यायचे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात रोखठोकपणा होता. समतेच्या आणि सामाजिक न्यायाच्या बाजूने टोकदार जातीय अस्मितांच्या विरोधात आणि स्त्री-पुरुष समृद्ध सहजीवनाच्या बाजूने बोलणारे आणि लिहिणारे भाई वैद्य जाणकार आणि दूरदृष्टीचे द्रष्टे नेते होते. त्यांच्या वैचारिकतेतील ही बहुविध रूपे समाजाला अधिक समृद्ध, बहुआयामी बनवीत. भाईंच्या या जिद्दीला मनापासून सलाम.

***

साभार: दै. सकाळ

पुरोगामी चळवळ पोरकी

'जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारल्यामुळे देशाची सारी संपत्ती, काम आणि त्याचा फायदा काही ठरावीक लोकांच्या हाती जाणार, त्यामुळे येणाऱ्या काळात भारतातील उद्योग, छोटे व्यापारी आणि दुकानांचे कामकाज ठप्प होईल!'असे मत मांडून आयुष्याच्या अखेरीपर्यंत सर्वसामान्यांच्या हितासाठी झटणारे दूरदृष्टी असलेले समाजवादी विचारांचे भाई वैद्य यांच्या निधनाने भारताचा मोठा सामाजिक दिशादर्शक हरपला आहे! भाई वैद्य यांचे सोमवारी निधन झाले. समाजवादी चळवळीचे अर्ध्वयु स्वातंत्र्यसैनिक आणि माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य यांच्या निधनाने राजकीय आणि पुरोगामी सामाजिक चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. अगदी शालेय जीवनापासून स्वातंत्र्यलढ्याचे बाळकडू प्यायलेले ते सच्चे समाजवादी होते. १९४२ची चलेजाव चळवळ असो अथवा गोवामुक्ती आंदोलन असो, संयुक्त महाराष्ट्राचा लढा असो अथवा आणीबाणीच्या काळातील चळवळ असो, त्यांनी सक्रिय भाग घेतला आहे. अनेक आंदोलनात त्यांनी लाठ्या खाल्ल्या आहेत. तुरुंगवास भोगला आहे. १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीच्या काळात त्यांना १९ महिन्यांचा तुरुंगवासही झाला होता. त्यांची एकदा नाही तर तब्बल २५ वेळा या ना त्या चळवळीनिमित्त तुरुंगवारी झाली आहे. वंचित आणि कष्टकरी यांच्यासाठी रस्त्यावर उतरण्यास सदैव ते तयार असत. २०१६मध्ये वयाच्या ८८व्या वर्षीही शिक्षण हक्कांसाठी त्यांनी सत्याग्रह केला होता. त्यांच्या या चळवळीच्या तारुण्याला सलामच करायला हवा! जनतेच्या भल्यासाठी, हक्कांसाठी रस्त्यावर उतरण्याची त्यांची कायम तयारी असायची. एवढ्या वयात अनेक जण हातात काठी घेऊन थरथरत घरी बसलेले असतात. परंतु भाईंच्या चळवळींची कथाच न्यारी. अगदी ८८व्या वर्षीही तरुणाला लाजवेल असा हिरिरीने सहभाग चळवळींमध्ये असायचा. ज्या समाजात आपण वावरतो आहोत, त्या समाजाचे भले झाले पाहिजे, सदैव हेच विचार त्यांना उतार वयातही स्वस्थ बसू देत नसत. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारी ते दिल्ली भारतयात्रेत तर ते सर्वांत अग्रणी होते. सुमारे चार हजार किमीची ही पदयात्रा होती. जनता पार्टी, समाजवादी जनपरिषद, राष्ट्रसेवा दल यांसारख्या संस्थांमध्ये त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण अशी पदे भूषवली होती. आपल्या कार्यकर्तृत्वाने त्या पदांची शोभा वाढवली होती. पुण्याचे महापौर ते राज्याचे गृहमंत्री असा त्यांचा प्रवासही थक्क करणारा आहे. स्वातंत्र्यापूर्वीपासून म्हणजे १९४३ पासून ते राष्ट्रसेवा दलात सक्रिय आहेत तेव्हापासून ते आजतागायत 'लोकशाही समाजवाद' अंगी बाणवला होता. सेवा दलाचे संस्कार पुढच्या पिढ्यांच्या मनात रुजविण्यासाठी त्यांची अलीकडे धडपड होती. त्यांची काही ठळक कामे आजही भविष्याकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाची झलक देतात. पोलिसांना अर्ध्या पॅन्टमधून फूल पॅन्टमध्ये आणणे असो अथवा मराठवाडा विद्यापीठाचे नामांतराचे पहिले विधेयक मांडणे असो किंवा सेवानिवृत्तांच्या निवृत्तिवेतनाची महागाईशी जोडणी करण्याचे अनेक निर्णय असोत, त्यांनी पुढाकार घेतला.

भाईंनी आयुष्यभर समाजवादी व पुरोगामी विचारसरणी जोपासली. महात्मा गांधी व साने गुरुजींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या जीवनावर होता. त्याची अनुभूती त्यांच्या प्रत्येक चळवळीतून आपल्याला येते. धार्मिक एकता आणि सामाजिक सलोख्यासाठी त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीचा कधीही विचार केला नाही. अनेकदा आपली राजकीय कारकीर्द पणाला लावून त्या विचारांची जोपासना केली. समाजातील वंचित-उपेक्षितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करीत राहिले. समाजवादी विचारांचा राजकीय पर्याय व्हावा यासाठी जे छोटे-मोठे प्रयोग झाले त्या प्रत्येक प्रयोगात ते सकारात्मक विचाराने सहभागी झाले आहेत. भाईंकडे सत्ता असो किंवा नसो, पद असो किंवा नसो, तळागाळातील जनता, गोरगरीब नागरिक, विद्यार्थी अशा कोणावरही अन्याय झाला की धावून जाण्याचे व्रत शेवटपर्यंत त्यांनी अंगीकारले आणि सदैव न्यायाची बाजू घेतली होती. स्मगलरचे सात साथीदार तीन लाख रुपये लाच घेऊन आले असताना गृहराज्य मंत्री

म्हणून त्यांना पोलिसांच्या हवाली करून तुरुंगात पाठवले. इतके ते बाणेदार होते. त्यांनी सत्तेवर असताना कधीही त्या पदाचा दुरुपयोग होणार नाही, याची काळजी घेतली आणि त्यामुळे त्या पदाचाही सन्मान भाईंमुळेच अधिक वाढला, हेही तितकेच खरे आहे.

पुण्याजवळ परंदवडी येथे भारत यात्रा केंद्र स्थापन झाले. भाई त्या केंद्राचे अनेक वर्षे संचालक होते. चंद्रशेखर यांच्याखेरीज विश्वनाथ प्रताप सिंग, जॉर्ज फर्नांडिस, मधू लिमये, मधू दंडवते, मोहन धारिया, शरद पवार, विजू पटनाईक, बापू काळदाते आदी नेत्यांशी त्यांचे निकटचे संबंध होते. पुण्याच्या पूर्व भागातून अनेक कार्यकर्त्यांची जडणघडण भाईंनी केली. काँग्रेस, जनता दल आदी पुरोगामी पक्षात भाईंनी तयार केलेले कार्यकर्ते आहेत. त्यांनीच तयार केलेले पांडुरंग तरवडे, दत्ता एकबोटे हे पुण्याचे महापौर झाले आहेत. प्रामाणिकपणा, समाजवादी, साधी राहणी हे गुण भाईंकडून शिकण्यासारखे आहेत आणि त्याच जोरावर अनेक कार्यकर्ते आज बडे नेते म्हणून समाजात वावरत आहेत. स्वातंत्र्यानंतर सामान्य माणसाच्या हिताची भूमिका घेणाऱ्या जयप्रकाश नारायण, मधू लिमये, एस. एम. जोशी या विचारवंतांसोबत भाई वैद्य यांनी आपल्या आयुष्याचा मोठा कालावधी घालवला होता आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कार्यातून आपल्याला प्रत्येक चळवळीतून दिसले आहे. आज त्यांनी घडवलेल्या कार्यकर्त्यांकडे त्या विचारांची अमूल्य भेट सुपूर्द केली आहे. समाजवादी विचारांची मशाल आज त्यांच्या मेहनतीमुळे सदैव पेटती आहे. त्यांच्या समाजवादी विचारांनी अनेक कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळायची. आज समाजात टोकाची, सामाजिक विषमता वाढली आहे. धर्मांधवाद वाढला आहे, तर समाजवाद संपुष्टात येतो की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, अशावेळी भाईंसारख्या व्यक्तीचे नसणे समाजवादी विचारांसाठी मोठी पोकळी निर्माण करणारे आहे. त्यांची उणीव आपल्याला प्रत्येक चळवळीत जाणवेल यात शंका नाही.

भाईंनी आपले विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक पुस्तकांचे लेखनही केले आहे. एका समाजवाद्याचे चिंतन, मंडल आयोग व अन्य मागासवर्ग, समाजवाद, संपूर्ण शिक्षण : फी विना समान व गुणवत्तापूर्ण : का व कसे, आर्थिक आक्रमणाचे अरिष्ट, परिवर्तनाचे साथी व सारथी शब्दामागचे शब्द इत्यादी त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. भाईंच्या जाण्याने आपल्यातून एक चळवळीतील सच्चा कार्यकर्ता, विचारवंत गेल्याची हळहळ व्यक्त केली जात आहे. ***

साभार: पुण्यनगरी – अग्रलेख

सोबत असण्याचे क्षण ... **पान क्र. ७९ वरून**

उद्घाटन करणारे भाई, ते बांग-मराठवाडीच्या उपोषणाआधीच्या उमरकांचनच्या निर्धार मेळाव्यात (२०१३) पाठीवर थाप मारून 'आगे बढो' म्हणणारे भाई.

अलीकडच्या दिवसात, कुठल्याही निवेदनावर, पत्रावर सही मागणाऱ्या फोनला 'जरूर टाक' म्हणून प्रतिसाद देणारे भाई (त्या-त वेळी भेटून अपडेट करायला हवं हे राहून जात होतं तरी नाराज न होणारे भाई आणि त्याची आता कायमची लागून राहणारी रुखरुख).

लोहियांवर, समाजवादी चळवळीच्या इतिहासावर दिलखुलास मुलाखत देणारे भाई, शंकरशेट रोडवरच्या चाळीपासून ते मनमोहन सोसायटीतल्या प्रशस्त बंगल्यापर्यंत सारख्याच सहजतेने वावरणारे भाई, नवं घर हिंडून दाखवताना लोकांच्या कर्तृत्वाला आनंदाने दाद देणारे, नलिनीताईंच्या चतुरस्रपणाचं कौतुक करणारे भाई, स्वत: चहा करून पाजणारे भाई, विनयच्या साठीला आणि पोरींच्या लग्नांनाही आवर्जून आलेले, प्रसन्नतेने, स्नेहाने माहोल भारून टाकणारे भाई.

अगदी अलीकडे, म्हणजे मागच्या महिन्याच्या पाच तारखेला, गणेश देवींच्या 'नागरिक सभे'च्या कन्सेप्टवर चर्चेसाठी आलेले भाई, ज्या निवेदनावर पहिली सही भाईंची आहे, आणि मध्ये कुठेतरी माझीही.... वाटतंय की आम्ही दोघे एकाच निवेदनावरच्या सह्यांसारखे आहोत, लोकशाही समाजवादाच्या! त्यांची पहिली तर माझी असंख्यांतली एक, इवलीशी.

त्या दिवशी भाईंचा हात नेहमीप्रमाणे हातात घेतला. तो मऊसूत, उबदार हात, आजीच्या हातासारखा. त्याचा स्पर्श आज, नव्हे, हॉस्पिटलमध्ये त्यांना न भेटताच आले त्या दिवसापासून सारखा जाणवतोय.

आणि आठवताहेत ते प्रधानसर गेले तेव्हा मायेने जवळ घेऊन सावरणारे भाई.... भाई, आता कोण सावरणार?.... पोरकं वाटतंय. ***

पुरोगामी चळवळीतील महान नेता भाई वैद्य

आपल्या जीवनप्रवासात प्रामाणिकपणे राजकारण करणारे ज्येष्ठ समाजवादी आणि पुरोगामी चळवळीतील नेते भाई वैद्य यांचे पुण्यातील पूना हॉस्पिटलमध्ये २ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास स्वादुपिंडाच्या कर्करोगाने निधन झाले. ते वयाच्या ८९व्या वर्षी इहलोक सोडून गेले. त्यांच्या निधनामुळे समाजवादी आणि पुरोगामी चळवळीची न भरून निघणारी फार मोठी हानी झाली आहे.

भाई वैद्य यांच्या ८९ वर्षाच्या प्रवासात गोवा स्वातंत्र्य चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय सहभाग होता. आणीबाणीत तर मिसाबंदी म्हणून १९ महिने तुरुंगवास सोसावा लागला होता. तर २५ वेळा कारावास भोगावा लागला. त्यांनी शिक्षण हक्कासाठी केलेला सत्याग्रह आणि त्यानंतर त्यांना मागील वर्षी झालेली अटक हा त्यांचा शेवटचा कारावास ठरला.

कन्याकुमारी ते दिल्ली असा चार हजार किलोमीटरच्या यात्रेत १९८३ साली त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. ही यात्रा जनता पार्टीचे अध्यक्ष चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली होती. केवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशात नाव जरी भालचंद्र सदाशिव वैद्य असले तरी भाई वैद्य या नावाने ते जास्त परिचित होते. त्यांचा मुलगा डॉ. अभिजित वैद्य आणि सून प्रा. डॉ. गीतांजली वैद्य अनुक्रमे प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ आणि प्राध्यापिका असूनसुद्धा त्यांनी शेवटपर्यंत समाजवादाची कास सोडली नाही.

ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांचा जन्म २२ जून, १९२८ रोजी पुणे जिल्ह्यातील दापोडे गावी झाला. त्यांनी वयाच्या १४व्या वर्षी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. यातूनच त्यांचा सक्रिय राजकारणात प्रवास सुरू झाला. त्यानंतर १९७४ ते १९७५ या कालावधीत पुणे जिल्ह्याचे महापौर म्हणून काम केले होते. तर आपल्या महाराष्ट्र राज्याचे सन १९७८ ते १९८० या काळात गृहराज्यमंत्री म्हणून त्यांनी व्यवस्थित जबाबदारी पार पाडली. त्यांच्या गृहराज्यमंत्री पदाच्या कार्यकाळात एका गुन्हेगाराचे साथीदार लाच म्हणून मोठी रक्कम घेऊन आले तेव्हा वैद्य यांनी राज्याचा गृहराज्यमंत्री या नात्याने लाच घेऊन आलेल्या गुन्हेगाराच्या साथीदारांना पोलिसांच्या ताब्यात दिले. तसेच हाफ पँटीत असणारे पोलीस दलातील कर्मचारी फूल पँटीत त्यांच्यामुळे आज दिसत आहेत. कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनात किमान निवृत्ती वेतन व त्याची महागाईशी जोडणी करण्याचे काम त्यांनी केले आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचे पहिले विधेयक त्यांनी मांडले होते. भाई वैद्य यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात संघर्ष करीत असतानासुद्धा जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस, समाजवादी जन परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष, एस. एम. जोशी मेमोरियल मेडिकल ट्रस्ट पुणे अध्यक्ष, खडकी ॲमेन्युनेशन फॅक्टरी वर्कर्स युनियन अध्यक्ष आणि भारत यात्रा ट्रस्ट दिल्ली राष्ट्रीय अध्यक्ष अशी विविध पदे भूषविली आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून आजपर्यंत त्यांना मानाचे असे २५ पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांनी समाजवादी चळवळीबरोबर विविध विषयांवर लेखन प्रबोधन आणि संघर्ष केला. समाजवादी विचारांचा एक लेखक म्हणून एका समाजवाद्याचे चिंतन मंडल का व कसे, अथक आक्रमणाचे अरिष्ट, परिवर्तनाचे साथी व सारथी, शब्दामागचे शब्द इत्यादी त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. भाई वैद्य हे महात्मा गांधी व साने गुरुजी यांच्या विचारांपासून प्रेरित होते. त्यांनी मागासलेल्या लोकांची स्थिती सुधारण्याची व्यापक काम केले. त्यांनी मागासवर्गीयांना धर्मनिरपेक्षतेची ओळख करून दिली.

काल सायंकाळी पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आज गरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व समताधिष्ठित राजकारण करण्यासाठी भाई वैद्य यांच्यासारख्या समाजवादी नेत्याची अधिक गरज पुरोगामी समजल्या जाणाऱ्या आपल्या महाराष्ट्राला आहे. आज त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीतील महान नेता महाराष्ट्राने गमावला आहे. त्यांनी केलेल्या

कार्याचा आपण जर विचार केला तर सध्याच्या तरुण कार्यकर्त्यांनी त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी काम करणे हीच खरी ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या पवित्र स्मृतीस श्रद्धांजली ठरेल. ✻✻✻

साभार: पुरोगामी संदेश– संपादकीय

भाई वैद्य न रहने का अर्थ... **पान क्र. ३९ वरून**

समय है; बागडोर सम्हालो, कूद पहो, मुख्य धारा में, राजनीति के।'' एक वरिष्ठ मार्गदर्शक को नकारना मुश्किल होते हुए भी मैने अपनी हिचकिचाहट बतायी। उनके साथ पारदर्शी होना मुश्किल था ही नही। कुछ सालों बात उन्होंने छोड दिया मेरे जैसे कार्यकर्ताओं को, इस मार्गपर ये नहीं चलेंगे ये समजकर, लेकिन जनआंदोलन के मार्ग पर हर मोड पर साथ रहे ! वामपंथी साथियों का गठबंधन उन्हे अपेक्षित था, लेकिन दलित आंदोलन को भी जोड कर। दलित समुदाय के उभार एवम् अस्मिता के सवालों को उनका हमेशा समर्थन रहा। धर्म-मूलतत्त्ववादियाँ शक्ती जुटाने में अगुवाह रहे भाई वैद्यजी। उसमें पाई सफलता-असफलता के वे पार थे।

... याद है भाई का डोमखेडी तक पहुँचना। तबियत बिलकुल साथ न देते हुए भी उनका पहाडी पट्टी में कईयों के हाथ में हाथ डालकर चढना-उतरना, वह भी चंद घंटो के लिये, एक बडी हासिली थी हमारे लिये। नर्मदा के संघर्ष में, हर जगह पहुँचना ही नही, कार्यकर्ताओं की भूमिका समझकर नेतृत्व के रूप में सराहना, और दिशा निर्देशन में नितनवीन सुझाव रखना, भाई की विशेषता रही। सन १९९० में ५००० पदयात्रियों के, मध्यप्रदेश-गुजरात सीमा पर फेरकुवा में लंबे उपवास में जब देशभर के समर्थकों की ओर से भाई ने प्रधानमंत्री चंद्रशेखरजी से संवाद साध लिया था, तब उनकी अनास्था देखकर निराश ही नही, गुस्सा हो उठे थ! ... तब से, अभी अभी, सोशलिस्ट फाउंडेशन में हुई आखरी सभा में जीवनशालाओं के क्रिडापटु बच्चें को सम्मानित करते, भाई ने तीन दशकों के आंदोलन पर उनकी सुंदर टिप्पणी रखते हुए कहा था - ''इतने चढ-उतार के पार टिके आंदोलन ने विकास की विकृत राजनीति को चुनौती दी है'' - तब मन भर आया था, हम सब का!

एनरॉन के खिलाफ का संघर्ष हो या लावासा का, भाईने विश्वास दिलाया, जीतने का मीटिंग शुरुवात के दौर की, छोटी हो या बडी, भाई अंतिम मंजिल तक पहुंचने का विश्वास दिलाते थे और हम भी जीत ही लेते थे, आधी धरती, आधा आसमान।

भाई युवा पीढी को साथ लेते हुए, शिक्षा के सवाल पर, केजी टु पीजी मुफ्त-समान-समता व समाजवादी शिक्षा की सकसद ले कर निकल पडे थे, आखरी दौर में। राष्ट्र सेवा दल से सोशलिस्ट फाउंडेशन तक संस्था-संगठनों में उनके बुनियादी योगदान से निरंतरता रही और 'सोशलिस्ट पार्टी' के बैनर तले राजनीतिक कदम उठा। इस प्रदीर्घ राजनीतिक, सामाजिक प्रबोधन में प्रधान मास्तर, मधु दंडवते, नानासाहब गोरे, एसेम जोशी, मृणालताई, आवाबेन, कमलाताई, मंगलाताई, निळूभाऊ, सुधाताई, वर्दे जी, आदि से जी. जी. पारीखजी तक के साथ भाई वैद्य जी का योगदान समाजवादी नेतृत्व की झलक दिखलाता है।

संघर्ष और रचना का एक अनोखा संगम समाजवाद की बहती धारा पर छोडकर भाई किस सागर की ओर चले ... और उनके बिना अब हमारे जैसे कईसारे साथी भी बिना थके-रुके किस भूमिपर झंडा गाडकर खडे रहें, आगे चलने के ही लिये, यही सवाल मन में आता है।

भाई की की कई सारा यादें, उनकी सोच, उनकी विविध प्रतिमाओं के साथ आज मनभर है . .

भाई, हम लडेंगे, और जीतेंगे। ✻✻✻

औरंगाबाद येथे भाई वैद्यांना श्रद्धांजली!

बहुआयामी समाजवादी कार्यकर्ता, जाणकार नेता, बोले तैसा चाले असे भाईंचे व्यक्तिमत्त्व, वैश्विक विचार, स्थानिक कृती, त्यासाठी स्वत:प्रयत्न करणारे ज्येष्ठ नेते भाई वैद्य यांनी आपले आयुष्य समाजाच्या विकासासाठी घालवले, त्यांच्या जाण्याने समाजाची खरोखर हानी झाली आहे, अशा भावना व्यक्त झाल्या.

राज्याचे माजी मंत्री, राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष, समाजवादी नेते भाई वैद्य यांचे २ एप्रिल रोजी निधन झाले. सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित सभेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. मंगला खिंवसरा यांनी शोकप्रस्ताव ठेवला. न्या. नरेंद्र चपळगावकर, सभेचे सरचिटणीस ज्ञानप्रकाश मोदणी यांनी प्रास्ताविक केले. न्या. नरेंद्र चपळगावकर, प्राचार्य प्रताप बोराडे, डॉ. प्रदीप जब्दे, ॲड. रमेशभाई खंडागळे, डॉ. रश्मी बोरीकर, डॉ. क्षमा खोब्रागडे, अण्णासाहेब खंदारे, अजमल खान, ॲड. मनोहर टाकसाळ, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक ताराबाई लड्ढा, पुरुषोत्तम हेडा, भिमराव बनसोड, प्रा. विजय दिवाण यांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी समाजवादी पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, लाल निशाण पक्ष, हमाल मापाडी स्वयंसेवक संघ, सरस्वती भवन शिक्षण संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

दै. जनक्रांती

महाराष्ट्राचे 'भाई' – श्रीराम यादव, सदाशिव पेठ

समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ-श्रेष्ठ नेते एस. एम. जोशी व ना. ग. गोरे यांच्या पठडीत तयार झालेले भाई वैद्य हे एक आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी पुण्याचे महापौरपद, राज्याचे गृह राज्यमंत्रिपद, जनता पक्षाचे महामंत्री, भारत यात्रा ट्रस्टचे अध्यक्ष, राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदी पदे सत्कार्यासह भूषविली. त्या त्या पदाचा मान तर राखलाच; त्याहीपेक्षा त्या पदाची उंची त्यांनी आपल्या वर्तनाने वाढविली. मनपा व शिक्षण मंडळ सेवानिवृत्त सेवक संस्थेचे ते दीर्घ काळ अध्यक्ष होते. सभासद या नात्याने माझा त्यांच्याशी अनेकदा संबंध आला. मी शिक्षण मंडळात नोकरी करीत असताना ते महापौर होते. त्यांच्याकडे विविध कामांसाठी सेवक, नागरिक येत. परंतु त्यांनी कधीही, कोणाला विन्मुख पाठविले नाही. महापालिकेसंबंधी खात्यातील अधिकारी असो, नाही तर कारकून असो; त्यांच्याशी संवाद साधताना, एखादे काम सांगताना त्यांच्या बोलण्यात माधुर्य असायचे. उर्मट भाषेत ते कधीही बोलत नसत. त्यांचे चाहते सर्व स्तरांत होते. अत्यंत साधी राहणी, सतत प्रसन्न-हसरा चेहरा, सकारात्मक विचारसरणी असे भाई वैद्य नावाचे व्यक्तिमत्त्व हरपले, त्यांच्या कार्याने ते अजरामर झाले आहेत, हे निश्चित.

साभार: महाराष्ट्र टाइम्स – बहुतांची अंतरे

भाईंच्या मार्गदर्शनामुळे माझी वाटचाल सुकर
माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे यांची कृतज्ञता

ज्येष्ठ नेते भाई वैद्य यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे माझी मंत्रिपदाची वाटचाल सुकर झाली, अशा शब्दांत माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे यांनी वैद्य यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त केली. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर राज्यातील मंत्रिमंडळामध्ये भाई वैद्य यांच्या रूपाने पुण्याला पहिल्यांदाच प्रतिनिधित्व लाभले होते. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही दलाच्या (पुलोद) सरकारमध्ये भाई गृह राज्यमंत्री होते. त्यानंतर काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात हा बहुमान रमेश बागवे यांना मिळाला होता. त्या कालखंडातील आठवणींना उजाळा देताना बागवे यांनी वैद्य यांची महती सांगितली.

मंत्रिपद मिळाल्यानंतर भाईंचे आशीर्वाद घेण्यासाठी मी त्यांना त्यांच्या निवासस्थानी भेटलो होतो. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता मंत्री झाला याचा मला आनंद झाला, अशा शब्दात भाई यांनी माझे अभिनंदन केले होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत गृह विभागाच्या कामकाजाची व्याप्ती समजावून सांगताना भाई वैद्य यांनी मला केवळ मोलाचे मार्गदर्शन केले असे नाही, तर सभागृहात कसे कामकाज करावे याचा गुरुमंत्र दिला, असे सांगून बागवे म्हणाले, विधिमंडळामध्ये कामकाज होते त्यापैकी किमान ७० टक्के विभाग हे गृह विभागाशी संबंधित असतात. भ्रष्टाचाराची प्रकरणे असोत किंवा जातीय दंगली. त्याचा थेट परिणाम हा गृह खात्याशी येतो. त्यामुळे या खात्याचा राज्यमंत्री म्हणून काम करणे ही तारेवरची कसरत असते, असे भाई यांनी मला सांगितले. सभागृहामध्ये विरोधी पक्षाचेच नाही, तर सत्ताधारी पक्षाचे आमदार हे देखील गृह विभागाच्या कामकाजावर टीका करीत असतात. त्या टीकेमुळे आपले लक्ष विचलित होऊ द्यायचे नाही. शांतपणाने प्रश्नांना सामोरे जायचे आणि कोणाचाही अवमान होणार नाही याची दक्षता घेत सभापतीकडे पाहून उत्तरे द्यायची. त्यांनी सांगितलेला हा कानमंत्र अमलात आणून सभागृहामध्ये मी कामकाज केले. भाईंच्या मार्गदर्शनामुळे माझी मंत्रिपदाची वाटचाल सुकर झाली.

माझ्या मंत्रिपदाच्या कालखंडात तत्कालीन पोलीस आयुक्त डॉ. सत्यपाल सिंह यांच्याशी माझे मतभेद झाले होते. त्यावेळी मंत्री हे लोकनियुक्त प्रतिनिधी असल्याने शासकीय अधिकाऱ्याने मंत्रिमहोदयांचा सन्मान ठेवलाच पाहिजे, अशी भूमिका घेत भाई वैद्य यांनी माझी पाठराखण केली होती, असेही रमेश बागवे यांनी सांगितले.

साभार: दै. लोकसत्ता

आदरणीय साथी भाई वैद्य यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष, माजी गृहराज्य मंत्री, ज्येष्ठ समाजवादी नेते साथी भाई वैद्य म्हणत, ''भारतातील प्रत्येक लोकशाहीवादी व समाजवादी नागरिकाने, आपली राष्ट्रीय परंपरा आणि राष्ट्र पुरुषांचे स्वप्न प्राणपणाने जपली पाहिजे. त्यासाठी, धार्मिक राष्ट्रवादाविरुद्ध प्रखर लढा दिला पाहिजे.'' ज्येष्ठ साथी भाई वैद्य हे, प्रखर समाजवादी, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. अशा महान समाजवादी नेत्याचा जन्म, दि. २२/६/१९२८ रोजी, वेल्हे

जवळील 'दापोडे', जि. पुणे या लहानशा खेडेगावात झाला. लहान खेडे गावात त्यांचा जन्म झाला तरी, त्यांनी स्वकर्तृत्वाने, उत्तुंग शिखर गाठले होते. साधी राहणी, साधे पण प्रखर, प्रभावी सत्य बोलणे, यामुळे त्यांनी अनेक माणसं जोडली. शिक्षण, समाजवाद, याबाबत प्रचंड तळमळ असलेले आमचे प्रेरणास्थान ज्येष्ठ साथी भाई वैद्य यांचे दि. २/४/२०१८ रोजी, वयाच्या ८९ व्या वर्षी, स्वादुपिंडाच्या कर्करोगाने निधन झाले. या आजाराने घात केला. शेवटच्या स्थितीत तो लक्षात आला आणि त्याने ज्येष्ठ समाजवादी नेते साथी भाई वैद्य यांना आपल्यातून हिरावून नेले. ते समाजवादी पक्ष आणि समाजवादी अध्यापक सभेचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांचे शिक्षण एम. ए. समाजशास्त्र, एम. ए. - राज्यशास्त्र, बी.टी. पर्यंतचे. वयाच्या १५ व्या वर्षापासून ते राष्ट्र सेवादलाचे पूर्णवेळ सेवक म्हणून प्रभावीपणे काम केले. सन १९६० मध्ये युवक चळवळींच्या अभ्यासार्थ, त्यांनी ११ देशांचा युरोप दौरा यशस्वीपणे केला. विद्यार्थी दशेत त्यांनी सन १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. महात्मा गांधी आणि पूज्य साने गुरुजींच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर होता. सन १९५५ मध्ये त्यांनी गोवामुक्ती आंदोलनात सक्रिय भाग घेतला. या आंदोलनाच्या दुसऱ्या तुकडीत त्यांना जबर मारहाण झाली. सन१९५७ मध्ये त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. त्यात त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. सन १९६५ च्या कच्छच्या सत्याग्रहात त्यांनी सक्रिय भाग घेतला. सत्याग्रह आंदोलन, चळवळ यात एकूण २५ वेळा त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. सन १९६२ ते १९७८ अखेरपर्यंत ते पुणे महानगरपालिकेचे सदस्य (नगरसेवक)होते. या दरम्यान ते सन १९७४-७५ या काळात पुणे महानगरपालिकेचे महापौरपदी होते. सन १९७० मध्ये, पुणे महानगर नियोजन मंडळाचे सदस्य होते. सन १९७० मध्ये आदरणीय भाईंच्या घरी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना झाली होती. पुढे त्यांनी समाजवादी जन परिषदेची स्थापना केली.

सन १९७५ मध्ये अखिल भारतीय महापौर परिषदेचे ते अध्यक्ष होते. पुण्याचे महापौर असताना आणीबाणी विरोधात जाहीर सभा घेतली. हरताळ केला म्हणून सन १९७५ ते १९७७ या काळात त्यांना १९ महिने मिसाखाली अटक केली होती. ते सन १९४६ मध्ये काँग्रेस समाजवादी पक्षाचे सदस्य झाले. त्यानंतर ते प्र.सो.पा., सं.सो.पा. जनता पार्टी यात पदाधिकारी होते. सन १९८६ ते १९८८ पर्यंत ते जनता पार्टीचे राष्ट्रीय महामंत्री होते. सन १९९५ ते १९९९ पर्यंत ते समाजवादी जन परिषदेचे अध्यक्ष होते. सन १९७८ ते १९८० या काळात ते आमदार होते. याच काळात ते महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री होते. या काळात त्यांना लाच देणाऱ्या ७ स्मगलर्स आणि त्यांच्या साथीदारांना ३ लाख रुपयांसह पोलिसांच्या स्वाधीन केले. ते गृहराज्यमंत्री असताना त्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या 'हाफ पँट' चे 'फुल पँट' मध्ये रूपांतर केले. ज्येष्ठ समाजवादी साथी भाई वैद्य म्हणजे अत्यंत निष्ठावंत राष्ट्र सेवा दल सैनिक. त्यांना एवढे मोठे मंत्री पद मिळाले तरी ते ढळले नाही. आपल्या राष्ट्र सेवा दलाच्या विचारांशी प्रामाणिकच राहिले. असे प्रामाणिक मंत्री आज भिंग लावून जरी शोधले तरी सापडणार नाही. त्यांनी विधिमंडळात पहिले नामंजूर विधेयक सादर करून अनेकांची भंबेरी उडवून दिली. आदरणीय साथी भाई वैद्य यांनी 'मंडळ आयोग व अन्य मागास वर्ग' हे सर्वोपयोगी पुस्तक लिहिले. सन १९८३ मध्ये त्यांनी कन्याकुमारी ते दिल्ली अशी सुमारे ४००० किमी.ची पदयात्रा काढली. सन १९८३ ते १९९७ पर्यंत ते भारत यात्रा ट्रस्ट दिल्लीचे सदस्य होते. तसेच ते भारत यात्रा केंद्र परंदवडीचे सन १९८३ ते १९९७ या काळात अध्यक्षही होते. सन २००१ मध्ये ते राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. साधा राष्ट्र सेवा दल सैनिक पूर्णवेळ सेवक ते सक्रिय अध्यक्ष पर्यंतचा त्यांचा समाजवादी शिक्षणासाठीची तळमळ असलेला प्रामाणिक प्रवास हा स्वकर्तृत्वाने भरलेला होता. स्वातंत्र्य सैनिक दुर्वे प्रतिष्ठान सेवानिवृत्त संघटन इत्यादीचे ते सदस्य होते.

समता प्रतिष्ठान पुणेचे अध्यक्ष होते. इंडो-पॅलेस्टाईन असोसिएशन, बुद्धिस्ट असोसिएशन या संस्थांचेही ते अध्यक्ष होते. ज्येष्ठ साथी मधू लिमये लिखित 'समाजवाद : काल, आज व उद्या' माजी पंतप्रधान चंद्रशेखर लिखित 'आर्थिक आक्रमणाचे उद्दिष्ट', राष्ट्र सेवा दल प्रकाशित 'एका समाजवाद्याचे चिंतन' या पुस्तकांचे अनुवाद आदरणीय ज्येष्ठ साथी भाई वैद्य यांनी केले आहे. ते ॲम्युशिन फॅक्टरी वर्कर्स युनियन खडकी पुणेचे अध्यक्ष होते. ते एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशनचे विश्वस्त होते. त्यांना सन १९९५ मध्ये गोवा राज्य सरकारतर्फे 'गोवा क्रांती दिन पुरस्कार'

देऊन गौरविण्यात आले. सन २००० मध्ये भारतीय अल्पसंख्याक संघटनेतर्फे ‘मौलाना आझाद सद्भावना पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात आले. सन २०१ मध्ये बहुजन संस्कृती केंद्र, भंडारदरा तर्फे ‘समता भूषण पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. सन २००२ मध्ये फुले-शाहू-आंबेडकर विचार मंच तर्फे ‘मानवतावादी पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. सन २००३ मध्ये बंधुता प्रतिष्ठानतर्फे शांतिदूत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन २०१६ मध्ये पुण्यभूषण फाउंडेशन त्रिदल संस्थेच्या वतीने त्यांना ‘पुण्यभूषण’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अशा महनीय, आदर्श आदरणीय व्यक्तिमत्त्वाच्या सान्निध्यात काही काळ राहण्याची संधी मिळाली. एवढे मोठे असूनही गर्विष्ठपणा अंगी नव्हता. आमच्यासारख्या सामान्यांची ते आवर्जून विचारपूस करीत. मायेचा हात पाठीवरून फिरवीत चांगले जीवन जगण्याचे प्रोत्साहन देत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील हिंदी, इंग्रजी, मराठी भाषेतील मोठे वृत्तपत्र वाचणारे साथी भाई वैद्य आमच्यासारख्याचे छोटे साप्ताहिक ‘जागृती पर्व’ आवर्जून वाचत. तसे ते प्रत्यक्ष भेटीत तसेच पत्रातून आवर्जून सांगत. त्यांचे प्रत्यक्ष भेटीत सांगणे आणि पत्रातून सांगणे आमच्यासाठी कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठे आहे.

आदरणीय ज्येष्ठ साथी भाई वैद्य म्हणजे समाजवाद आणि शिक्षणाबाबतची तळमळ असलेला एक झंझावात होता. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. आदरणीय ज्येष्ठ साथी भाई वैद्य यांना सा. ‘जागृती पर्व’ परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

साभार: सा. जागृतीपर्व, धुळे

भाई वैद्य अभिवादन सभा

राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष, राज्याचे माजी गृह राज्यमंत्री आणि ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांना अभिवादन करण्यासाठी मुंबईतील विविध संस्था, संघटना आणि पक्षाच्या वतीने रविवार ८ एप्रिल रोजी मुंबईतील दादर येथील सानेगुरुजी विद्यालयात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

शाहीर दत्ता म्हात्रे यांनी देह मंदीर चित्त मंदीर या प्रार्थनेने या अभिवादन सभेची सुरूवात केली. या सभेत मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु आणि माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, आमदार कपिल पाटील, आमदार विद्या चव्हाण, जेष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, जेष्ठ साहित्यिक अर्जुन डांगळे, पत्रकार झेलम परंजपे, गिरीश सामंत, सोशालिस्ट पार्टीचे कमलाकर सभेदार, राष्ट्र सेवा दलाचे मुंबईचे कार्याध्यक्ष शरद कदम, राष्ट्रीय महामंत्री सिरत सातपुते, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि डॉक वर्कर्स युनियनचे अध्यक्ष एस. के. शेट्ये, दीपक राक्षे, अंजली वाघमारे आदींची भाईंना श्रद्धांजली वाहणारी भाषणे झाली.

आयुष्यभर भाईंनी मूल्य जपली आणि धर्मांध आणि जातीयवादी शक्तीच्या विरोधात संघर्ष केला ते अपुरे राहिलेले काम सर्वांनी मिळून पुढे नेणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.

आजच्या सभेला मुंबईतील अनेक संस्था संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया दातार, जयंत धर्माधिकारी, अपना बँकेचे अविनाश सरफरे, उमेश ठाकूर, शांताराम दिवेकर, शेकापचे राजू कोरडे, अपना बाजाराचे

श्रीपाद फाटक, साने गुरुजी राष्ट्री स्मारकाचे जगदीश नलावडे, साने गुरुजी कथामालेचे संतोष केसरकर, राजा देसाई, सुहास बने, गोपाळ आजगावकर, प्रफुल्लता दळवी, विशाल हिवाळे, प्रकाश हिवाळे, सुधाकर सटवे, कमलाकर पवार, चंद्रकांत म्हात्रे, विद्या कांबळे तसेच जनता दल, सोशालिस्ट पार्टी, राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्र संचालन राष्ट्र सेवा दलाच्या महादेव पाटील यांनी केले.


भाई वैद्य अभिवादन सभा


समाजात आदर्श विचारांची जपणूक कशी करावी? चळवळीतील कार्यकर्त्यांचे मन कसे जपावे आणि जीवनात न्याय हक्कासाठी संघर्ष कसा करावा? याचे ज्ञान देणारे भाई वैद्य हे चालते बोलते विद्यापीठ होते, असे मत समाजवादी नेते बापू नेरूरकर यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ समाजवादी नेते, माजी गृहराज्यमंत्री तसेच राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष भाई वैद्य यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बॅ. नाथ पै शिक्षण संस्थेच्या संकुलात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. सिंधुदुर्ग जिल्हा राष्ट्र सेवा दल, जनता दल सिंधुदुर्ग, सोशालिस्ट पार्टी व बॅ. नाथ पै शिक्षण संस्था यांच्या वतीने भाई वैद्य यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. बापू नेरुरकर, माजी आमदार पुष्पसेन सावंत, कमलाताई परुळेकर, कामगार नेते प्रदीप नेरुरकर, जनता दलाचे अध्यक्ष महेश परुळेकर, उमेश गाळवणकर, रमेश बोंद्रे, शशिकांत नेवगी आदी उपस्थित होते. याप्रसंगी श्री. बापू नेरुरकर म्हणाले, भाई वैद्य यांनी गृहराज्यमंत्री असताना पोलिसांच्या हितासाठी अनेक चांगले निर्णय त्यांनी व्यक्त केली. भाई वैद्य यांच्या जाण्याने समाजवादी चळवळीचे व राष्ट्र सेवा दलाचे नुकसान झाल्याचे कमलताई परुळेकर म्हणाल्या. प्रदीप नेरुरकर, महेश परुळेकर, रमेश बोंद्रे, शशिकांत नेवगी उमेश गाळवणकर यांनीही विचार मांडले.

भाईंच्या विविध भावमुद्रा







समाज माध्यमे आणि पत्र नोंदी



देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या आणि स्वातंत्र्यानंतर सामान्य माणसाच्या हिताची भूमिका घेणाऱ्या जयप्रकाश नारायण, मधू लिमये, एस.एम.जोशी या विचारवंतांसोबत भाई वैद्यांनी आपल्या आयुष्यातील मोठा कालावधी घालवला.

पुणे परिसरच नव्हे तर महाराष्ट्र पातळीवर सातत्याने समाजवादी विचाराला शक्ती देण्याचे कार्य भाईंनी केले. कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर आणि तरुण पिढी यांच्या समवेत भाईंनी आपले आयुष्य व्यतीत केले.

महाराष्ट्र विधानसभेमध्ये पुण्याचे प्रतिनिधित्व भाईंनी केले. माझ्या नेतृत्वातील पुलोद मंत्रिमंडळामध्ये त्यांनी गृहखात्याचे मंत्रिपद संभाळले. भाईंनी आपले प्रशासन कौशल्य त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिले.

भाई आज आमच्यामध्ये नाहीत, हे आज आम्हा सर्वांना सहन करणे कठीण आहे. भाईंनी ज्या विचारांसाठी आणि वर्गासाठी अथकपणे आयुष्यभर काम केले त्या विचारांच्या हिताची जपणूक करण्याचा प्रयत्न करणे, हीच भाईंना खरी श्रद्धांजली होईल.

शरद पवार

शोकसंदेश

महाराष्ट्र राज्याचे माजी गृह राज्यमंत्री आणि ज्येष्ठ समाजवादी नेते भाई तथा भालचंद्र सदाशिव वैद्य यांच्या निधनामुळे आपण ध्येयनिष्ठ समाज मार्गदर्शकास मुकलो आहोत. समाजवादाचे ते प्रभावी भाष्यकार होते. सन १९४२ चे आंदोलन, गोवा मुक्ती संग्राम व संयुक्त महाराष्ट्र लढा यातील त्यांचा सहभाग तसेच शेतकरी व कष्टकरी वर्गासाठी त्यांनी केलेली समाजवादाची मांडणी नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारी आहे. त्यांच्या निधनामुळे जयप्रकाश नारायण - एस. एम. जोशी कालखंडाला जोडणारा वर्तमानाचा महत्त्वाचा दुवा निखळला आहे. भाई वैद्य यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली!

रामराजे नाईक निंबाळकर, सभापती महाराष्ट्र विधानपरिषद

शोक संवेदना

राज्याचे माजी गृहराज्यमंत्री, ज्येष्ठ समाजवादी नेते आणि मूल्यनिष्ठेला जीवनात सर्वोच्च प्राधान्य देणारे समाजहितैषी भाई तथा भालचंद्र सदाशिव वैद्य आणि समाजवादी विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड, हे त्यांच्या

जीवनाचे सूत्र होते. सतत अभ्यास आणि चिंतनामुळे समाजवादाचे ते प्रभावी भाष्यकार ठरले. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आणि आणीबाणी विरोधी लढा यातील त्यांचा सहभाग तसेच कष्टकरी-शेतकरी-भजूर वर्गासाठी त्यांनी दिलेले लढे चिरस्मरणात राहतील. भाई वैद्य यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. नियतीचा हा आघात पेलण्याचे सामर्थ्य आपणांस आणि कुटुंबियांस लाभावे, ही ईश्वरचरणी प्रार्थना ...

हरिभाऊ बागडे, अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा

डॉ. अभिजीत - डॉ. सौ. गीतांजली वैद्य

स.न.

अखेरच्या श्वासापर्यंत कर्करोगाशी दोन हात करणाऱ्या ती. भाईंना काळापुढे नमते घ्यावे लागले आणि गेल्या आठ दशकापासून समाजवादी विचारसरणीची त्यांची वाटचाल समाप्त झाली. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात स्वकर्तृत्वाने आपले स्थान अढळ राखणारे ... शेवटपर्यंत सक्रीय राहिलेले आणि समाजवादाचे खंदे लढवय्ये ती. भाई काळाच्या पडद्याआड कायमचे विसावले.

पद असो वा नसो सामाजिक समतेसाठी अविश्रांत प्रयत्नशील असणारे ... मूल्याधिष्ठित राजकारणाचा ... अनेक चळवळींचा मूर्तिमंत आदर्श असलेले ती. भाई आता नाहीत ही कल्पनाच न साहवणारी!!

आमटे आणि आनंदवन परिवाराशी असलेले त्यांचे अतूट नाते काळानेच तोडून टाकले... आपल्याप्रमाणे आम्ही आनंदवनवासीही त्यांच्या प्रेमळ छत्राला कायमचे पारखे झालो.

काही कर्तृत्ववान व्यक्ती त्यांच्या हयातीत जेवढ्या प्रकाशात येतात तितक्याच त्या त्यांच्या वस्तव्यानंतरही तळपत राहतात. त्यांच्या अतुलनीय कार्याची आवर्जून दखल घेतली जाते, स्तुतिसुमने उधळली जातात, अशा व्यक्तींच्या मांदियाळीत ती. भाई सदैव आघाडीवर राहतील. त्यांच्या अशा कायमच्या जाण्याने आपणावर ओढवलेल्या दु:खाच्या सावटात आम्हीही सहभागी होतो आहोत.

स्व. ती. भाई यांच्या पवित्र आत्म्यास शांती अन् सद्‌गती लाभो अन् या असीम दु:खातून सावरण्याचे बळ आपणाला मिळो ही लोकचरणी प्रार्थना!

आपले

डॉ. विकास आमटे, डॉ. सौ. भारती आमटे

भाई वैद्य जी का जाना समाजवादी विचारधारा के परिवार के लिए एक बहूत ही दुखद घटना है। एक कट्टर जनतांत्रिक समाजवादी जो की मूल्यवान राजनीति के पक्षधर रहे और जन आंदोलनों के लिए किसी भी हद तक जाकर दुर्गम में विश्वास जताते रहे है। ऐसे थे भाई जी, जब वे तरुण तुर्क थे तब भी उन्होंने व्यवस्था के ऊपर

सवाल उठाए थे और वैश्वीकरणवादी व्यवस्था तथा सांप्रदायिकता के खिलाफ तो वह अपने प्रखर विचार और वक्तव्य के द्वारा सीधा हमला करते थे। यह कह सकते हैं कि अंतिम दौर तक उसी तरुण तुर्क की भूमिका में एक प्रकार से रहे ।

भाई ने पिछले कुछ सालों मे शिक्षा का मुद्दा उठाकर केजी से पीजी तक शिक्षा मुफ्त हो जैसे कई देशों में है। और वह सामान तथा समाजवादी और समतावादी हो इस बात को उजागर करने से आज के युवा पीढ़ी को एक मंजिल दिखाई थी आज के ताजे मुद्दों से परिचित व्यक्ती हुए भाई जिस प्रकार से उस पर एक संगठित शक्ती और जन जागरणकरना चाहते थे उसका यह न नमूना था।

स्वयं भूतपूर्व मंत्री होने की बात भूलकर आम कार्यकर्ताओं संघर्ष और रचना में लगे हुए युवाओं के साथ सहज आदान प्रदान भाई की विशेषता थी।

उनके स्पष्ट तौर अभ्यास पूर्ण विचार जिसमें नमन उत्तम विश्लेषण हर छोटे-बड़े मुद्दे पर होता था और जो मार्गदर्शक की भूमिका वह निभाते थे उससे कई हमारे जैसे आंदोलनकारी कायम प्रेरणा लेते रहे।

नर्मदा की घाटी में सतपुड़ा की कोख में डोमखेड़ी नाम के पहाड़ी गांव में जहां डूब से टकराने का संघर्ष चलता रहा, वहा भाई अपने शरीर के साथ ना देते हुए भी कैसे पहुंचे आज भी मैं यात करती हूं।

लावासाका संघर्ष शुरू होते ही और पिछला एनरॉन विरोधी संघर्ष में भी भाई वैद्य जी और निसंकोच समर्थन देने वाले मान्यवर साथी रहे।

भाई जी के जाने से एक राजनीतिज्ञ फिर भी दलितों शोषितों के साथ देने वाला सामाजिक मार्गदर्शक हमने खोया है उनको शत-शत प्रणाम और उनके परिवारजनों को दुख सहने की प्रेरणा मिले।

मेधा पाटकर

महान सोशलिस्ट भाई वैद्य के निधन का समाचार सुन कर हृदय को गहरा आघात पहुंचा। उनके जाने से सोशलिस्ट आन्दोलन में ऐसी क्षति होगी जिसे पूरा करना अत्यन्त कठिन होगा। भाई वैद्य ने जीवन प्रयत्न शिक्षा के विकास के लिए महत्त्वपूर्ण कार्य किया। मै अपनी ओर से एवं सोशलिस्ट जनता पार्टी के कार्यकर्ताओं की ओर से भावभीनी श्रद्धांजली अर्पित करता हूँ।

श्यामसुंदर पसरीजा

प्रिय डॉ. अभिजित,

आपले परमपूज्य वडील आद. भाई यांचे काल अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. आद. भाई व माझे वडील डॉ. मोहन धारिया यांचे कित्येक वर्षांपासून खूपच जिव्हाळ्याचे संबंध होते. आद. भाईंच्या व माझ्या

वडिलांच्या समवेत घालविलेल्या आठवणींची मनमोहक चित्रे डोळ्यासमोरुन एका मागून एक पुढे सरकायला लागली. वनराईच्या प्रत्येक कार्यक्रमात आद. भाई आवर्जून उपस्थित रहात असत.

१९८४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत आद. भाई माझ्या वडिलांचे निवडणुक प्रमुख या नात्याने ज्या आत्मियतेने काम करीत होते ते मी पाहिले आहे. एखाद्या कामात सर्वस्व झोकून देऊन काम करण्याची पद्धत मी अनुभवलेली आहे. आद. भाईंच्या दु:खद निधनामुळे महाराष्ट्रातील पुरोगामी विचाराची तसेच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राची कधीही भरून न येणारी अपरिमित हानी झाली आहे. आपण आपल्या दु:खात मला सहभागी करून घ्यावे ही विनंती.

कै. भाईंच्या पवित्र स्मृतींना माझे विनम्र अभिवादन.

आपला

रविंद्र धारिया, अध्यक्ष वनराई

Dear Dr. Abhijit,

We are so sad to hear that Bhai Vaidya has left us. Yet, he will always be with us as a guiding light. The memory of his visit to Lucknow is etched in our minds.

His inspiring oration at the Acharya Narendra Dev Memorial Lecture at Lucknow university was a morale booster for all of us.

It was heartening to see the grand old veteran of Socialist movement keep the flame of his commitment burning.

We will always be grateful to him for taking the trouble to visit Lucknow on our invitation.

We convey our heartfelt condolences to you and the entire family and pray for his peace and salvation.

Yours Truly

Naveen Tewari, Harshvardhan, Surendra Vikram Singh, V. S. Chaube

Along with all the members and office bearers of Acharya Narendra Dev Samajvadi Sansthan, Lucknow.

My dearest kaka! I was out of town and totally disconnected from the world. Please accept my deepest condolences. I always considered Bhai my grand father too. His words, thoughts, unwavering spirit, undying enthusiasm,

extraordinary humanism, sharp yet kind intelligence... have all been an inspiration for me since childhood. His going away is not a loss, it should be in fact a celebration of his beautiful and long life - how he lived it and how he inspired generations. He left this world a little more beautiful & humane. He was the inspiration for me while doing 'Gandhi Of The Month' and I had made a docket for Hollywood legend Harvey Keitel based on Bhai's life. Lets screen that film soon as a tribute to our lovely Bhai.
Much much love
- Kranti Kanadé

Bhai (My grandpa)! You passed away yesterday leaving all of us behind. You fought for freedom and equality from the age of 13 till your last breath when you were 89. An Indian freedom fighter, Mayor of Pune city and as a Home Minister of Maharashtra state, you set parameters as an honest, uncompromising and a reformative politician. Later an activist, an influential thinker and a beloved socialist leader who fought for free health and education, who was always on the side of farmers, hard labour workers, Dalits, and minorities. Went to jail 28 times, fighting for these causes and education, who was always on the side believed in. In the dark times when Prime Minister Indira Gandhi declared emergency against democracy, you gathered 20,000 people in the protest to fight for our democratic values and spent 18 months in jail as a result of that.

All of these sacrifices without any expectation of reward. You never even owned a car. You were happy with four pieces of loose cotton clothes you had. It's tough to believe that you are no more. That deep voice, unending enthusiasm and constant struggle to help people is forever lost now. Its a huge loss for our society, and thats why thousands people cried their hearts out at your funeral yesterday. But you have ignited our minds with your thoughts, ideas and endless love that you gave us. Your life was your message, and we deeply care about the values you taught us through your actions, and we will strive to absorb them and take them forward.
Sohil Vaidya

प्रिय डॉ. अभिजित / डॉ. गीतांजली
यांसी,

भाई गेले. ते असे जातील असे वाटले नव्हते. त्यांचे जाणे हे केवळ तुम्हा कुटुंबीय मंडळींनाच नव्हे तर आम्हासारख्या भाईंवर प्रेम करणाऱ्या अनेक व्यक्तींना पोरके करणारे आहे.

परवा माझ्या अध्यक्षतेखाली कोल्हापुरात भाईंना श्रद्धांजली वाहण्याची शोकसभा झाली, त्यामध्ये अनेक कार्यकर्त्यांनी व संस्था चालकांनी आपण पोरके झाल्याचे दु:ख व्यक्त केले. जो आयुष्यभर जगाचा संसार करतो, त्याच्याच जाण्याने जग पोरके होते. इतरांच्या नाही.

भाईंची आम्हा उभयतांवर केवळ प्रेमच नव्ह तर माया होती. श्रीपतराव शिंदे यांची बहीण म्हणजे माझी धाकटी बहीण म्हणून ते भेटत असत. माझ्या अमृत महोत्सवाच्या प्रसंगी आदल्या रात्री भाई औरंगाबाद ते कोल्हापूर असा ५०० किमी. चा प्रवास करून मला आशिर्वाद देण्यासाठी आले, ही गोष्ट मी कशी विसरेन!

दि. १० मार्च रोजी, परवा, भाई माझ्या विनंतीवरून माझ्या छ. राजारामचरित्र ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यास उपस्थित राहिले. (नंतर मला समजले की त्यावेळी त्यांचे कॅन्सरचे निदान झाले होते!) याचा मला आता अचंबा वाटतो. केवढे हे सामाजिक भान. केवढी दुर्दम्य इच्छाशक्ती!

भाई म्हणजे निरागस मनाचे व्यक्तिमत्त्व. अशी निगर्वी, निष्पाप, निरागस, निस्वार्थी व निरामय जीवन जगणारी माणसे असू शकतात, यावर आजच्या पिढीचा विश्वास बसणे कठीण आहे.

असे म्हणतात की, महापुरुषाची निर्मिती होते तेव्हा देव त्याची मूस मोडून टाकतो. त्यामुळे पुन्हा तसाच महापुरुष होत नसतो. भाईबद्दल असे वाटते. भाईंची मूसच वेगळी होती. ती देवाने त्याच वेळी मोडून टाकली असल्यामुळे आता दुसरे भाई वैद्य मिळणे कठीण आहे!

खरं म्हणजे भाईंवर किती लिहावे, असे होऊन गेले आहे! त्यांनी माझ्या शाहू ग्रंथासाठी गेल्याच महिन्यात शाहूराजांवरचा लेख दिला आहे. बहुदा तो त्यांचा शेवटचा लेख असावा. ग्रंथ जूनमध्ये प्रकाशित होत आहे.
कळावे
आपला
जयसिंगराव पवार वसुधा ज. पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी
ता. क. खरं म्हणजे आम्ही येऊन जायला हवे पण मला उन्हाळ्याचा फार त्रास होत आहे. अगदी फोड येण्याइतका. त्यामुळे इच्छा तीव्र असूनही आलो नाही, याबद्दल तुम्ही क्षमा कराल अशी आशा आहे.

स.न.

आदरणीय श्री. भाई वैद्य ह्यांच्या निधनाने राष्ट्रसेवा दल, समाजवादी कार्यकर्ते, प्रागतिक वैचारिक कार्यक्रम अंमलात आणून पहाणाऱ्याचा एक आधारवड निखळला आहे.

त्यांच्या स्मरणास आमचे सहस्त्र प्रणाम.

मराठवाड्याच्या ह्या भागात सेवादलाचा विचार आता तो मा. गंगाप्रसादजी अग्रवाल , श्री. भाई वैद्य व डॉ. बापू काळदाते ह्यांच्या प्रयत्नांमुळे हे निर्विवाद एक नवीन विचारांची पिढी त्यांनी तयार करून ठेवली आहे. त्यामुळेच श्री. भाऊरानडे, डॉ. अंबिके ह्यांच्यासारखे निग्रही कार्यकर्ते येथे येऊन सामान्य जनांच्या विचारात प्राण ओतून गेले. मा. एस. एम., ना. ग. गोरे, बाबा आढाव, सारखे कार्यकर्ते येऊन राजकीय दिशा दाखवून गेले.

मा. भाई वैद्य ह्यांच्यामुळे हे प्रागतिक विचार सगळे, वाटले व कार्यप्रवृत्त झाले. कोणतेही सामाजिक समाज जीवन वृद्धीचे कार्य त्यांना न संकोचता आपण मानून त्यास मदत केली त्याचे हे उपकार येथील जनता कदापिही विसरणार नाही.

हैद्राबाद संस्थान असतांना आर्यसमाजाचे कार्य सर्व अडचणीची तोंड देत धैर्याने करणारी काही मंडळी येथे होती. त्यांनी एक शिक्षण संस्था काढून तरुणांची मने तयार करण्याचे काम सुरू केले होते. तेव्हाच्या सरकारमुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असे.

त्यांना शाळा वाढविण्याकरिता मोठ्या जागेची आवश्यकता होती व तेव्हाच रझाकारी सरकार ती मिळू देत नसे. आणिबाणीनंतर मा. भाई वैद्य गृहमंत्री झाले. तेव्हा ह्या कार्यकर्त्यांनी शाळेच्या जागेकरिता आम्या वतीने प्रयत्न केले.

श्री. भाईंनी सर्व माहीती घेऊन शाळेचे व कार्यकर्त्यांचे उत्कृष्ठ प्रामाणिक व अपरिवादी कार्य पाहून ह्या शाळेच्या सरकारी कक्षांनी एक मोठी जागा मिळवून दिली.

आणि त्या जागी मुलांचे हायस्कूल, मुलींचे हायस्कूल, ज्यु. कॉलेज असून ३००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एक दर्जेदार शाळा म्हणून ती प्रसिद्ध आहे. इमारत तयार होत असावीत. श्री. भाई येथे आले असता त्यांनी त्यांचा मोठा सत्कारही केला होता. त्यांचे उपकार नेहमीकरिता लक्षात राहण्यासारखेच आहेत.

श्री. भाईंच्या पूण्य स्मृतीस मन:पूर्वक अभिवादन.

आपले

व.द. भाले शांता भाले

Dear Dr. Abhijit,

Mohites were deeply grieved to know about sad demise of your beloved father on 2nd April 2018, Mohites extend to you and your family their heartfelt condolences over his demise.

He came from a village and had joined freedom movement at 14 years of age. With his demise, the nation has lost a great veteran socialist. Not only he became the Mayor of Pune but he was honored to be the first President of the All India Mayors Association. He was the Minister of State for Home, Maharashtra, who changed policemen's uniform from shots to full slacks. He had also led Sayunkta Maharashtra Movement. He was responsible for forming of Unions of unorganized workers in Maharashtra. His contribution to the field of education is undoubtedly unparalleled.

I consider myself to be very fortunate to have had interaction with him as young Superintendent of Police, Ahmednagar when he visited Shrirampur as a Minister of State for Home, Government of Maharashtra.

While returning from Shrirampur he asked his security staff to move into my staff car and asked me to get into his staff car. On way to Ahmednagar, after he enquired about my family background, he straightway came to the point started knowing from me about the causes of corruption and measures that need to be taken for its eradication. Ahmednagar was my first independent charge. I was honest enough in my forthright answers to his questions. This interaction proved it beyond doubt that he was deeply concerned with the improvisation of police image. He enjoyed reputation as a politician with clean image, a leader, a leader of impeccable integrity, a man of character who dedicated his entire life for the upliftment of socially and educationally backward ones.

May the Almighty give you enough strength and courage to face this tragedy and overcome the irrecoverable loss.

May the departed soul rest in peace.

Regards,

Bhujang S. Mohite, IPS (Retd)
Majiwade, Thane(West)

डॉ. अभिजित वैद्य यांना स. न.

भाईंच्या अंत्यदर्शनासाठी साने गुरूजी स्मारकावर आलो तेव्हा आपणास भेटलो होतो. नमस्कारापलीकडे अशा प्रसंगी बोलता येत नाही म्हणून भाईंविषयीच्या भावना व्यक्त करण्यासाठी हे पत्र.

भाईंची कॅन्सरशी निकराची झुंज चालू असल्याचे कळले होते. पण त्या वेळी भेटायला येता आले नाही याची आता रुखरुख वाटते. मी सारनाथला असताना माझ्या मुलाचा समीरचा फोन आला की भाईंची प्रकृती चिंताजनक आहे. वाटले की डॉक्टरी इलाजांनी ती सुधारेल. पण तसे व्हायचे नव्हते हेच खरे. अखेर भाईंचे अंत्यदर्शनच घ्यावे लागले.

आमची पिढी भाईंसारख्यांच्या बौद्धिकांवर पोसली. मी भाईंच्या प्रथम संपर्कात आलो त्यालाही आता पन्नास वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. भाई गेल्यानंतर या काळातील अनेक आठवणी जाग्या झाल्या. भाईंशी झालेल्या भेटीगाठी, पत्रव्यवहार, भाषणे, पक्षाचे व चळवळीचे काम, सेवादलाची शिबिरे, परिवर्तनाचे लढे - सारे डोळ्यांपुढे तरळून गेले. भाईंचा अन् बाबांचा शब्द हा आदेश मानून काम करताना मिळालेले समाधान आठवले. कधीकधी काही निमित्ताने उडालेले खटके आणि त्यातून आलेला तात्कालिक दुरावाही आठवला. पण हा दुरावा अल्पकालीन ठरला. संबंधातील कडवटपणा विसरून पुन्हा मधुर संबंध निर्माण झाले. ह्या आठवणी म्हटल्या तर व्यक्तिगत म्हटल्या तर चळवळीच्या इतिहासाचा आंशिक भाग ठराव्यात.

१९६५ सालच्या महागाई विरोधी आंदोलनात भाईंचे भाषण सर्वांत प्रथम ऐकल्याचे स्मरते. शाळकरी विद्यार्थी असलेला मी त्याने चांगलाच प्रभावित झालो. त्यावेळी मी जुन्नर तालुक्यातील राजुरीच्या हायस्कूलमध्ये १० वीला शिकत होतो. जुन्नर तालुक्यात संसोपाचे काम करणाऱ्या शिवाजी जाधवांनी मला हेरले आणि मीही त्यांच्या संपर्कात आलो. साथी शिवाजीरावांनी त्यांच्या बोरी गावात समाजवादी युवकांचा एक मेळावा घेतला. त्याचे प्रमुख पाहुणे भाई होते. मला वाटते मेळावा डिसेंबर १९६५ मध्ये झाला. आमच्या राजुरी गावापासून बोरी आठ किलोमीटर अंतरावर आहे. मी या मेळाव्यासाठी माझ्या ३३ मित्रांना घेऊन सायकल मोर्चाने गेलो. दिवसभराचा मेळावा मोठ्या जोशात झाला. संध्याकाळी बोरी गावच्या मध्यवर्ती चौकात भाईंची तडाखेबंद सभा झाली. दिवसभराची शेतीची कामे उरकून गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. साथी शिवाजीराव त्या गावचे. ते कुंभार या अल्पसंख्य समाजाचे. गावच्या लेखी त्यांना फारशी प्रतिष्ठा नव्हती. पाव बटर विकून, लाल टोपी घालून काम करणारा हा कार्यकर्ता तसा गावकऱ्यांच्या चेष्टेचा विषय होता. पण दीन दुबळ्यांना तो आपला वाटत होता. त्याला बळ आणि प्रतिष्ठा देण्याचे काम भाईंच्या भाषणाने केले. भाषणात भाई म्हणाले, 'तुमच्या साथींचे एक पोस्टकार्ड मला आले आणि त्यामुळेच मी या गावात आलो. साथी पोस्टकार्ड, निरोप हा आमच्यासाठी आदेशच असतो.' गावकरी साथींकडे कौतुकाने पाहू लागले. पुढे भाई म्हणाले, 'हा साधा माणूस नाही. सत्याग्रह करून पोर्तुगिजांशी गोव्यात लढलेला स्वातंत्र्य सैनिक आहे.' त्यावर टाळ्या पडल्या व गावात साथींचे वजन एकदम वाढले. कारण साथी शिवाजीराव होतेच तसे निष्ठावंत

समाजवादी कार्यकर्ते. भाई, बाबा आचार्य केळकर, बा.न. राजहंस, श्यामकांत मोरे, रामभाऊ तुपे यांचे विश्वासू सहकारी. पण गावकऱ्यांना त्यांची माहिती नव्हती. भाईंच्या बोलण्यातून ती मिळाली. गावात शिवाजीरावांना वेगळी प्रतिष्ठा प्राप्त झाली. खरोखरीच भाईंनी सामान्य कार्यकर्त्यांच्या साध्या पत्रांना नेहमीच प्रतिसाद दिल्याची असंख्य उदाहरणे आहेत. त्याच सभेत भाईंनी मी व माझ्या विद्यार्थी सहकाऱ्यांचा खास उल्लेख करून कौतुकाची थाप आमच्या पाठीवर टाकली. आणि तेव्हापासून मी चळवळीतला कार्यकर्ता म्हणून भाईंशी कायमचा जोडला गेलो.

तीन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. साथी शिवाजीराव कॅन्सरने आजारी होते. वयाच्या ऐंशीव्या वर्षी ते अंथरुणाला खिळून होते. मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी भाईंना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. मी भाईंना फोन करून तशी विनंती केली. साथींनी भाईंना भेटण्याचा ध्यास घेतल्याचे मला जाणवले होते. कारण आता त्यांनी अन्नपाणीही वर्ज्य केले होते. माझ्या फोननंतर थोड्या वेळाने भाईंचा परत फोन आला. 'तू तीन तासात आळेफाट्याला ये. मी पुण्यावरून निघतो. निरफराके यांना घेऊन भाई आले. बोरीत शिवाजीरावांच्या घरी गावातील त्यांचे मित्र जमा झाले. भाईंच्या भेटीने साथी गहिवरले. आम्ही भाईंच्या हस्ते शाल देऊन साथींचा सत्कार केला. अन्नपाणी सोडलेले आणि गेले काही दिवस बोलतही नसलेले साथी भाईंशी व आमच्याशी बोलू लागले. जणू त्यांचा आजारच पळाला. साथींसारख्या कार्यकर्त्यांना चळवळीने काय दिले माहीत नाही, पण भाईंनी त्या प्रसंगी केलेल्या छोट्याशा भाषणात जे कौतुकाचे शब्द सांगितले तीच साथींच्या आयुष्यभरातील कामाची पोच होती. कार्यकर्त्यांविषयीची कृतज्ञता भाईंकडून नेहमीच अनुभवावयास मिळाली. पुढे दोन चार दिवसातच साथी शिवाजीराव गेले. समाधानाने गेले. भाईंनी दिलेली शाबासकी अभिमानाने मिरवत गेले.

मला आठवते की, शिवाजीरावांच्या सोबतच मी भाईंना भेटण्यासाठी गुरुवार पेठेतील भाईंच्या घरी प्रथम गेलो ते साल १९६६ असावे. पुढे कामानिमित्त व तसेही अनेकदा भाईंकडे जात राहिलो. भाई जेव्हा संगमनेरला येत तेव्हा माझ्या घरी हक्काने येत. माझ्या एक-दोन नाही तर चार पुस्तकांचे प्रकाशन भाईंच्याच हस्ते झाले. माझ्या लेखनाचे भाई चहाते असल्याचे सांगत तेव्हा मला लेखनासाठी मोठे बळ मिळत असे. कौतुक करताना मोकळ्या मनाने करीत आणि प्रसंगी फटकारताना मागे पुढे पाहत नसत. असे दोन्हीही अनुभव मी घेतले आहेत. 'लोकपरंपरेची सत्वधारा' या माझ्या पुस्तकाला भाईंची प्रस्तावना लाभली हा माझ्या अभिमानाचा विषय आहे.

भास्करराव दुर्वे स्मारक प्रतिष्ठानच्या विश्वस्त मंडळात मला भाईंबरोबर काम करण्याची संधी एक तपाहून अधिक काळ मिळाली. त्यावेळी भाईंच्या कामाचा झपाटा पाहून मी चकित व्हायचो. डॉ. महाले, किशोर पवार आणि भाईंच्या समवेत काम करण्याची संधी मला या निमित्ताने मिळाली अनेक समस्यांची यशस्वी सोडवणूक करून किशोरभाई व भाईंनी हे काम मार्गी लावले. विश्वस्त सेक्रेटरी म्हणून मी त्यांच्या सोबत होतोच. दुर्वे स्मारकाची इमारत उभी राहिली तेव्हा मिळालेले समाधान शब्दात सांगता येणार नाही. भाईंमुळेच दुर्वे प्रतिष्ठानला चंद्रशेखरांची भेट दिली. स्मारकाच्या उद्घाटन समारंभाला नानासाहेब गोरे, अण्णासाहेब शिंदे, दादासाहेब रूपवते, दत्ता देशमुख,

खताळ पाटील, कॉ. पी. बी. कडू, भाऊसाहेब थोरात, माधवराव लिमये, बाळासाहेब थोरात असे दिग्गज भाई व किशोरभाई यांच्या प्रयत्नातूनच येऊ शकले. अत्यंत देखणा व हृद्य असा हा कार्यक्रम झाला. विश्वस्त मंडळाचा सेक्रेटरी म्हणून मला या कार्यक्रमात सन्मानाने मिटवता आले.

भाईंच्या विषयी कमालीचा आदर असला तरी कधी कधी त्यांना विरोध करायचीदेखील वेळ येई. हा विरोध कार्यकर्ता म्हणून असे. त्यामुळे संबंधात तणाव निर्माण होणे साहजिक होते. पण हा तणाव फार काळ टिकत नसे. मी १९७३ ते ७५ च्या दरम्यान शिक्षणासाठी पुण्यात होतो. समाजवादी युवजन सभेचं काम करायचो. बा. न. राजहंसांच्या नेतृत्वाखालील शेतकरी शेतमजूर पंचायतीचं काकाकुवा मॅन्शनवरील महाराष्ट्र कार्यालय सांभाळायचो. त्याच ठिकाणी समाजवादी पक्षाचे कार्यालयही होते. सगळ्या समाजवादी नेत्या कार्यकर्त्यांत वावरण्याची संधी मिळायची. त्यावेळी भाई पुण्याचे महापौर होते. याचा आम्हांला खूप अभिमान होता. त्यावेळी पुण्यात राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद आले होते. त्यांना पुणे महापालिका मानपत्र देऊन सत्कार करणार होती. सयुसच्या तरुण कार्यकर्त्यांना हे पटले नाही. त्या समारंभाचा निषेध करणारे पोस्टर आम्ही काढले व पुण्यात जागोजाग लावायचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी तो हाणून पाडला. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशीच अम्हा चौघाजणांना पकडण्यात आले. पण हा निषेध भाईंना आवडला नाही. आवडणार कसा? महापौर पदावर राहून शिष्टाचार पाळण्याचा तो भाग होता. पण पोरसवदा असणाऱ्या आम्हा भडक डोक्याच्या तरुण मनांना हे पटणार कसे? आम्हाला त्यावेळी भाई समजून घेता आले नाहीत. असाच दुसराही एक प्रसंग आहे. एका जैन धर्माच्या साध्वी म्हणून अल्पवयीन मुलींना दीक्षा देण्याचा समारंभ होता. तिथे महापौर म्हणून भाई गेले व ते आम्हांला मान्य नव्हते म्हणून आम्ही बाहेर निदर्शने केली. भाई बाहेर आल्यावर आम्हांला म्हणाले की, 'तिथे मी काय बोललो हे महत्त्वाचे आहे. तिथे मी अशा प्रकारांचा निषेधच नोंदवला.' पण कडवटपणा आला व तो बराच काळ टिकला. मी दुर्वे प्रतिष्ठानचा 'विश्वस्तपदाचा' राजीनामा देऊ नये असे भाईंना वाटत होते, पण मी ते मानले नाही व त्यामुळेही भाई माझ्यावर रागावले. हा रागही कालांतराने वितळला.

पुढे मी लेखनाकडे वळलो. माझ्या लेखनाचे भाईंनी सर्वत्र कौतुक केले. माझ्या चार पुस्तकांच्या प्रकाशनासाठी ते आले. त्यावर त्यांनी मला पाठवलेली पत्रे मी जपून ठेवली आहेत.

आमच्या कुटुंबावर भाईंनी खूप प्रेम केले. आपल्या नातवंडासारखेच माझ्या मुलांना आणि नातवंडांना वागविले. असे भाई आपणा सर्वांनाच सोडून गेले आहेत. तुमची व कुटुंबाची मन:स्थिती कशी असेल हे मी समजू शकतो. भाईंच्या वाटेने चालणे हेच आपल्यासाठी योग्य आहे.

कळावे,

मा. रा. लामखडे, संगमनेर, अहमदनगर

डॉ. अभिजित वैद्य आणि सर्व कुटुंबिय

माननीय भाई वैद्य यांची जीवनज्योत मालवली त्यामुळे आम्हा सर्वांना झालेल्या दु:खात आम्ही सर्व त्यांच्या कुटुंबीयांसारखेच असलेले कार्यकर्ते ही दु:खी झालो आहोत.

आतापर्यंत या वयातही सभांसारख्या उपक्रमात सहभागी होत अनेकांना आपल्या मार्गदर्शक, परखड विचारांनी समाजकार्यात गुंतवून ठेवणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व हरपले आहे. समाजवादी विचार म्हणजे काय याची नुस्ती भाषणबाजी न करता समाजाच्या अनेक समस्यांना अभ्यासपूर्वक, विचारपूर्वक उत्तरे शोधून धोरणे आखून कार्यकर्त्यांना कार्यरत कसे ठेवावे हे त्यांच्याकडूनच शिकावे. राजकारणात राहून समाजाशी सतत जोडलेले, निस्पृहतेने वागणारे, कोणतीही अन्याय्य घटना आढळल्यास लढणारे - आजच्या लाचलुचपतीच्या राजकारणात अडकले नाहीत हेच बरे.

त्यांनी आमच्या महिला संघटनांना, समाजवादी महिला सभा आदिवासी सहज शिक्षण परिवार संस्थेला, त्यांच्या कामाला व कार्यकर्त्यांना नेहमीच आधार दिलेला आहे. त्यांचे विचार, संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आचरणात ठेवलेले आहेत.

स्वत: अनेक अडीअडचणी, संकटे सोसली, पण ध्येयवादी विचार सोडले नाहीत. सत्तेत असतांना अल्पस्वल्प काळातही त्यांनी स्वत:च्या पदाचा वापर समाजासाठीच कसा होईल हेच पाहिले.

समाजवादी अध्यापक संघ व शिक्षण मोफत व्हावे यासाठी त्यांचा प्रदीर्घ आणि या वयातही चालू असलेला लढा त्याला यश मिळावे ही आमची खूप इच्छा आहे.

मा. भाई शरीराने पंचत्त्वात विलीन झाले असले तरी त्यांच्या कर्तृत्वाने, अफाट जनसमुदायरूपी कार्यकर्त्यांच्या मनात व कार्यात चिरंतन जीवंत राहतील हेच सत्य आहे.

भाईंचा कौटुंबिक वारसा जपत आपणही त्यांचे कार्य पुढे नेत आहातच त्यात यशच लाभेल.

आपल्या सन्होंकित

सुधा रणदिवे

आदिवासी सहज शिक्षण परिवार मालवण

समाजवादी महिला सभा महाराष्ट्र, पुणे.

हमाल पंचायतीच्या सचिव मंडळाची बैठक दिनांक ५ एप्रिल २०१८ रोजी अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांचे अध्यक्षतेखाली भवानी पेठेतील कचेरीत झाली. या बैठकीत पुढील ठराव एकमताने संमत करण्यात आला.

ठराव

ज्येष्ठ समाजवादी नेते, विचारवंत व हमालपंचायतीचे पहिले सत्याग्रही आदरणीय भाई वैद्य यांचे सोमवा २

एप्रिल २०१८ रोजी अल्प आजाराने निधन झाले. भाईंनी हमाल पंचायतीच्या कामांमध्ये सक्रीय योगदान दिले, भाईंनी हमाल पंचाायतीच्या भवानी पेठेतील ऑफिसला जागा मनपाकडून मिळवून दिली. हमालांचे घर व्हावे यासाठी हमाल नगर उभारण्यासाठी त्यांचे मंत्रीपदाचे काळात पाच एकर जागा शासनाकडून हमालांचे घरासाठी दिली. वेळोवेळी त्यांनी संस्थेला मार्गदर्शन केले. नि:स्पृह, सदैव लोकांसाठी काम करणारे भाई हे हमालांच्या आयुष्यात अनमोल ठेवा म्हणून त्याकडे व त्यांचे कार्याकडे पाहिले जाईल. भाईंनी आपल्या कामात समाजाच्या व्यापक हिताची भूमिका घेतली. कधीही मूल्यांशी तडजोड केली नाही. नैतीक काम कसे असावे याचा आदर्श म्हणजे भाईंचे जीवन.! भाईंचे जीवनकार्य हमाल पंचायतीला सदैव मार्गदर्शक व प्रेरणादायी राहील. त्यांच्या निधनामुळे कष्टकऱ्यांच्या चळवळीचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. एक आधारवड गेला! भाईंच्या निधनामुळे वैद्य कुटुंबियांवर झालेला आघात व या दु:खात हमाल पंचायत, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ व सर्व कष्टकरी वर्ग सहभागी आहे.

भाई वैद्य यांचे स्मृतीस भावपूर्ण आदरांजली.

नवनाथ ज्ञा. बिनवडे
सरचिटणीस, हमाल पंचायत, पुणे.

डॉ. अभिजित वैद्य यांना,
सस्नेह नमस्कार.

आपली प्रत्यक्ष ओळख नाही आणि आपण एकमेकांना भेटलेलोही नाही. भाई मात्र मला माझ्या लहानपणापासून ओळखत होते. कारण भाई आमच्या घरी म्हणजे डॉ. मंडलीक यांच्याकडे अनेक वेळा येत असत. एक दोन वेळा मी तुमच्या घरीही येऊन गेल्याचं मला आठवत आहे. आज भाई गेल्यावर पत्र लिहिण्याची वेळ आली. असो.

परवा व्हाटस्‌ॲपवर कुणाचा तरी मेसेज वाचला की भाईंची तब्येत बरी नाही आणि प्रकृती चिंताजनक आहे. तेव्हाच मनात पाल चुकचुकली होती.

गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, आणिबाणीतील त्यांचा तुरुंगवास, आणि पुलोद सरकारमध्ये गृहमंत्री पदाची जबाबदारी, या सर्व गोष्टी मी पाहिल्या, ऐकल्या आहेत.

डॉ. मंडलीक ट्रस्टचं काम मी करायला लागल्यावर आणि नंतर कार्यकारी विश्वस्त झाल्यावर त्यांना माझं कौतुक वाटलं होतं आणि त्यांनी ते प्रत्येक भेटीत बोलूनही दाखवलं होतं.

असो आता फक्त आठवणीच राहिल्या.

तुम्हा सर्व कुटुंबियांच्या दु:खात मी स्वत: आणि डॉ. मंडलीक ट्रस्ट परिवार सहभागी आहे.

कळावे,
आपली
नीला पटवर्धन, कार्यकारी विश्वस्त मंडलीक ट्रस्ट

मा.अभिजित वैद्य परिवार,

आपले आश्रयदाते जेष्ठ मार्गदर्शक आपले वडील पू. श्री. भाई वैद्य हे आपल्याला सोडून परलोकी गेले. असो परमेश्वराची इच्छा त्याच्या पुढे कोणाचेच काही चालत नाही. धूत परिवार अलोट दु:ख सागरात अंत:करणापासून सहभागी आहे. आपणास पुढील कार्य करण्यास सामर्थ्य देवो. आपल्या परिवारातील सर्वांचे प्रकृतिस्वास्थ्य उत्तम राहो हीच त्या परमेश्वरचरणी प्रार्थना! एक राजकारणी त्यागी मार्गदर्शक गमावल्याने कंठ दाटून आला, पण आपणास मार्गदर्शन कठोर परिश्रम व कार्य हे अखंडपणे पुढे चालू ठेऊ हाच मोठा आधार होय. मृतात्म्यास चीरशांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

कळावे
नरेंद्र नंदलाल धूत
(पुणेकर नागरिक)

मा. श्री. डॉ. अभिजित वैद्य,
महोदय

आपले वडील व ज्येष्ठ समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांचे आकस्मिक निधन झाल्याची वार्ता समजली. त्यांच्या निधनाने आपल्या कुटुंबियांवर व संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. भाई वैद्य यांनी आपल्या जीवनात राष्ट्र सेवादलाचे माजी अध्यक्ष, महामंत्री, महाराष्ट्राचे गृहराज्य मंत्री, पुणे महापालिकेचे माजी महापौर तसेच अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेचे माजी अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र व देश पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. त्यामुळे त्यांनी केलेले कार्य हे न विसरण्यासारखे आहे.

आज जरी ते आपल्यात नसले तरी त्यांच्या कार्याने व विचाराने आमच्या मनात कायमपणे स्मरणात राहतील. त्यांच्या आकस्मिक जाण्याने वैचारिक क्षेत्रामध्ये एक पोकळी निर्माण झाली असून ती कधीही न भरून येणारी आहे.

अशा या थोर समाजवादी लढवय्या विचारवंतास आलासे परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली.

श्री. राजेंद्र सुरेंद्र आलासे, श्री. रविंद्र सुरेंद्र आलासे
कुरुंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

प्रिय डॉ. अभिजीत वैद्य व सौ. प्राची ताई,
सा. न. वि. वि.

भाई वैद्य यांच्या निधनाने आपल्यावरील पितृछत्र हरपले. पितृछत्र हरपणे म्हणजे काय याची प्रचीती मी तरुण वयात घेतली आहे. भाईने वैवाहिक जीवन सुरु करण्यापूर्वी पासून आमचा स्नेह होता. नातू बागेतल्या झोपडीवजा खोलीत भाई अनेक मित्रांना घेऊन येत. खूप चहा प्यायचो. भाईने साने गुरुजींच्या अनेक धडपडणाऱ्या मुलांना वैचारिक अधिष्ठान दिले. राम ताकवले, सुदाम ताकवले, मी, मधु निरफराके, निळू फुले, चंदू बोराटे आम्ही सर्वजण आयुष्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रात गेलो. भाईने दिलेल्या व प्रधान मास्तरांनी संस्कारीत केलेल्या आम्हा सर्वांना आयुष्यात निर्मितीचा आनंद घेता आला. भाई तळमावल्याला माझ्या ग्रामीण महाविद्यालयात दोन दोन तीन तीन दिवस मुक्कामाला येत. माझ्या ग्रंथालयात कोणती पुस्तके हवीत हे ते सांगत. माझे अफाट वाचन भाईमुळे व प्रधान मास्तरांमुळे झाले.

लालजी कुलकर्णी प्रजा समाजवादी, भाई संयुक्त समाजवादी त्या काळातच माझी मानसिक ओढाताण होऊन मी दैनंदीन राजकारणातून बाजूला झालो. भाईला शब्द दिल्याप्रमाणे प्रधान मास्तर व पन्नालाल सुराणाच्या पदवीधर मतदार संघातील निवडणूक मात्र जीव ओतून करीत असे. समर्पण, आत्मीयता, कार्यकर्त्यांबद्दलचे प्रेम, त्यांच्या कुटुंबियांबद्दलची आस्था हे भाईचे वैशिष्ट्य होते. माझी पहिली पत्नी कॅन्सरने आजारी असताना भाई लोकसभेच्या निवडणुकीला उभे होते तरीही वेळ काढून नारायणपेठेत माझ्या श्वशूरगृही येऊन माझ्या पत्नीला भेटले. माझ्या मुलाची बायपास झाली ते वारजाला पहायला गेले. माझी बायपास झाली तेव्हा नेल्सन मंडेलाचे आत्मचरित्र घेऊन आले. मला म्हणाले, पुरुषोत्तम हृदयविकारी व्यक्तीने एक वर्ष पूर्ण विश्रांती घेतली पाहिजे. नेल्सन मंडेला २७ वर्षे तुरुंगात होते. एकट्याला रहाता येते हे तू शिकशील. माझ्या बरोबर कोकणात अनेकवेळा आले.वडघरचे साने गुरुजी स्मारक येथे तीन दिवस आम्ही एकत्र राहिलो. धावत्या भेटीपेक्षा भाईबरोबर २/३ दिवस एकत्र राहणे म्हणजे सरस्वतीची उपासना. भाईबरोबर आणिबाणीत तुरुंगवास पत्करणारे डॉ. लिलाधर केणी व भाई माझ्याकडे तळमावल्यास राहीले. लिलाधर केणीनी समुद्रात बुडालेल्या द्वारकेचे अवशेष हे स्लाईड शो द्वारा दाखविले. माझे सेवादलातले आयुष्य म्हणजेच एक खजिना. या खजिन्यातील रत्ने म्हणजे भाई वैद्य, प्रधान मास्तार, बाबा आढाव, वसंत पळशीकर. शिवाजी विद्यापीठात एनएसएस चा सर्वोत्कृष्ठ अधिकार माझा मानला जायचा. खरे पहाता भाई वैद्य बरोबर साने गुरुजी सेवा पथकात जी २/३ शिबीरे केली त्यात शिबीर कसे आयोजित करावे हे मी शिकलो. गुरुवार पेठेतील चाळीत रहाणारा भाई, घोरपडी पेठेत वन बीएचके च्या फ्लॅट मध्ये रहाणारा भाई, तोरणानगरमध्ये रहाणारा भाई अशी अनेक रूपे समोर येतात. भाईचे जाणे व मास्तरांचे जाणे म्हणजे मी दुसरे पोरकेपण मानतो. जाणारा तोल सावरणारा चुकते पाऊल फिरवणारा भाईसारखा वडीलधारा स्नेही माझ्या आयुष्यातून गेला हे मला जाणवेलच. पण तुम्हां दोन्ही अपत्यांना भाईची आठवण येणार. सुदैवाने दिलेला वसा डॉ. अभिजीत त्याच्या परीने जपतो आहे. हाच

आनंद भाईला कार्ल मार्क्स स्वर्गात स्वागत करायला उभा आहे. आपल्या जवळचे जग आनंदी ठेवणे हीच भाईला खरी श्रद्धांजली.

आपला,

पुरुषोत्तम शेठ

प्रति,

डॉ. वैद्य

स.न.वि.वि.

आपले वडील, देशाचे एक धडाडीचे अग्रणी स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी

१. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात

२. हैद्राबाद मुक्ती संग्रामात

३. गोवा मुक्ती संग्रामात व

४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत नेते म्हणून भाग घेतला. लाठ्या/काठ्यांचा मार खाल्ला, तुरुंगवास भोगला. ते सच्चे स्वातंत्र्य सैनिक होते.

५. स्वातंत्र्यानंतर ते महाराष्ट्राचे गृहमंत्री म्हणूनही महाराष्ट्राची सेवा केली. पुण्याचे महापौर पदही भूषविले. राष्ट्रसेवादलाचे राष्ट्रीय पातळीवरचे, अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळली.

भा. भाई हे स्वत:चे मोठेपण, विसरून सर्व सामान्य कार्यकर्त्यात, मित्रत्वाचे नात्याने ते सर्व सामान्यामध्ये, स्वत:ला विसरून बरोबरीच्या नात्याने, बोलत, वागत त्यांचे, मित्र/सल्लागार बनत.

मा. भाई समाजवादी पक्षाच्या कामासाठी यु.पी/बिहार/उत्तरप्रदेश आरामात ही दौरा करीत. सध्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे, या प्रश्नासाठी महाराष्ट्रभर त्यांनी सभा घेतल्या. एक मासिक चालविले.

ते माझे सच्चे/उमदे/स्वभावाने आनंदी असे मित्र होते. त्यांच्या जाण्याने, मला तीव्र यातना झाल्या. तुम्हास तर दु:खाचा डोंगर कोसळला असेल, राज्याचे न भरून निघणारे नुकसान झाले.

आम्ही इर्लेकर कुटुंबिय, आपल्या दु:खात सहभागी आहोत. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो!

आ. विश्वासू,

य. बी. इर्लेकर, बीड

प्रति,
प्रिय डॉ. अभिजीत

भाई गेले हे ऐकून अत्यंत वाईट वाटले. मन उदास झाले. आपल्या फॅमिलीत एवढा मोठा, सर्वांना प्रिय राज्यभर एवढे मोठे व्यक्तिमत्त्व दुसरे झाले नाही.

भाई हे नाव उच्चारताच समोर सोज्वळ, सात्विक, प्रेमळ, निरागस तेजस्वी चेहरा दिसतो.

भाई म्हणजे सर्वांच्यावर प्रेम करणे, मदतीला धाऊन व इतरांच्या अडचणी सोडविणे, कोठेही अन्याय झाला, काम अडली की भाई पुढे होऊन ती सोडविणार.

भाईंनी आयुष्यभर गरीबांची, अन्यायग्रस्तांची बाजू घेऊन त्यांचे प्रश्न सोडविले व त्यासाठी वेळोवेळी आंदोलन करून त्यांना न्याय मिळवून दिला.

अनेक आंदोलनात त्यांनी लाठ्या खाल्या आाहेत. तुरुंगवास भोगला आहे.

जनता पार्टी, समाजवादी जनपरिषद, राष्ट्र सेवा दल या संस्थांमध्ये त्यांनी अनेक महत्त्वाची पदे भूषवली.

समाजातील वंचित, उपेक्षितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर त्यांनी संघर्ष केला.

एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, ग.प्र. प्रधान, भाई वैद्य, बाबा आढाव ही समाजवादी नेते मंडळी सर्वांची आवडती प्रेरणादायी असून ती आपल्या महाराष्ट्राची भूषण आहेत. भाई राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते.

गोवा मुक्तीसंग्रामात शिरूभाऊ लिमये यांच्या बरोबर संग्रामात भाग घेतला होता.

विविध पुरस्कारांनी भाईंचा गौरव झाला आहे.

भाई पुणे शहराचे महापौर होते. महाराष्ट्र राज्याचे गृहराज्य मंत्री होते.

भाई ही महाराष्ट्राची, देशाची शान होती.

असा भाई होणे नाही!

अभिजीत तू भाईंचा सुपूत्र आहेस. तू ही असाच मोठा हो.

कुमार भाऊ
एम. के. देशपांडे,ठाणे (प)

मा. श्री. डॉ. अभिजित वैद्य,
पुणे
महोदेय,

आपले वडील व ज्येष्ठ समाजवादी विचारवंत भाई वैद्य यांचे आकस्मिक निधन झाल्याची वार्ता समजली आणि आपल्या कुटुंबावर व संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. त्यांनी केलेले कार्य हे न विसरण्यासारखे आहे.

ते आपल्या जीवनात राष्ट्र सेवादलाचे माजी अध्यक्ष, महामंत्री, महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री पुणे नगरीचे माजी महापौर तसेच अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेचे माजी अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र व देश पातळीवर आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे.

जरी ते आज आपल्यात नसले तरी त्यांच्या कार्याने व विचाराने आमच्या मनात कायमपणे जिवंत आहेत. त्यांच्या आकस्मिक जाण्याने वैचारिक क्षेत्रामध्ये एक पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही न भरून येणारी आहे.

अध्यक्ष साने गुरुजी शिक्षण संस्था, कुरुंदवाड, सर्व संचालक मंडळ, व मुख्याध्यापक, साने गुरुजी विद्यालय, कुरुंदवाड सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांचे वतीने अशा या थोर समाजवादी लढवय्या विचारवंतास भावपूर्ण श्रद्धांजली...

साने गुरुजी शिक्षण संस्था कुरुंदवाड, ता. शिरोड, जि. कोल्हापूर

प्रति,

डॉ. अभिजित वैद्य

देशाचा स्वातंत्र्य लढा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या आणि समताधिष्ठित समाजरचनेसाठी अखेरपर्यंत संघर्ष असणारा नेता आज महाराष्ट्राने हरपला आहे.

आदरणीय भाईंचा आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सुवर्ण पान ठरलेल्या सातारा प्रतिसरकारची राजधानी असलेल्या कुंडल गावचा ऋणानुबंध क्रांतिअग्रणी जी. डी.बापू लाड ह्यांच्यामुळे खूप जुना आणि जिव्हाळ्याचा होता. त्यामुळेच बर्धन ह्यांचा 'क्रांतिअग्रणी पुरस्कार २०१३' ने कुंडल येथे गौरव करण्यात आला होता, त्यावेळी आदरणीय भाईंनी मांडलेले स्फूर्तिदायी विचार आजही कुंडल आणि कुंडल परिसरातील जनता विसरलेली नाही. इतकेच नव्हे तर क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड ह्यांच्या मृत्यूनंतर फेब्रुवारी, २०१५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'जी. डी. बापू लाड : आत्मकथन - एक संघर्ष यात्रा' ह्या ग्रंथासाठी त्यांनी प्रदीर्घ व अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लिहिली होती.

अशा तत्त्वनिष्ठ आदरणीय भाईंना कुंडल ग्रामसंसद, क्रांती उद्योग व शिक्षण समूह, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड विचार व कार्यशक्तीच्यावतीने कुंडल ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मंगळवार, दि. ३ एप्रिल, २०१८ रोजी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आपल्या कुटुंबाच्या दु:खात मी व्यक्तीश: आणि क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड विचार व कार्यशक्तीचे सर्व कार्यकर्ते सहभागी आहोत. आदरणीय भाईंच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच विनम्र प्रार्थना! आदरणीय भाईंना विनम्र अभिवादन ! आपला

अरुण लाड, कुंडल.

प्रति,
डॉ. अभिजित वैद्य,
आरोग्यसेना प्रमुख
यांस,

भाईंच्या निधनाने आपल्या कुटुंबियांना झालेल्या दु:खात आम्ही युनियनचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सभासद सहभागी आहोत.

देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या आणि स्वातंत्र्यानंतर सामान्य माणसाच्या हिताची भूमिका घेणाऱ्या साथी, जयप्रकाश नारायण, मधु लिमये, एस. एम. जोशी या विचारवंतांसोबत भाईंनी आपल्या आयुष्यातील मोठा कालावधी घालवला.

स्वातंत्र्यपूर्व व त्यानंतरच्या काळात पुण्याला सर्वात मोठा रोजगार देणारा उद्योग म्हणजे संरक्षण उद्योग. या उद्योगातील कामगारांना संघटीत करण्याचे काम साथी, एसेम, नानासाहेब गोरे, विनायकराव कुलकर्णी, किशाभाऊ पटवर्धन यांनी केले, पुढे ही धुरा बा. न. राजहंस यांनी पेलली.

साथी, एसेमांच्या निधनानंतर बा. न. राजहंस व नानासाहेबांचेही ३ वर्षाच्या कालखंडात निधन झाले. परंतू संरक्षण कामगारांच्या फेडरेशनमध्ये कोणतेही पद नसताना भाईंनी पुण्यातील संरक्षण कामगारांच्या विविध संघटनांना तसेच फेडरेशनला कधीही अंतर दिले नाही.

भाईंच्या जाण्याने आमचा मार्गदर्शनाचा हा झरा आता आटला आहे. संरक्षण उद्योगाच्या खाजगीकरणावर अभ्यासपूर्ण व तडफेने बोलणाऱ्या भाईंची आता आम्हास नक्कीच उणीव भासेल. सध्याच्या हिंदुत्ववादी व भांडवलदार धार्जिण्या सरकारचा तर्काच्या कसोटीवर विरोध करणारे प्रखर समाजवादी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले हेच वास्तव स्वीकारणे जड जात आहे.

त्यांनी पेटविलेली ज्योत आरोग्य सेनेच्या माध्यमातून आपण तेवत ठेवलेली आहेच; ति कार्य अजून जोमाने पुढे जावो व त्यातून गरजवंतांच्या आरोग्य स्वस्थाबरोबरच देशाचे सामाजिक स्वास्थ्य ही सुधारावे, हीच भाईंना खरी आदरांजली ठरेल!

आपला साथी
सलीम सय्यद सरचिटणीस, एमटीएसएसडी वर्कर्स युनियन, खडकी

प्रति,
मा. डॉ. अभिजित वैद्य
पुणे,
यांना सप्रेम नमन...

स्वातंत्र्य सैनिक, थोर विचारवंत, समाजवादी नेते, कृतिशील मार्गदर्शक, माजी गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मा. भाई वैद्य यांचे दु:खद निधन झाल्याचे वृत्त समजले. अतिव दु:ख झाले.

वैद्य काकांचे आणि माझे पप्पा ॲड. रावसाहेब शिंदे यांचे अतिशय जवळचे व जिव्हाळ्याचे संबंध होते. आमच्या कुटुंबातीलच ते होते. पप्पांच्या अनेक कार्यक्रमांना काका प्रमुख पाहूणे तथा अध्यक्ष म्हणून पुण्यात व श्रीरामपूर येथे त्यांची उपस्थिती आम्हाला प्रेरणादायी ठरली. दि. २५ जानेवारी २०१८ रोजी एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या पप्पांच्या स्मृतीदिनानिमित्ताने पुरस्कार सोहळ्यासाठी ते अध्यक्ष म्हणून लाभलेले होते. त्यावेळी त्यांनी पप्पांच्याबद्दल आणि मम्मींच्याबद्दल काढलेले विचार आम्हां कुटुंबियांना एक प्रकारे आधारच मिळाला. विशेषत: मम्मींच्या कार्यक्रमातही काका उपस्थित होते. पप्पांच्या सहस्त्रचंद्र दर्शन या कार्यक्रमाचे वेळी प्रकाशित झालेल्या प्रेरणापर्व या ग्रंथात काकांचा नैतिकतेचा ध्यास हा महत्त्वपूर्ण लेख आहे. काकांच्या लेखामुळे या ग्रंथाची नक्कीच गुणात्मक वाढ झालेली आहे.

काकांनी लिहिलेल्या वर्तमानपत्रातून, लेखातून, ग्रंथांतून आणि व्याख्यानातून त्यांनी समाजप्रबोधनाची ज्योत प्रज्वलित केली, याची जाणीव महाराष्ट्रातील सर्वांनाच आहे. गोवामुक्ती आंदोलन आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील काकांचे समर्पण अतिशय मोलाचे असून ते सर्वश्रुत आहे.

असे थोर व्यक्तीमत्त्व काळाच्या पडद्याआड अचानक गेल्यामुळे तुम्हांस व तुमचे कुटुंबिय आणि परिवारावर दु:खाचा डोंगरच कोसळला आहे. नियतीपुढे कुणाचेच काही चालत नाही. आपणा सर्वांना या दु:खातून सावरण्यासाठी परमेश्वर आपणांस बळ देवो ही प्रार्थना. आपल्या सर्वांच्या दु:खात मी व माझी मम्मी शशिकलाताई शिंदे, माझी पत्नी डॉ. प्रेरणा शिंदे, माझी बहिण सौ. शुभा ब्रद्रिनाथ देवकर आणि ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठान श्रीरामपूर या संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आम्ही सर्व सहभागी असून काकांना श्रद्धांजली अर्पण करतो.

गतात्म्यास सदगती लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

आपला विश्वासु
डॉ. राजीव शिंदे

मृत्युंजयी, करुणासागर, चरित्र्यसंपन्न कै. भाई वैद्य
वाणी अमृत तयांची वदले मग देवदूत ।
असावी स्वकर्तव्याची जाण कर्म करता करता अखेर ।
जाईल कुडीतून प्राण ।

हे भाईंचे तत्त्वज्ञान, खरोखर सत्कार्य करीत असतानाच, भाईंच्या कुडीतून प्राण निघून गेला. शेवटी शरीर नाशवंत असते. त्याची कितीही काळजी घेतली तरी ते वयानुसार जराजर्जर होत जाणार. आपल्याला कितीही वाटले, की भाईंनी वयाची शताब्दी पूर्ण करावी – तरी नियतीचा खेळ अगाध असतो. दि. २ एप्रिल सायंकाळी वयाच्या ९० व्या वर्षी भाईंची वाणी मूक होत गेली; पण शेवटच्या क्षणापर्यंत भेटायला येणाऱ्या मित्रांसमोर भाई समाजवादाचा विचार पोटतिडिकेने मांडत होतेच, अखेर भाईंचे दु:खद निधन झाले... तरीही त्यांच्या अखंड कार्याच्या असंख्य आठवणी मागे आहेत; म्हणून भाई मृत्युंजयी ठरतात.

प्राचीन काळापासून आजतागायत होऊन गेलेली 'देवगुणी' माणसं आज देवत्वाला पोहोचली. त्यांची पूजा होऊ लागली.भाईंची वाटचाल देखील त्याच मार्गाने झाली असे मला वाटते; कारण भाई 'देव' न मानणारे 'देवमाणूस' होते. आपल्या ध्येयवादी वृत्तीपासून आयुष्यभर तसूभरसुद्धा ते बाजूला गेले नाहीत. मागे हटले नाहीत.

थोर समाजवादी विचारवंत, अत्यंत बुद्धिमान, करुणासागर, स्मरणशक्तीचा विश्वकोश, कृतिशील कायकर्ते, राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण करणारे, अजातशत्रू, वंचितांचे कैवारी, उच्च दर्जाचे नेतृत्व, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे कर्तव्यकठोर असूनही स्वभावात ओलावा असणारे, गर्दीत रमणारे, सतत संघर्ष करणारे, पुरोगामी, . अशी कितीही विशेषणे भाईंना लावली तरीही त्यांना समजून घेण्यात माझी कुवत कमी पडते.

निवृत्तीनंतर अण्णांच्या प्रेरणेने मी गेल्या १० वर्षांपासून अखिल भारतीय समाजवादी सभेला जोडली गेले. मी सभेला शक्य तेव्हा जाते. थोडाफार खारीचा वाटा उचलते, तेथे अखंड कार्यमग्न असलेल्या शिक्षणमहर्षींना मनोमन नमस्कार करते. दरम्यान माझ्यातील संवेदनशील लेखिका भाईंचे निरीक्षण करीत राहिली, प्रसंगानुरूप त्यांच्यावर कविता करीत राहिली. त्यांचे शब्दचित्र रेखाटत राहिली... आणि भारावून गेली. मी काही थोरबीर नाही, पण मला भावलेले भाई असे होते . . .

समाजातील ज्येष्ठ, श्रेष्ठ, पुढारी व अनेक विचारवंत यांचे भाई आदरस्थान तर होतेच, याशिवाय तळागाळातल्या सामान्यांचे भाई होते तीर्थस्थान! त्यांनी नाही केला कधी आपपर भाव, त्यामुळे प्रत्येकाला वाटायचे भाई आपलेच आहेत, सदा बघावे तेव्हा भाईंच्या भोवती माणसांचा गराडा असे. भाईंच्या मुखातून बाहेर पडलेले 'अमृतबोल' झेलण्याची प्रत्येकाची धडपड चाले आणि भाईसुद्धा प्रत्येकाची दखल घेत, त्यांचेही विचार, गाऱ्हाणे शांतपणे ऐकत व त्यावर मार्गही सांगत. भाई म्हणजे 'मूर्तिमंत परीस!' त्यांच्या क्षणभर मिळणाऱ्या सहवासात, त्यांच्या तेजस्वी विचारांनी वातावरण कणभारित होई. मन कसे समृद्ध होऊन जाई. भाई नुसते समस्यांवर उपाय

सांगत नसत, तर अनुयायांनी सांगाती घेऊन संघर्ष, सत्याग्रह, आंदोलने करीत. त्यापायी ते अनेकवेळा तुरुंगातही गेले. लाठीमारही सहन केला. नेता बरोबर असला की मरमगळलेली मनंसुद्धा प्रज्वलित होतात. तशाच त्यांच्यामागे झुंडीच्या झुंडी जात.

''भाईंचे वक्तृत्व ओघवते, सुलभ आणि स्वाभाविक; त्यात असायची सागराची खोली! ज्ञानाचा सागरच जणू! भाई म्हणजे संदर्भकोशांची खाण! त्यातील माणिकमोती वेचायचो आम्ही कानात प्राण आणून! आम्ही कधी न ऐकलेले न वाचलेले!` वेचून ठेवले आम्ही संदर्भ पोतडीत, ठेवले जपून! ''भाई म्हणजे कृतिशील कार्यकर्ते अन् नेते! नव्हते केवळ बोलके, बोलघेवडे सुधारक!...अखंड कृतिशीलतेमुळे त्यांची चालायची अखंड भ्रमंती! आज इथे तर उद्या तिथे. कुठलेही वाहन चालायचे त्यांना, त्यात नसे बडेजाव! विमान, रेल्वे, बस, कार, रिक्षा अन् बैलगाडीही; कारण 'मी' पणाचा लवलेशही नव्हता त्यांच्या स्वभावात!''

"कुणी विनाकारण दुखावले जाऊ नये म्हणून भाई सर्वांशीच मार्दवाने बोलत; पण त्यात नसे गुळमुळीतपणा. सगळे काही पारदर्शक...प्रसंगी रोखठोक बोलत. कुणाचा मुलाहिजा न ठेवता शासनाला तर धारेवरच धरत, त्यांच्या चुका, त्रुटी त्यांच्याच घशात घालत... तरीही ते होते अजातशत्रू!'

"आयुष्यभराच्या कार्यप्रणालीतून व वाचनाच्या व्यासंगातून त्यांच्या विचारांची बैठक तयार झालेली होती हे जाणवे, त्यांनी कमावलेल्या विचारधनाची केवढी संपत्ती होती, त्यांच्याजवळ! अबब! मोजदाद न करता येणार नाही इतके श्रीमंत होते ते! हे विचारधन ते मुक्तहस्ते वाटत असत आणि हे दानाचं समाधान त्यांच्या मुखकमलावर झळकत असे.'

"काय होतं त्यांच्या पाठिशी ...नेमक्या प्रश्नांची जाण, प्रश्न सोडविण्याचा ध्यास! समाजाची बांधिलकी, वंचितांची पाठराखण, अपरिग्रहवृत्ती, निःस्पृहता, सर्वस्व झोकून देण्याची मानसिकता, मृत्युंजयी भाई, स्वार्थाच्या बाजारबुणग्यात लखलखत होता त्यांचा मानवताधर्म! जातिविरहित समानता! सामान्यांचा कळवळा!''

फक्त अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेबाबत उल्लेख करायचा असेलतर भाईंनी गेल्या काही वर्षांत शासनाने राष्ट्रीय उत्पन्नापैकी किमान सहा टक्के खर्च शिक्षणावर करावा व केजी टु पीजी, म्हणजेच बालकाचे वय वर्षे तीन ते १८ पर्यंत सर्वांना मोफत, समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हा आग्रह धरला होता. कमी उत्पन्न गटातील मुलांना जवळच्या पण त्यांना हव्या असणाऱ्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी पंचवीस टक्के आरक्षण असावे हाही प्रश्न धसास लावून धरला होता, त्याला हळूहळू यश येऊ लागले आहे.''

- कृतज्ञता - भाई स्वत: एवढे मोठे, असामान्य असूनही सर्वसामान्य कार्यकर्त्यांची ही दखल घेत, त्यापैकी मी एक आहे. मला त्यांच्याबद्दल ऋण व्यक्त केलेच पाहिजे.

- २०१३ साली माझ्या यजमानांचे आकस्मिक निधन झाले, त्यावेळी आमचे कुटुंब हादरून गेले होते. त्या

दु:खद प्रसंगी भाई आमच्यासारख्या सामान्यांच्या घरी आले. आमचं त्यांनी सांत्वन केलं. अध्यापक सभेच्या सर्व सदस्यांना फोन करून, त्यांच्यासह वैकुंठात हजर झाले, इतकेच नव्हे तर साने गुरुजी स्मारकावर शोकसभा घडवून आणली. मोठ्या भावासारखे माझ्या पाठिशी उभे राहिले. मला सावरले, सर्वांनी मिळून मला हळूहळू दु:खातून बाहेर काढले. केवढी ही आभाळमाया!

– माझी सभेला येण्याजाण्याची अडचण भाईंनी ओळखली. कोणताही सभा-समारंभ संपला की, भाई मला आवाज देत, आपण बरोबर जाऊयात, खैरेताई त्यांच्या बरोबर असायच्याच. भाई मला प्रथम घरापर्यंत सोडत. माझा चालताना तोल जातो म्हणून मला विनोदाने 'पडके' असे म्हणत.

माझ्या पतींचे निधन झाल्यामुळे आम्ही कुटुंबीय माझी पंचाहत्तरी करण्यास उदासीन होतो पण भाई, रामचंद्र जाधव व सहकाऱ्यांनी मिळून माझी पंचाहत्तरी साजरी केली.

– माझ्या तिन्ही नातवंडांच्या लग्नानिमित्त झालेल्या स्वागत-समारंभास भाई सहकाऱ्यांसह उपस्थित राहिले. मुंबईच्या प्रवासाचा तर त्यांना खूप त्रास झाला; पण त्याबद्दल त्यांनी कधीही उच्चार केला नाही, उलट आमचे कौतुक केले. आमच्या सर्वाचे एक समाजवादी कुटुंब आहे, असे ते मानत.

– माझ्या दोन पुस्तकांना भाईंनी मौलिक प्रस्तावना लिहिल्या, त्याचा मला अभिमान वाटतो.

– कुणी स्नेही-कार्यकर्ता आजारी असल्यास भाई स्वत: त्यांच्या घरी जात व विचारपूस करीत, त्याप्रमाणे माझ्याही घरी येत, त्यावेळी आमचे मन कृतज्ञतेने भरून येई.

हे सर्व कसं विसरलं जाईल भाई! आम्ही आपल्या ऋणात कायम राहू.

श्रीमती राजकुँवर सोनवणे

भाई वैद्य, निरागस, निर्मोही, स्वच्छ आणि सचोटीच्या साजधुरिणांच्या बिरादरीतला अखेरचा कार्यकर्ता!!
भाई वैद्य यांना लहानपणी पाहिलं होतं. वडिलांशी त्यांची चांगली ओळख होती. आमच्या घरीही आलेले आहेत.

गुंडगिरीने झाकोळलेल्या स्थानिक आणि देशभरच्या मवाली राजकीय अवकाशात त्यांची उणीव सतत भासत राहील.

भाई वैद्य यांना आदरांजली.

सलील वाघ

आधरणीय भाईंची उणीव जाणवत राहणार. भावपूर्ण श्रद्धांजली.

राजा दिक्षीत

डॉ. अभिजित,

आपले प. पूज्य पिताश्री भाई यांचे निधनाची बातमी स्थानिक वर्तमानपत्रातून कळली. श्री. भाई आमचे परम मित्र होते, त्यांचे व आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. रामभाऊ तुपे यांचे घनिष्ठ संबंध व प्रेम होते. त्यामुळे वेळोवेळी त्यांचे आमच्या संस्थेत येणे व्हायचे.

भाई स्वतंत्र सैनिक असल्याने आमच्या संस्थेचे सभासदपण होते. त्यांच्या निधनाने आम्हा सर्वांना खूप दु:ख झाले असून आम्ही सर्वजण आपल्या कुटुंबात सहभागी आहोत.

इश्वर भाईंच्या आत्म्यास सद्‌गती व शांती देवो हीच प्रभु प्रिते आम्ही मागणी करीत आहोत.

भोगिलाल शहा, उपाध्यक्ष, अ.भा. गोवा स्वा.सं. सै.

डॉ. अभिजीत वैद्य, पुणे,

यांस,

स.न.

आपले पिताश्री व ज्येष्ठ समाजवादी नेते मा. श्री. भाई वैद्य यांचे दिनांक ०२.०४.२०१८ रोजी दु:खद निधन झाल्याचे वृत्त समजले. या वृत्ताने कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या परिवारास मोठ्ठा धक्का बसला आहे.

वडील म्हणजे शिस्त व संस्कारांचा अमोल ठेवा. त्यांच्या निधनामुळे आपणास व आपल्या कुटुंबियांस दु:ख होणे स्वाभाविक आहे. आपल्या जीवनात वडील जरी आज नसले तरी त्यांचे संस्कार, आशिर्वाद आपल्या पाठीशी आहेत.

साहेबांची जीवनशैली व राहणीमान अत्यंत साधे होते. माणसे जोडण्याचा त्यांचा छंद होता. त्यांनी जीवनात अनेक व्यक्तींना आपलेसे केले. त्यामुळे ते समाजप्रिय व्यक्तीमत्त्व होते. नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती त्यांनी अंगीकारली होती. त्यांच्या जाण्याने उत्तम मित्रास आम्ही मुकलो आहोत.

साहेबांचे व माझे सुमारे ५० वर्षाचे दृढ संबंध होते. ते समाजवादी होते परंतु कडवे समाजवादी नव्हते. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या आकस्मिक निधनाने आपणास झालेल्या दु:खाची आम्हास जाणीव आहे. नियतीपुढे कोणाचेच चालत नाही, जीवन हे असेच क्षणभंगुर आहे.

आपल्या परिवारास झालेल्या दु:खात सर्वसाधारण सभेचे सदस्य, कार्यकारी मंडळ, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, संस्थेचे सर्व घटक सहभागी आहेत.

कै. वैद्य साहेब यांच्या आत्म्यास ईश्वर चिर शांती देवो हीच प्रार्थना!

आपला

वालचंद देविचंद संचेती, कार्याध्यक्ष, कॅम्प एज्युकेशन सोसायटी, पुणे.

आदरणीय सर,

नुकताच भाईच्या निधनाची बातमी पाहिली. आपल्या व्यक्तीगत आयुष्यात ही अत्यंत दु:खद घटना आहे तसेच समाजवादी चळवळीसाठी देखील मोठी दु:खदायक आहे.

आपल्या या दु:खात मुंगसे कुटुंब सहभागी आहे. भाईंचे विचार पुढे नेणे ही त्यांना आदरांजली आहे. आमच्यावतीने भाईंना ती समर्पीत करीत आहोत.

मुंगसे परिवार.

आदरांजली सभेत मी शेवटपर्यंत थांबू शकलो नाही. क्षमस्व. आदर्शवत, आदरणीय भाईंना माझा अखेरचा विनम्र प्रणाम. त्यांची समाजवादावरील निष्ठा, वैचारिक क्षमता, स्पष्टता, मनाचा मोठेपणा, पारदर्शीपणा, संघटन कौशल्य हे सर्वच आदर्शवत होते. डाव्या, पुरोगामी प्रवाहांची एकजूट झाली पाहिजे या बद्दलची त्यांची आत्यंतिक तळमळ विशेष स्फूर्तीदायी होती. आपण सर्वांनी त्यांची शिकवण प्रत्यक्षात आणायला हवी; तीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.

डॉ. अनंत फडके.

एका लढवय्या तरुणाला भावपूर्ण श्रद्धांजली!!!

जेष्ठ समाजवादी नेते, माजी गृहराज्य मंत्री, समाजवादी पार्टी (इं) चे संस्थापक - राष्ट्रीय प्रमुख आदरणीय भाई वैद्य (वय वर्ष ९०) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने पुण्यात दु:खद निधन झाले. भाईंनी पुण्याचे नगरसेवक, महापौर ते महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री असा राजकीय प्रवास करीत असताना आपला समाजवादी विचार कधीच सोडला नाही. त्यांनी कधीच जाती-पातीला थारा न देता, अखंड आयुष्यभर एका सरळ रेषेत चालून गोरगरिबांना, वंचितांना आणि कष्टकऱ्यांना आधार दिला. आयुष्यात भाईंनी अनेक संकटे पाहिले आणि त्याच्याशी चार हात कसे करायचे याची प्रेरणा म्हणजे भाई. तरुणालाही लाजवेल असे काम भाई आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत निस्वार्थीपणे जनसामान्यांसाठी, तळागाळातील जनतेसाठी करीत राहिले तसेच भाईंनी संपूर्ण जीवनात आपल्या तत्त्वांशी आणि समाजवादी विचारांशी कधीही तडजोड केली नाही त्यामुळे भाईंना महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरात मानणारा एक वर्ग आज खरंच पोरका झाला. त्यांनी जनमाणसांसाठी आणि त्याच्या हक्कासाठी मोर्चे, सत्याग्रह, धरणे तसेच विविध सामाजिक प्रश्नांना आंदोलनाद्वारे वाचा फोडली. त्यांची वैचारिक बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती आणि जीवनातील संघर्ष हा भाईंच्या रूपाने कायम स्मरणात राहील. परंतू भाईंच्या जाण्यामुळे पुरोगामी महाराष्ट्रात तयार झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. असा साधा, सरळ, सज्जन माणूस होणे नाही. आदरणीय भाई वैद्य यांना भावपूर्ण श्रद्धांजली!!! आपला विश्वास - **गणेश थोपटे (मुक्त पत्रकार, पिंपरी चिंचवड शहर)**

सविनय जयभीम!

भाई, माझ्या कॉलेज जीवनातील समविचारी मित्र परिवारात आदरणीय व्यक्तीमत्त्व राहिले. निस्पृह राहीले, मंत्रिमंडळात असताना लाच नाकारणारे, लाच देणारे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन यांना अटक करणारे एकमेव स्वतंत्र भारतातील मंत्री होय. हे रेकार्ड अजून कोणी ब्रेक केलेलं नाही. मंडल आयोगाचे समर्थक राहीले. तर्कतीर्थशास्त्रींना वादातून खनखवले होते. कॉलेजच्या या कालावधीत आम्ही काही मित्र त्यांना भेटलो असता त्यांनी आम्हास लोकशाही तत्त्व की रुजवण्यासाठीची संविधानिक आधार याविषयी बोलले. मी कॉलेजमध्ये प्राध्यापक झाल्याने त्यांना प्रा. किरण सुरवसे यांच्यावतीने बोलवले होते. भारताच्या स्वतंत्रता सुवर्ण जयंतीचे प्रमुख पाहूणे म्हणून बोलावले होते. त्यांनी भारताचा स्वतंत्र लढा हा तीन स्तरावर झाला असे सांगितले. सामाजिक म. फुले ते बाबासाहेब आंबेडकर, राजकीय रानडे ते म. गांधी, शस्त्रक उमाजी नाईक ते सुभाषचंद्र अशी मांडणी केल्याचे अजून आठवते.

इतर गप्पांमध्ये बोलताना मी म्हणालो, भाई, आपणपोलिसांना फुल पँट केल्याने त्यांचा मुलगी पाहण्याचा भावदेखील वाढवला आहे. त्यांचे हास्य अजूनदेखील आठवते. अशा सच्चा समाजवादी नेत्यास विनम्र भावपूर्ण अभिवंदन.

डॉ. अरविंद शेलार

भावपूर्ण श्रद्धांजली

समाजवादी विचारांचा पुण्यातील आणखी एक तारा निखळला

जेष्ठ समाजवादी नेते/माजी गृहराज्यमंत्री १९४२ च्या चलेजाव चळवळीतील त्यावेळचे तरूणफळीचे नेते/राष्ट्र सेवादलाचे प्रमुख/पुण्याचे मा. मेयर/पणे लेबर युनियन या कामगार संघटनेचे मा. सरचिटणीस/आणीबाणी विरोधात १९ महिने येरवडा जेलमध्ये तुरूंगवास भोगलेले/शेतकरी/शेतमजूर/झोपडपट्टी वासीयांच्या न्यायहक्कासाठी लढणारे नेते मा. भाई वैद्य यांचे निधनामुळे आम्ही समाजवादी विचारांचे/सेवादलाचे सैनिक/नाहीरे वर्गासाठी लढणारे कार्यकर्ते पोरके झाले असून कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. स्व. भाईंना भावपूर्ण श्रद्धांजली.

शोकाकुल

प्रताप गुरव–राष्ट्रसेवादल पिंपरी–चिंचवड/अध्यक्षओबीसी महासंघ पिंपरी–चिंचवड/उपाध्यक्ष बारा बलुतेदार महासंघ महाराष्ट्र.

आज भाई वैद्य गेले. राष्ट्र सेवा दल आणि समाजवादी-पुरोगामी चे नेते आणि आधारस्तंभ - भाई या नावानेच सुपरिचित असलेले भाई आज गेले. आयुष्यभर समाजवादी आणि पुरोगामी विचारांवर निष्ठा ठेवून कणखरपणे पण सर्वांना बरोबर घेऊन त्यांनी महाराष्ट्रभर काम केले. त्यांनी बेचाळीसच्या चलेजाव चळवळीत भाग घेऊन स्वातंत्र्य आंदोलनात पदार्पण केले. त्यावेळी ते अवघे १४-१५ वर्षाचे होते. त्याच उर्मीने पुढे सेवादलात कार्यरत राहिले. गोवा आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, आणीबाणीविरोधी आंदोलनात भाग घेतला. अनेक वेळा कारावास भोगला. राज्य शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेले भाई अभ्यासू म्हणून ओळखले जात. मी त्यांची जागतीकरण-खाजगीकरण या विषयावरील अभ्यासपूर्ण, त्यातील धोके दाखविणारी व्याख्याने ऐकली आहे. विषमता आणि बेरोजगारी आपल्याला आता दिसून येत आहे. आर्थिक बाबतीत समतोलपणा आवश्यक आहे असे ते प्रतिपादन करत असत.

जनता पक्षाच्या सरकारात त्यांनी गृह राज्य मंत्रीपद समर्थपणे सांभाळले. स्मगलिंग विरोधात त्यांनी कठोरपणे पावले उचलली. त्यांना लाच देण्याचा प्रयत्न करणाऱ्या एक कुविख्यात गुंडाला रंगेहात पकडून दिल्याची घटना आजही ताजी आहे. धार्मिक राजकारणाच्या भयानक गुंगीत देश सापडला असताना भाई यांच्या सारख्या ध्येयवादी, पुरोगामी नेत्याचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. भाईंना भावपूर्ण श्रद्धांजली.

अनिल खांडेकर

Abhijit,

This is Sanjay Nagarkar (Son of Vasundhara Nagarkar who worked with your mom if you remember. We stayed in PMC Colony No. 7 in Ghorpade Peth)

I read in sakal about Bhai and wanted to talk to you so I called Poona Hospital and they gave me your mobile no. As 91-9822090755 but it didn't ring although I called no of times. I don't have your home phone no anyway.

Bhai was and will remain inspiration to all this current and future generations to come.

As someone said, Death lays its icy hand on poor and rich alike. So whatever was we destined to be associated with a person is what we do.

Now you are responsible to Prachi and co along with your social and other responsibilities. In a way you are following a path of Bhai it seems...

I will try to call you both when I could connect from here. Give my regards to Prachi as well.

Hope god gives you strength to bear this grief and stand stall in coming difficult period.

If you happen to be in US it will be our pleasure to host you, Prachi and your families and catch up with so many things we missed for so many years.
Sanjay.

Dear Abhijit,

I am feeling loss of words to express my feelings which come in my mind when I amattempting to convey to you and all members of your family condolences on behalf of Pramodini. Myself and all members of our family on the sad loss of your dear father and our highly respected friend – dear Bhai Vaidya – Many memories are triggered in my mind about our friendship. Even though we were in Fergusson college during the same period it was only in September 1975. When I was posted in Hong Kong as Manager for NIA that Bhai came in my life through a letter he wrote to me expressing his condolence on the death of my father Prof. Samarth. Bhai was then Mayor of Pune and that letter showed the calibre of culture which is conspicuous by absence in the community of politicians.

After sad loss of our dear friend and teacher Prof. Pradhan, Bhai had been a source for me for intellectual exchange of views on the topics of common interest – particularly on the themes of political and Economic scenario in India and the world. Only three weeks back, when I phoned him after reading the latest issue of China News, he as usual started the conversation in his gentle norm and alerted me on the development of his health problem. But there was no indication of depression or anxiety and on the contrary he was enthusiastic and told me that we can look forward for now discussions at your new flat, which will make it easy for me to see him. I was looking forward for this pleasure which destiny snatched away. Prof. Pradhan always used to admire Bhai’s stubborn loyalty to his principles and convictions. There is so much to talk about him arising from my own talks with him on diverse topics during the last five-six years.

Even though unexpected development has snatched awy from me the pleasure of meeting him in your new flat, I look forward to meet you in due course as per your convenience at your new flat to pay my regards to our dear respected friend from our generation. It will not be talk of condolence but celebration of the life of one of the most committed democtatic, socialist humanist of OUR

GENERATION – You and your colleagues from your generation have to fulfil the mission for which dear Bhai dedicated his life.
With lots of love and regards to all,
Ramesh.

Hon'ble Mr./Mrs. Dr. Abhijit & family Respected With Heartfelt Sympathy
To know your love of one, will never work your world again,
to feel the pain of never seeing the beloved face again, must be the hardest of all experiences. From the depths of my heart, I hope time heals the deep sorrow you feel. SHARING your SORROW.
yours Sincerely
Mohan Annaso Chougule & Family.

Dear Dr. Abhijit,

Very sad to hear of Bhai's almost sudden passing away. I had known him for long time through socialist parivar. It was common to run into him in the university library or Deccan bookstall in good old days.

He was one of the last campaigners of the era, who symbolized socialist values and ideals. I won't to able to see you and he family in person As I am out in Durban, South Africa.

With much admiration and fondest rememberances.

Naresh.

Abhiit & entire family,

We read the news of Bhai's demise a sad news Indeed! When we visited last, He appeared normal & In good health for his age. I guess, Destiny prevails! He has left behind his illustrious carrier. He had great acceptance for whatever was going around in Political field since the new generation has to shoulder the change & perhaps with the time desired change may take place! His honesty & ability to work with various organisations in Pune is well-known. Such people, one after another are going away a natural event! We are not in a position to have his last 'Darshan' because of my wife' health, but we send our heartfelt condolences to your entire family. **Dr. Murali Kamat.**

Dear Abhijit,

Yesterday I couldn't speak much as I was overwhelmed seeing colossal figure of BHAI lying down for his last journey. I had been fascinated by him from my very early childhood when I used to visit your home. In spite of in thick of politics in those days he always had time for few words with me, which was a tremendous moral booster for me. I immediately said "Caste doesn't matter. We all are human." I have seen him standing firm for his principals and conviction. He had never hagitated to relinquish any position if it conflicted with his moral stand. I was tremendously benefited by his teaching directly and directly and indirectly which helped me to evolve into better human being. I remember he, he had written me a congratulatory letter from prison in the dark days of emergency when we passed S.S.C. which I promptly reciprocated in spite f reservations from my parents due to suppressive atmosphere of emergency. That letter of BHAI has remained with me as a prized possession. Such person is rare to come and will be ratest in the years to come. I wish you will cope up with the loss with courage and carry his legacy forward on your able shoulders. May BHAI rest in peace.

Rajiv Sule


Sorry to hear the news. He used to come to our school often and as Mayor, he was the chief guest for our annual social gathering 1974-75 while we were in 9th std. He was regularly coming to him **"माझे बाबा"** along with Ashwin Pundalik and others in annual नुमविय.

Bhai Vaidya was a true socialist who was more social worker than a power hungry politician. Though he was Honourable Minister of State for Home in Sharad Pawar's PRF ministry, he was never found engaged in power politics. True leaders of the old generations are leaving us one by one.

May his soul rest in peace.

Abhijit I had posted this on NMV group. But you are not member of that group. Therefore I am forwarding this to you.

N.P.Deshpande.



''श्रध्देय भाई वैद्य स्मृतिग्रंथ''

राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्हा

साने गुरुजी स्मारक सिंहगड रस्ता, पुणे - ४११०३०

श्रध्देय भाई वैद्य यांचे राष्ट्र सेवा दलाला असलेले योगदान अतुलनीय आहे. दि. २ एप्रिल २०१८ रोजी भाई वैद्य यांचे निधन झाले. भाईंच्या विचारांची स्मृती सतत जागी राहावी, आपणा सर्वांना त्यांच्या वैचारिक ठेव्यातून सातत्यपूर्ण मार्गदर्शन व प्रेरणा मिळावी म्हणून 'भाई वैद्य स्मृतिग्रंथ' संकलित करण्याची जबाबदारी राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्ह्याने स्वीकारली आहे. भाईच्या जन्मदिनी दि. २२ जून २०१८ रोजी हा स्मृतिग्रंथ प्रकाशित करण्याचा मानस आहे. आपणास नम्र विनंती की भाई वैद्य स्मृतिग्रंथासाठी जाहिरात, देणगी देऊन सहकार्य करावे. धन्यवाद !

डॉ. अभिजित वैद्य — संपादक

मेहबूब इनामदार — संपादक


जाहिरातीचा दर

१. कव्हरपेज २,३,४ - रु. १००,०००/- २. रंगीत पूर्ण पान - रु. ७५,०००/-
३. रंगीत अर्धे पान - रु. ४०,०००/- ४. रंगीत पाव पान - रु.२५,०००/-
५. शुभेच्छा - रु. १०,०००/-

पानाचा आकार : २८ X २१ से. मी. • छपाईचा आकार : २८ X २१ से. मी.
मुख्यपृष्ठ : आर्ट पेपर (चार रंगी) • छपाई : ४ कलर ऑफसेट प्रिंटिंग
प्रती : ५,००० • रंगीत पाने : ९० जि.एस. एम. • साधी पाने : ९० जि.एस. एम.

कृपया जाहिरातीची रक्कम क्रॉस्ड चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवावी. चेक / डिमांड ड्राफ्ट राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्हा या नावाने काढावा. आंध्रा बँक खाते क्र. २९४११११०००१४७७, IFSC Code: ANDB0002941 • पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन नं. इ-१७९८ (पुणे) राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्हा यांना दिलेली रक्कम प्रमाणपत्र क्र. PNCIT-III/TECH/80G/326 • Dt. 08/07/20018 नुसार आयकर मुक्त आहे. आपले ऑर्डर फार्मस् खालील पत्तावर पाठवावेत.

अॅड. संपत कांबळे, मो. नं. ९४२२३६१२२० प्रमुख व्यवस्थापकीय मंडळ भाई वैद्य स्मृतिग्रंथ, राष्ट्र सेवा दल, पुणे जिल्हा, साने गुरुजी स्मारक, सिंहगड रोड, पुणे-३०.
दुरध्वनी क्र.: ०२०-२४३२०४४४, २४३३६११०



लोकनेते भाई वैद्य: अल्प परिचय

भालचंद्र सदाशिव वैद्य

✻२२ जून १९२८ - २ एप्रिल २०१८✻

✻शिक्षण- बी.ए. बी.टी. (१९५२) एम.ए. समाजशास्त्र एम.ए. राज्यशास्त्र (१९७२)✻

✻१९४३ साली राष्ट्र सेवा दलात सामील झाल्यापासून 'लोकशाही समाजवादी' विचारधारा स्वीकारली आणि अखेरपर्यंत ती निष्ठा जपली.✻

अखेरपर्यंत पुढील पदांवर कार्यरत.

✻अध्यक्ष, एस.एम.जोशी मेमोरियल मेडिकल ट्रस्ट , पुणे १९९८ पासून✻

✻अध्यक्ष, पुणे म.न.पा. सेवा निवृत्त संघ - १९७५ पासून✻

कार्य केलेली एकूण पदे

✻१९४६ साली 'काँग्रेस सोशलिस्ट पार्टी' या जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया व एस.एम.जोशी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे प्रथम सदस्यत्व. त्यानंतर समाजवादी पक्षाची जी जी रूपांतरे झाली त्यात सक्रिय सहभाग.✻

✻महापौर, पुणे - १९७४ ते १९७५✻

✻राष्ट्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया मेयर्स कॉन्फरन्स -१९७५✻

✻मंत्री, गृह आणि सर्वसाधारण प्रशासन या खात्यांचे राज्यमंत्री - १९७८ ते १९८०✻

या काळातील ठळक नोंदी–

✻पहिले मराठवाडा विद्यापीठ नामांतर विधेयक मांडले.✻

✻स्मग्लरचे सात साथीदार तीन लाख रुपये लाच घेऊन आले असताना गृहराज्य मंत्री म्हणून त्यांना पोलिसांच्या हवाली करून तुरुंगात पाठविले.✻

✻राज्य पोलिसांना फुल पँट देण्याचा ऐतिहासिक निर्णय✻

✻महाराष्ट्र सेवा निवृत्तांच्या वेतनामध्ये किमान सेवा निवृत्त वेतन आणि त्याची महागाईशी जोडणी या गोष्टी करून घेतल्या.✻

✻राष्ट्रीय महामंत्री, जनता पार्टी - १९८६ ते १९८८✻

✻राष्ट्रीय महामंत्री, समाजवादी जनपरिषद - १९९५ ते १९९९✻

✻राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्र सेवा दल - २००० ते २००२✻

✻राष्ट्रीय अध्यक्ष, भारत यात्रा ट्रस्ट, दिल्ली - २००४ पासून २०११✻

✻राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा - मे २००४ ते २०१३✻

✻अध्यक्ष, खडकी ॲम्युनिशन फॅक्टरी वर्कर्स युनियन, पुणे २०१३ पर्यंत✻

✻राष्ट्रीय अध्यक्ष, सोशलिस्ट पार्टी (इंडिया) - मे २०११ पासून२०१६✻

RNI NO. MAHMA R/2014/57536
Decl No.: SDO/Pune/SR/34/2014 Dated: 27/ 08/ 2014

Date of Publication : 15 May 2018

